ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२०/पाने १३२/किंमत ₹१०

लोकराज्य

६०

चित्र आश्वासक महाराष्ट्राचे

हीरकमहोत्सवी महाराष्ट्र

महाराष्ट्र शासन

ही दिवाळी साजरी करू या जपून, सणाचा आनंद ठेवू या जपून!

मास्क वापरा | हात धुवा | अंतर ठेवा

माझे कुटुंब
माझी जबाबदारी

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

वर्ष ७२ वे | अंक ४ | ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२०

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — डॉ. दिलीप पांढरपट्टे
- प्रबंध संपादक — अजय अंबेकर, गोविंद अहंकारी
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, गजानन पाटील, राजाराम देवकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण साहाय्य — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., कोपरखैरणे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई–४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

शेती : विकेल तेच पिकवू ६
१२ ग्रामविकास : गावांनी कूस बदलली
सिंचन : आव्हानांवर मात १८
२२ पाणी : प्रत्येक घरात नळ
ऊर्जा : आधुनिकतेची कास २७
३२ सहकार : नव्या अर्थव्यवस्थेत आधार
आरोग्य : यशस्वी झुंज ३८
४४ वने : लक्षवेधी संवर्धन
उद्योग : नेहमीच अग्रेसर ५०
५७ शिक्षण : सार्वत्रिकीकरण ते दर्जात्मक
सांस्कृतिक : साहाय्यकारी भूमिका ६४
७० पर्यावरण : वसुंधरेसाठी अभियान
पायाभूत सुविधा : ट्राम ते मेट्रो ७६
८४ महिला विकास : नवतेजस्विनींची झेप
वंचितांचा विकास : ३६० अंश दृष्टिकोन ९०
९६ भाषा : विचारांची आणि व्यवहारांची
पर्यटन : मनमोहक महाराष्ट्र १०१
१०६ क्रीडा : विजय हमारा लक्ष्य हैं...
आयटी : गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन, प्रशासनात वापर ११२
११८ कायदा व सुव्यवस्था : तंत्रज्ञानाच्या साथीने गुन्ह्यांना आळा
मंत्रिमंडळात ठरले ! १२४
१२८ 'पोषण माह'मध्ये राज्य अव्वल

भक्कम महाराष्ट्र, भक्कम देश

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचे यंदा हे हीरकमहोत्सवी वर्ष आहे. गेल्या ६० वर्षांतील राज्याच्या कारकिर्दीवर प्रकाश टाकला तर जे अनेक देशांना जमले नाही ते महाराष्ट्राने करून दाखविले आहे. भाषावार प्रांतरचनेचा आग्रह धरत संयुक्त महाराष्ट्रासाठी हौतात्म्य प्राप्त केलेल्या वीरांचे समृद्ध आणि संपन्न महाराष्ट्राचे स्वप्न साकार होत आहे. शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी जनतेने हक्काने मिळवलेले हे राज्य आपल्या हातांवर तोलत अनेक क्षेत्रात अग्रेसर केले आहे. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी घातलेल्या नवमहाराष्ट्राच्या पायावर आज राज्य उभे असून उद्याच्या महाराष्ट्राला आणखी एका नव्या उंचीवर नेण्याचे कार्य मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासन करत आहे.

देशाच्या आर्थिक विकासाचे इंजिन असलेल्या महाराष्ट्राने उद्योग, सहकार, ऊर्जा, शिक्षण, पायाभूत सुविधा अशा विविध क्षेत्रांत केलेले कार्य केवळ अद्वितीयच नाही, तर इतर राज्यांसाठी दिशादर्शकही आहे. राज्याने प्रगतीची नवी शिखरे गाठताना वंचित आणि उपेक्षित वर्गाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दिलेली प्राथमिकता हेच महाराष्ट्राच्या संस्कृतीचे द्योतक आहे. स्वातंत्र्य चळवळीत देशाचे नेतृत्व करणाऱ्या महाराष्ट्राने समाजप्रबोधन आणि सामाजिक विकासात केलेले कार्य निश्चितच अन्य प्रांतांसाठी प्रेरणादायी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात देश एका संक्रमणातून जात असताना येथील जनतेला उद्यमशीलतेकडे वळवून त्यातून समग्र समष्टीचा विकास करण्यासाठी राज्यकर्ते आणि धोरणकर्त्यांनी घेतलेले निर्णय नक्कीच राज्याचे चित्र बदलणारे आहेत. आज राज्याचे जे आश्वासक चित्र आपल्यासमोर दिसते ते येथील धुरीणांनी बाळगलेल्या स्वप्नांमुळे आणि त्या स्वप्नांना मूर्तरूप देण्यासाठी घेतलेल्या अविरत कष्टामुळे.

सध्या महाराष्ट्र हे उद्योग क्षेत्रात सर्वात अग्रेसर राज्य आहे, देशातील सर्वात जास्त विदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात होते, ही राज्याच्या विकासाची पोचपावती आहे. येथील उत्तम पायाभूत सुविधांना दिलेले ते एक प्रकारचे प्रशस्तिपत्रच आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात जगाच्या वेगाशी जुळवून घेतलेल्या त्या-त्या वेळच्या निर्णयामुळे कौशल्यप्राप्त मनुष्यबळ महाराष्ट्रात उपलब्ध होत आहे. त्यामुळेच विविध क्षेत्रातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांना महाराष्ट्रात गुंतवणूक करावी वाटते. देशातील सर्वात चांगल्या पायाभूत सुविधा महाराष्ट्रात आहेत, नागरिकीकरणाचा वेग वाढत असताना नगरे मूलभूत सोयी-सुविधांनी युक्त आहेत, सिंचनाच्या प्रकल्पांनी केवळ महाराष्ट्राची तहान भागवली नाही तर कृषी विकासाला गती दिली. सहकारी चळवळीने महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचे चित्र बदलले. वंचित-उपेक्षित घटकांबरोबरच महिला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्याने राबवलेल्या कल्याणकारी योजनांमुळे महाराष्ट्रात केवळ प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणच झाले नाही, तर उच्च शिक्षणाच्या मोठ्या संस्था उभ्या राहिल्या. राज्याचा प्रवास अविरत सुरू आहे. अनेक बाबींमध्ये एक उद्दिष्ट गाठल्यानंतर पुढचे ध्येय निश्चित करून वाटचाल करावी लागते, महाराष्ट्रही आपल्या कक्षा रुंदावत नवनव्या क्षेत्रात नवनवी उद्दिष्टे गाठण्यास सज्ज झाला आहे.

चित्र आश्वासक महाराष्ट्राचे

हीरकमहोत्सवी महाराष्ट्र

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा आणि विचारांचा, समाजसुधारकांच्या ध्येयाचा आणि स्वातंत्र्य चळवळीसाठी प्रसंगी ब्रिटिशांच्या गोळ्या अंगावर झेलणाऱ्या राष्ट्रभक्तांचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्राने एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. या हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त राज्याच्या विविध क्षेत्रांच्या कामगिरीचे एक प्रकारे सिंहावलोकन करणारा 'लोकराज्य'चा हा विशेषांक प्रकाशित करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. हिमालयाच्या संरक्षणासाठी सह्याद्रीने नेहमीच छातीचा कोट केला आहे. 'महाराष्ट्र भक्कम असेल, तर देश भक्कम राहील' हा विश्वास महाराष्ट्राने आपल्या कृतीतून सिद्ध केला आहे. महाराष्ट्राला केवळ भूगोल नाही, तर इतिहास आणि संस्कृतीही आहे. हा विशेषांक वाचकांना नक्की आवडेल, अशी खात्री आहे.

डॉ. दिलीप पांढरपट्टे
(मुख्य संपादक)

सुख आणि समाधानाची गुंतवणूक

महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतरचे अनेक चढउतार मी पाहिलेही आहेत आणि माझे वडील स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळे जवळून अनुभवले पण आहेत. देशाचे ग्रोथ इंजिन समजल्या जाणाऱ्या राज्याचा हीरकमहोत्सव साजरा होत असताना या राज्याचा मुख्यमंत्री होण्याची संधी मला मिळाली ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. महाराष्ट्राच्या विकासात राज्य स्थापन झाल्यापासून किंबहुना त्याच्याही आधीच्या काळापासून अनेक राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी भरीव योगदान दिले आहे. राज्यातील अनेक नावीन्यपूर्ण, पथदर्शक व लोकाभिमुख योजना देशपातळीवर स्वीकारल्या गेल्या आहेत. देशाच्या विकासात राज्याचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. राज्याने सर्व क्षेत्रात आघाडी घेतली आहे. विस्कळीत विकास न करता राज्यातील शहरे व ग्रामीण भागाच्या विकासाचे नियोजन एकसंध, एकसारखे आणि भविष्यातील विचार करून व्हावे यासाठीही नियोजन करावे लागणार आहे. महाराष्ट्राचे भविष्य रंगवताना पैशाची गुंतवणूक नव्हे तर सुख आणि समाधान ही नव्या महाराष्ट्रातील खरी गुंतवणूक असणार आहे. या दृष्टीने नियोजन असणे अपेक्षित आहे.

- उद्धव बाळासाहेब ठाकरे, मुख्यमंत्री

अव्वल स्थान कायम

महाराष्ट्र नेहमीच 'महान'राष्ट्र म्हणून वावरला आहे. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, आचार, विचार, उच्चार, कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती, शेती, उद्योग, व्यापार, सहकार, शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुधारणा अशा सर्व क्षेत्रात राज्याने नेहमीच अव्वल स्थान कायम राखले आहे. राज्याचा हीरकमहोत्सव साजरा करत असताना बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, भालकीसह सीमाभागातील मराठी भाषक गावे अजूनही महाराष्ट्रात सामील होऊ शकली नाहीत, याची खंत आपल्या सर्वांच्या मनात आहे. यासाठी सीमाभागातील मराठी भाषक गावांसह संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न पूर्णपणे साकार होईपर्यंत हा लढा सुरू राहील, असा विश्वास देतो. महाराष्ट्राच्या हीरकमहोत्सवानिमित्त राज्याच्या जडणघडणीत, विकासात योगदान दिलेल्या आजी-माजी लोकप्रतिनिधींचे, अधिकारी-कर्मचारी बांधवांचे, शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, कला, क्रीडा, संस्कृती अशा जीवनाच्या सर्व क्षेत्रात योगदान दिलेल्या मान्यवरांचे ऋण व्यक्त करतो. राज्यातील तसेच सीमाभागातील मराठी बांधवांनाही मनापासून शुभेच्छा देतो.

- अजित पवार, उपमुख्यमंत्री

सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट

आजघडीला महाराष्ट्रासमोर विविध प्रश्न आहेत. राज्याने देशाच्या उभारणीत सर्वच स्तरावर महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. येणाऱ्या काळात राज्याचा वेगाने आर्थिक विकास करून भौगोलिक असमतोल कमी करताना रोजगार निर्मिती, दारिद्र्य निर्मूलन, मूल्यांचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने पुढाकार घेणे गरजेचे आहे. राज्यात सुरू झालेली सहकारी चळवळ पुढे देशभरात वाढली. ग्रामीण नेतृत्व निर्माण करण्यामध्ये सहकारी चळवळीचा सिंहाचा वाटा आहे. त्याचप्रमाणे शहरांचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी रिजनल टाऊन प्लॅनिंग कायदा करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य होते. संकटातून संधी निर्माण करत राज्याने विकासाची परंपरा राखली आहे. कृषी क्षेत्राला उभारी देण्यासाठी प्रयत्न करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. सामाजिक प्रगतीच्या हेतूने उत्तम शैक्षणिक गुणवत्तेसोबत समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे, तसेच लोकशाही व धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांचे संवर्धन करून सामाजिक न्याय व समतेचा विचार मजबूत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

- बाळासाहेब थोरात, महसूल मंत्री

शेती : विकेल तेच पिकवू

आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरलेल्या महाराष्ट्राच्या शेतीच्या विकासाचे श्रेय येथील कष्टकरी शेतकरी आणि त्याची आधुनिक नजर याला जाते. पारंपरिक शेतीला पर्याय शोधत फळपिकाकडे येथील शेतकरी वळला आणि त्याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले. भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास आणि 'विकेल ते पिकेल' हे धोरण नव्या शेती व्यवसायासाठी आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या विकासाचा शेती हा पायाभूत आधार आहे.

विनोद रापतवार

भारतीय भूमिपृष्ठाचा तोल दक्षिण कातळाने तोलून धरला आहे. या दक्षिण कातळावरच्या महाराष्ट्र प्रदेशाने भारताच्या राष्ट्रीय जीवनाला असाच भक्कम आधार दिला. या सहज आणि साध्या शब्दात कविवर्य वसंत बापट यांनी महाराष्ट्राच्या भव्यतेचे वर्णन केलेले आहे. महाराष्ट्राची भूमी ही थंड झालेल्या लाव्हाच्या थरांनी बनलेली आहे. स्वाभाविकच इथला कातळ हलाहाल पचवून मजबूत उभा आहे. हिमालयापेक्षाही हा डेक्कन ट्रॅप वयाने वडील आहे, मजबूत आहे. माथ्याला व अंगा-खांद्यावर पाषाण असला तरी वाहत्या जलधारा आपल्या पायथ्याशी खेळवत तिथल्या भूमीला, शेतीमातीला दख्खनचे पठार समृद्ध करत आला आहे. जी गोष्ट दख्खनच्या पठाराची तीच गोष्ट सातपुडा पर्वतरांगांची! उत्तरेकडून महाराष्ट्रात उतरण्यासाठी लागणाऱ्या सीमेला भक्कम तटबंदी ही सातपुडा पर्वताचीच. उत्तर महाराष्ट्रातल्या नंदूरबारपासून ते थेट विदर्भापर्यंत या सातपुड्याच्या रांगा महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशच्या काठाकाठाने वाढत गेलेल्या आहेत. गावातील ज्येष्ठ मंडळी पाय समोर करून जसे उखड बसतात..ना.. तशा या सातपुडाच्या रांगा ! उत्तरेतून येणाऱ्या उष्णतेच्या लाटा सहन करण्याबरोबर अंगाखांद्यावर पावसाला खेळवत तो पायथ्याशी असलेल्या शेतजमिनीकडे नदी-नाल्याच्या रूपात वाहते ठेवतो आहे.

महाराष्ट्राच्या मध्यात अजिंठ्याच्या पर्वतरांगा असतील, पुढे मराठवाड्यात बालाघाट डोंगराच्या रांगा असतील, तेलंगणाच्या सीमेवर असलेल्या नांदेड

जिल्ह्यातील माहूरच्या पर्वतरांगा असोत, या सर्व पर्वतरांगा आपल्या पायथ्याला लहान-मोठ्या नद्यांच्या माध्यमातून आजूबाजूची शेतजमीन सुपीक करत गेल्या आहेत. कृष्णा, भिमा, तापी, गोदावरी, वैनगंगा, पैनगंगा, वाघूर, पांझरा, पुर्णा, सिंदफणा, मांजरा, कोकणातील वशिष्ठी, दमनगंगा, वैतरणा, उल्हास आदी विविध नद्या या आपल्या उपनद्यांना लेकुरवाळ्या आईच्या भूमिकेत जाऊन दरवर्षी नित्यनियमाने महाराष्ट्राच्या उदराची तृष्णा भागवतात.

खोऱ्यांनी जोपासली विविधता

महाराष्ट्रातील नद्यांनी निसर्गतः तिचे एक खोरे निर्माण केले आहे. या खोऱ्यात, नद्यांच्या पाणलोटात वैविध्यपूर्ण अशा शेतीची, शेतातील वाणांची गुपिते व वैशिष्ट्ये जपली आहेत. कोकणाच्या भूमीत डोंगरमाथ्यावर जिथे आश्वासित पाणी आहे तिथे भात बहरतो, जंगलामध्ये फणस, मसाले बहरतात तर कातळावर असलेल्या हापूसच्या बागा समुद्रातील खारेपाण्याचा गुण घेत अधिक चवदार वाण देतात. भिमा, कृष्णाच्या काठावर असलेली शेतजमीन ऊसासारख्या पिकाला भरभरून पुढे करते. काही अवर्षण भागात इथल्या शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने डाळींब, द्राक्ष, पपई सारखे पीक उच्च तंत्रज्ञानाच्या माध्यमातून घेऊन दाखवले आहे. उत्तर महाराष्ट्राच्या कोपऱ्यापासून ते थेट विदर्भाकडे मराठवाड्यातल्या बहुसंख्य भागात पांढरे सोने म्हणून ज्याकडे आपण पाहतो त्या कापसाच्या पिकाला इथल्या शेतीने बहरून दाखवले तर पाण्याचे आव्हान असतानाही अनेक भागात जास्त पाणी लागणाऱ्या ऊसाला प्राधान्य दिले गेले आहे.

मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, सातपुड्याच्या पर्वतरांगेत व विदर्भात जिथे कुठे पाण्याचा ताण आहे त्या भागातील शेतजमिनीने ज्वारी, बाजरीसारखी पिके दिली आहेत. नद्यांच्या प्रवाहाबरोबर जिथे-जिथे गाळ वाहत येऊन आजूबाजूच्या जमिनी समृद्ध झालेल्या आहेत त्या भागात फळ भाजीपाल्यासारखी पिके इथल्या शेतकऱ्यांनी भरभरून घेतली आहेत. महाराष्ट्राच्या मातीचा पोत वैविध्यपूर्ण आहे. कोकणात कातळाच्या रंगाप्रमाणे इथली जमीन लालसर होते तर पुढे दख्खनच्या पाठारात असलेल्या कातळाप्रमाणे काळसर होते. पैनगंगेच्या पाणलोट क्षेत्रात मातीचा पोत संमिश्र आढळतो. महाराष्ट्राच्या भूमीची डोंगररांगांनी जशी विभागणी केली आहे तशीच विभागणी हवामानाची आहे. या विभागणीत जैवविविधता व शेतीच्या पिकांमध्येही अंतर पडलेले दिसते.

पूर्व विदर्भात एकाहून एक सरस असे भाताचे वाण बहरते. इथे उन्हाळ्यात प्रचंड उष्णता तर हिवाळ्यात थंडी व पावसाचे प्रमाणही अधिक. कुठे सुपीक जमीन, मुबलक पाणी तर कुठे रानोमाळ खडकांसह असलेली भरड जमीन. या वैविधतेने शेतीमातीसह शेतकऱ्यांनासुद्धा सोशिक आणि सहनशील बनवले आहे. कित्येक वर्षांपासून महाराष्ट्रातील शेतकरी निसर्गाच्या या वैविधतेला स्वीकारत पाण्याच्या बाबतीत परावंबली असल्याने संघर्ष करत उभा आहे. एक प्रकारे संकटांच्या असंख्य मालिकेतून खंबीर उभा असलेला हा एकमेव उद्योग म्हणून शेतीकडे पाहावे लागेल. मागील दोन दशकात हवामान बदलामुळे जी आव्हाने निर्माण झाली त्यातून सावरण्यासाठी शेतकऱ्यांना महाराष्ट्र शासनाने विविध योजना आकारून न्याय दिला.

राज्यातील कृषी क्षेत्राला दिशा देण्यासाठी पहिल्या पाच पंचवार्षिक योजनांमध्ये कृषी व संलग्न क्षेत्रामध्ये भांडवली गुंतवणुकीचे प्रमाण हे सरासरी २० टक्के होते. यात टप्प्याटप्प्याने कृषी क्षेत्राला उभे करत कृषी संलग्न क्षेत्रावर शासनाने भर दिला. महाराष्ट्रात सुदैवाने सिंचनासाठी इतर राज्यांच्या तुलनेत मुबलक प्रमाणात प्रकल्प निर्माण केले आहेत. आपल्या भौगोलिक रचनेत ९४ टक्के कठीण पाषाण आहे. केवळ १२ टक्के भूपृष्ठ असे आहे की, जिथून मातीच्या थरातून पाणी मुरत-मुरत भूजल स्तरापर्यंत पोहोचते. जवळपास ४० हजारांपेक्षा अधिक खेडी असलेल्या आपल्या राज्यात ८० टक्के खेडी ही कोरडवाहूमध्ये आहेत. आजही एकूण लोकसंख्येच्या ६५ टक्के लोकसंख्याही शेती व शेतीपूरक उद्योगाशी जोडली आहे. आजवर विविध आव्हानात उभ्या असलेल्या कृषिक्षेत्राला उद्याचा शाश्वत मार्ग जर घ्यायचा असेल तर तज्ज्ञांच्या दृष्टिकोनातून पुढील विवेचनही

कृषी विकासाला तंत्रज्ञानाची जोड

शेतकरी राजाला सुगीचे दिवस आणण्यासाठी आम्ही प्रयत्न सुरू केले आहेत. राज्याच्या कृषी क्षेत्राच्या विकासाला तंत्रज्ञानाची जोड देत सर्व योजनांचा लाभ एकाच अर्जावर देण्याची योजना सुरू केली आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या संकल्पनेतील 'विकेल ते पिकेल' ही योजना यशस्वीरीत्या राबवून बळीराजाचे उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. स्मार्ट योजनेच्या माध्यमातून कृषी मालाला बाजारपेठेची जोड दिली जात आहे.

- दादाजी भुसे, कृषी मंत्री

समजून घेतले पाहिजे.

आर्थिक उन्नतीचा मंत्र

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर राज्यातील कृषिक्षेत्र जागतिक स्तरावर चांगल्या टप्प्यावर आहे. कृषी क्षेत्राचा सारासार विचार करता जे पिकेल ते विकेलऐवजी 'जे विकेल तेच पिकेल' या संकल्पातूनच महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राला, शेतकऱ्यांना यापुढे आर्थिक प्रगती साध्य करता येईल. जे पीक महाराष्ट्राच्या मातीत रुजले आहे, वाढले आहे, पिढ्यान्‌पिढ्यापासून ज्या पिकाशी आपण जुळलेलो होतो त्या तेलबियांपासून मात्र आपण दूर गेलो आहोत. ४० टक्के तेलबिया परकीय चलन देऊन भारताला आयात कराव्या लागतात. शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या यापुढे अधिक सक्षम व्हायचे असेल तर ज्या शेती उत्पादनांना मागणी आहे त्याकडे नियोजन करून वळावे लागेल.

भविष्यातील शेतीचा प्रवास आपल्याला बायोफ्यूअलकडेही वळवावा लागेल. पूर्वी पिकाच्या सुरक्षिततेसाठी ३० टक्के खर्च हा खते व कीटकनाशकांसाठी व्हायचा आता तो ६० ते ७० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. कर्बाचे प्रमाण हे ०.३ ते ०.४ पर्यंत खाली आले आहे जिथे की, हे प्रमाण २ एवढे हवे. शेतीला लागणारा खर्च कमी करण्यासाठी गटशेती, सौरऊर्जा आणि बाजारपेठ ही उद्याच्या शेतीचे मूलमंत्र असतील.

संग्रहित

गटशेती देईल नवे मापदंड

स्व. यशवंतराव चव्हाण, स्व. वसंतराव नाईक, स्व. डॉ. शंकरराव चव्हाण, माजी कृषिमंत्री शरद पवार यांच्या अनुभवी दूरदृष्टीतून महाराष्ट्रातील कृषिक्षेत्राच्या विकासाचा आराखडा तयार झाला आहे. शेतकऱ्यांनीही आजवर विविध शासकीय योजनांसमवेत नवतंत्रज्ञानाची कास धरल्यामुळे देशात महाराष्ट्र हा कृषिक्षेत्रात आघाडी घेऊ शकला. बदलत्या काळानुसार राज्यातील काही जिल्ह्यात गटशेतीच्या माध्यमातून कृषी विकासाचे नवे मापदंड आपल्या शेतकऱ्यांनी यशस्वी उभे करून इतर राज्यांपुढे आदर्श ठेवला आहे. आपण फळे-भाजीपाल्याच्या निर्यातीत झेप घेतली आहे. सहकाराच्या चळवळीतून साखर उद्योगापाठोपाठ दुधाच्याही क्षेत्रात मोठा टप्पा आपण गाठू शकलो आहोत. तथापि, व्यावसायिक शेतीसाठी अजून आपल्याला बरेच काही साध्य करायचे आहे. शेतीच्या वरचेवर होत जाणाऱ्या वाटण्या व इतर कारणांमुळे भविष्यात गटशेतीशिवाय पर्याय नाही.

शेतमालाचा भाव हा ग्राहकांच्या मानसिकतेशीही संबंधित झाला आहे. साधे चॉकलेट २० रुपयाला घेणारा ग्राहक मेथीच्या जुडीला दहा रुपये देतानाही घासाघीस करतो. या व्यवहारातूनही जर शेतकऱ्यांच्या हाती पैसा आलाच तर तो पैसा शेतकरी पुन्हा शेतीत कमी गुंतवतो. युरोप, अमेरिका, इस्राईलसारखे देश उपलब्ध असलेल्या कृषीयोग्य जमिनी लक्षात घेऊन नियोजन करतात. बाजाराला जे हवे ते शेतकऱ्यांना पिकवायला लावतात. तिथले शेतकरीही शासनाच्या नियोजनाला पूर्णपणे समर्थन देत शेती करतात. तीच दृष्टी आपल्या भारतात वाढायला हवी. भविष्यात शेती आणि शेतकऱ्यांचे भले होण्याचे अगदी बोटावर मोजण्याइतके अवघे एक-दोनच मार्ग शिल्लक आहेत. यात गटशेती आणि शेती उत्पादक कंपन्या याचा प्राधान्याने शेतकऱ्यांना विचार करावा लागेल.

गावनिहाय पीक आराखडा

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर अन्न-धान्याच्या प्रगतीबाबत शेतकऱ्यांनी स्पृहणीय कार्य केले आहे. आजवर राज्याच्या कृषिक्षेत्राला खूप काही साध्य करता आले तथापि वातावरणातील बदल, पावसाचा असमतोल व लहरीपणा यात शेतकऱ्यांना खूप काही सहन करावे लागते. आजही निसर्गाचा लहरीपणा शेतकऱ्यांच्या हाती फार काही लागू देत नाही ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. शेतीमध्ये उद्योजक निर्माण व्हावेत ही जर आपली अपेक्षा असेल तर कृषीविषयक शिक्षण देणाऱ्या संस्थांनी स्वत:हून व्यवस्थापनाचे कौशल्य अंगीकारावे लागेल. बदलत्या वातावरणात जे पीक टिकणारे आहे त्याचा प्राधान्याने विचार करावा लागेल. ऊसापासून शेतकऱ्यांनी दूर जात इतर पिकांकडे वळले पाहिजे. प्रत्येक गावाचा स्वतंत्र पिकांचा आराखडा जर तयार झाला तर शेतीचाही खर्च कमी होण्याबरोबरच जो शेतमाल निर्माण होईल त्याच्या निर्यातीचे भक्कम पर्याय उपलब्ध होतील. उद्याच्या भवितव्यासाठी गटशेती, प्रत्येक गावाचे सामूहिक उत्पादन आणि वितरण व पेरणीसाठी सामूहिक नियोजन हे आवश्यक राहील.

कोकण समृद्ध

हापूस आंबा, काजू, कोकम, फणस, जांभूळ, नारळ, सुपारी, मसाला पिके कोकणात उत्कृष्ट होतात. या पिकाखाली सुमारे ४ लाख हेक्टर एवढे क्षेत्र असून त्यापासून अंदाजे १० लाख मेट्रिक टन एवढे उत्पादन मिळते. या पिकांच्या उत्पादनापासून दरवर्षी सुमारे १००० कोटी रुपये येथील शेतकऱ्यास मिळतात.

विद्यापीठाने या सर्व पिकांच्या सुमारे ३५ प्रगत जाती विकसित केल्या आहेत. तसेच या सर्व पिकांसाठी लागवड तंत्रज्ञानाच्या विविध शिफारशी केल्या आहेत. भविष्यामध्ये बदलत्या हवामानात अधिक सक्षम ठरणाऱ्या, अधिक व दर्जेदार उत्पादन देणाऱ्या, कीड व रोग यांना प्रतिकारक असलेल्या, प्रक्रिया उद्योगास पोषक अशा, उन्नत पोषणमूल्य असलेल्या जाती विकसित करण्यावर कृषी विद्यापीठ भर देत आहे.

कोकणामध्ये जांभूळ, कोकम, फणस, सुरंगी, तिरफळ, वटसोल इ. अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण पिके आहेत. जी येथील शेतकऱ्यांना आर्थिक सुबत्ता देऊ शकतात तथा प्रक्रिया उद्योगास चालना देऊ शकतात. फळ पिकांवर आधारित प्रक्रिया उद्योगाला मोठा वाव कोकणामध्ये आहे. एकट्या प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून कोकणातील फलोत्पादन व इतर कृषी उत्पादनातून सुमारे १००० कोटींपेक्षा जास्त महसूल निर्माण होऊ शकेल.

छोटे शेतकरी महत्त्वाचे

१९६० ते १९७० या दशकात महाराष्ट्रात मोठी हायब्रीड क्रांती झाली. या पहिल्या क्रांतीचा असंख्य शेतकऱ्यांना लाभ झाला. यानंतर राज्यातील बहुसंख्य क्षेत्र असलेल्या कोरडवाहू शेतकऱ्यांसह ज्यांच्याकडे मुबलक पाणीही आहे अशा शेतकऱ्यांनी जीएमओ तंत्रज्ञान स्वीकारले. १९७० नंतरच्या काळात बीटीकॉटनच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी दुसरी क्रांती केली. हे प्रयोग छोट्या शेतकऱ्यांनी केले हे आपण प्राधान्याने लक्षात घेतले पाहिजे.

आजचा काळ हा निसर्गावर अवलंबून शेती करण्याचा मुळीच नाही. प्रिसिजन फार्मिंगचे अर्थात पिकाला जे हवे, जसे हवे तसेच आणि तेवढेच देऊन शेती करण्याचे दिवस आहेत. शेतात नांगराचा फाळ लागला की, तो फाळच मातीत किती आद्रता आहे याचे सेन्सिंग करून तो संपूर्ण माहिती देईल. या माहितीवर पेरणीच्या बियाणासमवेत मातीला आवश्यक असणारे घटक खताच्या माध्यमातून त्या फाळाच्या बाजूलाच आपोआप पडेल. एवढे तंत्रज्ञान आता विकसित आहे, मात्र हे समजून घेऊन त्याच्या वापरासाठी प्रत्येक शेतकऱ्याला पात्र व्हावे लागेल.

विकेल ते पिकेल

शेतमालाला हमीभाव नव्हे तर हमखास भाव मिळावा, यासाठी राज्य शासनाने 'विकेल ते पिकेल' अभियान सुरू केले आहे. बाजारपेठेचा कल ओळखून मुल्यसाखळी निर्माण करून शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्याचा या अभियानाचा उद्देश आहे. याबरोबरच, कृषी विभागातर्फे मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना, ग्रामकृषी विकास समिती या योजनांही सुरू करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्राच्या तापमान वाढीबाबत टेरी (Teri) या संस्थेने एक अहवाल दिला आहे. यापुढे वाढत्या उष्णतेसमवेत कीड रोगही वाढणार आहे. यामुळे सोयाबिन, केळी तग धरू शकेल का हा प्रश्न आहे. राज्यातील कोरडवाहूचे क्षेत्र लक्षात घेता आपल्या या भागातील मूळ पीक असलेल्या ज्वारी, नाचणी, डाळी या पिकांकडे पुन्हा वळावे लागेल. उसाऐवजी स्वीट सोरगम, इथेनॉल-एनर्जी शेती याला महत्त्व द्यावे लागेल. 'एक गाव एक वाण' ही चळवळ होऊन जर सामूहिक शेती झाली तर निश्चितच प्रत्येक गावोगावच्या शेतकऱ्यांना बाजारपेठेच्या मागणीप्रमाणे शेतीसह सिद्ध होता येईल.

संग्रहित

सुशिक्षित पिढी शेतीकडे वळते आहे

एरवी विदर्भातील काळीशार माती कापसाच्या वाणासाठी अधिक फायदेशीर आहे हे ब्रिटिशांनी ओळखून पार मध्य प्रदेशपासून ते खानदेश, अकोला, अमरावती, नागपूरपर्यंत त्याकाळी कापसासाठी कास्तकारांना प्रवृत्त केले होते. तेव्हापासून विदर्भात जो कापूस लागला तो आजपर्यंत! याला छेद दिला तो संत्र्याच्या पिकाने! महाराष्ट्राच्या एका टोकावर उभ्या असलेल्या विदर्भाच्या प्रांतात भोसले घराण्यातली रघुजी राजे भोसले यांनी सर्वप्रथम संत्र्यांचे वाण आणले. एकाबाजूला कापूस दुसऱ्या बाजूला संत्रा आणि विदर्भातील जिथे खारपाणपट्टा आहे तिथे तूरडाळ, चणाडाळ. शेती उत्पादनाचे हे गणित लक्षात घेत अकोला डाळीसाठी, अमरावती नागपूर संत्र्यासाठी, पूर्व विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा हा भाग धान अर्थात तांदूळासाठी तर उर्वरित भाग कापसासाठी गुंतला गेला. त्या-त्या भागात तशा बाजारपेठाही आकारास आल्या.

शेतमालाचे उत्पादन, त्यातून मिळणारे उत्पन्न याची सांगड घालत काही शेतकरी उच्च कृषी तंत्रज्ञानाकडे वळले. नैसर्गिक शेती,

कोरडवाहूची त्रिसूत्री

राज्यात कोरडवाहूचे क्षेत्र ८० टक्क्यांच्या आसपास आहे. एवढे मोठे क्षेत्र व या क्षेत्रावर अवलंबून असलेली शेतीपूरक उद्योगाशी संबंधित असलेली ग्रामीण भागातील संख्या जर पाहिली तर दोन्ही गोष्टी एकमेकांना परस्परपूरक आहेत. यासाठी मात्र कृषिक्षेत्रासाठी निगडित असलेली श्रमशक्ती ही व्यवस्थित कामाची विभागनी करून कृषिक्षेत्राला जोडली गेली तर कृषिक्षेत्रातील तिसरी क्रांती व्हायला वेळ लागणार नाही. यासाठी प्रत्येक गावाने आपापसातील मतभेदाच्या चौकटी बाजूला ठेवून गटशेतीसाठी, सामूहिक शेतीसाठी, समान पाणी वाटपासाठी पुढे एकवटावे लागेल. प्रत्येक गाव एखाद्या कॉर्पोरेट कंपनीप्रमाणे जेव्हा घड्याळाच्या ठोक्याप्रमाणे चालते तसे श्रमशक्तीची विभागणी करून चालावे लागेल. ज्यांना पेरणीची आवड आहे, त्यांना पेरणीपूर्व तयारीपासून पेरणीच्या कामापर्यंत लक्ष केंद्रित करावे लागेल. ज्याला लागवडीत अधिक ज्ञान आहे त्याने लागवडीसह भरघोस उत्पादन कसे घेता येईल यावर लक्ष केंद्रित करावे. ज्यांना मार्केटिंगमध्ये आवड आहे त्यांना पॅकेजिंग, ग्रेडिंग आणि विक्री याची जर जबाबदारी घेतली तर ग्रामीण भागात आज ज्यांच्या हाताला काम नाही त्या सर्व लोकांना काम मिळेल. स्वाभाविकच यात चांगला पैसाही राहिल. पालेभाज्यांपासून कृषिक्षेत्राशी निगडित असलेल्या सर्व उत्पादनाचे जर व्यवस्थित हब केले, गावनिहाय व उपलब्ध असलेले पाणी लक्षात घेऊन विविध पिकांचे नियोजन केले तर कुठलाही शेतमाल मागणीपेक्षा अधिक होणार नाही. अधिकचे जर उत्पादन झाले तर फार्मर प्रोड्युसर्स कंपनीचे लघू प्रक्रिया उद्योग आकारास आणून प्रक्रिया उद्योगाला चालना देता येईल. संकटे सर्वच क्षेत्राला आहेत या संकटातही शेतीही सदैव सकारात्मक आहे, असा विश्वास शेतकऱ्यांनी अगोदर स्वत:मध्ये निर्माण करावा लागेल.

सेंद्रिय शेती याचा आलेख विदर्भात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी आपलासा करून घेतला. कोकणातल्या आंब्याप्रमाणे विदर्भातही पिढीजात संत्र्यांच्या बागा ज्या शेतकऱ्यांकडे होत्या, त्या शेतकऱ्यांनी नवतंत्रज्ञानाला ओळखून एकरी अधिक झाडे कशी लागतील याचा विचार सुरू केला. त्यातून चांगले उत्पादन आणि उत्पन्नही मिळवले. आता नागपूर जिल्ह्यापासून वरुड, मोर्शी, परतवाडा, चांदूरबाजार, अचलपूर मार्गे बुलडाणापर्यंत संत्रा पोहोचला आहे. आजघडीला विदर्भात अंबियाभार सात लाख टनापर्यंत पोहोचला आहे. आजघडीला एका एकरचा भाव २० हजार रुपये लक्षात घेता ही उलाढाल एकट्या संत्र्याची १४०० कोटी रुपयांपर्यंत आहे.

गेल्या पाच वर्षात उपलब्ध असलेल्या नोकरीचे प्रमाण व त्यासाठी युवकांनी साध्य केलेली उच्च गुणवत्ता लक्षात घेता गुणवंत पिढी आता शेतीकडे वळत आहे. मुलांची ही पिढी उच्च तंत्रज्ञानाशी अधिक सख्य असलेली आहे. त्यांना मातीतील ओलावा कळतो, त्यांना विविध पिकांच्या पोषकतेसाठी आवश्यक असलेले घटकही माहिती आहेत. त्यांची समज लक्षात घेता विदर्भ येत्या काही वर्षात कृषी क्षेत्राबाबत आपली भक्कम ओळख निर्माण करेल. संत्र्यासह विदर्भ आता पुढच्या काही दशकात आंबा उत्पादनातही मैलाचा दगड गाठेल. भंडारा जिल्हा या परिवर्तनासाठी सज्ज होऊ शकतो तर गडचिरोली जिल्हा आपल्या नैसर्गिक क्षमतेसह वेगळ्या काजूचा गोडवाही देऊ शकतो. अर्थात शासकीय भक्कम धोरणांच्याच माध्यमातूनच!

जमिनीचा पोत महत्त्वाचा

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर लोकसंख्या जशी-जशी वाढत गेली त्याप्रमाणात पाण्याचा प्रश्न गंभीर होत गेला. यासाठी निसर्गाचे कालचक्र जरी कारणीभूत असले तरी पाण्याचा अतिउपसा व शेतीसाठी मोकाटपद्धतीने पाण्याचा अधिक वापर हे सुद्धा एक कारण आहे. वाढती महानगरे, बदलती जीवनशैली आणि स्वच्छतेची कल्पित मानके यामुळे रोजच्या जीवन व्यवहारात पाण्याचा वापर अधिक वाढला. पाण्याची व्याप्ती आणि पाण्याचे प्रश्न हे जरी जटिल होत असले तरी भविष्यात खरे आव्हान हे शेतातील मातीच्या आरोग्याचे आहे, पोताचा आहे. माती प्रश्न जर बिकट झाला तर पाण्याचा प्रश्न हा अधिक गंभीर होईल. महाराष्ट्राच्या शेत जमिनीतील सेंद्रिय कर्ब हा उणेच्या खाली गेला आहे. यात बीड, लातूर, उस्मानाबाद हे तीनही जिल्हे अत्यंत धोकादायक वळणावर आहेत. हा कर्ब नैसर्गिकरीत्या वाढवावा लागेल. केवळ तात्पुरता पर्याय म्हणून रासायनिक खातांचा अतिवापर केला तर या जमिनी नापीक व्हायला वेळ लागणार नाही. यावर शासकीय यंत्रणांसह सर्व सेवाभावी संस्था, शेतकरी उत्पादक संघ, शेतकऱ्यांचे गट सर्वांनी मिळून प्रयत्न करायला हवेत.

गुणवत्तापूर्ण कृषिक्षेत्र

ज्या देशांमध्ये शेती शक्य नाही, शेतातील आपल्या एवढे वैविध्यपूर्ण उत्पादन शक्य नाही असे आखातीदेश महाराष्ट्राच्या जवळ असणे ही कृषिक्षेत्राच्या निर्यातीसाठी सदैव शाश्वत अशी गोष्ट आहे. ज्या शेतकऱ्यांना निर्यातक्षम व आखतीदेशांना लागणारी गुणवत्तापूर्ण कृषिक्षेत्रातील उत्पादने हवी आहेत ती फळे, भाजीपाला, फुले, अन्न-धान्यावर प्रक्रिया केलेले उत्पादने सदैव पुरवण्याची क्षमता महाराष्ट्राच्या शेती आणि शेतकऱ्यांमध्ये आहे. यासाठी पायाभूत सुविधा आहेत. डाळिंब, केळी, पेरू, आंबा, टरबूज-खरबूज, पपई, अननस, भाजीपाला, संत्रा अशी कितीतरी उत्पादने

त्यांना हवी आहेत. शिवाय फळांच्या बाबतीत कधीकाळी जे ठोक मार्केट इथे उपलब्ध होते त्यासमवेत आता लूज मार्केटही चांगल्या प्रमाणात महाराष्ट्रातच उपलब्ध झाले आहे.

गेल्या ३० वर्षांकडे जर आपण पाहिले तर राज्याने कृषिक्षेत्रात साध्य केलेली प्रगती ही निश्चितच देदीप्यमान म्हणावी लागेल. साधे डाळिंब आणि केळीचे उदाहरण घेऊयात. साधारणत: २ लाख हेक्टर क्षेत्रावर महाराष्ट्रात केळी आहे. एका हेक्टरला याचे सरासरी ६० टन उत्पादन होते. एकूण उत्पादन १२० लाख टनांच्या जवळ जाते. एका हेक्टरला ४ लाख रुपये किमतीची केळी लक्षात घेता ही उलाढाल जवळपास ८ हजार कोटी रुपयांची केळीच्या उत्पादनातून महाराष्ट्रात होते. आजच्या घडीला यात टिश्यू कल्चरचे क्षेत्र हे २० टक्के आहे. भविष्यात ते अधिक वाढणार, यात शंका नाही. याचाच अर्थ आज प्रती हेक्टरी ६० मे.टन जे केळीचे उत्पादन आहे ते ६० मे. टनवरून ९० मे. टनावर जाईल. म्हणजेच केवळ केळी पिकातील महाराष्ट्रातील उलाढाल ही ८ हजार कोटीपासून १६ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक पटीत वाढत जाईल.

डाळिंबाच्या बाबतीत आपले एकूण क्षेत्र १ लाख २७ हजार हेक्टरपर्यंत असू शकते. सरासरी उत्पादन हे आजघडीला १० टनापर्यंत आहे. प्रतिहेक्टरी ४ लाखाचे उत्पादन डाळिंबातून घेता येते. १ लाख २७ हजार हेक्टर क्षेत्रावरील डाळिंबाचे उत्पादन लक्षात घेता हे उत्पन्न सरासरी ५ हजार कोटींच्या घरात पोहोचते. भविष्यात ही उलाढाल मोठ्या प्रमाणात वाढू शकते. यात संत्रा व मोसंबीचे गणित आणखी वेगळे आहे. इतर फळांचे गणित वेगळे आहे. शेतीक्षेत्राबाबत आज जे गणित मांडले जाते ते आणि वर दिलेली वस्तुस्थिती लक्षात घ्यावी लागेल. ज्या गतीने शेतीचे लहान तुकडे पडत गेले त्याच गतीने किंबहुना सर्व शेतकऱ्यांनी जर मिळून ठरवले तर सर्व तुकडे एकत्र करून एकसंध शेती व्हायला वेळ लागणार नाही. फक्त डोळस दृष्टी हवी.

महत्त्वाचे निर्णय

- महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१९ पर्यंतच्या कालावधीसाठी घेतलेल्या अल्पमुदतीच्या पीक कर्जाचे पुनर्गठन / फेरपुनर्गठन केलेल्या राष्ट्रीयीकृत बँका, व्यापारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, ग्रामीण बँका, विविध कार्यकारी सहकारी संस्था यांच्याकडून शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीक कर्जाच्या थकबाकीची ३० सप्टेंबर २०१९ रोजी रक्कम प्रतिशेतकरी दोन लाख रुपयांपर्यंत शासनाच्यावतीने भरण्याचा निर्णय.
- कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात थेट ऑनलाइन पद्धतीने जमा. या योजनेंतर्गत सुमारे ३२ लाख पात्र खातेदार शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध, २० जुलै २०२० अखेर त्यापैकी २७.३७ लाख खातेदारांना १७ हजार ६४६ कोटी रुपये एवढ्या रकमेचा लाभ. अवघ्या दोन महिन्यात योजनेची अंमलबजावणी, यामुळे शेतकऱ्यांना चालू वर्षाच्या खरीप व रब्बी हंगामासाठी पीक कर्ज मिळण्याचा मार्ग अधिक सुलभ.

संदर्भ : या लेखासाठी कृषिविद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू व ज्येष्ठ पत्रकार, प्रगतशील शेतकरी यांची मते घेतली आहेत. यात डॉ. विलास भाले, कुलगुरु, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, डॉ. अशोक ढवण, कुलगुरू वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी, डॉ. संजय सावंत, कुलगुरु, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली जि. रत्नागिरी, सुनिल तांबे, ज्येष्ठ कृषी संपादक, अदिनाथ चव्हाण, संपादक ॲग्रोवन, मनोज जवंजाळ, उद्यान पंडित व अध्यक्ष नागपूरी संत्रा फार्मर्स प्रोड्यूसर्स कंपनी लिमिटेड नागपूर, अनिकेत लोहिया, कार्यवाह मानवलोक, नाथराव कराड, प्रगतशील शेतकरी परळी जि. बीड, डॉ. अनिल पाटील, डाळिंब व केळी तज्ज्ञ, जळगाव गिरीश कानोले, कृषी अभियांत्रिकी तज्ज्ञ यांचा समावेश आहे.

जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड

संग्रहित

ग्रामविकास : गावांनी कूस बदलली

पंचायतराज व्यवस्थेने गावांना आत्मनिर्भर केले. गावाच्या समस्या आणि त्यावरील उपाय शोधण्याचे महत्त्वाचे साधन गावसभेला दिल्याने गावात खऱ्या अर्थाने लोकशाही आली. महिलांच्या सहभागामुळे गावातील ज्वलंत प्रश्नांवरील उत्तरे मिळू लागली. केंद्र आणि राज्य शासनच्या सहकार्याने गावे आपली नवी ओळख निर्माण करू लागली आहेत. बचतगटांनी गावांना केवळ आर्थिक मदत केली नाही तर महिलांमधील उद्यमशीलतेला वाव दिला. आधुनिक शेती, सिंचन आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने गावांनी कूस बदलली आहे.

इर्शाद बागवान

राज्यातील ग्रामीण भागाच्या दृष्टीने मागील ६० वर्षांकडे वळून पाहिले असता अनेक देदीप्यमान घडामोडी आपल्याला दिसून येतात. पंचायतराज व्यवस्थेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण गावातील शेवटच्या घटकापर्यंत झाले. गावातील सामान्यातील सामान्य माणूस शासन प्रक्रियेत सहभागी होऊ लागला. त्याला अधिकार प्राप्त झाले. पंचायतराज व्यवस्थेचे हे फार मोठे यश आहे. याशिवाय पंचायतराजमध्ये महिलांना आरक्षण दिल्यामुळे त्या गावाच्या कारभारात सहभागी होऊ लागल्या. चूल आणि मूलमध्ये अडकलेल्या महिलांनी घराचा उंबरठा ओलांडला, त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि महिलांनी याच्याही पुढे जाऊन अनेक क्षेत्रात मोठी भरारी घेतली. राज्यात आणि देशात ही फार मोठी सुप्त क्रांती घडून आली, याचे सर्वस्वी श्रेय पंचायतराज व्यवस्थेला जाते.

राज्यात १९६०-६१ मध्ये जिल्ह्यांची संख्या २६ होती. दरम्यानच्या काळात प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने काही जिल्ह्यांचे विभाजन झाल्याने आता जिल्ह्यांची संख्या ३६ इतकी झाली आहे. त्यापैकी मुंबई शहर आणि मुंबई उपनगर वगळता इतर ३४ जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषदा अस्तित्वात आहेत. आज राज्यात ३५१ पंचायत समित्या असून २८ हजार ग्रामपंचायती आहेत. १९६०-६१ मध्ये ग्रामीण भागाची लोकसंख्या २ कोटी ८३ लाख ९१ हजार होती. ही लोकसंख्या २०१८-१९ मध्ये ६ कोटी १५ लाख ५६ हजार इतकी झाली आहे. १९६०-६१ मध्ये नागरी लोकसंख्येचे प्रमाण २८.२ टक्के होते, ते २०१८-१९ मध्ये ४५.२ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. थोडक्यात राज्याचे शहरीकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे. राज्याचा १९६०-६१ मध्ये असलेला ३५.१ टक्के हा साक्षरता दर आता वाढून २०१८ - १९ मध्ये ८२.३ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे.

आपले गाव – आपले सरकार

महात्मा गांधीजींनी स्वातंत्र्यानंतर 'खेड्याकडे चला' हा मूलमंत्र देशाला दिला. ग्रामविकासाचा कळस गाठण्यासाठी देशात

पंचायतराजची स्थापना झाली. महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीखाली आणि वसंतराव नाईक यांच्या संकल्पनेतून पंचायतराजची आखणी झाली. आज पंचायतराजमध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे. देशात २४ एप्रिल १९९३ पासून ७३ वी घटना दुरुस्ती अमलात आली. या घटनादुरुस्तीने पंचायत राजला घटनात्मक दर्जा प्राप्त करून दिला. यामुळे भारतातील सर्व राज्यात गावपातळी, जिल्हापातळी आणि या दोन्हीमधील तालुका विकास गट पातळी अशी त्रिस्तरीय पंचायत राज्य पद्धती सुरू झाली. ग्रामीण विकासाच्या वाटचालीत ७३ व्या घटनादुरुस्तीचा टप्पा सर्वाधिक महत्त्वाचा ठरला आहे.

प्रश्नांचे भान आले

पंचायतराजने महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाला स्वाभिमान, अधिकार दिला. आपल्या गावाचे सरकार निवडून देण्याचे स्वातंत्र्य मिळाले. त्रिस्तरीय रचनेमुळे ग्रामीण प्रशासनाला वेगळीच शिस्त लागली. जिल्हा, तालुका आणि गाव हा विकासाचा घटक मानल्याने समतोल विकास करण्यास वाव मिळाला. याशिवाय, पंचायतराजमुळे ग्रामीण प्रश्नांची जाण आणि भान असणारे अनेक नेतृत्व राज्याला मिळाले. ग्रामपंचायत सदस्य किंवा सरपंच पदापासून वाटचाल सुरू केलेले अनेक नेते पुढे मंत्री, मुख्यमंत्रिपदापर्यंत पोहोचले. एका अर्थाने पंचायतराजने राज्याला आणि देशाला दिशा देणारे नेतृत्व दिले. यामुळेच ग्रामीण विकासाची गंगा घराघरापर्यंत नेण्याची एक प्रभावी चळवळ आज उभी राहताना दिसते.

लोकशाहीचे विकेंद्रीकरण ही महत्त्वाकांक्षी संकल्पना महाराष्ट्राने स्वीकारली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना अनेक महत्त्वाचे अधिकार हस्तांतरित करण्यात आले आहेत. सरकारने विविध महत्त्वाच्या विषयांचे हस्तांतरण जिल्हा परिषदांकडे केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था प्रभावी काम करण्यावर लक्ष केंद्रित करत आहेत.

भारत हा खेड्यांचा देश आहे आणि ही खेडीच आपल्या देशाचे भविष्य आहे, असे राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणाले होते. म्हणूनच त्यांनी नेहमीच ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेवर भर दिला. पंचायतराज व्यवस्थेतील त्रिस्तरीय रचनेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण झाले. जनतेला स्थानिक प्रश्न आपल्याच पातळीवर सोडवणे शक्य झाले. ग्रामविकासालाही चालना मिळाली. जगातील सर्वात मोठी संसदीय लोकशाही प्रणाली राबवणारे राष्ट्र म्हणून भारताकडे पाहिले जाते. या सर्वात मोठ्या लोकशाहीला स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकशाहीच्या लहानशा प्रक्रियेतून बळकटी मिळाली आहे.

महिला आरक्षणातून क्रांती

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण देण्याचा निर्णय देशाच्या सामाजिक विकासात क्रांतिकारी ठरला आहे. महिलांनी घराचा उंबरठा ओलांडला आणि गावाचे, तालुक्याचे, जिल्ह्याचे धोरण ठरवण्यामध्ये त्यांचा सहभाग मिळू लागला. महिलांचे सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय सक्षमीकरण होण्यामध्ये या निर्णयाने क्रांतिकारी अशी भूमिका निभावली आहे. आरक्षणातून पुढे आलेल्या अनेक महिला पुढे स्वकर्तृत्वावर निवडणुका लढवू लागल्या आणि खऱ्या अर्थाने त्या समाजाच्या मूळ प्रवाहात सहभागी होऊ शकल्या. २४ मार्च २०११ रोजी पंचायतराज संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देण्याचा क्रांतिकारी निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला. महिलांनी या संधीचा लाभ घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात आपले कर्तृत्व स्वबळावर सिद्ध केले. सुरुवातीला त्यांना प्रशासन समजून घेण्यासाठी पती, नातेवाईक किंवा पुरुष सहकाऱ्यांची मदत घ्यावी लागली. पण आता स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला स्वबळावर प्रशासनाचा गाडा चालवत आहेत. ग्रामपंचायतीचा प्रत्यक्ष कारभार, सामाजिक समस्या, शासनाच्या विविध योजना, महिला सबलीकरण, पंचायतराज कार्यपद्धती, ग्रामपंचायत कायदा, त्यातील नियम, ग्रामपंचायतींचे अर्थव्यवस्थापन अशा विविध विषयांवर महिला सदस्यांना प्रशिक्षणही देण्यात येते. या माध्यमातून ग्रामीण भागात महिला सक्षमीकरणाची एक सुप्त क्रांती घडून आली आहे. राज्यातील ३४ जिल्हा परिषदांमध्ये सदस्य संख्या १ हजार ९५५ इतकी आहे. त्यापैकी ९७८ महिला सदस्या जिल्हा परिषदांचे काम यशस्वीरीत्या चालवत आहेत. त्याचपद्धतीने ३५१ पंचायत समित्यांमधील ३ हजार ९१० सदस्यांपैकी १ हजार ९५५ महिला सदस्य आहेत. तसेच २७ हजार ८९६ ग्रामपंचायतींच्या १ लाख ९७ हजार ३३८

जीवनमान उंचवण्याचा प्रयत्न

महाराष्ट्र राज्याने ग्रामीण विकासात भरीव प्रगती साध्य केली आहे. यापुढील काळात ग्रामीण भागात दर्जेदार अशा पायाभूत सुविधांची निर्मिती करण्याबरोबरच लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न केले जातील. स्थानिक स्वराज्य संस्थांचे संगणकीकरण, महिला बचतगटांसाठी ई-कॉमर्स व्यासपीठ, प्रत्येक कुटुंबास हक्काचा निवारा, प्रत्येक गावाला जोडणारे पक्के रस्ते अशा विविध क्षेत्रात काम करून राज्यातील गावे स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक बनवण्यात येतील.

- हसन मुश्रीफ, ग्रामविकास मंत्री

ग्रामसभांना अधिकार

पूर्वी फक्त केंद्र आणि राज्य सरकारच्या हातात असलेल्या सत्तेचे, पंचायतराज व्यवस्थेमुळे गावपातळीपर्यंत विकेंद्रीकरण झाले. पण तिथेही सत्ता फक्त निवडक पदाधिकाऱ्यांच्या हातीच एकवटलेली राहायची. या सत्तेचे गावातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत ग्रामसभेच्या माध्यमातून विकेंद्रीकरण झाले. ग्रामसभा हा लोकशाही व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक आहे. गावाचा सामाजिक, आर्थिक विकास आराखडा बनवणे आणि गाव पातळीवर राबवण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे नियोजन करण्याची जबाबदारी ग्रामसभेची आहे. लोकांच्या सहभागाशिवाय लोकशाही जिवंत राहू शकत नाही हे लक्षात घेऊन ग्रामसभांच्या बळकटीकरणाला शासनाने प्राधान्य दिले आहे.

गावाच्या विकास आणि निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग अतिशय महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र शासनाने ग्रामसभेच्या प्रत्येक नियमित सभेपूर्वी महिलासभा घेण्याची कायद्यामध्ये तरतूद केली आहे.

सदस्यांपैकी सुमारे ९८ हजार ६६९ सदस्य या महिला आहेत.

स्वच्छता अभियान

स्वच्छता अभियानाच्या क्षेत्रात महाराष्ट्रातील ग्रामीण भागाने अभूतपूर्व असे काम केले आहे. २०००-०१ मध्ये राज्यात ग्रामीण स्वच्छतेला चालना देण्याकरिता संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सुरू करण्यात आले. याअंतर्गत गावांना प्रेरित करण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा राबवण्यात आली. राज्याच्या सर्व भागात या योजनेला अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला. लोकांनी एकत्र येऊन, वर्गणी गोळा करून गावांची फक्त स्वच्छताच केली नाही, तर इतर अनेक विकासकामे राबवण्यात आली. लोकसहभागातून छोटे बंधारे, तलावांची निर्मिती, शाळांमध्ये सुविधा, सांडपाण्यावर परसबागा, शौचालये, सौरऊर्जेचा वापर, बायोगॅसची निर्मिती, बायोगॅसपासून वीजनिर्मिती, शौचालयापासून बायोगॅस आणि त्यावर घरातला स्वयंपाक, शाळांची स्वच्छता, हरित गाव, हरित रस्ते, पाण्याचे लेखापरीक्षण, जलसंधारण, पाऊसपाणी संकलन, नद्या, जुन्या विहिरी, आड, तलाव यांचे पुनरुज्जीवन अशा अनेक अभिनव संकल्पना लोकसहभागातून राबवण्यात आल्या. धामणेर, आसगाव, निढळ, कवठेपीरान, हिवरेबाजार यांसारख्या अनेक गावांचा कायापालट झाला. राज्यातील अनेक गावे फक्त स्वच्छ म्हणूनच नव्हे तर आदर्श गावे म्हणूनही पुढे आली. शासनाने पुढे जाऊन गावांमध्ये तंटामुक्त गाव योजना राबवली. याचाही फायदा घेत गावांमधील अनेक तंटे गावपातळीवरच सोडवले जाऊ लागले. त्यामुळे न्यायालय यंत्रणेवरील ताण कमी झाला.

महाराष्ट्राची स्वच्छता अभियानाची यशोगाथा लक्षात घेऊन केंद्र शासनाने अशी योजना देशपातळीवर राबवण्याचा निर्णय घेतला, त्यातूनच २००३ मध्ये देशभरात संपूर्ण स्वच्छता अभियान सुरू झाले. यामध्येही महाराष्ट्राने आघाडी घेत देशातील सर्वाधिक गावे हागणदारीमुक्त करण्याचा बहुमान मिळवला. लोकांची मानसिकता बदलणे, योजनेत त्यांचा सहभाग घेणे आणि त्या माध्यमातून गावाचा कायापालट करणे यासाठी ही योजना फक्त देशपातळीवरच नव्हे तर जगभरात गौरवली गेली. महाराष्ट्रातील आदर्श गावे पाहण्यासाठी आजही जगभरातील अभ्यासक महाराष्ट्रातील आदर्श आणि स्वच्छ गावांना भेटी देतात.

राज्यात केंद्र शासनाचे स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) २ ऑक्टोबर २०१४ पासून राबवण्यात येत आहे. ग्रामीण भागात स्वच्छता राखणे, उघड्यावर मलविसर्जन करण्यास प्रतिबंध करणे, कुटुंबासाठी वैयक्तिक शौचालये बांधणे व त्याचा निरंतर वापर करणे ही या अभियानाची उद्दिष्टे आहेत. नोव्हेंबर २०१९ पर्यंत राज्यातील ग्रामीण भागातील एकूण ६४.०२ लाख कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालये उपलब्ध झाली असून राज्यामधील सर्व ३४ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या

संग्रहित

आणि २७ हजार ६६८ ग्रामपंचायतींमध्ये १०० टक्के स्वच्छतालक्ष्य साध्य झाले आहे. या अभियानांतर्गत ऑगस्ट २०१९ पर्यंत ५ हजार ७२४ कोटी रुपये खर्च झाला.

सर्वांसाठी पाणी व स्वच्छता याची उपलब्धता व शाश्वत व्यवस्थापन याची सुनिश्चितता करणे हे शाश्वत विकास ध्येयांपैकी एक आहे. राज्यात ग्रामीण भागात पाणीपुरवठा योजना उपलब्ध करून देण्यासाठी विविध योजना राबवण्यात आल्या. यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, दुहेरी पंप नळ पाणीपुरवठा योजना, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम, जलस्वराज्य योजना, पाणी टंचाई निवारण कार्यक्रम अशा विविध योजना राबवण्यात आल्या.

रोजगार हमी योजनेचा घातला पाया

सत्तरच्या दुष्काळात लोकांना रोजगार देण्याच्या उद्देशाने तत्कालीन विधानपरिषद सभापती वि. स. पागे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेली रोजगार हमी योजना ही संपूर्ण देशाला दिशा देणारी ठरली. १९६९ साली सांगली जिल्ह्यातील गावी ही योजना प्रथम सुरू झाली व नंतर व्यापक प्रमाणावर राबवण्यात आली. अकुशल ग्रामीण बेरोजगारांना स्वत:च्या परिसरामध्ये रोजगार प्राप्त करून देणारी ही योजना कोट्यवधी बेरोजगारांना अक्षरश: वरदानच ठरली. या योजनेमुळे शहरांकडे जाणाऱ्या लोंढ्यांचे स्थलांतराचे प्रमाण कमी झाले. यातूनच पुढे देशपातळीवर मनरेगा योजनेचा जन्म झाला.

महाराष्ट्र राज्याच्या रोजगार हमी योजनेच्या यशस्वी वाटचालीची दखल घेत केंद्र शासनाने संपूर्ण देशामध्ये ही योजना लागू करण्याच्या हेतूने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम २००५ पारित केला. या राष्ट्रीय कायद्याची अंमलबजावणी २ फेब्रुवारी २००६ रोजी सुरू करण्यात येऊन टप्प्याटप्प्याने १ एप्रिल २००८ पर्यंत देशातील सर्व ग्रामीण जिल्ह्यांचा त्यात समावेश करण्यात आला आहे. आज या योजनेतून मागेल त्याला रोजगार दिला जातो. राज्यात वर्षातील १०० दिवसांपर्यंतच्या रोजगाराची हमी केंद्र शासनाने घेतली असून उर्वरित दिवसांमध्ये काम देण्याची हमी राज्य शासनाने घेतली आहे. योजनेतून फक्त रोजगारच दिला जात नाही तर गावांमध्ये मत्तेची मोठ्या प्रमाणात निर्मिती होते. रस्ते, जलसंधारण, मृद्संधारणाची कामे, वृक्षारोपण यांसह आता शेतीला चालना देण्यासाठी वैयक्तिक विहीर बांधकामांसारख्या योजनाही सुरू करण्यात आल्या आहेत. शिवाय गावातील वैयक्तिक शौचालये बांधण्यासाठीही या योजनेतून काम करता येते. महाराष्ट्रात जन्मलेली ही योजना देशाला दिशा देणारी ठरली.

मनरेगामधून राज्यात फळबाग लागवड योजना फार प्रभावीपणे राबवण्यात आली. या योजनेमधून सिताफळ, द्राक्षे, अंजिर, आंबा, संत्रा, मोसंबी, लिंबू, बोर, डाळींब, केळी, पपई अशा नानाविध फळांच्या बागा राज्यातील सर्वच भागांमध्ये लावण्यात आल्या. मनरेगामधून काम करणाऱ्या शेतकऱ्यांना याचा वैयक्तिक लाभ मिळाला. चिंचेसारखी पूर्वी फक्त बांधावर असलेली झाडे बागेमध्ये आली. यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बदलली. कोरडवाहू भागासाठी ही योजना संजीवनी ठरली. या भागाला एक आर्थिक बळ मिळाले. शिवाय मनरेगा योजनेमुळे ग्रामीण भागात मजुरीची किमान रक्कमही वाढली. त्यामुळे मजुरांना चांगला रोजगार मिळू लागला.

मूलभूत सुविधेत अग्रेसर

राज्याच्या ग्रामविकासात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे खूप महत्त्व आहे. राज्याची रोजगार हमी योजना केंद्र शासनाने संपूर्ण देशात राबवली आहे, हे या योजनेचे यश आहे. या योजनेशी निगडित फळबाग लागवड योजना चालू ठेवल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. अकुशल मजुरास मागणीनुसार काम देण्यासोबतच ग्रामीण भागांमध्ये सामूहिक स्वरूपाची तसेच मूलभूत सुविधा निर्माण करण्यात आपण अग्रेसर आहे.

- संदीपानराव भुमरे, रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री

आवास योजनांनी दिला आसरा

ग्रामीण भागातील नागरिकांना हक्काचा निवारा मिळावा यासाठी राज्यात विविध योजना यशस्वीपणे राबवण्यात आल्या. इंदिरा आवास योजनेमधून अनेक बेघरांना हक्काची मजबूत घरे मिळाली. याशिवाय प्रधानमंत्री आवास योजना, राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना, शबरी आवास योजना, रमाई आवास योजनांचीही राज्यात प्रभावी अंमलबजावणी झाली. सध्या प्रधानमंत्री आवास योजनेतून ग्रामीण भागातील बेघर व भूमिहीन लाभार्थ्यांना १.२० लाख रुपये तर नक्षलग्रस्त व डोंगरी भागातील लाभार्थ्यांना १.३० लाख रुपये अनुदान देण्यात येते. याशिवाय मनरेगामधून शौचालय बांधकामासाठी अनुदान देण्यात येते.

घरकूल बांधण्यासाठी जागा नसलेल्या ग्रामस्थांना पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी योजनेतून अनुदान देण्यात येत आहे. याशिवाय ग्रामीण भागातील शासकीय जागांवरील निवासी अतिक्रमणांनाही नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पेसा ग्रामपंचायतींना थेट निधी

पेसा कायदा अंमलबजावणींतर्गत अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना विकासाची कामे करण्यासाठी आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत अर्थसंकल्पित केलेल्या एकूण प्रस्तावित निधीच्या पाच टक्के निधी वितरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याकरिता ग्रामपंचायतींना थेट निधी उपलब्ध करून देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या निधीतून मुलभूत पायाभूत सुविधा, वनहक्क व पेसा कायद्याची अंमलबजावणी, आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, वन्य जीव संवर्धन, जलसंधारण, वनीकरण, वन्य जीव पर्यटन व वन उत्पादने या प्रकारची कामे ग्रामसभांना घेता येतात. २०१८-१९ मध्ये या योजनेतून २६७.८८ कोटी रुपये खर्च झाले. आदिवासी गावांच्या विकासाच्या दृष्टीने ही योजना महत्त्वपूर्ण ठरली आहे.

वित्त आयोगाचा निधी

१४व्या वित्त आयोगाचा कालावधी मागील वर्षी समाप्त झाला. आता चालू आर्थिक वर्षापासून पुढील ५ वर्षांच्या कालावधीसाठी १५व्या वित्त आयोगामधून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना विविध विकास कामांसाठी निधी मिळणार आहे. या निधीपैकी ८० टक्के निधी हा थेट गावांच्या विकासासाठी ग्रामपंचायतींना वितरित केला जातो. पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांना प्रत्येकी १० टक्के निधी दिला जातो. गावांना मोठा निधी मिळत असल्याने गावांमधील विविध पायाभूत सुविधांच्या विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळते. १५व्या वित्त आयोगातून मिळणाऱ्या निधीमधून राज्यातील सर्व गावांमध्ये विविध प्रकारच्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील.

१५व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२५ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी केंद्र शासनाकडून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी राज्याला बेसिक ग्रँट (अनटाईड) व टाईड ग्रँट (Tied Grant) अशा दोन प्रकारच्या ग्रॅन्टच्या स्वरूपात ५०-५० टक्के या प्रमाणात निधी प्राप्त होणार आहे. १५व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार बेसिक ग्रँट (अनटाईड) ही ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी कर्मचारी पगार किंवा आस्थापनाविषयक बाबी वगळून इतर स्थानिक गरजेनुसार (Location Specific felt needs) आवश्यक बाबींवर वापरावयाची आहे. १५व्या वित्त आयोगामधून २०२०-२१ या कालावधीसाठी केंद्र शासनाकडून राज्याला एकूण ५ हजार ८२७ कोटी रुपये इतका निधी मंजूर आहे.

ग्रामीण रस्ते विकास

गावातील रस्त्यांच्या विकासासाठी राज्यात २००० पासून प्रधानमंत्री ग्रामसडक योजना राबवली जाते. प्रारंभी अशा योजना शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राबवण्यात येत असत. पण ७३व्या घटना दुरुस्तीनंतर ग्रामीण रस्त्यांची जबाबदारी पंचायतराज संस्थांवर सोपवण्यात आली. राज्य शासनाने नंतरच्या काळात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना सुरू केली. गावाच्या गतिमान विकासासाठी दळणवळणाच्या साधनांचा प्राधान्याने विकास झाला पाहिजे हे लक्षात घेऊन, ग्रामीण भागातील रस्ते विकासाच्या कामांना गती देण्यात आली. इतरही विविध योजनांमधून राज्यातील बहुतांश गावे पक्क्या रस्त्यांनी जोडण्यात आली आहेत. राज्यात १९६०-६१ मध्ये सार्वजनिक बांधकाम आणि जिल्हा परिषदांकडून देखभाल केल्या जाणाऱ्या रस्त्यांची लांबी ३९ हजार २४१ कि.मी. होती, ती २०१८-१९ पर्यंत ३ लाख १ हजार २६७ कि.मी. इतकी झाली आहे.

विकास आराखडे आणि ई – प्रशासन

राज्यातील प्रत्येक गावाचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. भविष्यातील एक ते दहा वर्षाचा विकास आराखडा प्रत्येक गावाने तयार केला आहे. शहरांप्रमाणे गावांचाही सुनियोजित विकास व्हावा यासाठी हे आराखडे उपयुक्त ठरत आहेत.

राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायत आता संगणकीकृत करण्यात आली आहे. आपले सरकार सेवा केंद्र, अतिक्रमण नियमानुकूल ऑनलाइन प्रणाली, जिओग्राफिक इन्फॉर्मेशन सिस्टिम, व्हीलेज बुक, मानव संपदा प्रणाली, प्रोजेक्ट मॉनिटरिंग सिस्टिम, लाएबिलिटी रजिस्टर सिस्टिम, ग्रामपंचायत कर्मचारी ऑनलाइन मानधन प्रणाली, गावठाण जमाबंदी प्रकल्प, कॅडर मॅनेजमेंट सिस्टिम, जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग सिस्टिम यांमधून ई-प्रशासन राबवले जात आहे.

ग्रामविकासाला चालना

शासनाने आता यापुढील काळातही ग्रामीण विकासाच्या चळवळीला गती देण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने विविध योजना राबवण्यात येत आहेत.

योजनांवर विशेष भर

ग्रामविकासातूनच देशाचा विकास साध्य होऊ शकतो. यासाठी शासनातर्फे ग्रामविकास योजनांवर विशेष भर दिला जातो. आदर्श गावांच्या निर्मितीतूनच आदर्श देशाच्या निर्मितीचे ध्येय साध्य करणे शक्य आहे. ग्रामविकासातील प्रत्येक घटकाच्या सहकार्याने राज्याच्या विकासाचे आश्वासक चित्र यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित होते, एवढे मात्र निश्चित.

- अब्दुल सत्तार, ग्रामविकास, राज्यमंत्री

मोठ्या गावांमध्ये सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापनासाठी शहरी दर्जाच्या सुविधा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मोठ्या गावांना यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून २ कोटी रुपयांपर्यंत निधी मिळणार आहे. स्मार्ट ग्राम योजनेचे नाव आता 'आर. आर. (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना' असे करण्यात आले आहे. या योजनेतील बक्षिसांच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. तालुकास्तरावर चांगले काम करणाऱ्या गावांना १० लाख ऐवजी २० लाख रुपये, तर जिल्हास्तरावर चांगली कामगिरी करणाऱ्या गावांना ४० लाखऐवजी ५० लाख रुपयांचा पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामीण बचतगटांची ५० उत्पादने ॲमेझॉन आणि जीईएम या ई - कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करण्यात आली आहेत. ग्रामपंचायतींच्या उपसरपंचांना प्रथमच मानधन वितरित करण्यात आले. उपसरपंचांच्या खात्यावर पहिल्यांदाच १५.७२ कोटी रुपये जमा करण्यात आले. १५व्या वित्त आयोगाचा निधी जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींना वितरित करण्यात आला. बंधित निधी १ हजार ४५६ कोटी रुपये व अबंधित निधी १ हजार ४५६ कोटी रुपये वितरित करण्यात आला आहे. आदिवासी गावांच्या विकासासाठी पेसामधून १६० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. जुनी पेन्शन योजना लागू नसलेल्या जि.प. कर्मचाऱ्याचा सेवेत मृत्यू झाल्यास कुटुंबीयास १० लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.

मागील काही महिन्यांत कोरोना संकटकाळातही ग्रामविकास विभागाने अनेक निर्णय घेतले आहेत. राज्यातील ग्रामीण भागातील सुमारे ५ कोटी लोकांना प्रतिकारशक्ती वाढीसाठी अर्सेनिक अल्बम हे होमिओपॅथिक औषध व आयुर्वेदिक औषध मोफत, कोरोनामुक्तीसाठी काम करणारे ग्रामपंचायत कर्मचारी, संगणक परिचालक, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, आशा गटप्रवर्तक, स्त्री परिचर यांना १ हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान, कोरोनामुक्तीसाठी काम करणारे जि. प. अधिकारी, कर्मचारी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका आदी सर्वांना ५० लाख रुपयांचे विमा संरक्षण, कोरोनामुक्तीसाठी काम करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतनासाठी करवसुलीच्या टक्केवारीची अट शिथिल, राज्यातील ग्रामसभांना तात्पुरती स्थगिती, मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका पुढे ढकलल्या, मृत कोरोना रुग्णांवर अंत्यसंस्कार करणाऱ्या कार्यकर्त्यांना विमा संरक्षण अशा विविध निर्णयांमधून कोरोना संकटकाळात काम करण्यात आले.

सत्तेचे विकेंद्रीकरण

३ ऑक्टोबर १९६० रोजी विकेंद्रीकरणाबाबत मुंबईत झालेल्या एका परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी आपल्या राज्याचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण म्हणाले होते की, लहानमोठ्या पातळीवरील लोकांच्या या संस्था अर्थातच लोकशाही पद्धतीने उभारल्या गेल्या पाहिजेत. कारण निरनिराळ्या पातळीवर लोकशाही संस्था निर्माण झाल्याशिवाय आपण लोकशाही नेतृत्व निर्माण करू शकणार नाही, लहानलहान क्षेत्रात काम करणाऱ्या ह्या लोकशाही संस्थांतूनच भावी नेते तयार होतील. आपण स्वीकारलेली लोकशाही पद्धत दृढमूल करण्याच्या दृष्टीने या गोष्टीला फार महत्त्व आहे. लोकशाही जीवनपद्धतीवर आपली संपूर्ण निष्ठा आहे आणि म्हणून आपली प्रत्येक कृती ही निष्ठा दृढतर कशी होईल या दृष्टीने घडली पाहिजे. आज पंचायतराज व्यवस्थेच्या यशाकडे पाहिले असता यशवंतरावांचे हे मत सार्थ ठरत असल्याचे दिसून येते.

स्पर्धेच्या जगात पुढील ८ ते १० वर्षात प्रत्येक गाव हे सर्व सोयीसुविधांनी संपन्न असेल, असे राज्य शासनाचे धोरण आहे. शहरातील राहणीमान आणि गावातील राहणीमान यामध्ये कोणताही भेद राहणार नाही असा प्रयत्न आहे. पुढील काही वर्षात महाराष्ट्रातील प्रत्येक गावात सर्व आवश्यक सोयीसुविधा असतील. प्रत्येक गाव स्वयंपूर्ण असेल. स्वच्छ हवा, प्रदुषणमुक्त वातावरण, हिरवीगार झाडे, स्वच्छता आणि पाणीपुरवठा, रस्ते, दळणवळण आणि शिक्षण, आरोग्य या सर्व सोयीसुविधांनी परिपूर्ण अशी महाराष्ट्रातील गावे असतील. राज्य शासनाने यासाठी कंबर कसली आहे. राज्यातील अनेक गावांनी सहकार्य केल्याने परंपरागत गावांनी कात टाकून आदर्श गावे उभारली आहेत. हे चित्र असेच कायम राहील. आपल्या गावासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक ग्रामस्थ संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ग्रामीण स्वराज्याची प्रेरणा घेऊन ग्रामविकासाच्या चळवळीला गती देईल, असा विश्वास वाटतो.

संदर्भ – पद्मश्री पोपटराव पवार यांचेशी चर्चा, ग्रामविकास चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते डॉ. अविनाश पोळ यांचेशी चर्चा, महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल २०१९–२०, लोकराज्य – ग्रामोन्नती विशेषांक एप्रिल २०१२

विभागीय संपर्क अधिकारी

सिंचन : आव्हानांवर मात

शेतीला शाश्वत सिंचन मिळावे या हेतूने उभारण्यात आलेल्या राज्यातील जलसिंचन प्रकल्पांनी उद्योगांच्या आणि शहरीकरणाच्या विकासातही मोलाचे योगदान दिले आहे. शेतीबरोबरच राज्याच्या शहरी भागाची पाण्याची गरज भागविणे आणि ग्रामीण भागात रोजगार निर्मितीच्या प्रक्रियेला गतिमान करणारे जलसिंचन प्रकल्प राज्याच्या चौफेर विकासाचे मुख्य घटक ठरले आहेत.

रवींद्र राऊत

पाणी सजीवाचा प्रमुख घटक आहे. आर्य संस्कृतीपासून विचार केला तर पाण्याजवळ लोक वस्ती करत होते. पाण्याचा वापर शेतीसाठी केला जात होता. जेथे पाण्याची मुबलकता आहे त्या परिसरात संपन्नता येऊ लागली. काळाच्या ओघात पाण्याचे महत्त्व मानवाच्या लक्षात आले. त्यामुळे पाण्याकडे पाहण्याचा मानवाचा दृष्टिकोन बदलला. पाण्याचा सामूहिक वापर होत असल्याचे दाखले सातव्या शतकात आढळून येतात. अलीकडील तीन-चारशे वर्षात पावसाचे प्रमाण बदलत गेले. त्यामुळे पावसाळ्यानंतर उरलेल्या आठ महिन्यांची पाण्याची गरज भागवण्याच्या प्रेरणेतून पाण्याचा साठा करून हवे तेव्हा पाणी वापरण्याची कल्पना मानवाने विकसित केली. यातूनच तलाव, विहिरी, बंधारे, धरण आदींचा विकास झाल्याचे स्पष्ट होते.

छत्रपतींचा वारसा

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कल्पनेतून गडकिल्ल्यांवर पाण्याच्या टाक्या, तलाव बांधले गेले. या टाक्या आणि तलाव आजही चांगल्या स्थितीत आहेत. याच कल्पनेतून बीड जिल्ह्यातील खजिना विहीर विकसित करण्यात आली असावी, असा एक प्रवाह आहे. ब्रिटिश काळात शेतीच्या उत्पादन वाढीसाठी आणि पिण्याच्या पाण्याच्या सोयीसाठी अनेक प्रकल्प उभारण्यात आले. राजर्षी शाहू महाराज यांनी राधानगरीच्या प्रकल्पाबरोबरच कोल्हापूर पद्धतीचे बंधारे उभारण्याची अभिनव कल्पना साकारली. भारतरत्न सर एम. विश्वेश्वरय्या यांचे सिंचनविषयक प्रकल्प उभारणीतील योगदान महत्त्वाचे आहे. त्यांच्या नदीजोड प्रकल्पाच्या कल्पनेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही मते नोंदवली आहेत.

जलसंपदाचे ३४०० प्रकल्प पूर्ण

राज्याचे भौगोलिक क्षेत्र ३०.८ दशलक्ष हेक्टर आहे. त्यापैकी २२.५० दशलक्ष हेक्टर क्षेत्र लागवडीयोग्य आहे. प्रकल्प साठ्यावरून सिंचनाखाली येऊ शकणारे क्षेत्र लक्षात घेऊन त्यानुसार विभागांची रचना करण्यात आली. राज्यात सुमारे ४०० नद्या आहेत. त्यांची लांबी सुमारे २० हजार किलोमीटर आहे. राज्याचे क्षेत्र गोदावरी, तापी, नर्मदा आणि कृष्णा नदीच्या खोऱ्यात विभागले आहे. राज्यात जलसंपदा, ग्रामविकास आणि जलसंधारण विभागाव्दारे सिंचन सुविधा विकसित केल्या जातात. राज्यात जून २०१९ अखेर ४०४ मोठे आणि मध्यम तर ३४७३ लघू प्रकल्प पूर्ण झाले आहेत. या प्रकल्पांच्या माध्यमातून ५१.२३ टक्के सिंचन क्षमता विकसित झाली आहे. १०० हेक्टरपर्यंत सिंचन क्षमता असणारे प्रकल्प जिल्हा परिषदेतर्फे उभारण्यात आले. त्यापेक्षा मोठे प्रकल्प जलसंपदा विभागाने विकसित केले. जलसंपदा विभागाने राज्यात आतापर्यंत सुमारे ३४०० प्रकल्प पूर्ण केले आहेत. पावसाचे प्रमाण खूपच कमी झाल्याने १९६२ मध्ये राज्यात पहिला सिंचन आयोग स्थापन करण्यात आला. पाण्याचे नवीन स्रोत तयार करणे आणि उपलब्ध स्रोतांचा

उजनी धरण

काटकसरीने वापर करण्यासाठी दूरगामी धोरण ठरवून जलसंपदा विभागातर्फे मोठ्या प्रमाणावर प्रकल्प उभारण्यात आले.

प्रवाही ते नलिका वितरण

राज्यात गेल्या तीन-चारशे वर्षापासून प्रवाही पद्धतीने सिंचन करण्याची पद्धत सुरू होती. त्या वेळी प्रांतनिहाय वेगवगेळे कायदे होते. राज्याच्या स्थापनेनंतर सिंचन विकासाला गती येण्यासाठी व शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी कोयना, उजनी, जायकवाडी यांसारखे मोठे प्रकल्प उभारण्यात आले. याबरोबरच भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन सिंचनाच्या विविध योजनांची राज्य शासनाने निर्मिती केली. सुरुवातीच्या काळात सार्वजनिक बांधकाम, वीज आणि जलसंपदा अशा एकत्रित विभागाचे तीन स्वतंत्र विभाग करण्यात आले. यामुळे राज्याच्या सिंचन क्षेत्राने आघाडी घेतली. राज्यात उभारल्या गेलेल्या विविध मोठ्या, मध्यम आणि लघू प्रकल्पापासून कालव्यांच्या साहाय्याने करण्यात येणारे सिंचन ते नलिका वितरण प्रणालीद्वारे सिंचन असा विकासाचा टप्पा आहे. याचबरोबर पाणीपट्टीतून देखभाल दुरुस्तीचा खर्च भागवणे, सूक्ष्म सिंचनाचा विस्तार, थेट खरेदीद्वारे भूसंपादन, ई-गव्हर्नन्स आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर यांच्या समावेशाने सिंचन कार्यक्रम अधिक लोकाभिमुख होण्यास मदत झाली आहे.

जलसिंचन क्षेत्रात नवे टप्पे

राज्याच्या सिंचन व्यवस्थेत सातत्याने कालानुरूप निर्णय घेतले गेले आहेत. यासाठी राज्य शासनाने जलधोरण जाहीर केले. जलसंपत्तीचे काळजीपूर्वक नियोजन, विकास आणि व्यवस्थापन करणे यावर या जलनीतीचा भर आहे. पाण्याचे नियोजन आणि वापर यामध्ये लाभार्थींचा सहभाग, सामाजिक न्यायाच्या दृष्टीने प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाला प्राधान्य, पाण्याचे समन्यायी वाटप, दुष्काळी भागाचा विशेष विचार, पर्यावरणाच्या गुणवत्तेत सुधारणा, नद्या आणि धरणाच्या जलाशयातील पाण्याची शुद्धता यांचा या जलधोरणात प्राधान्याने विचार केला आहे. जलसिंचन प्रकल्पांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण आणि कामगिरी सुधारण्यासाठी स्थिर चिन्हांकन, जललेखा परीक्षण आदी तंत्रांचा वापरही जलधोरणाचे वैशिष्ट्य राहिले आहे. जललेखा प्रसिद्ध करणारे महाराष्ट्र जगातील एकमेव उदाहरण असावे. यामुळे सिंचन व्यवस्थापनामध्ये सुधारणा झाली आहे. सिंचन प्रकल्पाच्या महसुलात भरीव वाढ झाली आहे. यामुळे सिंचन प्रकल्पांचे व्यवस्थापन आणि प्रचालनाचा खर्च करणे शक्य होत आहे.

शाश्वत विकास

“ राज्यातील जलसंपदेचा उपयोग करत धरण, बंधारे, तलावांच्या माध्यमातून राज्याने शेतकऱ्यांच्या बांधावर पाणी नेण्याचे काम केले आहे. नागरिकांना पिण्यासाठी मुबलक पाणी मिळावे यासाठी प्रयत्न केले आहेत. पाण्याच्या अचूक नियोजनामुळे सिंचन क्षमतेत वाढ झाली आणि राज्य सुजलाम्-सुफलाम् झाले आणि होत आहे. भौगोलिक परिस्थितीमुळे राज्यातील काही भागाला नेहमीच दुष्काळाच्या झळा सहन कराव्या लागत आहेत, यासाठी विविध योजना, प्रकल्पांच्या माध्यमातून येत्या काळात प्रयत्नांची पराकाष्ठा करत या भागातही पाणी नेण्याचे काम होईल.

- जयंत पाटील, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री ”

विकास महामंडळांची स्थापना

केंद्रीय जलआयोगाने पाणी वापराची कालमर्यादा लवादाच्या निर्णयानुसार घालून दिली होती. त्यामुळे २००० अखेर राज्याच्या वाट्याचे पाणी अडवणे बंधनकारक होते. यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता होती. यावर तोडगा म्हणून सार्वजनिक क्षेत्रातून निधी उभा करता यावा यासाठी पाच खोरेनिहाय महामंडळे स्थापन करण्यात आली. कृष्णा, गोदावरी, तापी, नर्मदा आणि कोकण भागातील पश्चिम वाहिन्या नदीखोऱ्यातील पाण्याच्या नियोजनासाठी ही विकास महामंडळे स्थापन करण्यात आली. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ यांचा यामध्ये समावेश आहे. या

जलसंपदा प्रकल्पांची संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र

तपशील	मोठे, मध्यम	लघू	एकूण
३० जून २०१९ रोजी पूर्ण आणि प्रगतिपथावरील प्रकल्प संख्या	४०४	३४७३	३८७७
सिंचन क्षमता (लाख हेक्टर)			
जून २०१८ पर्यंत निर्माण झालेली सिंचन क्षमता	३७.५०	१३.७३	५१.२३
२०१८-१९ मधील कालवा आणि नदीद्वारे सिंचन क्षेत्र	१७.८८	६.१४	२४.०२
२०१८-१९ मधील लाभक्षेत्रातील विहिरीद्वारे सिंचन क्षेत्र	१०.३८	१.५७	११.९५
२०१८-१९ मधील वापरलेली एकूण सिंचन क्षमता	२८.२६	७.७१	३५.९७

उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी

राज्यातील सर्व जलसंधारणाच्या विविध प्रकल्पांची दुरुस्ती करून मूळ पाणीसाठवण क्षमता पुनर्स्थापित करणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व नादुरुस्त प्रकल्पांची दुरुस्ती करण्याची विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. राज्यातील भूजल पातळी वाढवून विकेंद्रित पाणीसाठे निर्माण करण्यासाठी जलसंधारणाच्या विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येऊन राज्य टंचाईमुक्त करण्यासाठी तसेच शेती आणि पिण्याकरिता शाश्वत पाणी देण्यासाठी शासन प्रयत्नशील असेल.

- शंकरराव गडाख, मृद् व जलसंधारण मंत्री

महामंडळांच्या माध्यमातून पाच प्रमुख नदी खोऱ्यांचे २५ उपखोऱ्यांत विभाजन करून राज्याचा जल आराखड़ा आखण्यात आला. खोरेनिहाय उपलब्ध पाण्याचा महत्तम वापर होण्यासाठी अवर्षण भागात म्हैसाळ उपसासिंचन योजना अस्तित्वात आली. अशा प्रकारे अनेक योजना अस्तित्वात आल्या तर काही प्रस्तावित आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील भीमा-सीना नद्या २० किलोमीटर लांबीच्या बोगद्याद्वारे जोडून सीना नदीच्या काठाची जमीन सिंचनाखाली आणण्यात यशस्वी झाले. राज्य शासन या प्रकल्पाच्या यशस्वितेनंतर दुष्काळाचा सामना कराव्या लागणाऱ्या मराठवाड्याला सिंचन सुविधेसाठी पश्चिम महाराष्ट्रातील नद्याचे पाणी वळवण्यात येणार आहे. याचाच भाग म्हणून नीरा आणि भीमा नदी जोडली जाणार आहे. उजनी धरणातून कोळेगाव धरण जोडणारे बोगदे अंतिम टप्प्यात आहेत. यामुळे मराठवाड्यातील दुष्काळी भागाला दिलासा मिळणार आहे.

पाणी वापर संस्था

पाण्यासाठी होणारे स्थानिक संघर्ष आणि पाणी वापराबाबतची जागरूकता यामुळे पाण्याचे व्यवस्थापन शेतकऱ्यांच्या हाती सोपवण्याचा लोकहिताचा निर्णय घेतला. यासाठी महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन होण्यासाठी कायदा २००५ करण्यात आला आहे. मोठ्या प्रकल्पांवर लघू वितरिका हे कार्यक्षेत्र मानून पाणी वापर संस्था स्थापन केल्या गेल्या. यामध्ये लघू वितरिका आणि वितरिका कार्यक्षेत्र ठरवण्यात आले. अशा सर्व संस्थांचे एकत्रित नियंत्रण व्हावे यासाठी कालवास्तरीय आणि प्रकल्पस्तरीय शिखर संस्था निश्चित करण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांना घनमापन पद्धतीने हवे तितके पाणी घेऊन पीक स्वातंत्र्याचा हक्क मिळाला. पाणी वापर संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन देऊन राज्य शासनाने सिंचनाच्या क्षेत्रात मोठा बदल केला आहे. मात्र, पाणी वापर संस्था स्थापन करण्यात आणि परिचालन करण्यात लोकांचा सहभाग वाढणे आवश्यक आहे, असा मतप्रवाह आहे.

उद्योग, शहरांचा विकास

राज्यातील सिंचन प्रकल्प केवळ शेतीच्या उपयोगासाठी उपयुक्त ठरले असे नाही. पाण्याची उपलब्धता झाल्यामुळे सिंचन प्रकल्पांच्या परिसरात औद्योगिक विकास झाला. कोयना, जायकवाडी सारख्या मोठ्या सिंचन प्रकल्पातून जलविद्युत प्रकल्प कार्यान्वित केले जातात.

सिंचनविषयक धोरण (आयोग आणि समित्या)

- महाराष्ट्र राज्य सिंचन आयोग १९६२ (श्री. बर्वे आयोग)
- अवर्षणप्रवण क्षेत्राची सत्यशोधन समिती १९७३ (सुकथनकर समिती)
- आठमाही पाणी वापर समिती १९७९ (दांडेकर, देऊसकर, देशमुख समिती)
- कोकण बृहत आराखडा १९८१ (स्वामिनाथन समिती)
- कोकण सिंचन विकास उच्चाधिकार समिती १९८०
- सिंचन व्यवस्थापनाबाबत उच्चाधिकार समिती
- राज्यातील प्रादेशिक अनुशेषाबाबत दांडेकर समिती १९८४
- कसबेकर अभ्यासगटाचा अहवाल १९८६
- महाराष्ट्र जल आणि सिंचन आयोग १९९९

लघू सिंचन प्रकल्पांची संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र

तपशील	कोल्हापूर बंधारे	उपसा जलसिंचन	लघू	पाझर तलाव	इतर	एकूण
३० जून २०१९ रोजी पूर्ण प्रकल्प	१२९४५	२८९८	२९६०	२४२१२	५८८५६	१०१८७१
३० जून २०१९ रोजी प्रगतिपथावरील सिंचन क्षमता (लाख हेक्टर)	१५६५	८९	४८७	१६४०	३१९७	६९७८
जून २०१८ पर्यंत निर्मित	३.४९	०.४१	२.५४	६.७८	५.४४	१८.६६
जून २०१९ पर्यंत निर्मित	३.५५	०.४२	२.६४	६.८८	५.४७	१८.९६
२०१८-१९ मध्ये वापरलेली	१.२४	०.१५	०.९२	३.४४	२.७४	८.४९

या प्रकल्पातून निर्माण झालेल्या विजेने औद्योगिकीकरणासाठी उत्प्रेरकाचे काम केले आहे. औद्योगिकीकरणामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. त्यामुळे देशभरातील तरुण रोजगारासाठी या परिसरात आले. साहजिकच शहरीकरण मोठ्या प्रमाणावर झाले. शहरीकरणाची गती वाढताच सेवा क्षेत्रातील विकासाने गती घेतली. अर्थात या सर्व आर्थिक प्रगतीसाठी जलसंपदा विभागाचे सिंचन प्रकल्प आहेत, हे मान्यच करावे लागेल. राज्याचे औद्योगिक क्षेत्रात देशात आघाडीवर असल्याचे गमक जलसंपदा विभागाच्या प्रकल्पातच आहे. शहरांबरोबरच या प्रकल्पांनी ग्रामीण भागातील विकास आणि आर्थिक प्रगतीला हातभार लावला आहे.

रोजगार निर्मिती

सिंचनाच्या शाश्वतीमुळे कोरडवाहू शेतकरी नगदी पीक घेऊ लागला. यातून राज्यातील ऊस, कापूस अशी पिके आणि फळबागाखालील क्षेत्रांत मोठी वाढ झाली. ग्रामीण भागात सहकारी संस्थांच्या माध्यमातून दुग्धविकास, सूत गिरणी, साखर कारखाना, कुक्कुटपालन व्यवसाय विकसित झाले. याच माध्यमातून शिक्षण संस्थाही विकसित झाल्या. यामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. या संधीमुळे रोजगारासाठी शहरांकडील ओघ रोखला गेला. यासाठी सिंचन प्रकल्पांचे योगदान मोठे आहे. या संस्थांतून शिक्षण घेतलेले तरुण आज अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान, बांधकाम अशा विविध क्षेत्रात अतिशय आघाडीवर आहेत. महाराष्ट्राने माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात घेतलेली झेप ही राज्यात दरवर्षी तयार होणाऱ्या कुशल मनुष्यबळामुळेच आहे.

व्यवहार्यता आणि आव्हाने

जलसिंचन प्रकल्पाने राज्याच्या विविध भागात मोठ्या आणि व्यापक प्रमाणावर विकासाची संधी दिली असली तरी अलीकडील काळात जलसिंचन प्रकल्पांना होणारा विरोध लक्षणीय आहे. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन आणि जलाशयात बुडणाऱ्या वनजमिनी यामुळे नवे प्रकल्प सुरू करण्यावर शासनाला मर्यादा येत आहेत. त्यामुळे आहे त्याच प्रकल्पांच्या माध्यमातून अधिकाधिक जमीन सिंचनाखाली कशी आणता येईल, या दिशेने शासनाचे प्रयत्न आहेत. त्याचबरोबर धरणाच्या जलाशयात साचलेला गाळ हीदेखील समस्या आहे. कालवे, नदी यांच्या काठावर झाडे लावून जमिनीची धूप रोखण्यावर भर दिला जात आहे. गेली काही वर्षे जलसिंचन प्रकल्पांनी शेतीला पाणी पुरवण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे. पण अलीकडे अचानक पडणाऱ्या पावसाने येणाऱ्या पुराचे व्यवस्थापन करण्याचे कामही जलसिंचन प्रकल्पांना करावे लागले आहे. या कामातही जलसंपदा विभाग आणि जलसंपदा विभागातील अधिकारी कर्मचारी यशस्वी झाले आहेत.

कोयना धरण

जलसंपदा विकासातील महत्त्वाचे टप्पे

- महाराष्ट्र राज्य पहिल्या सिंचन आयोगाची स्थापना
- महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेची स्थापना
- अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय स्थापन
- पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालयाची स्थापना
- राष्ट्रीय जल आयोग अहवाल
- वसंतदादा पाटील समिती अहवाल
- लाभक्षेत्र विकास प्रशासकांची निर्मिती
- संपूर्ण राज्यासाठी एकच नवीन पाटबंधारे अधिनियम अस्तिवात
- प्रकल्प बाधितांकरिता पुनर्वसन कायदा
- कृष्णा पाणी तंटा लवादाची स्थापन
- नर्मदा पाणी तंटा लवाद स्थापना.
- जल व भूमी व्यवस्थापन संस्थेची (वाल्मी) स्थापना.
- धरण सुरक्षितता संघटनेची स्थापना
- विभागाकडे महाराष्ट्र भूमी विकास विभागाचे हस्तांतरण
- पाटबंधारे विकास महामंडळाची स्थापना
- राज्याचे जलनीती धोरण निश्चिती
- महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन कायदा २००५ संमत
- पाटबंधारे प्रकल्पांचे स्थिर चिन्हांकन
- पाटबंधारे प्रकल्पांचा जललेखा अहवाल

संदर्भ :- ■ राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाचे संकेतस्थळ (www.wrd.nic.in), ■ महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे संकेतस्थळ (mwrra.org) ■ चाळीस शतकांचे शेतकरी – डॉ. जयंतराव पाटील ■ एफएसआय अहवाल, ■ महाराष्ट्रातील जलसंपदा – प्रा. डॉ. एस. व्ही. ढमढेरे ■ महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल ■ सिंचन सहयोग प्रकाशने ■ जलसंपदा विभागाची पुस्तिका

जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर

पाणी : प्रत्येक घरात नळ

मानवी समुदाय विकासाच्या संकल्पनेत पाणी हा विषय अत्यंत महत्त्वाचा ठरतो. जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही कोणत्याही लोककल्याणकारी राज्याची प्राथमिकता असते. सर्वाधिक नागरिकीकरण असलेल्या महाराष्ट्रात नागरी आणि ग्रामीण अशा दोन्ही पातळ्यांवर पाणीपुरवठा हा महत्त्वाचा विषय ठरला आहे. पण योग्य धोरण, त्याची अंमलबजावणी आणि भविष्याचा अगोदरच घेतलेला वेध यामुळे १२ कोटींहून अधिक जनतेला पाणीपुरवठा करण्याचे शिवधनुष्य राज्य शासन पेलू शकत आहे. राज्याने पाणीपुरवठा हा प्राधान्याचा विषय ठेवल्याने आज अनेक वाड्या-वस्त्यांपर्यंत पाणीपुरवठा होत आहे.

देवेंद्र पाटील

महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यापासून ग्रामीण पाणी पुरवठा हा विषय शासनाच्या प्राधान्याचा राहिला आहे. शुद्ध आणि पुरेसे पाणी उपलब्ध असल्याशिवाय आरोग्यमान उंचावणे अशक्य आहे. आजच्या स्थितीत महाराष्ट्राचा विचार केल्यास जवळपास सर्वच्या सर्व म्हणजे ९९,६०६ गाव-वाड्या-वस्त्यांमध्ये शासनाने कोणत्या ना कोणत्या स्वरूपात पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे. आतापर्यंत प्रतिव्यक्ती प्रतिदिन ४० लीटर पाणीपुरवठा करणे गृहीत धरलेले होते. मात्र आता येणाऱ्या काळात प्रत्येक कुटुंबाला कार्यात्मक नळजोडणी देऊन किमान प्रत्येकी ५५ लीटर प्रतिव्यक्ती पाणीपुरवठा झाला पाहिजे यासाठी 'जल जीवन मिशन' हा अत्यंत महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राज्यात सुरू झाला आहे. 'हर घर नल से जल' हे आता राज्याचे मिशन झाले आहे. २०२४ पर्यंत राज्यातील प्रत्येक कुटुंबाला नळजोडणी देण्याचे उद्दिष्ट या कार्यक्रमातून पूर्ण करण्यात येणार आहे.

राज्यात सुमारे ५० टक्के लोकसंख्या नागरी भागात राहते. या जनतेला योग्य प्रमाणात पाणीपुरवठा करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने राज्याने वेळोवळी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे शहरांची तहान भागत आहे. मुंबई महानगरपालिकेने आपल्या वाढत्या पाण्याच्या गरजेला बघून धरण बांधण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे मुंबईला पुरेसा पाणीपुरवठा होत आहे. धरणाच्या पाण्याचे होत असलेल्या काटेकोर नियोजनामुळे नाशिक, पुणे, औरंगाबाद यांसारख्या शहरांचा विकास झाला. आज महाराष्ट्रातील शहरी भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बहुतांश सुटला आहे, त्यामागे गेल्या ६० वर्षात दूरदृष्टी ठेवून घेतलेल्या निर्णयांचे यश आहे. सिडकोने नवीन शहरे वसवताना तेथील पाणी पुरवठ्याची जबाबदारीही स्वतःकडे घेतल्याने नवीन शहरांत पाण्याचा प्रश्न निर्माण झाला नाही.

महाराष्ट्रातील शहरांप्रमाणे ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. विस्ताराने देशात तिसऱ्या क्रमांकाचे राज्य असलेल्या महाराष्ट्राच्या

ग्रामीण भागाची विभागणी ३४ ग्रामीण जिल्हे, ३५१ तालुके आणि २७ हजार ८६२ ग्रामपंचायतीमध्ये केले आहे. महसुली गावे ४० हजार ५९९ आहेत. ६ कोटी ७१ लाख ५९ हजार लोकसंख्या असलेल्या ग्रामीण भागात पाण्याची गरज काय असेल याचा अंदाज येतो. यातील ७७,०६४ वाड्या-वस्त्यांना आहेत. जे देशाचे प्रमाण ४५ एवढे आहे. इतर उपाययोजनांद्वारे (साधी विहीर / विंधन विहीर आणि इतर) २२५४२ वाड्या / वस्त्या येथे पाणी पुरवले आहे.

शासनाच्या आधीच्या निकषाप्रमाणे प्रतिव्यक्ती प्रतिदिन ४० लीटर पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे ७७ हजार ४३७ गाव-वाड्यांना पाणीपुरवठा उपलब्ध आहे. याबाबतीत राज्याचे प्रमाण ७७.७४ टक्के आहे आणि राष्ट्रीय प्रमाण ७९.२० टक्के आहे जे राष्ट्रीय प्रमाणापेक्षा थोडे कमी आहे. ग्रामीण लोकसंख्या नळ पाणी पुरवठा योजनेद्वारे व्याप्ती पाहिल्यास ५ कोटी २४ लाख ३३ हजार आहे आणि इतर उपाययोजना करून हाताळलेली लोकसंख्या १ कोटी ४७ लाख २६ हजार आहे. ग्रामीण पाणीपुरवठा हा विषय सातत्याने केंद्र आणि राज्य सरकार मिळून हाताळत आहेत. केंद्र सरकारने सुरू केलेल्या ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या सर्व कार्यक्रमांमध्ये आणि योजनांमध्ये राज्य सरकार पूर्ण शक्तीनिशी सहभागी झाले आहे.

राष्ट्रीय स्तरावर ग्रामीण पाणी पुरवठा योजना १९८६ ला National Drinking Water Mission (NDWM) हा कार्यक्रम सुरू झाला. १९९१ ला 'राजीव गांधी राष्ट्रीय पिण्याच्या पाण्याचे अभियान' (RGNDWM) सुरू करण्यात आले. देशात १९९४ ला ७३वी घटनादुरुस्ती आली आणि त्या दुरुस्तीप्रमाणे ग्रामीण जनतेला सुरक्षित पिण्याचे पाणी पुरवण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीकडे देण्यात आली. राष्ट्रीयस्तरावर ग्रामविकास मंत्रालयाच्या अंतर्गत पाणीपुरवठा विभाग स्थापन करण्यात आला. याच दरम्यान राज्यात पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग हा ग्रामविकास विभागाला जोडलेला होता तो पुढे स्वतंत्र मंत्रालयात परावर्तित करण्यात आला. २००२ साली क्षेत्र सुधारणा कार्यक्रमाला व्यापक स्वरूप देऊन 'स्वजलधारा' हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. २००५ ला 'भारत निर्माण' नावाने ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम केंद्र आणि राज्य सरकारने सुरू केला. ARWSP या कार्यक्रमाचे बदललेले स्वरूप घेऊन २००९ मध्ये अतिशय महत्त्वाकांक्षी 'राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम' राज्यांच्या सहकार्याने सुरू करण्यात आला. दरम्यान केंद्रस्तरावर पेयजल व स्वच्छता विभागाला स्वतंत्र मंत्रालयाचा दर्जा मिळाला. सद्य:स्थितीत केंद्र स्तरावर पेयजल व स्वच्छता विभाग हा जलशक्ती मंत्रालयाला जोडला आहे. राज्यात मात्र पाणीपुरवठा व स्वच्छता या विषयासाठी स्वतंत्र मंत्री आहेत. देशासह राज्यात नव्याने २०१९ मध्ये सुरू झालेल्या 'जल जीवन मिशन' या कार्यक्रमाची वेगाने अंमलबजावणी करण्यात येत आहे.

घरोघरी मुबलक पाणी

राज्यातील ग्रामीण भागातील जनतेला शुद्ध आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याला राज्य शासनाचे सर्वोच्च प्राधान्य राहिले आहे. कोरोना संकटकाळातही पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाने आपले कार्य अव्याहतपणे सुरू ठेवले. 'हर घर नल से जल' हे आता राज्याचे मिशन झाले आहे. २०२४ पर्यंत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाकडे कार्यात्मक नळजोडणी आणि प्रतिव्यक्ती किमान ५५ लीटर पाणी उपलब्ध करून देण्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

- गुलाबराव पाटील, पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री

दृष्टिक्षेपात राज्य

१ एप्रिल २०२० नुसार राज्यातील १४२.३६ लक्ष कुटुंबांपैकी मार्च २०२० अखेर ५३.८८ लक्ष कुटुंबाकडे वैयक्तिक नळजोडणी उपलब्ध आहे. 'जल जीवन मिशन' अंतर्गत पुढील ४ वर्षात एकूण ८८.४८ लक्ष नळजोडणी देण्याचे उद्दिष्ट आहे. राज्यातील एकूण ४० हजार ५९९ गावांपैकी ३६ हजार २१८ गावांमध्ये नळ पाणी पुरवठा योजना असून उर्वरित ४ हजार ३८१ गावांना विहीर/विंधण विहीर यासारख्या उपाययोजनांद्वारे पाणी पुरवठा उपलब्ध करून देण्यात येत आहे. राज्यातील एकूण ९९ हजार ६०६ वाड्या/वस्त्यांपैकी ७४ हजार ४०५ वाड्या/वस्त्यांना नळ पाणीपुरवठा योजना असून त्यांपैकी १० हजार ४६४ वाड्या/वस्त्यांना १००% घरगुती नळजोडण्या देण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थितीत ३ हजार ५०२ पाणी पुरवठा योजना प्रगतिपथावर असून त्यांचे दायित्व २४८३.०५ कोटी रुपये इतके आहे.

देशाच्या तुलनेत राज्य

पाणीपुरवठा सुविधांच्या व्याप्तीचा विचार करायचा झाल्यास पूर्णत: व्याप्ती असलेल्या गाव-वाडी-वस्ती (Fully Covered Habitations) ची राज्याची टक्केवारी ७७.७ टक्के आहे, जी की देशाची स्थिती पाहिल्यास ७९.७ टक्के आहे. राष्ट्रीय

स्तरावर महाराष्ट्राचा १२वा क्रमांक आहे. आता आपण जर घरगुती नळजोडणीचा विचार केल्यास महाराष्ट्र राष्ट्रीय स्थितीच्या खूप पुढे आहे. देशात घरगुती नळजोडणीचे प्रमाण २९.५ टक्के एवढे आहे. तर हेच प्रमाण महाराष्ट्रात ४७.६३ टक्के एवढे आहे. घरगुती नळजोडणीमध्ये महाराष्ट्राचा ११ वा क्रमांक लागतो. महाराष्ट्राची ग्रामीण कुटुंब संख्यासुद्धा इतर अनेक राज्यांच्या तुलनेत खूप जास्त आहे. २०१४-२०१५ मध्ये नळजोडणीमध्ये महाराष्ट्र देशात ६ व्या स्थानी होता, तेव्हा ३५.२१ टक्के एवढी नळजोडणी महाराष्ट्रात होती. येणाऱ्या काळात केंद्र सरकारने निश्चित केलेल्या कालावधीच्या म्हणजेच २०२४ च्या आधीच महाराष्ट्र ग्रामीण भागातील १०० टक्के कुटुंबांची नळजोडणी पूर्ण करण्याच्या प्रयत्नात आहे.

नवनवीन प्रकल्प

ग्रामीण पाणीपुरवठा क्षेत्रासाठी जनसहभागीदारी अत्यंत महत्त्वाची आहे. फक्त पाणीपुरवठ्याच्या योजना उभ्या करून देणे एवढेच काम सरकारचे नाही. जनतेने या सुविधांबाबत स्वमालकीची भावना ठेवावी म्हणून योजना उभी राहत असल्यापासूनच त्यामध्ये ग्रामस्थांचा प्रत्यक्ष सहभाग असणे महत्त्वाचे आहे. अलीकडच्या ३० वर्षांमध्ये राज्यात खूप मोलाचे प्रयत्न झालेले आहेत. जागतिक बँक, जर्मन बँक अशा आंतरराष्ट्रीय संस्थांच्या मदतीने पथदर्शी प्रकल्प, प्रत्यक्ष प्रकल्प राबवले गेले आहेत. सुरुवातीला क्षेत्र सुधार कार्यक्रम (Sector Reform), त्यानंतर पथदर्शी

प्रकल्प ९ जिल्ह्यांमध्ये राबवला. त्याची फलनिष्पत्ती पाहून २००४ पासून जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्यातून जलस्वराज्य प्रकल्प राबवला गेला. राज्याच्या २६ जिल्ह्यामध्ये हा प्रकल्प राबवला होता. खऱ्या अर्थाने लोकसहभाग असलेला आणि मागणी आधारित धोरणाप्रमाणे हा प्रकल्प राबवला गेला. गावातल्याच माणसांच्या कारभाराने यशस्वीरीत्या पूर्ण झालेला हा देशातला पहिला प्रकल्प होता. या प्रकल्पाचे आंतरराष्ट्रीय स्तरावरून कौतुक झाले.

जलस्वराज्य प्रकल्प

राज्याच्या २६ जिल्ह्यांमध्ये २००४ ते २००९ या कालावधीत हा प्रकल्प २८०० ग्रामपंचायतीत राबवला गेला. हा प्रकल्प म्हणजे संपूर्ण देशातील पहिला असा प्रकल्प होता ज्यात गावच्या लोकांनी पुढे येऊन, प्रशासनाचे संपूर्ण सहकार्य घेऊन; पाणीपुरवठा योजनांची यशस्वी उभारणी करून अंमलबजावणी केली गेली.

याच प्रकल्पात जलधर पथदर्शी प्रकप राबवला गेला होता. जलधरावर आधारित गावाच्या पाण्याचे सूक्ष्म नियोजन करण्याचे प्रयोग या पथदर्शी प्रकल्पातून केले गेले, पुणे, औरंगाबाद आणि बुलडाणा या तीन जिल्ह्यांतील निवडक भागात हा पथदर्शी प्रकल्प राबवला गेला. हा प्रकल्प राबवला जात असताना पुणे, अहमदनगर आणि औरंगाबाद या जिल्ह्यांमध्ये 'आपलं पाणी' नावाने जर्मन बँकेच्या अर्थसाहाय्याने जलस्वराज्य प्रकल्पाच्या धर्तीवरच राबवला गेला. २००९ मध्ये या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले.

पावसाच्या पाण्याचा उपयोग

जलस्वराज्य प्रकल्पाचे यश पाहून राज्य सरकारच्या जलस्वराज्य २ कार्यक्रम या टप्पा २ च्या प्रकल्पालासुद्धा जागतिक बँकेने अर्थसाहाय्य दिले. या दुसऱ्या

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम योजनेचा कालावधी ३१ मार्च, २०२० रोजी संपुष्टात आला आहे. पण यात मंजुरी देण्यात आलेल्या प्रगतिपथावरील व अपूर्ण पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करण्याकरिता आता या योजनेस दोन वर्षे (२०२१-२२ पर्यंत) मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला, यामुळे या योजनेंतर्गत अनेक गावांची तहान भागणार आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ६००.५० कोटी इतक्या किमतीच्या ७४३ नवीन पाणीपुरवठा योजना राबवण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच ११८.६३ कोटी इतक्या किमतीच्या ३२ बंद असलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. अशा सर्व पाणीपुरवठा योजनांची कामे प्रगतिपथावर असून उर्वरित अपूर्ण कामे पूर्ण करण्याकरिता ४३० कोटी रुपये इतक्या निधीची आवश्यकता होती. ही योजना पूर्णतः राज्य सरकारची आहे. या योजनेमुळे ग्रामीण महाराष्ट्रात प्रत्येक कुटुंबाला पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे काम सोपे होण्यास मदत होणार आहे.

अटल भूजल योजना

राज्यात १३ जिल्ह्यांमध्ये केंद्र शासन पुरस्कृत अटल भूजल योजना राबवण्यात येणार आहे. या जिल्ह्यातील ७३ पाणलोट क्षेत्र, १३३९ ग्रामपंचायतीमधील १४४३ गावांमध्ये ही योजना राबवण्यात येईल.

घसरणाऱ्या भूजल पातळीला आळा घालून, भूजल पुनर्भरणाच्या उपाययोजनांद्वारे तसेच जल संधारण व कृषी विभागाकडील सूक्ष्म सिंचनाच्या उपाययोजनांद्वारे भूजल पातळीमध्ये सुधारणा करणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे.

भूजलाच्या अनियमित उपशामुळे भूजल पातळीत होत असलेली घसरण व बाधित होत असलेली गुणवत्ता थांबवण्याकरिता केंद्र शासन व जागतिक बँक यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येणाऱ्या या योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्राकरिता या योजनेंतर्गत केंद्र शासन व जागतिक बँक यांच्याकडून अधिकतम एकूण ९२५.७७ कोटी रुपये अनुदान पाच वर्षांमध्ये उपलब्ध होणार आहे.

टप्प्यामध्ये पाणीपुरवठा व स्वच्छता क्षेत्राचे बळकटीकरण हा प्रकल्पाचा प्रमुख हेतू होता. टप्पा २ मध्येही अनेक नावीन्यपूर्ण प्रयोग झाले. अतिदुर्गम आणि पाणीपुरवठा योजना पोहोचणार नाही अशा ठिकाणी थेट पावसाचे पाणी संकलित करून साठवण टाकीत पाणी साठवण्याची विशेष योजना निश्चित उपयुक्त ठरली. या टाक्यांमध्ये साचलेले पाणी दुर्गम वाड्या-वस्त्यांना वर्षभर पुरते. ही पाण्याची साठवणूक वैज्ञानिक दृष्टिकोनातून केलेली असते.

गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण

ग्रामीण पाणीपुरवठा क्षेत्रामध्ये ग्रामीण जनतेला शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे म्हणून राज्यातील सर्व जिल्ह्यांना पाणी तपासणीच्या सुसज्ज प्रयोगशाळा असाव्यात यासाठी प्रयत्न सुरू आहेत. २६ जिल्ह्यांच्या प्रयोगशाळा कार्यान्वित झाल्या आहेत. प्रत्येक गावाला कमीत कमी अंतरावर प्रयोगशाळा उपलब्ध असावी म्हणून राज्यातील तालुक्याच्या ठिकाणी प्रयोगशाळा सुरू करण्यात येत आहेत. या प्रयोगशाळा अशुद्ध पाण्यामुळे होणाऱ्या साथरोगांवर नियंत्रणासाठी मदतगार ठरणार आहेत. राज्यामध्ये ४.५ लाख पाणी पुरवठा योजना, स्रोत व त्यांची उपांगे यांची माहिती Geo-tag करण्यात आली आहे. राज्यामध्ये कार्यरत १८३ प्रयोगशाळांच्या (१ राज्य, ३४ जिल्हा व १४८ उपविभागीय प्रयोगशाळा) मदतीने दरवर्षी ७ ते ८ लाख पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासले जातात.

प्रत्येक घरात नळ असणार

राज्यात सुरू झालेल्या 'जल जीवन मिशन' या कार्यक्रमाच्या मदतीने २०२४ पर्यंत राज्यातल्या ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाकडे कार्यात्मक नळजोडणी देण्याचे प्रमुख उद्दिष्ट या कार्यक्रमाचे आहे. त्याचबरोबर प्रतिव्यक्ती किमान ५५ लीटर पाणी उपलब्ध असण्यासाठी प्रयत्न होणार आहेत. हा कार्यक्रम एकूणच आश्वासक आहे. यामध्ये पाणीपुरवठा योजनांच्या शाश्वततेमध्ये येणाऱ्या अडथळ्यांचा साकल्याने विचार केलेला आहे. जल जीवन मिशन अंतर्गत गावांना शाश्वत पाणीपुरवठा व्हावा म्हणून जुन्या पाणीपुरवठा योजनांची पुनर्जोडणी करण्यात येणार आहे.

आवश्यकता असलेल्या गावांमध्ये नवीन पाणीपुरवठा योजनासुद्धा घेण्यात येणार आहेत. ग्रामपातळीवर जल जीवन मिशन अंतर्गत कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती जिल्हा परिषद यांच्या समन्वयाने ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांच्यामार्फत करण्यात येणार आहे.

आवश्यकतेप्रमाणे आणि भूजल साठ्याच्या उपलब्धतेनुसार नवीन योजनाही घेण्यात येणार आहेत. ज्या गावांमध्ये पाण्याचे प्रमाण कमी आहे अशा गावांमध्ये प्रादेशिक/ अनेक गाव योजना (Water Grid) घेण्यात येतील.

आदिवासी भाग व दलित वस्ती येथे जर नळ पाणीपुरवठा योजनांची सोय नसेल तर तेथे कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना घेण्यात येतील, शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, शासकीय वसतिगृहे, अंगणवाडी इत्यादी सर्व संस्थात्मक नळजोडणी कार्यक्रमाला प्राधान्य राहणार आहे.

जल जीवन मिशनच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी गावस्तरापर्यंतच्या यंत्रणेशी समन्वय ठेवून, आवश्यक त्या रचना पूर्ण करून, योग्य प्रशिक्षण देऊन प्रयत्न करणार आहोत. राज्यात दरवर्षी उन्हाळा जवळ आला की, ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचे जलस्रोत आटून जातात व पाणी टंचाई निर्माण होते. राज्यातील अनेक गावे टँकरवर अवलंबून असतात. ग्रामीण महिलांना या काळात

पाण्यासाठी भयंकर वणवण करावी लागते. येणाऱ्या काही वर्षात महाराष्ट्र टँकरमुक्त करण्यासाठी अत्यंत सूक्ष्म नियोजन करण्यात येणार आहे. ग्रामीण पाणीपुरवठा क्षेत्रासाठी तांत्रिक साहाय्य सहज उपलब्ध व्हावे म्हणून ग्रामीण भागातील प्लंबर

किंवा तत्सम कारागिरांसाठी जल जीवन मिशन अंतर्गत व्यापक प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात येणार आहे.

समस्या व उपाय

एकूण लोकसंख्या वाढीमुळे, बदलत्या जीवनशैलीमुळे ग्रामीण व शहरी भागातील वाढत्या भूजलाच्या वापरामुळे, तसेच कारखाने व त्यांचे सांडपाणी, शेती व त्यातील खतांचा व कीटकनाशकांचा वापर इत्यादींमुळे भूजल गुणवत्तेवर परिणाम होत आहे. महाराष्ट्रातील भूजलाची खालवणारी पातळी, सर्वदूर वाढते प्रदूषण - यात प्रामुख्याने शेतातील रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा अतिवापर, उघडे मलमूत्र विसर्जन या समस्यांमुळे भूजलाची रासायनिक व जैविक गुणवत्ता दिवसेंदिवस हळूहळू बिघडत चालली आहे. राज्यातील ८५ टक्के पेयजल पुरवठा योजना भूजलावर अवलंबून आहेत. भविष्यातील मागणीची पूर्तता करण्यासाठी टिकाऊ तत्त्वावर पाण्याची उपलब्धता ही राज्यात होणार आहे.

भूगर्भातील पाण्याचे अत्याधिक शोषण केल्याने गंभीर ठरेल. सक्रिय वापरकर्त्यांच्या सहभागासह पिण्याच्या पाण्याच्या योजनांची कार्यक्षम देखभाल - दुरुस्ती साध्य करणे आणि जलस्रोतांचा टिकाव या काही गंभीर समस्या आहेत. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी गंभीर आव्हाने आहेत. ग्रामीण पाणीपुरवठा योजनांची सर्वात मोठी अडचण आहे ती म्हणजे योजना स्वयंपूर्ण होत नाहीत. अनेक ग्रामपंचायत क्षेत्रातील नागरिकांना पाणी दर किंवा पाणीपट्टी देणे हा सवयीचा भाग नसतो. ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती फारशी सक्षम नसते. प्रभावी आणि कुशल नेतृत्व व उत्तम प्रशासक नसलेल्या ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात अनेक योजना बंद पडतात. बंद पडण्याची कारणे पाहिली तर विजेचे देयक थकणे, पाइपलाइन तुटणे, फुटणे किंवा वेळेवर व नियमित देखभाल व दुरुस्ती नसणे ही आणि अशा प्रकारची आहेत. ग्रामीण जनतेत पाणीपुरवठा योजनेसंबंधी जबाबदारीची आणि मालकीची भावना निर्माण केली तर अनेक समस्या सुटू शकतात.

आगामी वर्षांसाठी योजना

ग्रामीण जनतेला पुरेसा आणि शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी आणि तो शाश्वत असण्यासाठी भविष्यकालीन नियोजन करावे लागणार आहे. ग्रामपंचायती पाणी पुरवठा योजना सक्षमपणे चालवतील यासाठी त्यांना सक्षम करण्याकडे विभागाचे लक्ष आहे. कालानुरूप या क्षेत्रात येणारे तंत्रज्ञान ग्रामीण पाणीपुरवठा विषयात पूर्णत: उपयोगात यावे यासाठी विभागाकडून प्रयत्न केले जात आहेत. जल जीवन मिशन कार्यक्रमातून राज्यातील जनतेला १०० टक्के नळजोडणी करून २०२४ पर्यंत पाणीपुरवठा केला जाणार आहे. त्यासोबत पाण्याचे स्रोत शाश्वत राहावेत यासाठी व्यापक लोकजागृती करणे, ग्रामीण जनतेला उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची सवय लावणे. नळजोडणी झाल्यानंतर हळूहळू शहरांप्रमाणे पाण्याचे मीटर बसवण्यावर भर द्यावा लागणार आहे.

पाणीपुरवठा यंत्रणा कमीत कमी मनुष्यबळावर आधारित करण्यावर विभागाचा भर असणार आहे. संगणकीकरणाचा आधार घेतला जाणार आहे. भविष्यातील पाण्याच्या प्रदूषणाचे प्रमाण पाहता पाणी गुणवत्तेचे काम अतिशय बारकाईने करण्याचे नियोजन राज्य करत आहे. पाणी नमुने तपासण्याची सोय प्रत्येक जिल्ह्यात करण्यात येत आहे. यापुढील काळात अगदी सर्व तालुक्यांपर्यंत या सुविधा उभ्या करण्यात येणार आहेत. एकूणच शाश्वत स्वरूपात ग्रामीण पाणी पुरवठा सुरू राहावा आणि जनतेला शुद्ध पाणी मिळावे, ते पुरेसे असावे यासाठी आपले प्रयत्न असणार आहेत आणि महाराष्ट्र हे राज्य येणाऱ्या काळात पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत देशातील सर्वोत्तम राज्य ठरेल, असा विश्वास वाटतो.

संदर्भ : ■ केंद्र सरकारच्या पेयजल व स्वच्छता विभागाची आयएमआयएस प्रणाली युनिसेफ चा ग्रामीण पाणीपुरवठाविषयी अहवाल ■ जलस्वराज्य प्रकल्पाचा टप्पा १ आणि टप्पा २ चा अहवाल ■ महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळ बैठक निर्णय ■ पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा दिनांक ४ सप्टेंबर २०२० चा शासन निर्णय. ■ आर. विमला, अभियान संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन ■ युसुफ कबीर, युनिसेफ, मुंबई ■ राहुल साकोरे, प्रकल्प संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन ■ श्री. राठोड, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, वाशीम. ■ कुमार खेडकर

विभागीय संपर्क अधिकारी

ऊर्जा : आधुनिकतेची कास

डॉ. राजू पाटोदकर

ऊर्जा या शब्दातच एक मोठी ताकद आहे. एखाद्या राष्ट्राच्या विकासाकरिता ऊर्जेची उपलब्धता ही महत्त्वाची गरज आहे. अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजांसोबत आता वीज आणि पाणी या दोन्ही तितक्यात महत्त्वाच्या गरजा झालेल्या आहेत. सध्याचा टाळेबंदीचा काळ जागतीक स्तरापासून थेट ग्रामस्तरापर्यंत वैयक्तिक पातळीवर आपण सगळे अनुभवत आहोत. कोरोनाच्या महासंकटात 'वर्क फ्रॉम होम' ही संकल्पना मोठ्या प्रमाणात सर्वत्र रुजली आहे. ही संकल्पना प्रत्यक्षात राबवताना वीज हा महत्त्वाचा घटक ठरतो. गेल्या ६० वर्षात महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रात अग्रेसर आहे यात ऊर्जा क्षेत्राचा महत्त्वाचा वाटा आहे. वाढलेले नागरिकीकरण, शेतीच्या सिंचनाच्या सोयी आधुनिकतेची कास धरत वाढलेले यांत्रिकीकरण एवढेच काय तर नव्या बदलात इलेक्ट्रिक वाहनांपर्यंतचा प्रवासात प्रदूषणमुक्त ऊर्जेचे महत्त्व वाढले आहे. महाराष्ट्राने हे बदल अगदी सहज स्वीकारत, नव्या आव्हानांना तोंड देत या क्षेत्रात केलेले कार्य अतिशय मोलाचे आहे. यात प्रामुख्याने अपारंपरिक ऊर्जास्रोतांकडे महाराष्ट्राने वेळीच लक्ष दिले आहे.

पंचसूत्री

राज्यातील सामान्य जनता, शेतकरी आणि औद्योगिक ग्राहक यांना माफक दरात वीज देणे, सेवेची गुणवत्ता उंचावणे, उत्पन्नाचे नवे स्रोत शोधून आणि खर्च कमी करणे, नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून वीज कंपन्या आणि ऊर्जा विभागाची कार्यक्षमता व उत्पादकता वाढवणे, देश आणि जागतिक पातळीवर ऊर्जा क्षेत्रात होत असलेल्या यशस्वी आणि प्रभावी प्रयोगांची राज्यात अंमलबजावणी करणे या पंचसूत्रीनुसार चालत असलेल्या या विभागाचे यश राज्यातील वाढती गुंतवणूक आणि इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र अग्रेसर असण्यातच दिसून येते.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची ६ जून २००५ ला पुनर्रचना करून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ या सूत्रधारी कंपनीसह महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या चार कंपन्या अस्तित्वात आल्या. तसेच अपारंपरिक ऊर्जेसाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) म्हणजे मेडा ही

महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये विविध क्षेत्रांनी आपले योगदान दिले आहे. यात ऊर्जा क्षेत्राने केलेली प्रगती निश्चितच कौतुकास्पद आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जी स्पर्धा सुरू आहे, त्या स्पर्धेत टिकण्यासाठी आपल्या देशाला अनेक टप्पे पार करावे लागले. त्यातून प्रगतीचे शिखर गाठण्याचा आपला प्रयत्न राहिला. या सर्व प्रक्रियेत देशातील ज्या विविध विभागांनी/क्षेत्रांनी कार्य केले त्यात ऊर्जा क्षेत्रही अग्रेसर राहिले. गेल्या ६० वर्षात राज्याने पायाभूत सुविधांमध्ये केलेल्या विशेष सुधारणांमुळे ऊर्जा क्षेत्र आज महाराष्ट्राचे बलस्थान आहे.

राज्याची समन्वय व शिखर संस्था आहे. बदलत्या परिस्थितीमुळे पुनर्रचना करण्यात आलेल्या या कंपन्यांनी महाराष्ट्रातील ऊर्जा क्षेत्राला राष्ट्रीय पातळीवर नवी ओळख मिळवून दिली आहे.

महानिर्मिती

राज्याच्या विजेच्या मागणीचा मोठा भार महानिर्मिती कंपनीवर असून भविष्यातील विजेची गरज भागवण्यासाठी कंपनी सातत्याने कार्यरत असते. जीवाश्म इंधनाचा जबाबदारीने वापर करून ऊर्जानिर्मितीच्या क्षेत्रात सौर, पवन, जलविद्युत अशा विविध स्रोतांच्या माध्यमातून कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमीतकमी करण्यासाठी कंपनी करीत असलेले कार्य आता वैश्विक तापमान वाढीच्या या काळात महत्त्वाचे ठरत आहे. याबरोबरच खर्च नियंत्रित केल्यास स्वस्त वीज उपलब्ध होऊन राज्यातील उद्योगविश्वाला बळ देण्याचे काम कंपनीने केले आहे. सध्या महानिर्मितीची वीज क्षमता १३ हजार १८२ मे.वॅ. आहे.

प्रकल्प व नियोजन

महानिर्मितीने आतापर्यंत ४,७३० मे.वॅ.चे प्रकल्प पूर्ण केले आहेत. यात प्रामुख्याने खापरखेडा संच क्र.५ (५०० मे.वॅ.), भुसावळ संच क्र.४ (५०० मे.वॅ.), भुसावळ संच क्र.५ (५०० मे.वॅ.), कोराडी संच क्र.८ (६६० मे.वॅ.), चंद्रपूर संच क्र.८ (५०० मे.वॅ.), कोराडी संच क्र.९ (६६० मे.वॅ.), चंद्रपूर संच क्र. ९ (५०० मे.वॅ.), परळी संच क्र.८ (२५० मे.वॅ.), कोराडी संच क्र.१० (६६० मे.वॅ.). यांचा समावेश आहे. तर चालू असलेल्या प्रकल्पामध्ये भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र संच क्र. ६ (१ X ६६० मे.वॅ.), चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्र आणि कोराडी व खापरखेडा औष्णिक वीज केंद्राकरिता कोळसा वहनासाठी पाईप कन्व्हेयर योजना या प्रकल्पांचा समावेश आहे.

महानिर्मिती कंपनीचे राळेगणसिद्धी व कोळंबी प्रत्येकी २ मे.वॅ. सौर प्रकल्प पूर्ण झाले आहेत. राळेगणसिद्धी व कोळंबी येथील सौर प्रकल्प मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत पूर्ण केले असून त्या प्रकल्पाद्वारे ५२०० शेतकऱ्यांना शेतीसाठी कमी दराने दिवसा वीजपुरवठा मिळण्याचा लाभ झाला आहे. तसेच महानिर्मिती कंपनीने अपारंपरिक ऊर्जा अंतर्गत चंद्रपूर येथे ५ मे.वॅ., साक्री येथे १२५ मे.वॅ. आणि बारामती येथे ५० मे.वॅ. क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प पूर्ण केले आहेत. महानिर्मिती कंपनीद्वारे १८७ मे.वॅ. व ३९० मे.वॅ. क्षमतेचे नवीन सौर ऊर्जा प्रकल्प टाकण्याचे प्रस्ताव प्रगतिपथावर आहेत.

महापारेषण

अत्याधुनिकतेच्या काळात ऊर्जानिर्मितीसोबत महापारेषणदेखील महत्त्वाचे ठरत आहे. गेल्या १५ वर्षात राज्यात महापारेषणने जवळपास ५० हजार किलोमीटर वाहिन्यांचे जाळे निर्माण केले आहे. तसेच ६६१ अतिउच्चदाब उपकेंद्रे निर्माण करून वीज पारेषित करण्याची क्षमतादेखील वाढवली आहे. एकूणच महापारेषणच्या कामाची व्याप्ती पाहता महापारेषण उत्तम कार्य करत असल्याचे लक्षात येते.

वीजनिर्मितीत झालेली वाढ, वितरण जाळ्यातील सुधारणा आणि ऊर्जा बचत आणि संवर्धनाच्या विविध उपायांमुळे महापारेषण आणि महावितरण कंपनीला मोठे यश मिळाले आहे. २६ मे, २०१८ रोजी तर देशभरात एकूण एक लाख ७० हजार १२१ मेगावॅट वीजमागणीची नोंद झाली. त्यात महाराष्ट्राचा विक्रमी २३ हजार ७४६ मेगावॅट इतका वाटा होता. ही मागणी महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वाधिक होती. महापारेषणला ऐतिहासिक विजेची मागणी पारेषित करण्यास महापारेषण कंपनीला मोठे यश मिळाले आहे. महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या कंपन्यांसमवेत उत्तम समन्वय ठेवून आणि नियोजन करून ती पूर्ण करण्यात यश मिळवले आहे. राज्याने सार्थ अभिमान बाळगावा अशी ही बाब आहे.

विशेषत: सर्व छोट्या गावांना वीजपुरवठा करण्याचे स्वप्न देशाने साकार केले असतानाच विजेच्या विक्रमी मागणीला महाराष्ट्र अतिशय उत्तम तयारीने आणि समर्थपणे सामोरा गेला आहे. गेली काही वर्षे वीजनिर्मिती आणि त्याचे वितरण यासाठी जे विशेष प्रयत्न करण्यात आले, त्याचे हे यश आहे. यावरून महापारेषणच्या ऐतिहासिक कार्याची महती लक्षात येते.

नवीन तंत्रज्ञान

महापारेषणने नवीन तंत्रज्ञान अंगीकारले असून त्याचे फायदे देखील होत आहे. पूर्वी अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या काळात वाहिनीवर सुव्यवस्थेचे काम करताना वाहिनी खंडित करून काम

हरित ऊर्जा

राज्याला अखंडित आणि गुणवत्तापूर्ण वीज पुरवठा करणे, मागेल त्याला वीज, मुंबई आणि महामुंबईला आत्मनिर्भर करण्यासाठी येथे वीजनिर्मिती वाढवणे, शेतकऱ्यांना दिवसा पुरेसा वीज पुरवठा, सामान्य जनता आणि उद्योजकांना रास्त दरात वीज पुरवठा करणे हे आपले व्हिजन आहे. अद्ययावत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उत्पादन, वितरण आणि वहन खर्च कमी करणे व उत्पन्नाचे नवे स्रोत शोधून सरकारच्या वीज कंपन्याना नफ्यात आणणे, अपारंपरिक ऊर्जेची निर्मिती वाढवून हरित ऊर्जेचे प्रमाण वाढवण्यावर राज्याचा भर असेल.

- डॉ. नितीन राऊत, ऊर्जा मंत्री

करणे अपरिहार्य होते. त्यामुळे वाहिनीची उपलब्धता व पर्यायाने पारेषण आणि मर्यादित राखणे शक्य नव्हते. पण नवीन तंत्रज्ञान अंगीकारल्याने हॉटलाईन मेंटेनन्स तंत्रज्ञानात ऊर्जित वाहिनीवर वाहिनी खंडित न करता सुव्यवस्थेची कामे करणे शक्य होत आहे. आर्थिक नुकसान होत नाही. संभाव्य बिघाडाआधीच दुरुस्ती करणे शक्य होत आहे. यासाठी हॉटलाईन प्रशिक्षित असे कर्मचारीदेखील नेमण्यात आले आहेत. प्रत्यक्ष मनोरा चढवून त्याचे निरीक्षण करण्याऐवजी आता अतिउच्चदाब वाहिन्यांचे निरीक्षण अत्याधुनिक अशा ड्रॉन कॅमेरामार्फत केले जाते. त्यामुळे वाहिन्यांमध्ये बिघाडापूर्वी तत्काळ देखभाल दुरुस्तीची कामे केली जातात. महापारेषणच्या तारा आणि टॉवर्स राज्यभर पसरलेले आहेत. या तारांवर ऑप्टिकल फायबरचे जाळे उभारून आणि त्याद्वारे महापारेषणची अंतर्गत संदेशवहन यंत्रणा मजबूत करणे. तसेच या जाळ्यातून अन्य कंपन्यांनाही इंटरनेटशी संबंधित सेवा देऊन उत्पन्नाचे नवे पर्याय निर्माण करणे प्रस्तावित आहे.

तसेच राज्य भार प्रेषण केंद्र (एसएलडीसी) आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर करीत वीज प्रणालीतील दोष अवघ्या काही सेकंदात शोधणारी सुपरव्हॉजरी कंट्रोल ॲण्ड डाटा ॲक्विझिशन (स्काडा) ही यंत्रणा अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून अत्यंत कार्यक्षम करण्याचे ठरवले आहे. एसएलडीसी ही स्वतंत्र कंपनी म्हणून स्थापन करण्याचे नियोजन आहे. एसएलडीसी आणि स्काडा या यंत्रणांना कोणतीही महत्त्वाची तांत्रिक माहिती अवघ्या सेकंदात मिळावी यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान येथे वापरण्यात येईल. तसेच हवामान खात्यातर्फे मिळणारी पूर्वसूचना सतत वापरून कामाची गुणवत्ता आणि अखंडित वीजपुरवठा ही ध्येये साध्य केली जातील. भविष्यात वाढत्या विजेच्या मागणीनुसार पारेषण प्रणाली अद्ययावत करणे, पारेषण हानी कमी करण्यासाठी उपाययोजना करणेदेखील महत्त्वाचे आहे.

वीज वितरण

महाराष्ट्रात कृषी ग्राहक वगळून सर्व ग्राहकांना २४ X ७ वीज पुरवठा केला जातो. तसेच राज्यात औद्योगिक व नागरी क्षेत्रात विनाव्यत्यय वीजवितरण करण्याचे प्रस्तावित आहे. वितरण कंपनीमार्फत ग्राहकांच्या सेवेसाठी विविध योजना राबवल्या जात आहेत. कंपनीतर्फे कृषी संजीवनी योजना, नवप्रकाश योजना, कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित झालेल्या घरगुती व कृषी ग्राहकांसाठी अभय योजना, पेयजल पाणी पुरवठा योजना, दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना (डीडीयुजीजेवाय), इंटिग्रेटेड पॉवर डेव्हलपमेंट स्कीम, कृषिपंपाना ऊर्जा पुरवठा, ग्राहकाभिमुख योजना, विजेबाबत स्वावलंबन, वेळोवेळी येणाऱ्या नैसर्गिक आपत्तिग्रस्तांसाठी त्या त्या काळी जाहीर होणाऱ्या वीजबील माफी व सवलत योजना अशा विविध योजना राबवल्या जातात.

महावितरण

महावितरणने १७ व्या विद्युत शक्ती सर्वेक्षण (Electric Power Survey) नुसार भविष्यातील वीज मागणीतील वाढ विचारात घेऊन तसेच २०२५ पर्यंत विजेची मागणी लक्षात घेता विविध दीर्घकालीन वीज खरेदी करार केलेले आहेत. महावितरण कंपनीतर्फे महाजनको, केंद्रीय विद्युत निर्मिती प्रकल्प यांच्यासोबत सामंजस्य कराराद्वारे व स्वतंत्र वीज प्रकल्प यांच्यासोबत ऊर्जा मंत्रालय, भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार पारदर्शक निविदेद्वारे वीज खरेदी करार करण्यात आले आहेत.

राज्यातील ४३ लाख कृषिपंप धारकांना वीज पुरवण्याचे महत्त्वाचे कार्य वितरण कंपनीने केले आहे.

महत्त्वाचे म्हणजे स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतर मुंबईलगत असलेल्या जागतिक दर्जाच्या एलिफंटा बेटावर व घारापुरी लेण्यामध्ये वीज पुरवठा करण्यात कंपनीला यश मिळाले आहे. समुद्रातून ७.५० किलोमीटर लांबीची केबल टाकण्यात आली असून यासाठी २५ कोटी खर्च झाला आहे.

भावी नियोजन

राज्यात घरोघरी वीज पुरवठा करणारी महावितरण कंपनी ही आशिया खंडातील या क्षेत्रातील सर्वात मोठी कंपनी आहे. या कंपनीची कार्यक्षमता, उत्पादकता आणि महसूल वाढवण्यासाठी या कंपन्यांच्या चार विभागीय कंपन्या स्थापन करण्याचे ठरवले आहे. काही भागात महावितरणला उत्तम महसूल मिळतो तर काही भागात तो अपेक्षित प्रमाणात मिळत नाही. या निर्णयामुळे एकीकडे उत्पन्न वाढेल तर दुसरीकडे वीज सेवा पुरवठ्याची गुणवत्ताही वाढेल.

अधिक क्षमतेने काम करण्यासाठी कंपनीच्या काही प्रस्तावित उपाययोजना आहेत. यात लघुदाब व उच्चदाब रिंगमेन व सक्षमीकरण करण्यासाठी जुन्या वाहिन्या व वितरण साहित्य बदलणे व त्यांची क्षमतावाढ करणे आहे. तसेच २०२३-२४ पर्यंत ५०,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली शहरे, सर्व औद्योगिक वसाहती व समूहांपर्यंत पोहोचण्याचे लक्ष्य आहे. त्याचप्रमाणे औद्योगिक क्षेत्राबाहेरील ३० मोठे औद्योगिक समूह व सर्व ११० औद्योगिक वसाहती यांचा समावेश

करण्याचे प्रस्तावित आहे.

महावितरणपुढे नवनवीन आव्हाने आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने थकबाकी वसुली, वीज चोरी रोखणे, वीज गळती कमी करणे, जुन्या प्रणालीचे नूतनीकरण, नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून सक्षम होणे, कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढवणे अशा प्रकारची आव्हाने आहेत. त्यास मोठ्या विश्वासाने महावितरण सामोरे जात आहे.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण

राज्यात अपारंपरिक ऊर्जास्रोतांचा म्हणजेच नवीन व नवीकरणीय ऊर्जास्रोतांचा विकास व प्रसार करण्यासाठी तसेच ऊर्जा संवर्धन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या स्वायत्त मूलाधार शासकीय संस्थेची स्थापना केली आहे. महाऊर्जाची नोंदणी संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये तसेच सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये करण्यात आली आहे. ऊर्जा संवर्धन कायदा-२००१ अंतर्गत महाऊर्जास पद निर्देशित संस्था म्हणून शासनाने घोषित केली आहे. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाचा उद्देश पुढीलप्रमाणे आहे :

- नवीन व नवीकरणीय ऊर्जा म्हणजेच अपारंपारिक स्रोतांपासून ऊर्जा निर्मिती करणारे प्रकल्प/योजना/साधने यांचा व ऊर्जा संवर्धनाचा विकास आणि प्रसार करणे. • नवीन व नवीकरणीय ऊर्जास्रोतांपासून वीज निर्मिती करण्यास प्रोत्साहन देणे. • ऊर्जा बचत व ऊर्जा कार्यक्षमतेचे कार्यक्रम हाती घेऊन त्याचा प्रसार करणे. • राज्य शासन व केंद्र शासनाचे नवीन व नवीकरणीय ऊर्जा विषयक कार्यक्रम राबवणे.

नवीन व नवीकरणीय ऊर्जा

महाऊर्जाने पारेषण संलग्न (Grid-connected) नवीन व नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पाकडे लक्ष केंद्रित केले असून मार्च, २०२० अखेर राज्यात ९५८७.५७३ मेगावॅट क्षमतेचे अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. त्यामध्ये पवन ऊर्जा प्रकल्प ४९९८.२१ मेगावॅट, ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्प २३०१.३० मेगावॅट, कृषी अवशेषांवर आधारीत प्रकल्प २१५ मेगावॅट, औद्योगिक सांडपाणी (पारेषण संलग्न व विरहित) घनकचऱ्यापासून वीज निर्मितीचे प्रकल्प ३७.८३८ मेगावॅट, सौर ऊर्जा प्रकल्प १६६२.२० मेगावॅट आणि लघुजल विद्युत निर्मिती प्रकल्प ३७०.०२५ मेगावॅट एवढ्या क्षमतेचे प्रकल्प समाविष्ट आहेत. पारेषण संलग्न अपारंपरिक ऊर्जा स्रोतांपासून वीजनिर्मिती प्रकल्प धोरणांतर्गत येणाऱ्या प्रकल्पामध्ये • पवनऊर्जेपासून वीज निर्मिती. • ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती. • कृषी अवशेषांवर आधारित वीज निर्मिती. • शहरी घन कचरा/औद्योगिक कचऱ्यापासून वीज निर्मिती. • लघू जलस्रोतांपासून वीज निर्मिती. • सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प या सहा प्रकल्पांचा समावेश आहे.

तसेच महाऊर्जाकडून विविध योजना राबवल्या जातात. यात प्रामुख्याने राज्यात विविध शासकीय, निमशासकीय कार्यालयांच्या इमारतीवर सौर विद्युत संच आस्थापित करण्याची योजना. • राज्यातील आदिवासी व दुर्गम भागातील गावे/वस्त्या/पाडे/तांडे यामध्ये नवीन व नवीकरणीय ऊर्जेद्वारे ग्रामीण विद्युतीकरणाची सौभाग्य योजना. • अटल सौर कृषी पंप योजना. • अटल नवीकरण और शहरी परिवर्तन मिशन (अमृत योजना) अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पामध्ये सौर ऊर्जा उपंगाची अंमलबजावणी करणे. • किसान ऊर्जा सुरक्षा एवंम उत्थाण महाभियाण (कुसुम) योजनेंतर्गत सौर कृषी पंप आस्थापित करणे. • लघू व मध्यम उद्योगांना प्राथमिक ऊर्जा परीक्षण. • ऊर्जा बचत कार्यक्रम. • ऊर्जा संवर्धन व ऊर्जा कार्यक्षमता या क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्य स्तरावरील पुरस्काराची योजना. • नगरपालिका, महानगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या पाणीपुरवठा योजना व पथदिव्यांमध्ये ऊर्जा कार्यक्षमता वाढवण्यासाठी अर्थसाहाय्याची योजना. • शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारतींमध्ये ऊर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबवण्यासाठी अर्थसाहाय्याची योजना. • ऊर्जा संवर्धनविषयी क्षमता बांधणीसाठी जनजागृती करण्याची योजना. • बायोगॅसपासून विकेंद्रित विद्युत निर्मिती प्रकल्प. • कृषी अवशेषांपासून ब्रिकेट/पेलेट/कांडी कोळसा निर्मिती.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

राज्यातील वीजदर आकारणीसाठी महत्त्वाचा असा विद्युत नियामक आयोग राज्यात गठित आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग राज्य सरकारने विद्युत

ग्राहककेंद्रित ऊर्जा क्षेत्र

सुरक्षित, परवडणारा व विश्वसनीय वीज पुरवठा, ग्राहक सेवा सुधारणे, ऊर्जा विभागाचे डिजिटायझेशन, विपणनातील कार्यक्षमता व आर्थिक शाश्वतता, स्वच्छ ऊर्जेला प्राधान्य देण्यात येत आहे. ग्राहककेंद्रित ऊर्जा क्षेत्र निर्माण केले जात आहे. कोविड-१९च्या काळात अतिशय कठीण परिस्थितीत ऊर्जा विभागाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी विजेचा खंड पडू दिला नाही. निसर्ग चक्रीवादळानंतर ४५ लाखांहून अधिक ग्राहकांचा विक्रमी वेळेत वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला.

- प्राजक्त तनपुरे, ऊर्जा, राज्यमंत्री

नियमन आयोग कायदा १९९८ च्या तरतुदीनुसार गठित केला आहे. जो विद्युत कायदा २००३ ने पुनर्स्थापित केला आहे. विद्युत कायदा २००३ मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चिती करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

एकूण महसुलाची गरज व त्याप्रमाणात वीजदर ठरवून मिळावेत याकरिता महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्याकडे वितरण कंपनीतर्फे वीजदर सुधारणा प्रस्ताव सादर करण्यात येतो. या प्रस्तावाची आयोगाकडून पडताळणी झाल्यानंतर वर्तमानपत्रात जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात येते. त्यानंतर आयोगातर्फे राज्यातील महसुली मुख्यालयांच्या ठिकाणी जाहीर सुनावणी घेण्यात येते.

ग्राहकांनी उपस्थित केलेल्या सूचना/हरकती/अभिप्राय विचारात घेऊन व संपूर्ण नियामक प्रक्रियेचा अवलंब करून आयोगातर्फे वीज दराबाबत निर्णय घेण्यात येतो व त्यानुसारच वितरण कंपनीकडून वीजदराची आकारणी करण्यात येते.

व्हिजन २०३०

देशाच्या सकल उत्पन्नात महाराष्ट्राचे योगदान हे जवळपास १५ टक्के आहे. यामध्ये राज्यातील वीज क्षेत्राचा महत्त्वाचा वाटा आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी ऊर्जा क्षेत्र महत्त्वाचे असून पर्यावरणीय आणि आर्थिक शाश्वतता यावर लक्ष केंद्रित करून सलग वीजपुरवठा तसेच विजेची गुणवत्ता या दृष्टिकोनातून महाराष्ट्रातील वीज क्षेत्रातील कामगिरी सर्वोच्च आहे. देशाच्या आर्थिक विकासात महाराष्ट्राच्या ऊर्जा क्षेत्राची भूमिका ही नेहमीच महत्त्वाची राहिलेली आहे.

राज्यातील ऊर्जा क्षेत्राची वाढ ही 'मेक इन महाराष्ट्र'च्या माध्यमातून प्रतिवर्ष किमान १० टक्के करण्याचे ध्येय आहे. राज्यातील उद्योग, कृषी व सेवा क्षेत्रातील गुंतवणूक, पायाभूत सुविधांमधील वाढ यामुळे राज्यात विनाअडथळा वीज पुरवठा करणे आवश्यक ठरणार आहे. त्यामुळे विकास दर गाठण्यासाठी ऊर्जा क्षेत्र हे महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

ग्रीडद्वारे वितरण, नवीन तंत्रज्ञानासह डिजिटल मार्गांचा वापर करून जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचे तंत्र जगभरात अवलंबण्यात आले आहे. महाराष्ट्रातही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, इलेक्ट्रिक वाहनांचा वापर यावर भर देण्यात येत आहे. यासाठी वीज क्षेत्राचे व्हिजन डाक्युमेंट २०३० तयार करण्यात आले आहे. त्यातून महाराष्ट्राच्या ऊर्जा क्षेत्राच्या आकांक्षा, भविष्यकाळातील वाटचाल, आव्हाने व संभाव्य संधी यांचा विचार केला आहे. या सर्वांचा विचार करून कृती आराखडा प्रदान करण्यात आला आहे.

जगभरातील उद्योग क्षेत्र संक्रमणातून जात असताना अर्थव्यवस्था सावरण्याची महत्त्वपूर्ण भूमिका ऊर्जा क्षेत्राला निभावी लागणार आहे. त्या दृष्टीने महाराष्ट्रातील ऊर्जा विभागाची वाटचाल सुरू आहे.

सुरक्षित, परवडणारा व विश्वसनीय वीज पुरवठा, ग्राहक सेवा सुधारणे, ऊर्जा विभागाचे डिजिटायझेशन, विपणनातील कार्यक्षमता व आर्थिक शाश्वतता, स्वच्छ ऊर्जेला प्राधान्य हे 'व्हिजन २०३०'चे मिशन आहे. या मिशनच्या धोरणानुसारच राज्यातील ऊर्जा विभाग कार्यरत आहे. या क्षेत्रातील सहभागी कंपन्यांबरोबर एकत्रित काम करत शाश्वत, विकसित आणि ग्राहक केंद्रित ऊर्जा क्षेत्र निर्माण करण्यासाठी व्हिजन २०३०ची अंमलबजावणी होत आहे.

कोविड-१९च्या अनुषंगाने ऊर्जा विभागाने केलेली कामगिरी महाराष्ट्र विसरू शकत नाही. अतिशय कठीण परिस्थितीत ऊर्जा विभागाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी राज्यात विजेचा खंड पडू दिला नाही. या काळात झालेल्या निसर्ग चक्रीवादळामुळे राज्यातील पाचही परिमंडळातील १० हजार ४८९ गावांचा वीज पुरवठा खंडित झाला होता. वीज पुरवठा खंडित झालेल्या ग्राहकांची संख्या ४५ लाख एवढी होती. अविरत कष्ट करून विक्रमी वेळेत ही सेवा पूर्ववत करण्यात आली. निसर्ग चक्रिवादळामुळे जवळपास १०५ कोटींचे नुकसान झाले. ग्राहकांना उच्च दर्जाची सेवा मिळावी, यासाठी कटिबद्ध असलेला आपला ऊर्जा विभाग आहे.

संदर्भ : प्रशांत बडगेरी, उपसचिव; प्रमोद चंचूवार, पी.एस.पाटील, डॉ. मोहन दिवटे.

विभागीय संपर्क अधिकारी

सहकार : नव्या अर्थव्यवस्थेत आधार

युवराज पाटील

'एकमेकां साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' हे तुकाराम महाराजांचे १७ व्या शतकातले विचार... हा सहकार शब्दाचा पहिला आविष्कार. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात तो प्रत्यक्षात आला आणि बघता बघता मराठी माणसाच्या विकासाला सर्वात मोठी कलाटणी देणारा ठरला. त्या सहकाराची महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर घौडदौड झाली. महाराष्ट्राच्या विकासाचा राजमार्ग सहकार चळवळीने निश्चित केला. आज ग्रामीण जीवनात क्रांती करणाऱ्या या सहकार चळवळीने जीवनाची सर्वच क्षेत्रे व्यापली आहेत. महाराष्ट्र शिक्षण, उद्योग, कृषी अशा क्षेत्रात आज आघाडीवर आहे. त्याचे मूळ सहकार चळवळीत आहे.

वर्षानुवर्षे इथला सावकार शेतकरी आणि शेतमजुरांची आर्थिक कोंडी करून लुटत होते. याला उत्तर शोधताना सहकार चळवळीचा जन्म झाला. सहकाराचा विचारही सर्वप्रथम मराठी मातीत रुजला. महाराष्ट्रात १८७२ मध्ये सावकारशाहीच्या विरोधात असंतोष निर्माण झाला. त्यानंतर १८७५ ते १८७७ या तीन वर्षात भीषण दुष्काळ पडला, त्यात लाखाहून लोकांचा बळी गेला, पशुधनाची प्रचंड हानी झाली. तत्कालीन ब्रिटिश राजवटीने त्या काळी सावकारांना अभय दिले, त्यातून मोठ्या प्रमाणात जमिनीचे हस्तांतरण झाले. सलग तीन वर्षाच्या दुष्काळामुळे शेती व्यवसाय उद्ध्वस्त झाला.

ब्रिटिश व सावकारशाहीविरुद्ध शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला. त्यातून दुष्काळी भागातील शेतकऱ्यांनी सावकाराशाहीविरुद्ध बंड पुकारले. अहमदनगर जिल्ह्यात पहिले बंड झाले. लोकांमधील असंतोषाची दखल घेऊन ब्रिटिशांनी डेक्कन फॅमिन कमिशनची स्थापना केली. या कमिशनने परिस्थितीचा अभ्यास केला. पावसाच्या लहरीपणावर शेती अवलंबून असते. हमखास पिकाची खात्री नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये गरिबी वाढली, धार्मिक चालीरिती, लग्नसमारंभ आदी कारणांसाठी शेतकऱ्यांना सावकारांकडे जावे लागते. भरमसाठ व्याजदराखाली शेतकरी पिचून जातो. यामुळे शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्याची पर्यायी व्यवस्था निर्माण करायला हवी अशी कल्पना त्या आयोगाच्या निकषातून पुढे आली. त्यातूनच शेतकरी बँक स्थापनेचा विचार पुढे आला. न्या. महादेव गोविंद रानडे व पुण्याचे तत्कालीन न्यायाधीश डॉ. विल्यम वेडरबर्न यांनी सहकाराचा पुरस्कार वेळोवेळी केला. १९०१ ला फॅमिन कमिशनने सहकारी सोसायट्या स्थापन करण्याची शिफारस केली. त्यानुसार १९०४ मध्ये सहकारी सोसायट्या संदर्भात पहिला कायदा करण्यात आला, परंतु हा कायदा अपुरा

संग्रहित

असल्याचे लक्षात आल्यानंतर १९१२ ला नवा कायदा आणला, त्यात १९१९ ला सुधारणा करण्यात आल्या.

सहकारी अर्थव्यवस्था ही ग्रामीण जनता, आर्थिक व सामाजिक पीडित शोषितांच्या आर्थिक उत्कर्षाचे आशास्थान म्हणून मान्यता पावली गेली आहे. सहकारी अर्थव्यवस्थेने गेल्या ६० वर्षांमध्ये सर्वव्यापी स्वरूप प्राप्त केले आहे. सर्वसामान्य व्यक्तीच्या ग्रामीणविषयक गरजांपासून ते ग्राहक वस्तुवितरण, औद्योगिक प्रक्रिया इतकेच नव्हे तर सहकारी रुग्णालयांमार्फत देखील लक्षणीय वाटचाल झाली आहे. १९६१ मध्ये सहकारी संस्थाची संख्या ३१,५६५ इतकी होती, ती आता २०१९ अखेर २ लाख ६ हजार ४१४ इतकी झालेली आहे. सभासद संख्या १९६१ ला ४५ लाख (अंदाजित) होती तर मार्च, २०१९ अखेर ५ कोटी ३४ लाख (अस्थायी) इतकी झालेली आहे.

सहकाराला सुरुवात

१९०४ च्या मूळ सहकारी कायद्याला धरून विविध प्रांतात सोसायट्या स्थापन करण्यात आल्या. त्यात मुंबई येथे ११ नोव्हेंबर १९०५ ला 'पायोनियर अर्बन', ९ जानेवारी १९०६ ला पुण्यात 'नं. १ मिलिटरी अकाऊंट्स म्युच्युअल हेल्प क्रेडिट सोसायटी, १८ जानेवारी १९०६ ला 'कॉसमॉस को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी' स्थापना करण्यात आल्या होत्या. २३ जानेवारी १९०६ रोजी 'द बॉम्बे अर्बन को - ऑपरेटिव्ह पतसंस्था' म्हणून नोंद झालेली संस्था पुढे १९११ मध्ये 'दि बॉम्बे सेंट्रल को - ऑपरेटिव्ह बँक लि.' म्हणून सुरू झाली. पुढे १९६१ मध्ये सध्याची 'दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि.ची सुरुवात झाली. १९०४ नंतर सहकारी पतपेढ्यांनी ग्रामीण भागातही बाळसे धरायला सुरुवात केली. ज्या अहमदनगर जिल्ह्यात सावकारशाहीविरुद्ध बंड झाले, त्या भागातही मोठ्या प्रमाणात सहकारी पतपेढ्या सुरू झाल्या, ज्यांनी महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना धनंजयराव गाडगीळ यांच्या सहकार्याने २६ नोव्हेंबर १९५० रोजी सुरू केला होता. त्याच विठ्ठलराव विखे-पाटील यांनी १९२३ ते १९४७ या काळात २५ सहकारी पतपेढ्या उभ्या केल्या. त्यांना लोक 'पतपेढीवाले आप्पा' म्हणून ओळखू लागले.

भारत देश स्वातंत्र्य झाल्यानंतर सहकार चळवळीचा अभ्यास करण्यासाठी रुरल क्रेडिट सर्व्हे समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने केलेल्या शिफारसी भारत सरकारसह सर्व राज्यांनी व रिझर्व्ह बँकेने स्वीकारून अंमलबजावणीला सुरुवात केली आणि १९५५-५६ पासून सहकार चळवळीच्या नव्या कालखंडास सुरुवात झाली.

राज्यातील प्रमुख सहकारी संस्थांची नावे : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, प्राथमिक शेती पतपुरवठा संस्था सामान्य, कृषक सेवा सहकारी संस्था, प्राथमिक सहकारी नागरी बँका, नोकरदारांच्या पतपुरवठा संस्था, जिल्हा कृषी औद्योगिक संघ, तालुका खरेदी विक्री संघ, गटपातळीवरील बलुतेदार सहकारी संस्था, सूत गिरणी कापूस उत्पादक संस्था, मजूर सहकारी संस्था (बिगर आदिवासींच्या) ग्रामीण, सहकारी दवाखाने.

सहकाराचे महत्त्व

'विना सहकार नाही उद्धार' हे ब्रीद तयार व्हावे एवढी ताकत सहकारामुळे महाराष्ट्रात निर्माण झाली. सहकार हाच आर्थिक विकासाचा महत्त्वाचा घटक आहे याची जाणीव महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना होती. म्हणून त्यांनी सहकाराला चालना देण्यासाठी १९६० मध्येच राज्यात नवा सहकारी सोसायट्याचा कायदा केला. सहकारी तत्त्वावरील पहिली गृहनिर्माण संस्था 'चित्रापूर' मुंबईत अस्तित्वात आली. त्यामुळे सर्वसामान्य माणसाचे घरांचे स्वप्न पूर्ण झाले. याला शासनाने पाठबळ दिल्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्था शहरांत मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या. सर्वसामान्य माणूस स्वतःच्या घरात राहू शकतो, हा आत्मविश्वास सहकारामुळेच निर्माण झाला.

महाराष्ट्रातील सहकारजाळ्यात राज्यात नोंदणीकृत सहकार संस्थाच्या जवळपास २४ वेगवेगळ्या आस्थापना आहेत. राज्यात एकूण ३१ जिल्हा

शेतकरी हाच केंद्रबिंदू

राज्याच्या विकासामध्ये सहकार चळवळीची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. सहकारी अर्थव्यवस्थेने गेल्या ६० वर्षांमध्ये ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाला आधार दिला आहे. नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकरी बांधव अडचणीत येत आहेत. त्यामुळे शेतकरी हा केंद्रबिंदू ठेवून शेतकरी कर्जमुक्ती योजना, पीक कर्जाची प्रभावी अंमलबजावणी करून ग्रामीण वित्त पुरवठा अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात येत आहे. याबरोबरच शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन घडवण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे.

- बाळासाहेब पाटील, सहकार, पणन मंत्री

संपत्ती संवर्धन

अनोन्य सहकारी मंडळी नावाची संस्था निर्माण केली तो पहिला यशस्वी प्रयत्न होता. त्यानंतर सहा दशकाच्या कालखंडात जी सहकार चळवळ निर्माण झाली, ती शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठीच होती. पहिल्या कालखंडात रिलिफ मूव्हमेंट होती. दहा लोकांना अडचणी निर्माण झाल्या तर कशा दूर करायच्या यासाठी ते दहा लोक एकत्र येत. कोणत्याही मदतीने त्यांच्या संघशक्तीच्या जोरावर अडचणींवर मात करण्याचा प्रयत्न होता केवळ नड भागवून कार्यभाग होत नाही. कर्ज दिल्यानंतर ते परत आले पाहिजे. ते परत यायचे असेल तर केवळ परत येते की, नाही इतकेच पाहून चालत नाही. त्यासाठी कर्ज परत करण्याची पात्रता, एकंदर त्यांनी चालवलेले व्यवहार आणि त्यामधून संपत्ती वाढली तरच संबंधिताचे कर्ज फेडण्याची शक्यता निर्माण होईल. केवळ आपत्ती निवारण करावे. हा पहिला कालखंड झाला. दुसरा कालखंड होता तो संपत्ती संवर्धनाचा. पतसंस्थानंतर बहुउद्देशीय सोसायट्यांचा काळ आला. ग्रामीण शेतीविषयक गरजांपासून ते ग्राहक वस्तूंचे वितरण औद्योगिक प्रक्रिया आणि सहकारी रुग्णालयांपर्यंत सहकारी अर्थव्यवस्थेची वाटचाल झाली आहे.

मध्यवर्ती बँका असून त्यांच्या ३७५२ एवढ्या शाखा आहेत. या बँकांचे एकूण भागभांडवल ३ हजार २९६ कोटी ९ लाख एवढे आहे तर ठेवी ८३ हजार ४८ कोटी ६१ लाख एवढ्या आहेत. सद्य:स्थितीत महाराष्ट्रात १६८ सहकारी कारखाने कार्यरत आहेत. (२०१६ च्या अहवालानुसार) राज्यात ५०८ नागरी सहकारी बँका, २१,१३६ कृषी सहकारी पतसंस्था, १,१८३ पणन सहकारी संस्था, २७,४१२ उत्पादक सहकारी संस्था (साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या इत्यादींचा समावेश आहे), समाजसेवी सहकारी संस्था १,२६,३७१ या सर्व प्रकारच्या सहकारी संस्था कार्यरत आहेत. राज्याच्या लोकसंख्येच्या अर्ध्यापेक्षा अधिक लोक सहकार क्षेत्राशी प्रत्यक्ष निगडित आहेत. हा इतर राज्याच्या तुलनेत खूप मोठा आकडा आहे.

सहकार नेतृत्व

महाराष्ट्रात शेतकऱ्यांमध्ये जाणीवजागृती करून सहकारी चळवळीच्या माध्यमातून आर्थिक विकासाची पायाभरणी करायची हे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांचे स्वप्न होते. सहकाराच्या माध्यमातून उभी राहिलेली साखर कारखानदारी, दूध डेअऱ्या, सूतगिरण्या, तेलगिरण्या, शेतमाल विक्रीच्या मार्केटिंग संस्था, बँकिंग, प्रक्रिया उद्योग, ग्राहक, मत्स्य, गृहनिर्माण, बिगरशेती पतसंस्था यांच्यामुळे ग्रामीण लोकांचे राहणीमानच बदलले इतकेच नव्हे, तर राज्याच्या अर्थव्यवस्थेलाही गती मिळाली.

ग्रामीण भारताचा आर्थिक विकास जास्तीत जास्त लोकांच्या सहभागातून सहकारी चळवळीद्वारे साधला जाऊ शकतो, अशी धारणा ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ यांची होती. त्यास राज्याच्या सहकारी चळवळीतील वैकुंठभाई मेहता यांच्या अविरत प्रयत्नांची जोड मिळाली. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, विठ्ठलराव विखे-पाटील, भाऊसाहेब हिरे, बाळासाहेब भारदे, तात्यासाहेब कोरे, शरद पवार, भाऊसाहेब थोरात, शिवाजीराव पाटील यांच्यासारखा दूरदृष्टी असलेल्या नेत्यांच्या जाणीवपूर्वक प्रयत्नांमुळे सहकारी संस्थांचे बीज ग्रामीण भागात पेरले गेले.

पाणी उपसा सहकारी संस्था

राज्यातील जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली येण्यासाठी सहकारी उपसा जलसिंचन संस्थांना त्यांच्या प्रकल्प खर्चाच्या एकूण २५ टक्के अथवा एक लाख रुपये यापैकी कमीत कमी रक्कम सबसिडीपोटी दिली जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या औद्योगिक सहकारी संस्थांना पाच कोटी रुपयांचे भागभांडवल व व्यवस्थापकीय अनुदान देण्याची व्यवस्था सरकार करते.

साखर कारखानदारी

राज्याच्या सहकारी क्षेत्रात अधिक साखर कारखाने आहेत. देशाच्या साखरेची गरज भागवण्यात महाराष्ट्राचा वाटा महत्त्वाचा आहे. साखर कारखाने, जिनिंग फॅक्टरी, सूतगिरण्या, हातमाग, यंत्रमाग, सहकारी दूध डेअरी व संघ, मत्स्य

सहकारी संस्था यांचा शेतमाल प्रक्रिया सहकारी संस्थांत सहभाग होतो. यावरून सामाजिक व आर्थिक परिवर्तन घडवून आणणाऱ्या या चळवळीची शक्ती दिसते. आजघडीला १६८ सहकारी कारखाने आहेत. एकूण कारखान्यांची संख्या दोनशेच्यावर आहे.

लोकचळवळ

लोकांनी लोकांसाठी चालवलेली चळवळ म्हणजे सहकार चळवळ. ती खऱ्या अर्थाने लोकांची चळवळ आहे. चळवळीची सूत्रे कार्यकर्त्यांच्या हाती असली पाहिजे. त्या संस्थांचा कारभार लोकशाही पद्धतीने चालला पाहिजे.

मोलाचे योगदान

राज्याच्या तसेच देशाच्या विकासात सहकार क्षेत्राचे मोलाचे योगदान राहिले आहे. महाराष्ट्र हे सहकार चळवळीचे केंद्र आहे. शेती, साखर कारखाने, शिक्षण, ग्रामविकास, सहकारी सोसायट्या, पतसंस्था, सहकारी व ग्रामीण बँका, दुग्धव्यवसाय या क्षेत्रातील सहकार चळवळीमुळे राज्य प्रगत बनले आहे. या क्षेत्राला उभारी देणे, धोरणांच्या अंमलबजावणीत सुसूत्रता आणणे तसेच सहकारातून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यावर आमचा भर असेल.

- डॉ. विश्वजीत कदम, सहकार, राज्यमंत्री

सरकारचा या पद्धतीत किमान हस्तक्षेप असावा. असे सहकार चळवळीचे नेते आणि जाणकारांना वाटते गोरगरिबांच्या विकासासाठी चळवळीचा उपयोग व्हावा हा सहकाराच्या विचारांचा गाभा आहे. जागतिकीकरणामुळे काही समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यांना तोंड देण्यासाठी सहकारात कालानुरूप योग्य त्या सुधारणा करून शेतकरी कारागिरांना जगवले पाहिजे ही भूमिका शासनाने स्वीकारली. विविध क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आक्रमणाला सहकाराने तोंड देता येईल, ही त्यामागची धारण होती आणि आहे.

या सर्व साखर कारखान्यांची गाळप क्षमता हंगामात प्रतिदिन ५.११ लाख मेट्रिक टन इतकी आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील जवळपास २.५ कोटी एवढ्या लोकसंख्येची उपजीविका असे शेतीवर अवलंबून आहे.

पणन

- महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्पास (Maharashtra Agribusiness Network-MAGNET) मान्यता - यामुळे फळे व भाजीपाला उत्पादनास मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन या नेटवर्कमधून अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना प्रोत्साहन.
- कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत चालू राहणे व शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विक्रीमध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये म्हणून बाजार समितीचे मुख्य आवार व उपबाजार चालू ठेवण्याचा निर्णय.
- लॉकडाऊन काळात थेट शेतकरी - थेट ग्राहक उपक्रम.
- २७ मार्च ते ३० जून २०२० या कालावधीत फळे व भाजीपाल्याची एकूण ३६०० मे.टन विक्री. खरेदी विक्रीसाठी पणन मंडळाच्या संकेतस्थळावरील bs.msamb.com हे पोर्टल कार्यान्वित, ३२५ आंबा उत्पादकांची नोंदणी, त्याद्वारे ६५००० डझन आंब्याची विक्री.
- जानेवारी २०२० ते जून २०२० अखेर सुविधा केंद्रावरून ९९१२ मे टन शेतमाल आखाती व युरोपीय देशांमध्ये निर्यात.
- बाहेरील राज्यात पाठवण्यात येणाऱ्या भाजीपाला व फळे वाहतुकीस येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी कृषी पणन मंडळाच्या यार्ड येथील मुख्यालयात २४ तास 'आंतरराज्यीय फळे व भाजीपाला वाहतूक नियंत्रण कक्ष' २७ मार्च रोजी सुरू. या नियंत्रण कक्षास २००० फोन कॉल प्राप्त.
- यंदा २१९.४९ लाख क्विंटल विक्रमी कापसाची खरेदी गेल्या दहा वर्षातील ही विक्रमी खरेदी. हंगाम २०१९-२० मध्ये एकूण १९० कापूस खरेदी केंद्रावर कापूस पणन महासंघाद्वारे कापूस खरेदी. कापूस पणन महासंघाद्वारे हंगाम २०१९-२० मध्ये ३.३३ लाख शेतकऱ्यांकडून कापसाची खरेदी, शेतकऱ्यांकडून एकूण ४६०० कोटी रुपयांची कापूस खरेदी. सहकारी उद्योग शेतकऱ्यांच्याच मालकीचे हवेत.

कृषी पणन

- राज्यामध्ये एकूण ३०५ बाजार समित्या असून 'अ' वर्ग १४४, 'ब' वर्ग ७६, 'क' वर्ग ३९ आणि 'ड' वर्ग ४६ बाजार समित्या आहेत.
- २०१९ च्या हंगामात पणन मंडळाच्या विविध सुविधा केंद्रातून १९००.२२ मेट्रिक टन निर्यातीसाठीच्या आंब्यावर प्रक्रिया करण्यात आली.

संघटना होऊ नयेत म्हणून..!!

सहकारी संस्था तत्त्वानुसार चालत असल्या तरी त्याबाबत कार्य करणाऱ्या

पायाभूत सुविधा विकसित करणार

राज्यातील पणन व्यवस्थेतील पायाभूत सुविधांचे बळकटीकरण व आधुनिकीकरणाकरिता विविध प्रकल्प राबविण्यात येत आहेत. या प्रकल्पांतर्गत कृषी उत्पन्न बाजार समित्या, गोदाम, रस्ते, लीलावगृह, शीतगृहे, ग्रामीण आठवडी बाजार व जनावरांचे बाजार येथे आवश्यक पायाभूत व मूलभूत सुविधा विकसित करण्यात येत आहेत. शेतकऱ्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

- शंभुराज देसाई, पणन, राज्यमंत्री

काही अभ्यासकांचे मत आहे की, सहकार चळवळ ही लोकशाही, समानता, साम्यता, प्रामाणिकपणा, खुलेपणा इत्यादी मूल्यांवर व त्या अनुषंगाने येणाऱ्या सहकारी तत्त्वांवर आधारलेली आहे. सहकाराची गाडी रुळावर यावी, सहकारी मूल्ये व सहकारी तत्त्वे आणि संस्थांची उद्दिष्टे लक्षात घेऊनच सहकारी संस्थांचे कामकाज चालावे म्हणून महत्प्रयासाने अनेकांची समजूत काढून ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी ९७व्या घटनादुरुस्तीचे शिवधनुष्य अनेकांचा तात्त्विक विरोध असताना उचलून घटना दुरुस्ती घडवून आणली. पण प्रत्यक्षात लोकशाही व्यवस्थापन वेळच्या वेळी व्हावयाच्या निवडणुका, वार्षिक साधारण सभा, कार्यक्षम लेखा परीक्षण यांचा अभाव तसेच त्या अनुषंगाने अपेक्षित व्यवस्थापनातील कार्यक्षमता अद्यापही दिसत नाही. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सहकारी तत्त्वांप्रमाणेच मूल्ये, सहकारी तत्त्वेही लक्षात घेतली जावीत म्हणून शासनाकडे कायदा दुरुस्तीचा पाठपुरावा करीत आहे. अजूनही सहकारी संस्था, सभासद, पदाधिकारी आणि व्यवस्थापनाने योग्य ते कामकाज केल्यास सहकारी चळवळ समाजाच्या प्रगतीतील आपला योग्य तो वाटा उचलण्यास मागे पडणार नाही. तर आणखी एका अभ्यासकांच्या मते, राज्यात कापूस एकाधिकार खरेदीपासून पुढील उत्पादनापर्यंत हा व्यवसाय शेतकऱ्यांच्या मालकीचा करण्याचा प्रयत्न झाला होता. पण तो पूर्णत्वास गेला नाही, तसा झाला असता तर मराठवाडा आणि विदर्भाचे आजचे चित्र वेगळे दिसले असते. एकूण सहकारी चळवळ ही महाराष्ट्राची भाग्यरेषा ठरली आहे.

गावागावांतील विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या अधिक आर्थिक सक्षम करणे, पर्यायाने तालुका खरेदी-विक्री संघ अधिक क्रियाशील करण्याची या मागची भूमिका आहे. आजही शेतकऱ्यांच्या मालाची खुल्या बाजारपेठेत किंमत पडली तर शासनाच्या हमी भावाप्रमाणे तालुका खरेदी विक्री संघच मोठ्या प्रमाणात खरेदी करतात. उदा. कापूस, तूर, सोयाबीन, हरभरा, अशा प्रकारची उत्पादने.

सहकार क्षेत्राने महाराष्ट्राची ओळख देशभरात मोठी केली. ग्रामीण भागात जिथे शेतकऱ्यांना हजारात उत्पन्न मिळायचे तिथे सहकारी साखर कारखानदारीने लाखात उतपन्न मिळायला लागले. शेतीच्या प्रगतीसाठी सहकारी बँकांकडून सहज, सुलभ वित्त मिळायला लागले. त्यामुळे सहकार चळवळीने ग्रामीण महाराष्ट्राला बदलून टाकल्याचे चित्र अभ्यासाअंती लक्षात येते. महाराष्ट्र सरकारने नेहमीच सहकार क्षेत्राला पाठबळ देण्याचे धोरण ठेवल्यामुळे जागतिकीकरणानंतरही सहकार क्षेत्र अतिशय उत्तम काम महाराष्ट्रात करत आहे, हे निश्चित!!

शासन निर्णय

- महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१९ पर्यंतच्या कालावधीसाठी घेतलेल्या अल्पमुदतीच्या पीक कर्जाचे पुनर्गठण/फेरपुनर्गठण केलेल्या राष्ट्रीयकृत बँका, व्यापारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, ग्रामीण बँका, विविध कार्यकारी सहकारी संस्था यांच्याकडून शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीक कर्जाच्या थकबाकीची ३० सप्टेंबर २०१९ रोजी

संग्रहित

रक्कम प्रतिशेतकरी २ लाख रुपयांपर्यंत शासनाच्या वतीने भरण्याचा निर्णय.

- कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या थेट खात्यात ऑनलाइन पद्धतीने जमा, लॉकडाऊन कालावधीतसुद्धा या कर्जमुक्तीच्या अंमलबजावणीला गती.
- या योजनेंतर्गत सुमारे ३२ लाख पात्र खातेदार शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध २० जुलै २०२० अखेर त्यापेकी २७.३७ लाख खातेदारांना १७ हजार ६४६ कोटी रुपये एवढ्या रकमेचा लाभ.
- अवघ्या दोन महिन्यात योजनेची अंमलबजावणी, यामुळे शेतकऱ्यांना चालू वर्षाच्या खरीप व रब्बी हंगामासाठी पीक कर्ज मिळण्याचा मार्ग अधिक सुलभ.
- २०२०-२१ या वर्षातील खरीप हंगामातील ४५ हजार ७७८ कोटी रुपये एवढा लक्ष्यांक निश्चित. त्यापैकी १ एप्रिल २०२० ते ३१ जुलै २०२० या कालावधीत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व व्यापारी बँकांमार्फत सुमारे ३०.२० लाख शेतकऱ्यांना २२ हजार ७७० कोटी रुपये पीक कर्ज पुरवठा. यापैकी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत २१.३३ लाख शेतकऱ्यांना ११ हजार ५७८ कोटी रुपये पीक कर्ज पुरवठा. खरीप २०२० मधील पीक कर्ज वाटपाचे प्रमाण मागील वर्षाच्या तुलनेत जास्त.
- कोरोनामुळे निर्माण झालेले आर्थिक संकट विचारात घेऊन सहकारी पतसंस्थांना दिलासा देण्यासाठी थकीत कर्जाच्या एनपीए वर्गवारीसाठी सध्या असलेला ६ महिन्यांचा ९ महिन्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय.
- नागरी सहकारी बँका व पतसंस्थांमार्फत विविध प्रकारचे व्यावसायिक व नोकरदार यांनी काही विशिष्ट परिस्थितीत कर्जाची विहित कालावधीत परतफेड न केल्यास थकीत कर्जाची वसुली होण्यासाठी एकरकमी कर्ज परतफेड योजना लागू. या योजनेस ३१ मार्च २०२१ पर्यंत मुदतवाढ.
- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सहकारी संस्थांच्या निवडणुका सहा महिने पुढे ढकलण्याचा निर्णय.
- सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करणे व वार्षिक साधारण सभा घेण्यास मुदतवाढ.
- साखर उद्योगाला आर्थिक मदतीसाठी आत्मनिर्भर योजना.
- ४४ साखर कारखान्यांतील १ लाख ४१ हजार ऊसतोड मजुरांना लॉकडाऊनच्या कालावधीत मूळगावी पोहोचवण्याची व्यवस्था.
- लॉकडाऊनच्या कालावधीत महाराष्ट्र सहकार विकास महामंडळामार्फत ७५ शेतकरी उत्पादक कंपन्या/सहकारी संस्थांच्या सहकार्याने ४१४ सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील १२ हजार सभासदांना माफक दरात थेट फळे व भाजीपाला पुरवठा.

शेतीमाल तारण योजना

शेतकऱ्यांला असलेल्या आर्थिक गरजेपोटी तसेच स्थानिक पातळीवर शेतमाल साठवणुकीच्या पुरेशा सुविधा नसल्यामुळे शेतमालाच्या काढणी हंगामात मोठ्या प्रमाणात शेतमाल बाजारपेठेत विक्रीसाठी येतो. साहजिकच बाजारभाव पडतात, अशा वेळी शेतकरी आपल्या शेतमालाची वाठवणूक करून ठेवू शकतो, अशा शेतकऱ्यांसाठी १९९०-९१ पासून शेतमाल तारण कर्ज योजना राबवली जात आहे. या योजनेमध्ये तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सूर्यफूल, चणा, भात, हळद या शेतमालाचा समावेश आहे. या एकूण किंमतीच्या ७५ टक्के रक्कम ६ महिने कालावधीसाठी ६ टक्के व्याज दराने तारण कर्ज देण्यात येते.

सहकार खरेदी-विक्री संघ

राज्यात २०१९ अखेर जिल्हास्तरावर १० खरेदी विक्री संघ ३३७ तालुकास्तरावर खरेदी विक्री संघ आहेत. या संघाच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी मुंबई येथे महाराष्ट्र स्टेट को-ऑफ मार्केटिंग फेडरेशन कार्यरत आहे.

संदर्भ : लोकराज्य, शासनाचे कार्यक्रम अंदाजपत्रक, सहकार आयुक्त कार्यालयाचा ५३ वा अहवाल, विश्वकोश, सहकार महर्षी विठ्ठलराव विखे-पाटील लेखक अनिल शिंदे यांचा ग्रंथ. तसेच या क्षेत्रातील अभ्यासक, सहकार विभागात अनेक वर्षे उच्च पदावर काम केलेले आणि आता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये सहकार व्यासपीठाची जबाबदारी असलेले एस.टी. भिडे, ज्येष्ठ पत्रकार आणि सहकार विषयातील अभ्यासक जयराम देसाई, साखर कानखानदारीतील अभ्यासक, साखर संघाचे माजी पदाधिकारी डॉ. इंद्रजीत मोहिते, सहकार विभागाच्या विविध विभागात काम केलेले अभ्यासू अधिकारी, सध्या सातारा येथे जिल्हा उपनिबंधक म्हणून कार्यरत असलेले प्रकाश आष्टेकर

जिल्हा माहिती अधिकारी, सातारा

आरोग्य : यशस्वी झुंज

कोविड-१९ मुळे जगभरात आरोग्यविषयक सुविधांचा पुनर्विचार सुरू झाला आहे. आरोग्य हा कोणत्याही राज्याचा प्राधान्याचा विषय बनला आहे. गेल्या ६० वर्षांत महाराष्ट्राने आरोग्यविषयक पायाभूत सुविधांमध्ये खूप मोठा टप्पा गाठला असला तरी कोरोना संकटामुळे या क्षेत्रात अधिक भरीवपणे कार्य करण्याची गरज निर्माण झाली आहे. राज्य शासन या संकटावर मात करून राज्याचा आरोग्य आराखडा अधिक मजबूत आणि सर्वसमावेशक करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे निर्णय घेत आहे.

अजय जाधव

महाराष्ट्र हीरकमहोत्सवी वर्ष साजरे करत असतानाच न भूतो न् भविष्यती अशा कोरोना या जागतिक महामारीचे संकट राज्यावरही आले. यामुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची उपयोगिता आणि मर्यादा अधोरेखित झाली. या सेवेवरचा लोकांचा विश्वास त्याने अधिकच दृढ झाला. राज्यात सार्वजनिक आरोग्य संस्थांचे ग्रामीण भागात घट्ट असलेले जाळे आता वाढत्या शहरीकरणामुळे महानगरांतही व्यापक झाले पाहिजे अशी गरज भासू लागली आहे. विशेष म्हणजे कोरोनाच्या साथीने ते अधिकच स्पष्टपणे जाणवत आहे.

गेल्या ६० वर्षांत आरोग्य सेवेची कामगिरी पाहिली तर महाराष्ट्राने देशासमोर या क्षेत्रात आदर्श ठेवल्याचे लक्षात येते. देवीनिर्मूलन, प्लेग नियंत्रण, पोलिओ निर्मुलन, नारू रोगाचे समुळ उच्चाटन, कुटुंब नियोजन कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी, माता आणि अर्भक मृत्युदरात लक्षणीय घट अशा अनेक क्षेत्रात राज्याची कामगिरी प्रभावी ठरली आहे.

पहिले आरोग्य केंद्र शिरूरला

राज्यात ब्रिटीश काळापासून ग्रामीण आरोग्यावर भर देण्यात आला आहे. ग्रामीण जनतेला ग्रामीण आरोग्य केंद्राच्या माध्यमातून वैद्यकीय सेवा देण्याच्या हेतूने १९३१ ते १९३९ या काळात रॉकफेलर फाऊंडेशनच्या मदतीने देशभरात स्थापन झालेल्या ७ आदर्श आरोग्य केंद्रांपैकी एक महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील शिरूर येथे आहे. सध्या बी.जे. मेडिकल कॉलेजचे ग्रामीण क्षेत्रीय प्रात्यक्षिक केंद्र म्हणून त्याचा वापर होत आहे. आपल्या आरोग्यसेवेवर ब्रिटिशांची छाप दिसून येते. सिव्हिल रुग्णालय, सिव्हिल सर्जन, पोलीस सर्जन अशी काही नावे आजही तशीच कायम आहेत.

ग्रामीण महाराष्ट्रात प्राथमिक आरोग्यकेंद्रांची संख्या २५८ वरून सुमारे १८२८ पर्यंत आली आहे. लोकसंख्येची वाढ दुपटीने झाली, त्यापटीत आरोग्य सेवेत काही प्रमाणात वाढ झाली. ग्रामीण भागात उपकेंद्रांपासून ते प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालये यामाध्यमातून आरोग्यसेवा बळकट झाली आहे. दर लाख

लोकसंख्येमागे असलेले खाटांचे प्रमाण २३ वरून सध्या १०३ वर आहे.

'सार्वजनिक आरोग्या'शिवाय सुराज्याची संकल्पना पूर्णत्वास येऊ शकत नाही. राज्याच्या आरोग्य विभागाकडे राज्यातील नागरिकांच्या वैद्यकीय उपचारांची जबाबदारी आहे. ही जबाबदारी आरोग्य सेवा संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधनालय, कामगार राज्य विमा संचालनालय, आयुर्वेद संचालनालय आणि अन्न व औषध प्रशासनामार्फत हाताळली जाते. 'सर्वांसाठी आरोग्य, आरोग्यासाठी सर्व' ही संकल्पना घेऊन आरोग्य विभाग शहरी व ग्रामीण विभागात आरोग्य सेवा पुरवत आहे. विभागामध्ये सुमारे ८०२४ डॉक्टर्स, २१ हजार ५३८ नर्सेस व इतर कर्मचारी वर्ग कार्यरत आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान या प्रकल्पाचा आरोग्य विभागातील कार्यप्रणालीमध्ये प्रामुख्याने समावेश आहे.

लसीकरण

लसीकरण असो की, कुटुंब नियोजन कार्यक्रम अथवा कुष्ठरोग निर्मूलन प्रत्येक क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर राहिला आहे. साधारणपणे ८० च्या दशकात महाराष्ट्रात 'पाणी गाळा, नारू टाळा' या संदेशाने ग्रामीण भागातील भिंती व्यापल्या होत्या. आरोग्य शिक्षण, जाणीवजागृती यांच्या माध्यमातून राज्याने या रोगाला पार हद्दपार करून टाकले. पाणी गाळून पिण्याचा संदेश लोकांच्या मनात रुजवण्यात आल्याने रोगाचे उच्चाटन करण्यात यश मिळाले.

राज्याने ६० वर्षात सांसर्गिक आजारांच्या साथी अनुभवल्या आहेत. स्मॉल पॉक्स म्हणजे देवी, प्लेग या साथी राज्याने अनुभवत आणि त्यावर मात करत त्याचे राज्यातून उच्चाटन केले. याला लसीकरणाची जोड मिळाल्याने आजारावर नियंत्रण आले. आजही ज्यांचे वय पन्नाशीच्या घरात आहे त्या पिढीच्या डाव्या हाताच्या दंडावर मोठा आकाराचा चदगा (स्पॉट) हा दिसून येतो तो म्हणजे देवीच्या लसीचा व्रण.

पोलिओ निर्मूलन

पोलिओ निर्मूलनातही राज्याने भरीव कामगिरी केली. साधारणपणे १९७५ पासून लहान बालकांच्या लसीकरणाला राज्यात सुरुवात झाली. १९९५ पासून नियमितपणे पोलिओ लसीकरण करण्यात येत आहे. राज्यात २०११ पासून पोलिओचा रुग्ण आढळलेला नाही. हिवताप निर्मूलन, कुष्ठरोग नियंत्रण आणि अंधत्व नियंत्रणासारखे राष्ट्रीय कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवले जात आहेत. जलजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र यशस्वी झाला आहे. ग्रामीण भागात पावसाळ्यात हमखास येणाऱ्या हगवण, अतिसार आणि गॅस्ट्रोच्या साथीमध्ये कमालीची घट झाली आहे. याला आरोग्य शिक्षणाची जशी मोलाची मदत झाली त्याचप्रमाणे ग्रामीण महाराष्ट्रात पेयजल व्यवस्थेची निर्मिती, ठिकठिकाणी होणारा शुद्ध पाणीपुरवठा यामुळे जलजन्य आजारांच्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून येत आहे.

नागरिकांचे आरोग्य हे अनेक मूलभूत सुविधा जसे की, रस्ते, पाणी, नागरी सुविधा यांच्याशी निगडित आहे. या मूलभूत सोयीसुविधा राज्यात वाढल्याने आरोग्य सेवेला त्या पूरक ठरल्या आहेत. नळाद्वारे शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याने बऱ्याच अंशी दूषित पाण्यामुळे होणाऱ्या आजारांच्या प्रमाणात घट झाली आहे. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या माध्यमातून राबवलेल्या शुद्ध पाणी व स्वच्छताविषयक योजनांच्या अंमलबजावणीमुळेही जागरूकता निर्माण झाली आहे. राज्य हागणदारीमुक्त झाल्यामुळे पिण्याचे पाण्याचे स्रोत दूषित होण्यापासून वाचले व त्याचा फायदा जनतेला आरोग्यासाठी होत आहे. त्यामुळे कधीकाळी गाव-वाड्यांमध्ये होणारी अतिसाराची लागण होण्याच्या घटना कमी झाल्या आहेत. पावसाळ्यामध्ये मलेरिया, गॅस्ट्रो आणि पावसामुळे होणाऱ्या इतर रोगांचा फैलाव होण्यापासून आरोग्य विभागाने केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना फलदायी ठरल्या आहेत.

आदिवासी क्षेत्रावर विशेष भर

राज्यामध्ये आरोग्य संस्थांचे जाळे मोठ्या प्रमाणावर असून आरोग्य सेवेची त्रिस्तरीय योजना राज्यात राबवली जाते व त्यातर्फे ग्रामीण जनतेला विशेषत: गरीब व जोखमीच्या लोकांना गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा पुरवल्या जातात. राज्यामध्ये विविध राष्ट्रीय आरोग्याचे कार्यक्रम राबवले

आरोग्य यंत्रणेचे बळकटीकरण

मी पदभार स्वीकारल्यापासून सामान्यांना गुणवत्तापूर्ण आणि गतिमान सेवा देण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. ग्रामीण भागात ५०० नवीन रुग्णवाहिका देण्यात येत असून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य यंत्रणा अधिक बळकट करण्यावर भर दिला आहे. १७ हजार रिक्तपदे लवकरच भरली जातील. अर्थसंकल्पात आरोग्याला अधिकचा निधी मिळण्यासाठी प्रयत्नशील आहे. सांसर्गिक आजारांवरील रुग्णालये प्रत्येक जिल्ह्यात सुरू करण्याला प्राधान्य दिले आहे.

- राजेश टोपे, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

जातात. कुटुंब कल्याण कार्यक्रम चालू ठेवणे ही सार्वजनिक आरोग्य कार्यक्रमांची मध्यवर्ती कल्पना आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रे, सामूहिक आरोग्य केंद्रे अशा आरोग्य विषयक मूलभूत सुविधा पोहोचवणे यावर सार्वजनिक आरोग्य क्षेत्रामध्ये भर दिला आहे. मानसिक आरोग्य दक्षता, एड्स नियंत्रण, कर्करोग नियंत्रण आणि आदिवासी क्षेत्रामध्ये खास आरोग्य सेवा पुरवणे या कार्यक्रमांवर भर दिला आहे.

१९७० मध्ये राज्यात कुटुंब कल्याण कार्यक्रम राबवण्यास सुरुवात झाली. मर्यादित कुटुंब ठेवण्यासाठी शासनाने सुरू केलेली ही योजना खेडोपाडी पोहोचवली. 'लहान कुटुंब, सुखी कुटुंब', 'हम दो, हमारे दो' यांसारख्या घोषवाक्यांनी आरोग्य शिक्षणाच्या माध्यमातून ही योजना प्रभावीपणे अमलात आणली गेली. त्यामुळे कुटुंबाची संख्याही मर्यादित राहून एका कुटुंबात दोन अपत्ये ठेवण्यासाठी जनजागृती करावी लागली. राज्य शासनाचा हा एक महत्त्वपूर्ण कार्यक्रम उत्तमरीत्या राबवण्यात आला.

शहरांच्या वाढल्या गरजा

राज्यातील आरोग्य सेवेबाबत या क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी, स्वयंसेवी संस्था यांच्याशी चर्चा केल्यानंतर सर्वांनीच महाराष्ट्रातील ग्रामीण भागात सार्वजनिक आरोग्य यंत्रणा बळकट झाल्याचे सांगितले. त्या तुलनेत नागरी भागात ती बळकट होणे काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. देशामध्ये सर्वात जास्त शहरीकरण झालेल्या राज्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. त्यामुळे शहरी नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा पुरवण्यासाठी पुरेशी यंत्रणा उभारण्याची गरज असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. ज्या प्रमाणात स्वाइन-फ्लू, डेंग्यू यांसारखे आजार बळवतात, त्याचा जास्त प्रार्दुभाव हा शहरी भागातील दाट लोकवस्तीमध्ये जाणवतो. तेथून तो अन्यत्र पसरतो. औद्योगिकीकरण आणि नागरीकरण वाढतानाच आरोग्याच्या पायाभूत सुविधा शहरी भागामध्ये वाढवण्यावर भर देण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. सांसर्गिक आजारांवर नियंत्रण मिळवतानाच जीवनशैलीतून आलेल्या उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, कर्करोग यासारख्या असांसर्गिक आजारांवर (नॉन कम्युनिकेबल डिसिज) फोकस करणे आवश्यक असल्याचे या मान्यवरांचे म्हणणे आहे. त्याचबरोबर आरोग्यावर होणाऱ्या खर्चाबाबतीत सुद्धा विचार होणे आवश्यक आहे.

सार्वजनिक आरोग्य यंत्रणेचा ग्रामीण भागासाठी एक ढाचा तयार आहे तसा शहरी भागासाठीही आवश्यक आहे. शहरांमधील आरोग्य व्यवस्था, महापालिका, नगरपालिका यांच्या अखत्यारीत आहे. त्यामुळे या स्थानिक स्वराज्य संस्थांना आरोग्यासाठी अधिक निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या वर्षी राज्य शासनाने त्यासाठी पुढाकार घेतला असून शहरी भागासाठी आरोग्य संचालक या पदाची निर्मिती केली आहे.

वैद्यकीय शिक्षणाची महाराष्ट्रात सुविधा

गेल्या ६० वर्षांमध्ये वैद्यकीय शिक्षणाची सुविधा महाराष्ट्रात वाढली आहे. राज्यात सध्या ५१ वैद्यकीय महाविद्यालये कार्यरत आहे. त्याचबरोबर १८६ जीएनएम व ४६ बीएससी नर्सिंग महाविद्यालयेदेखील आहेत. या महाविद्यालयांतून शिकून बाहेर आलेले डॉक्टर शासकीय सेवेत येण्याचे प्रमाण मात्र कमी आहे. सरकारी सेवेत डॉक्टर का येत नाही याबाबत तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार डॉक्टरांसाठी योग्य ती कार्यसंस्कृती निर्माण करणे गरजेचे असून डॉक्टरांना मिळणारे वेतन, सुविधा, मनुष्यबळ या बाबींवर विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण भागामध्ये बऱ्याचदा राहण्याची योग्य ती सोय नसते. मुलाबाळांच्या शिक्षणाचा प्रश्न असतो. अशा परिस्थितीमुळे डॉक्टरांचा ओढा शहरी भागाकडे असतो. त्यामुळे ग्रामीण भागात डॉक्टरांच्या उपलब्धतेवर त्याचा परिणाम होतो. ग्रामीण भागात दर्जेदार सुविधा डॉक्टरांना उपलब्ध करून दिल्यास त्याचा चांगला परिणाम सेवेवर होण्यास मदत होईल. ग्रामीण आणि दुर्गम भागातील बालमृत्यू आणि मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्याकरिता विशेषज्ञांनी त्या भागात काम करणे आवश्यक असल्याचे मतही तज्ज्ञांनी व्यक्त केले.

हाफकिनची कामगिरी

महाराष्ट्रात असलेल्या रुग्णालयांनी देशभरात उपचारासाठी ख्याती मिळवली आहे. मुंबईतील जे.जे. रुग्णालय, के.ई.एम. रुग्णालय, पुणे, नागपूर, औरंगाबाद येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयांनी राज्यातील सामान्य रुग्णांना नवजीवन

टेलिआयसीयुचा प्रयोग

वैद्यकीय क्षेत्रात झालेले संशोधन, अद्ययावत यंत्रसामग्री यामुळे अनेक गंभीर आजारांवर यशस्वी उपचार करणे शक्य झाले. त्यामुळे मृत्यूच्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते. आजही ग्रामीण भागात दुर्गम ठिकाणी विशेषत: आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी राज्य शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी टेलिमेडिसीनचा वापर प्रभावी ठरत आहे. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञान आरोग्य क्षेत्रासाठी वरदान ठरत आहे. त्याचबरोबर कोरोनासारख्या महामारीत विशेषज्ञांची जाणवणारी कमतरता लक्षात घेता टेलिआयसीयूसारखा प्रयोगदेखील राज्य शासनाने सुरू केला आहे.

देण्याचे काम केले आहे. राज्यातील संशोधन संस्थेमुळे देखील महाराष्ट्राचा लौकिक देशभरातच नव्हे तर जगभरात वाढला आहे. 'हाफकिन इन्स्टिट्यूट' हे त्यातील एक महत्त्वाचे नाव! या इन्स्टिट्युटने प्लेग, देवी या आजारामध्ये मोठे काम केले आणि देशालाच नव्हे तर जगाला पोलिओची परिणामकारक लस दिली. त्याचबरोबर सर्पदंशावरील लसींच्या निर्मितीतही हाफकिनची कामगिरी अव्वल आहे.

वाढत्या लोकसंख्येला आळा घालतानाच 'स्त्री-भ्रूणहत्या'विरोधी कायद्याची (पीसीपीएनडीटी) महाराष्ट्राने प्रभावी अंमलबजावणी केली आहे. महाराष्ट्राने या क्षेत्रात केलेली कामगिरी देशभरात नावाजली गेली. मुलांमागे असलेला मुलींचा जन्मदर वाढण्यासाठीही राज्याने उल्लेखनीय काम केले आहे.

जनआरोग्य जीवनदायी

राज्यात २०१२ मध्ये राजीव गांधी आरोग्य योजना सुरू झाली. (दरम्यानच्या काळात या योजनेचे नामकरण महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना असे करण्यात आले.) आर्थिक दुर्बल घटकांसाठी ही योजना मोफत उपचार देणारी ठरली. त्यामुळे लाखो रुग्णांसाठी ती खऱ्या अर्थाने जीवनदायी ठरली. आता राज्यात सुरू असलेल्या कोरोना काळातही योजना राज्यातील सर्वच नागरिकांना लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. सामान्यांना न परवडणारे वैद्यकीय उपचार या योजनेमुळे शक्य झाले आहेत. अशा प्रकारची जागतिक स्वरूपाची सर्व नागरिकांना आरोग्याचे कवच देणारी योजना देणारे महाराष्ट्र पहिले राज्य ठरले आहे.

आपत्कालीन वैद्यकीय सेवेसाठी (१०८ क्रमांक) अद्ययावत रुग्णवाहिका सेवा महाराष्ट्राने सुरू केली. गेल्या किमान आठ ते दहा वर्षात लाखो रुग्णांना त्याने दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्राने मोटारबाईक ॲम्ब्युलन्स सेवादेखील सुरू केली. दुर्गम भागात आणि शहरी चिंचोळ्या भागात जेथे मोठे वाहन जात नाही. तेथेही मोटारबाईक ॲम्ब्युलन्स प्रभावी ठरली आहे.

औषध क्षेत्रात आघाडी

"राज्यात हाफकिनसारख्या औषध क्षेत्रात संशोधन करणाऱ्या परिपूर्ण संस्था आहेत. संशोधन, नियोजन आणि नियंत्रण या त्रिसूत्रीचा अवलंब करून राज्यातील आरोग्य क्षेत्रात मोठी झेप घेता येणे शक्य आहे. राज्यात फार्मा क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी अनेक उद्योजकही पुढे येत आहेत. अन्न धान्याच्या बाबतीतही आपले राज्य स्वयंपूर्ण आहे, आपले राज्य हे अन्न व औषध या क्षेत्रात आघाडी घेत आहे."

- डॉ. राजेंद्र शिंगणे, अन्न व औषध प्रशासन मंत्री

मातामृत्यू दरात घट

माता-बालकांच्या आरोग्यासाठी राज्यात अनेक योजनांच्या माध्यमातून उपाययोजना केल्या जात आहेत. राज्यात गेल्या अनेक वर्षांपासून संस्थात्मक बाळंतपणावर भर दिला जात आहे. त्यामुळे माता मृत्यूचे प्रमाण कमी झाले आहे. जागतिक बँक आणि केंद्रीय आरोग्य कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या सहकार्याने निती आयोगाने २०१७-१८ च्या माहितीच्या आधारावर आरोग्यदायी राज्य प्रगतिशील भारत अहवाल तयार केला आहे. सर्वात मोठ्या राज्यांमध्ये महाराष्ट्राने ६३.९९ गुणांसह तिसरे स्थान मिळवले आहे.

निती आयोगाच्या अहवालानुसार पाच वर्षांखालील बालकांच्या मृत्यू दरात आणि नवजात अर्भकांच्या मृत्युदरात घट आलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्र अग्रणी आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रात संस्थात्मक बाळंतपणात वाढ झाल्याने परिणामी माता आणि बाल मृत्युदरात घट झाली आहे. आदीवासी भागात 'माहेर' सारख्या योजनेमुळे गर्भवतींना प्रसूतीसाठी हक्काचे घर मिळाले आहे.

सॅम्पल रजिस्ट्रेशन सर्वेच्या (एसआरएस) प्रकाशित झालेल्या अहवालानुसार मातामृत्यू दर कमी असणाऱ्या राज्यांच्या यादीत यावेळेसही महाराष्ट्राने दुसरा क्रमांक मिळवला. गेल्या तीन वर्षात महाराष्ट्राचा मातामृत्यू दर ६८ वरून ६१ नंतर ५५ आणि आता ४६ असा नोंदवण्यात आला आहे. या यादीत पहिल्या पाच क्रमांकामध्ये केरळ (४३), महाराष्ट्र (४६), तामिळनाडू (६०), तेलंगणा (६३), आंध्रप्रदेश (७४) या राज्यांचा समावेश आहे.

बालकांची आरोग्य तपासणी

राष्ट्रीय बालस्वास्थ योजनेमुळे ग्रामीण भागातील बालकांचे आरोग्य सुधारण्यास मदत झाली आहे. या योजनेंतर्गत दरवर्षी सुमारे दोन कोटी बालकांची आरोग्य तपासणी करून ज्यांना शस्त्रक्रियेची आवश्यकता आहे त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करून नवजीवन दिले आहे. मेळघाट, पालघर, नंदुरबार या ठिकाणी आढळणारे कुपोषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे. कुपोषणग्रस्त बालकांना या भागात करण्यात आलेल्या बालक उपचार केंद्रांमुळे (सीटीसी) आणि पोषण पुनर्वसन केंद्रामुळे (एनआरसी) कुपोषणाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी साहाय्यभूत ठरली आहेत.

आरोग्य सुविधांवर भर

ग्रामीण आरोग्याचा पाया राज्यात बळकट आहे तो अधिक भक्कम करण्यासाठी पायाभूत सुविधांवर भर दिला जात आहे. कोरोना काळात शहरांपाठोपाठ ग्रामीण भागातही उपचारांच्या सुविधा निर्माण करण्यात आल्या. स्व.बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेच्या माध्यमातून आता गंभीर रुग्णांवर गोल्डन अवरमध्ये मोफत उपचाराची सुविधा मिळणार आहे.

- राजेंद्र पाटील-यड्रावकर, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, राज्यमंत्री

जिल्हा रुग्णालयामध्ये करण्यात आलेल्या एसएनसीयूमुळे देखील कमी वजनाच्या बालकांना नवजीवन देण्याचे काम केले जात आहे.

ग्रामीण पातळीवर अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्ती यांचे योगदान मोलाचे आहे. 'आशा' कार्यकर्तीमुळे आरोग्य सेवेला मोठी मदत मिळाली आहे. ग्रामीण भागातील आरोग्य विभागाचा कणा ओळखल्या जाणाऱ्या आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांच्या मोबदल्यात वाढ करण्याचा निर्णयही राज्य शासनाने घेतला आहे. त्याचा फायदा राज्यातील जवळपास ७० हजार आशांना होत आहे.

वैद्यकीय क्षेत्रात आपत्कालीन परिस्थिती तशी रोजचीच असते. त्यामुळे इमर्जन्सी म्हणून या क्षेत्राला अधिकचे बळ मिळण्याची गरज तज्ज्ञांनी व्यक्त केली. आरोग्यासाठी अर्थसंकल्पात जास्त तरतूद होणे गरजेचे असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले आहे. कोरोना महामारीने तर ही बाब अधिकच स्पष्ट केली आहे. महानगरांचा विकास आराखडा करताना या बाबी लक्षात घेणे गरजेचे झाले आहे.

राज्य निर्मितीच्या ६० वर्षांमध्ये आरोग्य क्षेत्रात आमूलाग्र बदल झाले. सार्वजनिक आरोग्यसेवेसोबतच खासगी रुग्णालयांचीदेखील उभारणी मोठ्या प्रमाणावर झाली. त्यामुळे आरोग्यविषयक सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाल्या. मात्र सर्वांनाच खासगी रुग्णालयातील जास्त खर्चाचे उपचार परवडत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांना सार्वजनिक आरोग्यसेवा आधार देणारी ठरली आहे. त्याला जोड मिळाली आहे ती राज्यात निर्मित झालेल्या विविध मूलभूत सुविधांची. डॉक्टरांची वानवा हा प्रश्न कायमच सार्वजनिक आरोग्य सेवेला भेडसावत राहिला आहे. त्यावर राज्य शासन उपायही योजते. त्याचा परिणाम नागरिकांना मिळणाऱ्या सुविधेवर नक्कीच होतो.

सार्वजनिक आरोग्यसेवा कधीही चांगली ही बाब सामान्यांचा जसा या सेवेरचा विश्वास वाढवते, तसेच या क्षेत्रातील कमतरता दूर करून अधिक गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी विभागाने प्रयत्न करायला हवेत असे मत जाणकारांनी व्यक्त केले.

राज्यातील आरोग्य संस्था

राज्यात आरोग्य संस्था स्थापन करण्याकरिता १९९१ जनगणनेच्या ग्रामीण लोकसंख्येच्या आधारे बिगर आदिवासी क्षेत्राकरिता प्रत्येक ३०,००० लोकसंख्येस एक प्राथमिक आरोग्य केंद्र, आदिवासी क्षेत्राकरिता प्रत्येक २०००० लोकसंख्येस एक प्राथमिक आरोग्य केंद्र, बिगर आदिवासी क्षेत्राकरिता प्रत्येक ५००० लोकसंख्येस एक उपकेंद्र, आदिवासी क्षेत्राकरिता प्रत्येक ३००० लोकसंख्येस एक उपकेंद्र, प्रत्येक ४ ते ५ प्राथमिक आरोग्य केंद्रामागे एक ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्यात येते.

अ.क्र.	महाराष्ट्रातील आरोग्य संस्था	एकूण
१	उपकेंद्र	१०,६६८
२	फिरती आरोग्य पथके	१३
३	प्राथमिक आरोग्य केंद्रे	१८२८
४	ग्रामीण रुग्णालये (३० खाटा)	३६४
५	उपजिल्हा रुग्णालये (५० खाटा)	६०
६	उपजिल्हा रुग्णालये (१०० खाटा)	३१
७	सामान्य रुग्णालये (मालेगाव, वामगाव, उल्हासनगर (प्रत्येकी २०० खाटा), मलाड-मालवनी (६० खाटा) मालेगाव, शेगाव, इचलकरंजी	७
८	इतर रुग्णालये (परभणी ऑर्थो रुग्णालय ६० खाटा)	१
९	जिल्हा रुग्णालये (७८७१ खाटा)	२३
१०	संदर्भ सेवा रुग्णालये (नाशिक आणि अमरावती)	२
११	मनोरुग्णालये (ठाणे, रत्नागिरी, पुणे, नागपूर)	४
१२	स्त्री रुग्णालये (अकोला, अमरावती, हिंगोली, जालना, परभणी, लातूर, बीड, नागपूर, उल्हासनगर, उस्मानाबाद, नांदेड, पुणे, गडचिरोली)	१३
१३	क्षयरोग रुग्णालये (कोल्हापूर, पुणे, अमरावती, बुलडाणा)	४
१४	कुष्ठरोग रुग्णालये (कोल्हापूर, पुणे, रत्नागिरी, उस्मानाबाद)	४
१५	आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण संस्था (सार्वजनिक आरोग्य संस्था नागपूर आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, ठाणे)	८

महाराष्ट्राचे आरोग्य चित्र

● महाराष्ट्र हे क्षेत्रफळानुसार देशातील तिसरे मोठे राज्य असून राज्याची लोकसंख्या देशात दुसऱ्या क्रमांकाची आहे. ● २०११ च्या जनगणनेनुसार राज्याची एकूण लोकसंख्या ११२३.७४ लाख इतकी आहे. ● एकूण लोकसंख्येपैकी शहरी लोकसंख्या ४५.२२ टक्के (५०८ लाख) इतकी आहे, तर ग्रामीण लोकसंख्येची टक्केवारी ५४.७७ (६१५ लाख) इतकी आहे. ● २०१६ च्या नमुना नोंदणी पद्धती नुसार राज्याचा (दर १००० लोकसंख्या) जन्म दर १५.९ व मृत्युदर ५.९ इतका आहे. ● राज्याचे सरासरी आयुर्मान पुरुष ६९.९ वर्षे व स्त्री ७३.७ वर्षे आहे.

वर्षभरातील महत्त्वाचे निर्णय

● शासकीय व अनुदानित शाळांमधील ६ ते १८ वर्ष वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांना मोफत चष्मे. ● राज्यात ६५०० आरोग्यवर्धिनी केंद्रे कार्यान्वित. ● राज्यात स्पेशल न्युबॉर्न केअर युनिटद्वारे ७० हजाराच्या वर कमी वजनाच्या नवजात अर्भकांवर उपचार. ● जिल्हा रुग्णालयात मोफत केमोथेरपी उपचार. ● हृदयविकारामुळे होणारे मृत्यू रोखण्यासाठी राज्यात 'स्टेमी' प्रकल्प. ● राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात पॅलिएटिव्ह केअर सेंटर सुरू करणार. ● ५१ ठिकाणी डायलिसिस केले जात आहे.

राज्य आरोग्य शिक्षण : संवादचे कार्य महत्त्वपूर्ण

उपचारापेक्षा प्रतिबंध कधीही चांगला या उक्तीनुसार आरोग्य क्षेत्रातील विविध योजना आणि कार्यक्रमांची अंमलबजावणी केली जाते. त्यासाठी सर्वांत महत्त्वाची भूमिका बजावली आहे ती राज्य आरोग्य शिक्षण संवाद ब्युरोने. साथ कुठलीही असो सामान्यांची जाणीवजागृती आणि लोकसहभाग घेऊन त्यावर मात करण्याचे काम महाराष्ट्रात झालेले दिसून आले आहे. पोलिओ असो की, एड्स निर्मूलन आरोग्य शिक्षण संवादातून मोठी जनजागृती करण्याचे काम केले आहे. अलीकडच्या कोरोनाच्या काळातही मोठ्या प्रमाणावर आणि प्रभावीपणे ही मोहीम राबवल्याने नागरिकांना मास्क वापरणे, हात धुणे, शारीरिक अंतर पाळणे या बाबी पटवून देण्यात येत आहेत. माझे कुटुंब माझी जबाबदारी या मोहिमुळे आरोग्य तपासणी सोबतच आरोग्य संदेश आणि जाणीवजागृती करण्याचे कामही होत आहे. विशेष म्हणजे संपूर्ण देशात महाराष्ट्र पहिले राज्य आहे की, जेथे राज्य आरोग्य शिक्षण संवाद ब्यूरो सुरू करण्यात आला आहे.

आहे. ● एकूण लिंग गुणोत्तर हे १००० पुरुषांमागे ९२९ स्त्रिया असे आहे. तर बालकांमधील लिंग गुणोत्तर हे हजार पुरुषांमागे ८९४ स्त्रिया असे आहे. ● राज्याचे साक्षरतेचे प्रमाण ८२.९१ टक्के इतके असून देशात १२ व्या क्रमांकावर

कोरोनावरील उपाययोजना

कोरोनाकाळात विविध लोकोपयोगी निर्णय सामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून घेण्यात आले. कोरोनाबाधितांवर महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून मोफत उपचार. कॅशलेस विमा संरक्षण देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य ठरले. कोरोना चाचण्यांचे दर कमी करून ४५०० वरून ते १२०० वर आणले. राज्यात एच.आर.सी.टी. चाचणीचे दर निश्चित करण्यात आले असून १६ पर्यंत स्लाईसच्या मशीनवर चाचणीकरिता २ हजार रुपये, १६ ते ६४ स्लाईसच्या मशीनवरील चाचणीकरिता २ हजार ५०० रुपये आणि ६४ ते २५६ स्लाईसच्या मशीनवरील चाचणीसाठी ३ हजार रुपये असे दर समितीने निश्चित केले. कोरोना साथ आटोक्यात आणण्यासाठी महत्त्वाचा घटक असलेल्या मास्कची किंमत निश्चित करून योग्य त्या किमतीत नागरिकांना मास्क मिळावा यासाठी पुढाकार घेणारे राज्य म्हणून महाराष्ट्र देशात अग्रेसर ठरले आहे.

घोडनदी..शिरूर तालुक्यातील प्रा. आ. केंद्र ..जुने व नवीन

संदर्भ : माजी आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. प्रदीप व्यास, आरोग्य विभागाचे माजी महासंचालक डॉ. सुभाष साळुंके, जनआरोग्य अभियानाचे सहसमन्वयक डॉ. अनंत फडके, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. सतीश पवार, डॉ. कैलास बाविस्कर, उपसंचालक, आय.ई.सी.

विभागीय संपर्क अधिकारी

वने : लक्षवेधी संवर्धन

प्रशांत सातपुते

महाराष्ट्राला निसर्गाने दोन्ही हातांनी दान टाकले आहे. वनराईने समृद्ध असलेला महाराष्ट्र जैवविविधतेने संपन्न आहे. आपल्या डरकाळीने संपूर्ण जंगलात थरकाप उडवणारा वाघ असो वा झाडावर चपळाईन चढणारा महाराष्ट्र राज्य प्राणी शेकरू असो, अशा विपुल वैविध्यतेने समृद्ध असलेली जंगले महाराष्ट्राच्या वैभवात भर घालत आहेत. पश्चिम घाट हा तर जीवशास्त्र अभ्यासकांसाठी एक मोठा कुतूहलाचा विषय आहे. राज्याच्या स्थापनेपासून येथील जैवसंपदेच्या रक्षणासाठी शासन नेहमीच कटिबद्ध राहिले आहे. मनुष्य आणि प्राणी यांचा संघर्ष होऊ नये, यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत.

हिमालय पर्वत, गंगेचे खोरे, पंजाब-अरवली- विंध्य व राजमहाल डोंगर हा डोंगराळ पट्टा, दख्खन पट्टा आणि कर्नाटक-आंध्र पासून रामेश्वरपर्यंत पसरलेला प्राचीन दगडांचा भाग अशा ५ विभागांत भारत पसरलेला आहे. त्याचप्रमाणे कोकण, तापी-पूर्णा खोरे, वर्धा-वैनगंगा खोरे, गोदावरीचे खोरे आणि पूर्वीच्या काळी कुंतल भाग म्हणून ओळखला जाणारा कृष्णेचे खोरे अशा उपप्रदेशात महाराष्ट्राचे भौगोलिक, सामाजिक आणि सांस्कृतिक व्यक्तिमत्त्व उभे ठाकले आहे. भारतामध्ये २०१७ च्या एका आकडेवारीनुसार ७ लाख ६७ हजार ४१९ चौ.कि.मी. भारताचे वनक्षेत्र आहे. देशाच्या तुलनेत राज्याचे ८ टक्के वनक्षेत्र आहे. जगातील ७.६ टक्के सस्तन प्राणी, १२.६ टक्के पक्षी, ६.२ टक्के सरीसृप, ४.४ टक्के उभयचल प्राणी, ११.७ टक्के मासे आणि ६ टक्के सपुष्प भारतात सापडतात. महाराष्ट्राचे ६१ हजार ५७९ चौ.कि.मी. वनक्षेत्र आहे. राज्यातील एकूण वन व वृक्षक्षेत्र राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या २०.१ टक्के आहे.

महाराष्ट्रात वनस्पतींच्या २५१३, सस्तन प्राण्यांच्या १२९, पक्ष्यांच्या ५६३, सरीसृपच्या १६०, उभयचरांच्या ५३, मास्यांच्या १५ आणि अपृष्ठवंशीय प्राण्यांच्या ५४४० जाती सापडतात.

समुद्रकिनारा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. कोकणातला सह्याद्री हा महाराष्ट्राचा कणा आहे. तर पूर्वेकडचा भामरागड, गडचिरोली इथल्या सातपुडा पर्वतरांगांनी त्याची सीमा तयार केली आहे. किनारपट्टीचा प्रदेश, पर्वतीय प्रदेश व पठारी प्रदेश अशी प्राकृतिक रचना असणाऱ्या महाराष्ट्रात सदाहरित वने, निमसदाहरित वने, पानझडी

वने, झुडपी व काटेरी वने आणि खारफुटी वने अशी वनसंपदा आहे. सदाहरित व निमसदाहरित वनात वाघ, बिबट्या, गवा, अस्वल, हत्ती, रानडुक्कर तर पानझडी वनात हरीण, कोल्हे, लांडगे, तरस हे आढळतात. काटेरी वनात साळिंदर, ससा, हरीण, तरस हे प्राणी आणि भारतद्वाज, मोर, घुबड इत्यादी पक्षी आढळतात. तसेच सरपटणाऱ्या प्राण्यांमध्ये विविध जातींचे सर्प आढळतात. झुडपी व काटेरी वनात दुर्मीळ होत जाणारा माळढोक आढळतो. धोक्यात येणारे प्राणी जीवन व पक्षी जीवन यांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी वन विभागाने राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये उभारली आहेत. राज्यात ६ राष्ट्रीय उद्याने, ४८ अभयारण्ये, ६ संवर्धन राखीव क्षेत्रे अशी ६० वन्यजीव संरक्षित क्षेत्रे अधिस्वीकृत करण्यात आली आहेत. त्यांचे एकूण क्षेत्रफळ ९३०५.०५ चौ. कि.मी.

वन्यजीव व वनांचे संवर्धन

वन व वन्यजीव यांचे संरक्षण व संवर्धन ही राज्य शासनाची प्राथमिकता राहिली आहे. त्या अनुषंगाने वृक्षलागवड, वन्यजीव उपचार केंद्र, निसर्ग पर्यटन, वन कुरण - चराईक्षेत्र विकास, वन, मृद् व जलसंधारण, आदिवासी व स्थानिक रहिवासी क्षमताबांधणी व उपजीविका प्रकल्प, जैविक वारसा क्षेत्रे, पर्यावरण संवेदनशील क्षेत्रे, बांबू क्षेत्राचा विकास, वन अमृत प्रकल्प, मानव व वन्यजीव संघर्ष कमी करणे या क्षेत्रात भरीव काम केले जात आहे.

- संजय राठोड, वने मंत्री

महाराष्ट्रातील वनोत्पादने

● **इमारती लाकूड** - साग, साल, ऐत, शिसव, काटेसावर, बीजा, तिवस, लेंडिया, नाना, हळदू. ● **जळाऊ लाकूड** - बाभूळ, काटेसावर ● **बांबू** - चंद्रपूर, गडचिरोली, ठाणे, रत्नागिरी व नाशिक. **उपयोग** : कागदाचा लगदा, घरांच्या छपरांसाठी, बांबूपासून चट्या, टोपल्या इ. बनवण्यासाठी. ● **लाख** : वड, पिंपळ या वृक्षांपासून मिळते. **उपयोग** : आभूषणे तयार करण्यासाठी.

● **विड्याची पाने** : तेंदू, अंजन, आपटा, चौर ● **अर्ज व तेल** : कुसुम, रोशा, पिसा, खैर, हिरडा, निंब, करंज, महू, शिकेकाई ● **तंतू** : महूळ, भेंडी, पळस, आगवे, शेवरी.

● **डिंक व राळ** - धावडा, खैर, बाभूळ, मोचन, लिंब.

● **कंदमुळे व फळे** - जांभूळ, करवंद, सीताफळ, चारोळी, आवळे, ताडफळे, बिब्यांची फुले व बिब्बे, मोहाची फुले व फळे.

● **गवत** - मारवेल, शेडा, पाओबाना.

राष्ट्रीय उद्याने	जिल्हा	क्षेत्र (चौकिमी)
चांदोली	सांगली	३१७.६७
गुगामल	अमरावती	३६१.२८
नवेगाव	गोंदिया	१३३.८८
पेंच	नागपूर	२५७.२६
संजय गांधी	मुंबई उपनगर	८६.९६
ताडोबा	चंद्रपूर	११६.५५

व्याघ्रप्रकल्प	जिल्हा	क्षेत्र (चौकिमी)
मेळघाट	अमरावती	२७६९
ताडोबा अंधारी	चंद्रपूर	१७२८
पेंच	नागपूर	७४१
सह्याद्री	सांगली	११६६
नवेगाव नागझिरा	गोंदिया	१८९५
बोर	वर्धा	८१६

महाराष्ट्रातील वनोद्योग

● **लाकूड कटाई** - चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, अमरावती, यवतमाळ, नांदेड, नाशिक, नंदूरबार, धुळे, ठाणे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग. ● **लगदा व कागद उद्योग** - चंद्रपूर व धुळे येथे लगद्याचे कारखाने बल्लारपूर, नंदुरबार, मुंबई व पुणे येथे लगद्यापासून कागद तयार करण्याचे कारखाने. ● **विडी उद्योग** - चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर, पुणे ● **काड्यापेट्या उद्योग** - मुंबईजवळ अंबरनाथ ● **अर्क व तेलउद्योग** - पुणे, मुंबई, पनवेल, चंद्रपूर ● **काच उद्योग** - डहाणू, चंद्रपूर.

युनेस्कोचा 'जागतिक वारसास्थळ' दर्जा प्राप्त चार ठिकाणे :

युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये जैव विविधतेच्या जगातील ३९ आणि भारतातील २ हॉटस्पॉट ठिकाणांमध्ये सह्याद्रीचा समावेश झालेला आहे. २१ देशांच्या सभासदांसमोर पश्चिम घाटाला जागतिक वारसा स्थळांचे नामांकन मिळाले आहे. पश्चिम घाटातील विशेषत: कोल्हापूर वनक्षेत्र विभागातील चार स्थळांचा समावेश आहे. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी अभयारण्य, सांगली जिल्ह्यातील चांदोली राष्ट्रीय उद्यान आणि सातारा जिल्ह्यातील कोयना अभयारण्य, कास पठार यांचा समावेश आहे. पुष्प पठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कास पठारावर अस्तित्व धोक्यात आलेल्या ६२४ वनस्पतींपैकी कास पठार आणि परिसरातील जंगलांमध्ये ३३ वनस्पती आढळतात.

कास पठार

कास पठार हे फुलांसाठी एकमेव व नैसर्गिक वारसा स्थळ म्हणून नामांकन प्राप्त झालेले ठिकाण आहे. कास पठाराची समुद्र सपाटीपासूनची उंची १२१३ मी आहे. तेथील पर्जन्यमान हे अंदाजे २५०० ते ३००० मि.मी. आहे. पर्जन्यकाळ जून ते ऑक्टोबर अखेर असतो. कास पठार हे कातळ खडकाचे कमी प्रमाणात माती व अन्नद्रव्य असलेले पुष्प पठार आहे. कास पठारावर व परिसरात प्रदेशनिष्ठ, दुर्मीळ व अतिदुर्मीळ वनस्पती आहेत. रेड डाटा बुकमध्ये जवळपास ४० फुले असणाऱ्या प्रजाती कास पठारावर आढळतात. कास पठारावर फुले असणाऱ्या वनस्पतींच्या ८५० प्रजाती, कीटक व विविध प्रकारच्या फूलपाखरांच्या ३२ प्रजाती, सरपटणाऱ्या प्राण्यांच्या १९ प्रजाती, सस्तन प्राण्यांच्या १० प्रजाती तसेच पक्ष्यांच्या ३० प्रजाती आढळतात.

राधानगरी अभयारण्य

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी गव्यांच्या संवर्धनासाठी राधानगरी अभयारण्य स्थापन केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी शिकारीसाठी राखून ठेवलेल्या कोल्हापूरच्या

जिल्हे	भौगोलिक क्षेत्र	अति घनदाट वन	मध्यम घनदाट वन	खुली वने	एकूण	भौगोलिक क्षेत्राच्या टक्के	खुरटी
अहमदनगर	१७०४८	०.००	६८.८२	१९८.०७	२६६.८९	१.५७	५५७.३९
अकोला	५६७३	११.००	१०८.४४	२२०.९३	३४०.३७	६.००	१६.००
अमरावती	१२२१०	६१८.८९	१४६१.५३	१०८७.३५	३१६७.७७	२५.९४	११२.७६
औरंगाबाद	१०१३१	२०.००	१०६.२६	४४१.६७	५६७.९३	५.६१	१७१.२९
भंडारा	४०८७	१७०.८६	५६३.१३	२६४.९३	९९८.९२	२४.४४	१८.५७
बीड	१०६९३	०.००	१३.००	१५१.०३	१६४.०३	१.५३	३६२.७९
बुलडाणा	९६६१	२५.००	१४३.९५	४२२.६५	५९१.६०	६.१२	१६२.००
चंद्रपूर	११४४३	१३२३.०३	१५५९.४४	११७१.९९	४०५४.४६	३५.४३	४४.२३
धुळे	७१९५	०.००	६८.५७	२३२.७०	३०१.२७	४.१९	१११.३७
गडचिरोली	१४४१२	४६९९.२९	३३०७.७३	१९०९.९२	९९१६.९४	६८.८१	२४.५८
गोदिंया	५२३४	८८८.६१	७३२.२३	३१७.७५	१९३८.५९	३७.०४	३२.२५
हिंगोली	४८२७	०.००	९.००	१०१.०१	११०.०१	२.२८	४९.२३
जळगाव	११७६५	५१.००	३४७.९४	७४७.९०	११४६.८४	९.७५	९४.५१
जालना	७६९४	०.००	९.६५	२६.८३	३६.४८	०.४७	५१.२१
कोल्हापूर	७६८५	६४.००	१०२०.४४	७०१.८८	१७८६.३२	२३.२४	१०२.८३
लातूर	७१५७	०.००	०.०४	१२.९८	१३.०२	०.१८	१९.६७
मुंबई	१५७	०.००	०.००	३.००	३.००	१.९१	०.००
मुंबई उपनगर	४४६	०.००	६७.००	७२.८६	१३९.८६	३१.३६	०.४३
नागपूर	९८९२	४०१.०६	९०२.५६	६९६.७६	२०००.३८	२०.२२	७३.६८
नांदेड	१०५२८	५८.००	४४२.५१	४३५.८५	९३६.७६	८.९०	१२३.०८
नंदूरबार	५९५५	०.००	४०४.१५	७५१.८४	११९५.९९	२०.०८	३०.००
नाशिक	१५५३०	०.००	३४६.३४	७३०.२१	१०७६.५५	६.९३	३३७.६६
उस्मानाबाद	७५६९	०.००	२.०८	४७.५८	४९.६६	०.६६	४७.४३
परभणी	६२१४	०.००	३.५७	३६.८६	४०.४३	०.६५	४७.७८
पुणे	१५६४३	०.००	७६०.९३	९४९.९३	१७१०.८६	१०.९४	५०८.०३
रायगड	७१५२	१३.००	१२५०.३४	१६७६.१२	२९३९.४६	४१.१०	७७.६०
रत्नागिरी	८२०८	३३.००	१८९२.०१	२२८७.८९	४२१२.९०	५१.३३	३.३६
सांगली	८५७२	०.००	९५.००	५५.१३	१५०.१३	१.७५	१७१.०३
सातारा	१०४८०	११७.००	५६९.६८	५९१.६९	१२७८.३७	१२.२०	३६५.७०
सिंधुदुर्ग	५२०७	८८.८२	१३९१.७३	१३४७.४३	२८२७.९८	५४.३१	३२.२७
सोलापूर	१४८९५	०.००	५.५०	४४.१७	४९.६७	०.३३	६०.७२
ठाणे	९५५८	०.००	१३००.११	१६९७.९८	२९९८.०९	३१.३७	२६१.०७
वर्धा	६३०९	९.९७	४१०.०३	४४१.९५	८६१.९५	१३.६६	५५.९३
वाशिम	४९०१	५.००	१०१.८९	१८९.८७	२९६.७६	६.०६	३१.६५
यवतमाळ	१३५८२	१२३.००	११०६.३५	१३७७.९७	२६०७.३२	१९.२०	९८.३९
एकूण	**३०७७१३**	**८७२०.५३**	**२०५७२.३५**	**२१४८४.६८**	**५०७७७.५६**	**१६.५०**	**४२५६.४९**

दक्षिण व पश्चिमकडील राधानगरी तालुक्यातील मानबेट, ओलवण व गगनबावडा तालुक्यातील मौजे तळिये या गावांच्या एकूण १९.६१ चौकिमी वनक्षेत्राचे गवा अभयारण्य म्हणून १९५८ मध्ये घोषणा करण्यात आली. त्यानंतर लक्ष्मी तलाव-राधानगरी व राजर्षी शाहू तलाव सागर- काळम्मावाडी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील वनस्पतींचे व वन्यप्राण्यांचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांचे संरक्षण, वाढ व विकास करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने १६ सप्टेंबर १९८५ च्या निर्णयानुसार गवा अभयारण्य हे सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचे केंद्र घोषित करण्यासाठी कार्यवाही सुरू केली. राधानगरी तालुक्यातील २८ गावे, गगनबावडा तालुक्यातील १ गाव अशा २९ गावांमध्ये ३५१.१६ चौ.कि.मी. क्षेत्राचा समावेश आहे. दक्षिण उष्ण कटिबंधीय सदाहरित वने, दक्षिण उष्ण कटिबंधीय पानगळींची दमट वने, दक्षिण उष्ण कटिबंधीय समशीतोष्ण रुंदपर्णी पर्वतीय वने अशा वनांचा प्रकार या ठिकाणी आढळतो. ४ हजार ते ६ हजार सरासरी पर्जन्यमान आहे. अंजनी ही सदाहरित वनस्पती प्रामुख्याने आढळते. जांभूळ, हिरडा, आवळा, ऐन, किंजळ, आंबा, कुंबा, सागवान, कोशिंब, भोमा, चांदाडा, बोंडारा, हडका, कटक, नाना, रानफणसी, उंबर, जांभा, सुरंगी, हेद, ओंब, गोजरा, करंज, बिंबा आदी जातींचे वृक्ष आहेत. करवंद, कारवी, निरगुडी, शिकेकाई, वागाटी, रामेटा, रानमिरी, तमालपत्र, तोरण, घायरी, कडीपत्ता, नरक्या, मुरूडसिंग, गारंबी इत्यादी झुडपे व वेली आढळतात. काही प्रमाणात बांबू वेत आढळतो. डोंगरी, पुसळ, शेडा, पवण्या, करड आदी गवत प्रजाती प्रामुख्याने आढळतात.

चांदोली आणि कोयना अभयारण्य- सह्याद्री व्याघ्र प्रकल्प हा ५ ऑक्टोबर २०१० रोजी अधिसूचित झाला आहे. यामध्ये कोयना अभयारण्य व चांदोली राष्ट्रीय उद्यान या दोन संरक्षित क्षेत्रांचा समावेश आहे. व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र हे कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी अशा चार जिल्ह्यांत येते. व्याघ्र प्रकल्पाचे गाभा क्षेत्र ६१२ चौकिमी आणि बफर क्षेत्र ६४५.४५ चौ.कि.मी. इतके आहे. कोयना अभयारण्यामध्ये कोयना नदीवर शिवसागर जलाशय, चांदोली राष्ट्रीय उद्यानामध्ये वारणा नदीवर वसंत सागर हा जलाशय आहे. १६ सप्टेंबर १९८५ रोजीच्या शासन निर्णयानुसार चांदोली अभयारण्याची निर्मिती करण्यात आली. या अभयारण्यात ३३ गावांचे भौगोलिक क्षेत्र समाविष्ट आहे. चांदोली अभयारण्याचे अधिसूचित क्षेत्र ३१७.६७ चौकिमी आहे. जुलै २००४ रोजीच्या अधिसूचनेनुसार चांदोली अभयारण्यास राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा देण्यात आला.

वन पर्यटनाला चालना

राज्य वनांनी समृद्ध आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने राज्यातील वनाच्छादित क्षेत्र वाढवण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलण्यात येत आहेत. त्याचबरोबर आदिवासींचे वनहक्क राखून ठेवण्यासह वनोत्पादनांमध्ये त्यांना योग्य वाटा राहील याकडेही लक्ष दिले जाणार आहे. वृक्षाच्छादित क्षेत्र वाढीसाठी वनेतर जमिनीवरही वृक्षलागवड कार्यक्रमाला गती देण्याचे धोरण राबवले जाणार आहे. त्याशिवाय राज्यातील व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय अभयारण्ये, राखीव वनक्षेत्र आदींच्या ठिकाणी वनपर्यटनाला चालना देऊन पर्यटनातून महसूल वृद्धी आणि स्थानिक रोजगारनिर्मितीला अधिक महत्त्व देण्याचे धोरण अवलंबले जाणार आहे.

- दत्तात्रय भरणे, वने, राज्यमंत्री

वाघांसाठीचा कॉरिडॉर

२९ जुलै हा जागतिक व्याघ्रदिन म्हणून साजरा केला जातो. कॉरिडॉर म्हणजे वेगवेगळ्या मोठ्या जंगलांना जोडणारा वनांचा पट्टा. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात वाघांचा जन्मदर मोठा आहे, त्यामुळे या जंगलाला वाघांची 'जीन बँक' म्हणतात. या जीनचा प्रसार दूरपर्यंत झाला पाहिजे. निसर्गाने प्राण्यांमध्ये स्थलांतराची ऊर्मी निर्माण केली आहे. या निर्धोक स्थलांतरासाठी कन्हाळगाव अभयारण्य झाल्यास पेंच - उमरेड कराडला - नवे गाव - नागझिरा - ताडोबा - कन्हाळगाव - चपराळा असा वाघांसाठीचा जगातील पहिला कॉरिडॉर तयार होऊ शकेल.

लक्षवेधी

- पर्यावरणाचा ऱ्हास करून होणारी प्रगती अमान्य करत आरे येथील मेट्रो कार शेड कांजूर मार्ग येथील शासकीय जमिनीवर करण्याचा निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेतला. त्यामुळे आरेतील ८०० एकर जंगल राखीव झाले आहे. आदिवासी पाड्यातील लोकांच्या आणि तबेल्यांच्या अस्तित्वाला धोका न लावता संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाला लागून असलेले हे वन शासनाने राखीव जंगल म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला. आरे आंदोलनातील पर्यावरणवाद्यांचे गुन्हेही मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे.

जैवविविधतेतील महत्त्वाचा घटक फुलपाखरू

फुलपाखरे ही जीवसृष्टीचा भाग असून, जैवविविधतेतील एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहेत. विविध जातींची फुलपाखरे हा आपल्याला मिळालेला नैसर्गिक वारसा आहे. साधारणत: ५ कोटी वर्षापासून ती पृथ्वीवर नांदत आहेत. पश्चिम घाटांच्या रांगा या फुलपाखरांच्या दृष्टीने नंदनवन समजल्या जातात. येथे ३५० च्यावर फुलपाखरांच्या प्रजाती आढळून येतात. फुलपाखरांचे संवर्धन करण्यासाठी कोल्हापूर वन्यजीव विभागाने राधानगरी येथे फुलपाखरू उद्यानाची निर्मिती केली आहे. यात प्रामुख्याने स्थलांतर करणारी इमीग्रंट, ब्ल्यू टायगर, ग्लॉसी टायगर, स्ट्राईप टायगर आदी फुलपाखरांचा समावेश होतो. त्याशिवाय निम्फालिडी कुळातील अनेक आकर्षक रंगांची फुलपाखरे येथे सहज दिसतात. आतापर्यंत जवळपास १३५ प्रजातींच्या फुलपाखरांची नोंद घेण्यात आली आहे. भारतातील सर्वात मोठे फुलपाखरू 'सदर्न बर्डविंग' आणि जगातील सर्वात लहान फुलपाखरू 'ग्रासज्वेल' यांचा समावेश आहे. राज्य फुलपाखरू असणारे ब्ल्यू मॉरमॉन हे फुलपाखरू येथे सहज दृष्टीस पडते. काजवा महोत्सव हे राधानगरी अभयारण्याचे आणखी एक वैशिष्ट्य आहे.

- कोल्हापूर-सिंधुदुर्ग सीमेवरील हत्ती आणि वाघांच्या संरक्षणासाठी तिलारी संवर्धन राखीव क्षेत्र केले.
- कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील नाणार रिफायनरी प्रकल्प हा दुसरीकडे करण्याचा घेतलेला निर्णय.
- राज्यामध्ये जखमी होणाऱ्या वन्यप्राण्यांना उपचार मिळण्यासाठी शासनाने वन्यप्राणी चिकित्सा निर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे.
- चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा व्याघ्र प्रकल्प वाघ भ्रमण मार्गात येणाऱ्या ७२ चौ.कि.मी. जागेतील कोळसा खाण, पॉवर जनरेशन प्रकल्पाला परवानगी नाही.
- पेंच अभयारण्यामधून जाणाऱ्या नागपूर- जबलपूर राष्ट्रीय महामार्ग क्र.४४ वर वन्य प्राण्यांचा अपघात टाळण्यासाठी महामार्ग प्राधिकरणाने तयार केलेले अंडरपास लाभदायक ठरत आहेत. पेंच व्याघ्र प्रकल्पाजवळ १६ कि.मी.च्या क्षेत्रात २५५ कोटी रुपये खर्च करून ४ लहान पूल व ५ अंडरपास तयार करण्यात आलेले आहेत. प्राण्यांच्या हालचाली टिपण्यासाठी भारतीय वन्यजीव संस्थेने ७८ कॅमेरे लावले आहेत. यामधून तब्बल १ लाख ३२ हजार ५३२ छायाचित्रे टिपण्यात आली आहेत. संस्थेच्या अंडरपासमध्ये ५ हजार २९५ वन्य प्राण्यांनी रस्ता ओलांडला आहे.
- राज्य शासनाने अलीकडे घेतलेले वरील निर्णय हे वन्यजीव आणि वनसंपदेच्या संवर्धनाबाबत लक्षवेधी ठरत आहेत.

समस्या/आव्हाने

- युपॅटोरियम ओडोरेटम हे दक्षिण अमेरिकेतील तण आहे. सध्या जंगलात मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यालाच जंगलमोडी किंवा रानमोडी असेही म्हटले जाते.
- विदेशातूनच आलेली घाणेरी किंवा टनटनीचा विदर्भाला मोठा धोका आहे.
- औषधी वनस्पतींच्या लिलाव पद्धतीच्या अनुषंगाने वनौषधी नष्ट होऊ लागल्या आहेत. काही नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.
- वन विभागाच्या संशोधन शाखेमार्फत वन्यजीव, वनसंपदा यांच्या प्रकारांची त्यांच्या अन्नसाखळीबाबत अभ्यास हवा.
- वृक्षारोपण करताना ३ ते ४ वर्षांचे झालेल्या झाडांचे रोपण करायला हवे.
- देशी, जंगली रोपांची वाटिका करणे फायद्याचे ठरेल.
- जैवविविधतेचा अहवाल अथवा नोंदवही ठेवणे.
- जंगलामध्ये आकर्षक दिसणाऱ्या तसेच फुले देणाऱ्या वनस्पतींबाबत संशोधन हवे.
- वन विभागातील अधिकाऱ्यांसाठी प्राणिशास्त्र आणि वनस्पतिशास्त्र पदवीधरांना प्राधान्य हवे.
- परदेशी वनस्पतींच्या बिया कोणत्याही स्वरूपात देशामध्ये येऊ नयेत यासाठी विमानतळावर काटेकोर तपासणी आवश्यक.
- महाराष्ट्राचा राज्यवृक्ष जारूळ, महाराष्ट्राचा राज्यप्राणी शेकरू, महाराष्ट्राचा राज्यपक्षी हरियाल यांचे संवर्धन आणि याविषयीचे प्रबोधन.
- कोकणात संरक्षित वने अभयारण्ये नाहीत. झपाट्याने कमी होणारे जंगल वाढवायला हवे. गोवा सरकारने मायनिंग बंदचा निर्णय घेतला. पर्यावरणपूरक विचार केला आहे. असे कडक निर्णय राज्याने आताच घेतल्यास जंगलासह जैवविविधता निश्चितपणे बहरेल. वन कायद्यांची तसेच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयांची कडक अंमलबजावणी करावी.
- पर्यटकांसाठी कडक नियमांची अंमलबजावणी व्हायला लागली.
- वन परिसरात राहणाऱ्या स्थानिकांचे शास्त्रीय प्रबोधन व्हायला हवे.

समांतर विकास

मानवाच्या विकासासाठी प्रकल्प,

सोयी-सुविधा राबवताना पर्यावरणाच्या विकासाचाही विचार व्हायला हवा. मानव आणि पर्यावरण या दोघांच्या समांतर विकासाचा विचार झाला तरच भविष्य आहे. पर्यावरणाला हानिकारक ठरणारे प्रकल्प हे अन्य ठिकाणी वळवता येऊ शकतात. नाणार प्रकल्प हा यातीलच एक घेतलेला निर्णय आहे. जंगलातून जाणारे रस्ते वा रेल्वे मार्ग हे राखीव संरक्षित जंगल वगळून अन्य मार्गाने वळवल्यास पर्यावरण आणि मानव दोघांच्याही विकासाचा समतोल साधला जाऊ शकतो. यासाठी होणारा खर्च हा वाचवल्या जाणाऱ्या वन्यजीव आणि वनसंपदेपेक्षा कमी असेल. किंबहुना अनेक ठिकाणी असणाऱ्या घाटमार्गांचा उपयोग तसेच पर्याय पाहता या भागात नव्याने आणखी जवळचा मार्ग करण्याची खरोखरच गरज आहे का? हा विचार निश्चितच वन्यजीव तसेच वनसंपदेला संवर्धन करणारा ठरवू शकेल.

संग्रहित

पुढील २५ वर्षांतील स्थिती

प्रो. टोनी बार्नोस्की या शास्त्रज्ञाने सध्या होत असलेल्या पर्यावरण ऱ्हासाचे परिणाम अभ्यासले आणि येत्या ५० वर्षांचे भाकित केले आहे. २०४५ सालापर्यंत जगाची लोकसंख्या ९ अब्ज होईल आणि त्याच वेळी जागतिक परिसंस्थेच्या ऱ्हासामुळे हवामानात अनेक परिणाम होतील या बदलाला अनुकूलन करणे मनुष्य जातीला शक्य होईलच असे नाही. त्यामुळे आताच आपल्याला परिसंस्था आधारित अनुकूलन स्वीकारावे लागेल.

ज्येष्ठ वनअभ्यासक मारुती चितमपल्ली यांनी संशोधन करून तयार केलेला प्राणिकोश, पक्षिकोश, मत्स्यकोश आणि वृक्षकोश वन विभागासाठी तसेच जगातील वनअभ्यासकांसाठी मौल्यवान ठरणार आहेत. विदर्भातील ४०-४५ वर्षाच्या प्रदीर्घ सहवासात श्री. चितमपल्ली यांनी केलेली जंगलभ्रमंती आणि संशोधन याचा फायदाही देशाच्या वन्यजीव आणि वनसंपदेसाठी फायदेशीर ठरणार आहे.

पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी एकूण जमिनीच्या ३३ टक्के जंगल असायला हवे असा एक संकेत आहे. देश स्वतंत्र झाला त्या वेळी पश्चिम घाटात ६७ ते ६९ टक्के जंगल होते. स्वातंत्र्यानंतर आज केवळ ३७ टक्के उरले आहे. पश्चिम घाटात जंगल कमी असले तरी जैवविविधता अधिक आहे. याच्या उलट विदर्भात जंगले अधिक परंतु जैवविविधता कमी आहे.

वन्यजीव आणि वन्यसंपदेच्या संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणात होणाऱ्या प्रबोधनामुळे भविष्यात त्याची व्याप्ती वाढू शकते. ५० वर्षे पूर्ण झालेल्या एका वृक्षाचे पर्यावरण मूल्य हे ५० लाख रुपये आहे. या पर्यावरण मूल्याबाबत प्रबोधन करणे आवश्यक आहे.

मानव निसर्गाचाच एक घटक आहे. वन्यजीव आणि वनसंपदा यांच्या अस्तित्वावर मानवाचे जीवन टिकून आहे. मानवाच्या समृद्ध जीवनाच्या विकासासाठी वन्यजीवन आणि वनसंपदा यांची विपुलता आणि समृद्धीकरणही असायलाच हवे. त्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या आज्ञापत्रातील पुढील ओळींचे इतक्या वर्षानंतर आजही पालन करावेच लागेल.

'रयतेने ही झाडे लावून लेकरांसारखी बहुतकाळ जतन करून वाढवली. ती झाडे तोडिलीयावरी त्याचे दु:खास पारावर काये? येकास दु:ख देवून जे कार्य करीन म्हणेल ते कार्य करणारा सही स्वल्पकाळेच बुडोन नाहिसेच होते. किंबहुना धन्याचेच पदरी प्रजापीडणाचा दोष पडतो. या वृक्षांच्या अभावे हानीही होते. याकरिता हे गोष्ट सर्वथा होऊ न द्यावी. कदाचित एखादे झाड जे बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असेल तरी त्याचे धन्यास राजी करून द्रव्य देऊन त्याच्या संतोषे न्यावे. बलात्कार सर्वथा न करावा.'

संदर्भ: ■ आरण्यऋषी मारूती चितमपल्ली ■ निवृत्त प्राचार्य डॉ. मधुकर बाचुळकर (वनस्पती तज्ज्ञ) ■ डॉ. गिरीश जठार, सहायक संचालक बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी ■ 'राधानगरी अभयारण्यातील फूलपाखरे' - लेखक निसर्ग अभ्यासक तथा वन्यजीव छायाचित्रकार सुनील करकरे ■ (भारतीय वन संरक्षण अहवाल २०१९)

जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर

उद्योग : नेहमीच अग्रेसर

काशिबाई थोरात

महाराष्ट्र शूरवीरांचा देश तर आहेच, पण उद्यमशील राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख जगापुढे आहे. महाराष्ट्राच्या उद्यमशीलतेमुळे देशी – परदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्राने आपला पहिला क्रमांक गेली अनेक वर्ष कायम ठेवला आहे. जागतिक पातळीवर आर्थिक मंदीचे सावट आले तरी महाराष्ट्रातील औद्योगिक विकासाची गती कमी झाली नाही. विदेशी गुंतवणुकीत राज्याचे उद्योग विश्वातील स्थान देशात क्रमांक एकवर आहे. औद्योगिक विकासाला अतिशय अनुकूल असलेले वातावरण, उत्तम पायाभूत सुविधा आणि कुशल मनुष्यबळ, तंत्रज्ञानातील प्रगती, साधनसंपत्तीची उपलब्धता या कारणांमुळेच गुंतवणूकदार महाराष्ट्राकडे आकर्षित होत आहेत.

ऊर्जा, परिवहन, सॉफ्टवेअर, वित्त आणि बँकिंग, रिटेल, माहिती तंत्रज्ञान, सेवा क्षेत्रात गुंतवणुकीचे प्रमाण लक्षणीय आहे. महाराष्ट्रात अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित व्हावे म्हणून राज्य शासनाने औद्योगिक धोरण, जैवतंत्रज्ञान धोरण, माहिती तंत्रज्ञान धोरण, ई-गव्हर्नन्स धोरण, विशेष आर्थिक क्षेत्र धोरण, पर्यटन धोरण, औद्योगिक समूह विकास, उद्योग, व्यापार व गुंतवणूक साहाय्यक कक्ष (मैत्री), एक खिडकी योजना सुरू करून 'मेक इन इंडिया', 'मॅग्नेटिक महाराष्ट्र', 'ॲडव्हान्टेज महाराष्ट्र' असे उपक्रम राबवून नावीन्यपूर्ण व सृजनशील उद्योगांकरिता अग्रगण्य स्टार्ट अप धोरण जाहीर केले. त्यातून औद्योगिक उद्योजकांना संस्थात्मक आधार दिला.

देशाच्या आर्थिक विकासामध्ये उद्योग क्षेत्र महत्त्वाची भूमिका निभावते. अर्थव्यवस्थेच्या इतर क्षेत्रांतील प्रगतीस उत्तेजन देते, रोजगाराच्या संधी निर्माण करते तसेच, देशांतर्गत बाजारपेठांच्या विकासास साहाय्य करते. राज्यातील सुविकसित पायाभूत सुविधा, मुबलक नैसर्गिक संसाधने, सर्व प्रकारच्या पद्धतीने चांगला संपर्क, कुशल मनुष्यबळ आणि दर्जेदार राज्याच्या स्थापनेपासूनच उद्योगवाढीसाठी स्वतंत्र असे वातावरण आहे. राज्याचा समतोल विकासासाठी सतत प्रयत्न सुरू आहे. यातूनच आता मुंबईबरोबरच पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद ही शहरेदेखील औद्योगिक क्षेत्र म्हणून उदयास आली. औद्योगिक विकासाच्या वाटेवर दमदार पाऊल टाकत महाराष्ट्र औद्योगिक प्रगती करत आहे. म्हणूनच औद्योगिक गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे सर्वांत जास्त पसंतीचे राज्य आहे.

यशवंतराव चव्हाण यांची भूमिका

आपले राज्य हे उद्योगधंद्याच्या बाबतीत भारतात सर्वात आघाडीवर आहे. त्यामुळे राज्यातील उद्योगधंद्याचा केवळ राज्याच्याच नव्हे तर सर्व देशाच्या अर्थव्यवस्थेवर भलाबुरा परिणाम होतो. उद्योगधंद्याचा पाया बळकट असल्याखेरीज आपल्या पंचवार्षिक योजना पूर्णपणे यशस्वी होऊ शकणार नाहीत, तेव्हा अशा परिस्थितीत औद्योगिकीकरणाची गती ज्यामुळे रोखली जाईल व राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होईल, असे काहीही न करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य ठरते. उत्पादन सारखे होत राहण्यासाठी व त्यात वाढ होण्यासाठी उद्योगधंद्याचा कारभार सुरळीत चालला पाहिजे.

महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली, तेव्हा मुंबईच्या काही भागात औद्योगिक विकास झालेला होता त्याला १०० वर्षांची परंपरा होती. राज्याचा विकास करायचा तर उद्योगाचे विकेंद्रीकरण करणे गरजेचे होते. याची जाणीव राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना होती. राज्याच्या औद्योगिक क्रांतीचा पाया यशवंतराव चव्हाण यांनी घातला. राज्याचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर उद्योगाशिवाय पर्याय नाही. ग्रामीण भागात उद्योगाचे जाळे उभारूनच हे शक्य होईल याचा त्यांनी विचार केला. राज्य उद्योगाभिमुख होण्यासाठी महाराष्ट्राच्या जन्मापासून त्यांनी उद्योगपूरक धोरण आखायला सुरुवात केली. त्यामुळे महाराष्ट्राचे आजचे उद्योग क्षेत्रातील स्थान अढळ आहे. देश-विदेशातील गुंतवणूक राज्यात होऊन राज्य उद्योगात अग्रेसर राहिले आहे.

उद्योगस्नेही राज्य

उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र हे देशात अग्रेसर असणारे राज्य आहे. उद्योग वाढीसाठी आवश्यक असणारे वीज, पाणी आणि जमीन, पायाभूत सुविधा राज्यात मुबलक प्रमाणात आहेत. राज्याचे उद्योगस्नेही धोरण आणि कुशल मनुष्यबळामुळे उद्योजक राज्यात आकर्षित होतात. कोविड-१९ या विषाणूच्या संकटानंतर उद्योगक्षेत्राला पुन्हा उभारी देण्यासाठी आवश्यक पावले उचलली. महापरवानाच्या माध्यमातून उद्योगासाठी कागदपत्रांची पुर्तता करताना होणारी दमछाक थांबली आहे. महाजॉब्स वेब पोर्टलच्या माध्यमातून नोकरी देणारे आणि नोकरी मागणारे एका प्लॅटफॉर्मवर आले आहेत. स्थानिकांना रोजगार आणि उद्योजकांना व्यवसाय सुलभता यामुळे उद्योगक्षेत्रात राज्य कायमच अग्रेसर राहील.

- सुभाष देसाई, उद्योग मंत्री

भूमिका स्पष्ट

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचा मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी औद्योगिक धोरणाविषयी आपल्या पहिल्या भाषणात भूमिका व्यक्त केली. राज्य निर्मिती होऊन चार महिनेही झाले नव्हते, त्या वेळी यशवंतराव चव्हाण यांनी बोर्ड ऑफ इंडस्ट्रियल डेव्हलपमेंन्ट या नावाचे एक मंडळ केले. संपूर्ण राज्याच्या भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून कोणत्या प्रदेशात कोणते उद्योग उभारता येतील याची माहिती तयार केली. राज्यांचे उद्योग धोरण हा राज्याचा प्रमुख भाग आहे. तो कायमस्वरूपी व्यवस्थेचा भाग व्हावा म्हणून या मंडळाने महाराष्ट्र उद्योग कायदा मंजूर केला. राज्याच्या सर्व उद्योगाभिमुख धोरणाचा समावेश कायद्यात करण्यात आला. पुढे या कायद्यांच्या आधारे १ ऑगस्ट १९६२ रोजी औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना झाली. अशा प्रकारचे उद्योग कायदा व महामंडळ स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य होते.

औद्योगिक विकास महामंडळ

राज्य शासनाची प्रमुख औद्योगिक पायाभूत विकास संस्था म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची (एमआयडीसी) स्थापना करण्यात आली. नियोजित आणि सुयोग्यरीत्या औद्योगिक विकास होण्यासाठी औद्योगिक क्षेत्र निर्माण करणे तसेच औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कार्य करणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे देशातील सर्व औद्योगिक विकास महामंडाळामध्ये सर्वाधिक औद्योगिक जमिनीची मालकी असलेल्यापैकी एक आहे. औद्योगिक क्षेत्रे, विशेष आर्थिक क्षेत्रे, सिल्वर झोन आणि माहिती तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान, वाईन (द्राक्ष प्रक्रिया) व रत्ने ही विशेष संकुले विकसित केली आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने २८९ औद्योगिक क्षेत्रे निर्माण केली असून, त्यापैकी १४३ मोठे औद्योगिक क्षेत्रे, ९५ लघू औद्योगिक क्षेत्रे व ५१ विकासकेंद्रे आहेत, तर १.९४,०११ कोटी गुंतवणूक व १५.०८ लाख रोजगार क्षमता असलेले ५० .७८८ उद्योग घटक आहेत. एकूण ९६,६३७ विकसित भूखंडापैकी सुमारे ७२ टक्के भूखंडांचे वाटप

मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०

एमआयडीसी आणि विविध कंपन्यांमध्ये नुकतेच सामंजस्य करार करण्यात आले. १५ कंपन्यांमार्फत जवळपास ३४,८५० कोटींची गुंतवणूक राज्यात होत आहे. तसेच यामुळे सुमारे २३,१८२ लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहेत. याचबरोबर गुंतवणूकदार आणि राज्य शासन यांचा एकमेकांवर विश्वास आहे. मागील सामंजस्य करारातील अनेक प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत. १२ देशांतील गुंतवणूकदारांसोबत १६ हजार ३० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. अमेरिका, दक्षिण कोरिया, सिंगापूर आदी देशांतील तसेच काही भारतीय गुंतवणूकदारांसोबत हे करार करण्यात आले आहेत. सुमारे ६० टक्के उद्योगांच्या बाबतीत जमीन अधिग्रहणासारख्या प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत. युनिटी इन डायव्हर्सिटी असे हे करार आहेत. केमिकल, डेटा यांसह लॉजिस्टिक, मॅन्युफॅक्चरिंग अशा विविध क्षेत्रातील उद्योग राज्यात गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत.

उद्योजकांना करण्यात आले.

थेट विदेशी गुंतवणूक

विदेशी गुंतवणुकीत राज्य देशात क्रमांक एकवर आहे. थेट विदेशी गुंतवणुकीने औद्योगिक घटकांमध्ये नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान आणले असून घटकांमधील स्पर्धात्मकता वाढवली आहे. तसेच, राज्यातील स्थानिक बाजारपेठांमधूनसुद्धा गुंतवणूक वाढली आहे. देशात झालेल्या विदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र आघाडीवर आहे. एका आकडेवारीनुसार आंध्र प्रदेशमध्ये ४.३ टक्के, गुजरातमध्ये ५.५ टक्के, कर्नाटकमध्ये १०.१ टक्के, तमिळनाडूमध्ये ७.२ टक्के असून महाराष्ट्रमध्ये २८.९ टक्के गुंतवणूक झाल्याचे दिसून येते. एप्रिल २००० ते सप्टेंबर २०१९ पर्यंत देशातील थेट विदेशी गुंतवणूक २५,६०,८८५ कोटी आहे. त्यात राज्यातील थेट विदेशी गुंतवणूक ७,३९,३०६ कोटी आहे. त्यामुळे आजही परदेशी गुंतवणुकीसाठी राज्याला पसंती दिली जात आहे.

राज्यातील औद्योगिक गुंतवणूक

ऑगस्ट १९९१ ते २०१९ या कालावधीत १३,०२,५१८ कोटी गुंतवणुकीसह २०,५०१ औद्योगिक प्रकल्प मंजूर करण्यात आले. त्यापैकी ३,०६,८६२ कोटी (२३.६ टक्के) गुंतवणुकीचे ९,०९९ प्रकल्प (४४.४ टक्के) कार्यान्वित झाले असून सुमारे १३.२३ लाख रोजगार निर्मिती झाली. माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी ५७१ प्रकल्प मंजूर झाले असून यातील गुंतवणूक सर्वाधिक ३,९८,९१२ कोटी (एकूण गुंतवणुकीच्या ३०.६ टक्के) होती, त्यापाठोपाठ इंधन आणि धातू उद्योगांमध्ये अनुक्रमे १,४३,३१४ कोटी (११.० टक्के) व १,०८,९०९ कोटी (८.४ टक्के) गुंतवणूक आहे एकूण मंजूर गुंतवणुकीपैकी सुमारे ४९.१ टक्के गुंतवणूक या तीन उद्योग गटांमध्ये आहे.

औद्योगिक प्रकल्प

देशात ऑगस्ट १९९१-२०१९ या कालावधीत १.१४.२८६ मंजूर प्रकल्पापैकी सर्वाधिक प्रकल्प महाराष्ट्रात आहेत. यात गुजरात (१४.५४८) -१२.७, तमिळनाडू (९.७८३)-८.६, मध्यप्रदेश (९.२३०) - ८.१, उत्तर प्रदेश ८.५८३- (७.५), कर्नाटक (५.८६०)- ५.१, महाराष्ट्र (२०.५०१)-१७.९ एवढे प्रकल्प मंजूर केले आहेत. तर या प्रकल्पातील गुंतवणूक जवळपास १३,०२,५१८ कोटी एवढी आहे.

माहिती तंत्रज्ञान

महाराष्ट्राला जागतिक स्तरावरील एक सर्वसमावेश वाढीचे स्पर्धात्मक माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा केंद्र म्हणून विकसित केले. राज्याला देशाची बौद्धिक व गुणवत्ता असलेली राजधानी म्हणून स्थापित करण्याच्या दृष्टीने धोरण जाहीर करण्यात आले.

यामध्ये औद्योगिकदृष्ट्या कमी विकसित भागात गुंतवणूक वाढवणे, समतोल विकास करून रोजगार निर्मिती करणे, निर्यात वाढीचे प्रमाण वाढविणे, सामाजिक व आर्थिक विकासाकरिता एक साधन म्हणून माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करणे, मूळ सामग्री निर्मितीसह नवीन उत्पादन व बिझनेस टू बिझनेस आणि बिझनेस टू कस्टमर यांना पुरवल्या जाणाऱ्या अद्वितीय सेवांकरिता बौद्धिक मत्ता व निर्मितीस प्रोत्साहन देणे ही या धोरणाचे उद्दिष्टे आहेत.

पुण्याजवळील हिंजेवडी येथे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नामांकित कंपन्यांनी माहिती तंत्रज्ञान घटकांची स्थापना केली व तद्नंतर अशी क्षेत्रे स्थापन होण्यास गती आली.

माहिती तंत्रज्ञान उद्यान व माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा धोरणाची अंमलबजावणी महामंडळाने विकसित केलेल्या २४ माहिती तंत्रज्ञान उद्यानांमध्ये केलेली आहे. महामंडळाने नागपूर, नाशिक (अंबड) अहमदनगर, सांगली, परसोडी, लातूर, कोल्हापूर, सोलापूर, सातारा, पुणे. तळवडे, खराडी, ऐरोली नॉलेज पार्क येथील भूखंड व गाळ्यांचे वाटप केले असून तेथे विविध नामांकित कंपन्या कार्यरत आहेत, तसेच संचालक मंडळाच्या निर्णयानुसार माहिती तंत्रज्ञान सेवा धोरण २००९ अंतर्गत खासगी विकासकांना विविध माहिती तंत्रज्ञान उद्यानातील भूखंड व गाळे वाटप करण्याचे धोरण ठरवण्यात आले व त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. हिंजवडी माहिती तंत्रज्ञान उद्यान, टप्पा क्र.एक व क्र.दोन, पुणे येथील भूखंडाचे वाटप पूर्ण झाले असून तेथे मे. विप्रो, मे. कॉग्निझन्ट, मे. केपीआयटी, मे. इन्फोसिस, व मे. एसटीपीआय अशा विविध नामांकित कंपन्या कार्यरत आहेत. टप्पा क्र. तीनमधील विकासकांची कामे झाली आहेत. त्यासोबत भूखंडाचे वाटपही

झालेले आहे. माहिती तंत्रज्ञान (आयटी) /बीपीओच्या नवीन प्रकल्पाची निर्मिती करण्यासाठी नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सोलापूर, लातूर, नांदेड या शहरांची निवड केली आहे. तसेच आय. टी. पार्कच्या निर्मितीचे काम नाशिक, अहमदनगर, सांगली, सोलापूर, लातूर, नांदेड, अमरावती, नागपूर या शहरांमध्ये खासगी उद्योजकांमार्फत करून घेण्यात येत आहे.

माहिती तंत्रज्ञान संकुले

माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी खासगी क्षेत्रास सहभागी करून घेण्यात आले आहे. याअंतर्गत ५३० खासगी महिती तंत्रज्ञान संकुले मंजूर करण्यात आली असून त्यापैकी १९,९२७ कोटी गुंतवणुकीची व सुमारे ५.३० लाख रोजगार निर्माण करणारी १९० माहिती तंत्रज्ञान संकुले कार्यन्वित आहेत. उर्वरित ३४० माहिती तंत्रज्ञान संकुलांमध्ये ७०,९९४ कोटी प्रस्तावित गुंतवणुकीसह सुमारे १२.९५ लाख रोजगार संधी निर्माण होणे अपेक्षित आहे. खासगी माहिती तंत्रज्ञान संकुले पुणे (१८६), मुंबई शहर व उपनगर (१७२), नागपूर (५), औरंगाबाद (३) आणि वर्धा (१) या जिल्ह्यांमध्ये आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सिडको आणि सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया यांनी विकसित केलेली ३७ सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान संकुले सुमारे १८,००० कोटी गुंतवणूक व सुमारे २.६८ लाख रोजगार उपलब्ध आहेत.

विशाल प्रकल्प

राज्यातील मुंबई, पुणे व ठाणे औद्योगिकपट्ट्यातील उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्याकरिता व राज्यातील औद्योगिकदृष्ट्या विकसनशील व मागास भागात उद्योग आकर्षित होण्याकरिता राज्य शासनाच्या उद्योग विभागामार्फत १९६४ पासून सामूहिक प्रोत्साहन योजना राबवण्यात येत आहे. मोठ्या उद्योगांना विशिष्ट सवलती/प्रोत्साहने देऊन राज्यामध्ये औद्योगिक गुंतवणुकीचा ओघ वाढविणे व त्यातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या भरीव संधी निर्माण करण्याकरिता सामूहिक प्रोत्साहन योजना २००१ मध्ये सुधारणा करण्यात आली. त्यामध्ये विशाल प्रकल्पाची संकल्पना अंतर्भूत केली गेली. त्यानुसार विशाल प्रकल्पांना प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला.

१ नोव्हेंबर २००६ रोजी महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक, गुंतवणूक पायाभूत सुविधा धोरण घोषित करण्यात आले. या धोरणांच्या अनुषंगाने नवीन सामूहिक प्रोत्साहन योजना, २००६ लाही मान्यता देण्यात आली. या सुधारित योजनेतही विशाल प्रकल्पाची संकल्पना समाविष्ट होती. या धोरणांतर्गत खासगी/संयुक्त/राज्य व केंद्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रम/कंपन्या विशाल प्रकल्पासाठी असलेल्या प्रोत्साहनाचा लाभ घेऊ शकतात.

राज्यात ६४३ विशाल प्रकल्प

राज्यामध्ये डिसेंबर २०१९ पर्यंत ४,७९,९५० कोटी गुंतवणुकीच्या व ५.२३ लाख प्रस्तावित रोजगार निर्मितीच्या ६४३ विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. यापैकी ८९,३४२ कोटी प्रत्यक्ष गुंतवणूक व सुमारे १.३७ लाख प्रस्तावित रोजगार निर्मितीच्या २०६ प्रकल्पांना पात्रता प्रमाणात देण्यात आले आहे.

विशाल प्रकल्पांची फलनिष्पती

राज्यातील मुख्य उद्योगांमधील रासायनिक आणि तत्सम उत्पादने, विद्युत

कामगारांच्या विकासाला प्राधान्य

राज्याच्या विकासात, जडणघडणीत कामगारांचे मोठे योगदान राहिले आहे. महाराष्ट्र हे अनेक कामगार कायद्यांचे जनक आहे. तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात कामगारांनी अत्यंत महत्वाची भूमिका बजावली आहे. राज्य शासन महाराष्ट्रातील कामगारांच्या सुरक्षेला, आरोग्याला आणि एकंदरच सर्वांगीण विकासाला प्राधान्य देऊन विविध कायदे कामगारांच्या हितासाठी राबवत आहे. यापुढील काळातही महाराष्ट्रात कामगारांचे हक्क आणि त्यांचे हित अबाधित ठेवण्याचा प्रयत्न असणार आहे.

- दिलीप वळसे-पाटील, कामगार मंत्री

उद्योगविभाग गुंतवणूक प्रस्तावाबाबत माहिती

अ.क्र.	विभाग	संख्या	गुंतवणूक (रु. कोटी)	रोजगार निर्मिती
१.	मेगा प्रोजेक्टस (उद्योग विभाग)	९८	४२२७६७	२५०९४९
२.	उद्योग संचालनालय	१४०६	३०८३१	२९९१९५
३.	महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ	२३३९	१२२३५४	१६४३२७
	एकूण	३८४३	५७५९५२	७१४४७१

आणि बिगर विद्युत यंत्रसामग्री, वस्त्रोद्योग, पेट्रोलियम आणि तत्सम उत्पादने इत्यादी उद्योगाचा समावेश आहे. तसेच इतर महत्त्वाच्या उद्योगांमध्ये धातू उत्पादने, मद्य, जडजवाहिरे, औषध निर्माण, अभियांत्रिकी वस्तू, यांत्रिक अवजारे, स्टील आणि लोह कास्टिंग आणि प्लास्टिक वस्तू इत्यादी उद्योगांचा समावेश आहे. या उद्योगांकडून विशाल प्रकल्प धोरणास चांगला प्रतिसाद मिळाला असून राज्यातील, राज्याबाहेरील व विदेशी गुंतवणूक राज्यात आकर्षित करण्यास व त्याद्वारे रोजगार निर्मिती होण्यास मोठा हातभार लागला आहे. विशाल प्रकल्प धोरणांतर्गत देशी -विदेशी गुंतवणूकदेखील मोठ्या प्रमाणावर राज्यात आकर्षित झाली आहे.

मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हेंजन्स २०१८ मध्ये झालेल्या उद्योग क्षेत्रातील गुंतवणूक प्रस्तावांच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती

	प्रस्तावित	प्राथमिक टप्पे पूर्ण केलेले प्रस्ताव
एकूण गुंतवणूक प्रस्ताव	३८४३	३४८४ (९०.६६%)
गुंतवणूक (रु. कोटी)	५७५९५२	१४३७०१ (२४.९५%)
रोजगार	७१४४७१	४३१९५२ (६०.४६%)

वाटचाल औद्योगिक राष्ट्राकडे

दिल्ली-मुंबई या दोन शहरांना जोडणारा रेल्वेचा डेडिकेटेड फ्रेट हा कॉरिडॉर प्रकल्प असून या कॉरिडॉरची लांबी १४८२ किलोमीटर आहे. फ्रेट कॉरिडॉरची उत्तप्रदेश, दिल्ली, हरियाणा, राज्यस्थान, गुजरात, मध्य प्रदेश व महाराष्ट्र या सहा राज्यातून प्रवास करून जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट या ठिकाणी येऊन मिळतो. त्यामुळे देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई-दिल्लीला जोडली जात आहे. या कॉरिडॉरच्या माध्यमातून विकासाचे नवे पर्व राज्यात सुरू झाले आहे. या प्रकल्पात मुंबई, ठाणे, रायगड, नाशिक, औरंगाबाद, अहमदनगर, धुळे व नंदुरबार या जिल्ह्यांचा समावेश आहे. या प्रकल्पांतर्गत सुरू असलेले उद्योग प्रकल्प आंतरराष्ट्रीय दर्जाचे आहेत. कॉरिडॉर राज्यातील शेंद्रा-बिडकीन आणि दिघी बंदर या दोन औद्योगिक क्षेत्रांचा समावेश आहे. या कॉरिडॉरमध्ये 'वॉक टू वर्क' ही संकल्पनाही निश्चित करण्यात आली आहे. हरित स्मार्ट औद्योगिक शहर म्हणून राज्यील १० हजार एकर क्षेत्रात वसलेल्या औरंगाबाद औद्योगिक शहरांचा (ऑरिक) विकास होत आहे. ऑरिकमध्ये सुमारे ५३ भूखंडांचे गुंतवणूकदारांना वाटप केले आहेत. ऑरिकमध्ये ५,००० कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक झाली असून सुमारे २.५०० रोजगार निर्मिती झाली आहे.

अशा प्रकारे केंद्र आणि राज्य शासनाने घोषित केलेल्या हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग, दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गिका, सागरमाला, भारतमाला इत्यादी विशेष प्रकल्प मार्गांवर औद्योगिक वसाहती उभारणे हा राज्याचा हेतू आहे.

गुंतवणूक व रोजगार निर्मिती

राज्याच्या अर्थव्यवस्थेची वाटचाल ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे होण्याच्या दृष्टिकोनातून भविष्यातील उद्योग, औद्योगिक व पायाभूत प्रकल्प, शाश्वत विकास, रोजगार निर्मिती आदी बाबींकडे गुंतवणूक आकर्षित करणे. राज्य शासनातील विविध विभागांमार्फत १३ विविध क्षेत्रांतील नवीन धोरणे जाहीर करण्यात आली.

राज्यातील सूक्ष्म, लघू, मध्यम व मोठ्या उद्योगामध्ये भरीव योगदान देणाऱ्या उद्योजकांचा सन्मान करण्यात आला. ईज ऑफ डुईंग बिझनेस रिफॉर्म्सवर विशेष भर देण्यात आले.

वस्त्रोद्योगात सकारात्मक बदल

राज्यातील वस्त्रोद्योग क्षेत्रात अनेक सकारात्मक बदल घडत आहेत. वस्त्रोद्योग क्षेत्राला चालना देण्यासाठी टेक्स्टाइल पार्कना सोयीसुविधा देण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे हातमाग व यंत्रमाग उद्योगालाही सुविधा देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. यापुढील काळात या क्षेत्राला ऊर्जितावस्था आणण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येणार आहेत. राज्याच्या वस्त्रोद्योग धोरणाची अंमलबजावणीही करण्यात येणार आहे.

- अस्लम शेख, वस्त्रोद्योग मंत्री

मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हेंजन्स २०१८ मध्ये उद्योग विभागामार्फत करण्यात आलेल्या सामंजस्य करारांपैकी प्राथमिक टप्पे पूर्ण केलेल्या प्रस्तावांची अंमलबजावणीची विगतवारी खालीलप्रमाणे :

प्रकार	गुंतवणूकप्रस्तावांची संख्या	गुंतवणूक (रु. कोटी)	रोजगार
उत्पादनात गेलेले प्रस्ताव	१२९४	३६३४७	१०७६८१
बांधकाम सुरू असलेले	७५७	२२०९२	१३६९९४
प्राथमिक पावले उचललेले	१४३३	८५२६२	१८७२७७
एकूण	३४८४	१४३७०१	४३१९५२
(अंमलबजावणीतील जवळपास ९०.६६% प्रकल्प प्रगतिपथावर आहेत)			

महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१९

राज्याने औद्योगिक धोरण २०१९ जाहीर केले असून ते १ एप्रिल २०१९ पासून अमलात आले आहे. गतिशील औद्योगिक वाढ आणि शाश्वत विकास हे या धोरणाचे मुख्य उद्देश आहेत. या धोरणातील प्रोत्साहने ही वीज, व्याज आणि राज्य वस्तू व सेवा करांवरील अनुदाने तसेच मुद्रांक शुल्क, वीज शुल्क यावर सूट या स्वरूपात आहेत. उद्योन्मुख उद्योग क्षेत्रांमध्ये विकास होण्याच्या दृष्टीने, प्राधान्य क्षेत्रे निश्चित केली असून या क्षेत्रांना जमीन वाटप व प्रोत्साहने यात प्राधान्य देण्यात येत आहे. एकूण १४ प्राधान्य क्षेत्रे निश्चित करण्यात आली आहेत.

संग्रहित

विशेष आर्थिक क्षेत्र

थेट विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी आणि रोजगार निर्मितीसाठी राज्याने २००१ मध्ये विशेष आर्थिक क्षेत्र धोरण घोषित केले आहे. त्यापैकी ४.२३१ हेक्टर क्षेत्रावर ३६.३५२ कोटींची गुंतवणूक असलेली सुमारे ५.९४ लाख रोजगार निर्मितीची ३० विशेष आर्थिक क्षेत्रे विकसित केली आहे.

जैवतंत्रज्ञान संकुले

राज्याच्या जैवतंत्रज्ञान धोरणानुसार जैवतंत्रज्ञान घटक स्थापित करणाऱ्या कंपन्यांना विविध आर्थिक प्रोत्साहने व कर सवलती देण्यात आल्या आहे. जालना, हिजंवडी - पुणे येथे सार्वजनिक क्षेत्रातील दोन जैवतंत्रज्ञान संकुले विकसित करण्यात आली आहे. सुमारे ३०५ कोटी अपेक्षित गुंतवणुकीची ६ खासगी तत्त्वावरील संकुले प्रस्तावित आहेत. सुमारे ४.९६८ कोटी गुंतवणूक व सुमारे १.७७ लाख रोजगार निर्मिती होणे अपेक्षित असलेली सार्वजनिक क्षेत्रातील १५ जैव-तंत्रज्ञान विशेष आर्थिक क्षेत्रे प्रस्तावित करण्यात आली आहे.

मैत्री

राज्यात गुंतवणूक व रोजगार वाढवण्यासाठी शासनाने इंटरनेटला जोडलेले एक स्टॉप शॉप मैत्री स्थापन केले आहे. सध्याच्या व संभाव्य गुंतवणूकदारांना गुंतवणूक प्रतिक्रियेबाबात सर्वसमावेशक माहिती उपलब्ध होण्यासाठी हा कक्ष शासन ते उद्योग (G2B)सेवा उपलब्ध करित आहे. मैत्रीमार्फत १२ विभागाकडून देण्यात येणाऱ्या एकूण ४८ सेवा समाकलित केल्या आहेत. आतापर्यंत १,५०० अडचणी हाताळण्यात आल्या असून १,४०० पेक्षा अधिक अडचणीचे निराकरण करण्यात आले आहे.

प्रोत्साहन योजना

अनुसूचित जाती आणि जमाती प्रवर्गातील घटकांना औद्योगिक विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष सामाजिक प्रोत्साहन योजना जाहीर केली. त्यामुळे उत्पादन व माहिती तंत्रज्ञान किंवा माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा क्षेत्रातील होतकरू उद्योजकांना सक्षमपणे कार्य करण्यासाठी मदत होत आहे.

या योजनेंतर्गत सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांसाठी असलेल्या औद्योगिक भूखंडापैकी २० टक्के भूखंड राखीव ठेवण्यात येत आहे. तसेच एमआयडीसीचा भूखंड ३० टक्के सवलतीच्या दराने देण्यात येत आहे.

उद्योगाला चालना

कोरोनामुळे संपूर्ण जग, देश, राज्य ठप्प असताना उद्योग विभाग सतत काम करत होता. २० एप्रिलनंतर ठप्प झालेले उद्योग सुरू केले. रेड झोन वगळून इतर भागातील सुमारे ६५ हजारांहून अधिक उद्योग सुरू केले. उद्योग क्षेत्र सुरू झाल्याने अर्थचक्र हळूहळू पूर्वपदावर आणण्याचा प्रयत्न केला. सुमारे १८ लाख कामगार कामावर रुजू झाले. अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह सुरू झाला.

महापरवाना

नवीन उद्योग सुरू करण्यासाठी मास्टर लायसन्स म्हणून महापरवाना देण्यास प्रारंभ केला. थेट परकीय गुंतवणूकदारांना झटपट उद्योग सुरू करण्यासाठी हा महापरवाना उपयुक्त ठरत आहे

प्ले अँड प्लग : उद्योग सुलभतेसाठी प्लग अँड प्ले पद्धत सुरू

रेडी शेड : नव उद्योगांसाठी एमआयडीसीद्वारे रेडी शेडची सुविधा एमआयडीसीमध्ये सुमारे ४० हजार हेक्टर जागा राखीव ठेवली आहे.

महाजॉब्ज : राज्यातील स्थानिक बेरोजगार तरुणांसाठी महाजॉब्ज वेब पोर्टल सुरू करण्यात आले आहे. वेबपोर्टल सुरू झाल्यानंतर अवघ्या २४ तासात दोन लाखांहून अधिक तरुणांची नोंदणी केली. नोकरीसाठी नोंदणी केलेल्या तरुणांना त्यांच्या अर्जाचा स्टेटस जाणून घेण्यासाठी मोबाइल महाजॉब्ज ॲप्लिकेशन उपयुक्त ठरत आहे.

मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० चा प्रारंभ

देश-विदेशांतील गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी उद्योग विभागाने मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०चा प्रारंभ केला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली उपक्रमांचा प्रारंभ करण्यात आला. अमेरिका, चीन, जपान, दक्षिण कोरिया, सिगांपूर आदी देशविदेशांतील कंपन्यांसोबत सुमारे २४ हजार कोटींचे सामंजस्य करार करण्यात आले. केवळ करार न करता त्याचा पाठपुरावा करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

अद्ययावत फार्मा पार्क

रायगड जिल्ह्यातील माणगाव परिसरात एमआयडीसीला मंजुरी देण्यात आली आहे. या ठिकाणी जागतिक दर्जाचे फार्मा पार्क सुरू करण्यात येत आहे.

इलेक्ट्रॉनिक पार्कची घोषणा : पुणे जिल्ह्यातील तळेगावमध्ये २५० एकरवर अद्ययावत असे इलेक्ट्रॉनिक पार्क उभे केले जाणार आहे. इलेक्ट्रॉनिक वस्तूंची मोठ्या प्रमाणात मागणी वाढत आहे. त्यामुळे देश विदेशांतील गुंतवणूकदारांना या क्षेत्रात काम करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. यानिमित्ताने अनेकांच्या हाताला रोजगार उपलब्ध होणार आहे.

अन्नप्रक्रिया उद्योगाला चालना

कृषी मालावर आधारित अन्नप्रक्रिया उद्योगाला चालना देण्यासाठी सामुहिक प्रोत्साहन योजनेत सुधारणा करण्यात आली आहे. यामुळे ग्रामीण भागात कृषी मालावर प्रक्रिया करणारे उद्योग सुरू होणार आहेत. फळ, भाज्यांची नासाडी टळून शेतमालाचे मूल्यवर्धन होण्यास मदत होणार आहे. मराठवाडा, धुळेपासून गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे.

कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर उद्योग विभागातील अधिकाऱ्याने एकही सुटी न घेता मंत्रालयातील उद्योग विभाग आठवड्याच्या सातही दिवस खुले राहिले. मंत्रालयातील सर्व अधिकारी वर्ग सतत काम करत आहे. उद्योग क्षेत्रातील समस्या जाणून घेऊन त्यावर तत्काळ तोडगा काढण्यासाठी विविध उद्योग संघटनांसोबत ऑनलाइन संवाद, चर्चासत्र सुरू ठेवले. ४० हून अधिक परिसंवाद केले.

मुंबई, ठाणे व पुणे या महानगराच्या परिसरातून उद्योगधद्यांचे विकेंद्रीकरण करून औद्योगिकीकरणाची व्याप्ती मागास भागात वाढवली आणि राज्याचा संतुलित विकास कसा होईल, अशीच धोरणे आखली गेली. या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी औद्यगिक विकास महामंडळाने करून प्रत्येक जिल्ह्यात एक तरी औद्योगिक क्षेत्र स्थापन केले आणि उद्योग क्षेत्र अधिकाधिक तालुक्यापर्यंत घेऊन कसे जाता येईल, यासाठी उद्योगांचे विकेंद्रीकरण करून राज्याच्या समतोल विकासाठी नियोजन करण्यात येत आहे.

जमीन, वीज आणि पाणी हे उद्योगाचे प्रमुख घटक उद्योजकांना सहज मिळावेत यासाठी राज्याने धोरण तयार केले. महामंडळाने सरकारी मालकीची पडीक व काहीच पीक उगवत नाही अशी पडीक जमीन ताब्यात घेऊन वीज, पाणी व इतर सुविधा निर्माण केल्या. ही विकसित जमीन उद्योजकांना दिली. त्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात उद्योग उभारले गेले. राज्यात सर्वत्र औद्योगिक वसाहतीचे जाळे तयार झाले. अशा पद्धतीने औद्योगिक प्रगतीचा भक्कम पाया तयार केला आहे. परंतू राज्यातील ग्रामीण भागात एमआयडीसीच्या क्षेत्राबाहेरील छोट्या उद्योगांना प्रोत्साहन देऊन त्यांना पायाभूत सुविधा निर्माण करून देणे आणि ग्रामीण भागात रोजगार निर्मितीवर अधिक भर देणे हे राज्यासमोर आवाहन आहे.

संदर्भ : या लेखासाठी उद्योगमंत्री सुभाष देसाई, उद्योग संचालनालयाचे आयुक्त डॉ. हर्षदीप कांबळे, औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. अन्बलगन, सीसीआय महाराष्ट्र राज्य मंडळाचे अध्यक्ष अरविंद गोयल, इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्सचे व्यवस्थापकीय संचालक राजीव पोदार, दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रिजचे अध्यक्ष मिलिंद कांबळे, सुला वाईन्सचे उपाध्यक्ष संजीन पैठणकर यांच्याशी चर्चा करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्राची आर्थिक विकास पाहणी अहवाल २०१९-२०.

विभागीय संपर्क अधिकारी

संग्रहित

शिक्षण : सार्वत्रिकीकरण ते दर्जात्मक

वर्षा फडके-आंधळे

कोणत्याही समाजाच्या किंवा राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा शिक्षण हा पायाभूत आधार असतो. समाजातील सर्व घटकांना शिक्षणाच्या मुख्य धारेत आणण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक समाजसुधारकांनी केलेल्या कार्याचे फळ म्हणून आज महाराष्ट्र शिक्षण क्षेत्रात अग्रेसर आहे. सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे प्रमुख साधन म्हणून ओळखले जाणाऱ्यात शिक्षण क्षेत्र हे अग्रभागी आहे. 'सर्वसमावेशक व समान गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी आणि सर्वांना आजीवन शिक्षणाच्या संधींचा प्रसार' हे शाश्वत विकास ध्येयांपैकी एक असून शिक्षण राज्यासाठी नेहमी मुख्य विषय राहिला आहे. त्यामुळे आपल्या एकूण वित्तीय महसूल खर्चापैकी साधारणपणे एक पंचमांश भाग सर्वसाधारण शिक्षणावर राज्य खर्च करीत आहे. २०१९-२० च्या अंदाजपत्रकानुसार सामाजिक सेवांवर झालेल्या एकूण विकास खर्चात सर्वसाधारण शिक्षणाचा ४५.३ टक्के हिस्सा अपेक्षित आहे. १९६० ते २०२० या काळातील महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्राचा झालेला प्रवास हा वैविध्यपूर्ण आहे. त्यातूनच आज सर्वांना शिक्षण देणारे महाराष्ट्र हे देशातील अग्रेसर राज्य ठरले आहे.

प्राथमिक शिक्षण

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना शिक्षण व्यवस्था पुरवण्याचे शासनाचे घटनात्मक दायित्व आहे, त्याबरोबरच केंद्र शासनाचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ व कृती कार्यक्रम १९९२ आणि राज्याचे धोरण ही मार्गदर्शक तत्त्वे ठेवून राज्यात विविध शैक्षणिक कार्यक्रम राबवले जात आहेत. मुलांना शाळेची गोडी लागावी म्हणून १९७८ पासून जिल्हा परिषद शाळांना जोडून बालवाड्या उघडण्यात आल्या. शाळा नसलेल्या खेड्यांमध्ये प्राथमिक शाळा उघडण्याकरिता जिल्हा परिषदांना भरीव अनुदान दिले तर राज्यातील ऊसतोड कामगारांच्या मुलांची मोठी संख्या पाहता या मुलांच्या शिक्षणाच्या सुविधेसाठी साखर कारखान्यांच्या परिसरात साखरशाळा जिल्हा परिषदांनी सुरू करून त्यांना शिक्षण प्रवाहात आणले.

शिक्षण हा समाजाच्या विकासाचा मूलभूत आधार ओळखून महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी सर्वांसाठी शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यातून एक मोठी चळवळ महाराष्ट्रात उभी राहिली. स्वातंत्र्योत्तर काळात या चळवळीला राज्य शासनाने पाठिंबा देत समाजातील वंचित-उपेक्षित घटकांपर्यंत शिक्षणाची गंगोत्री पोहोचवण्यासाठी नेटाने प्रयत्न केले. काळाप्रमाणे बदल हे या क्षेत्राचे अनिवार्य अंग आहे. त्यामुळे आता नव्या पिढीला कौशल्याधारित शिक्षण देत नव्या गतीशी जुळवून घेण्यातही महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे.

शाळांमधील मुलींचे गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी एप्रिल १९९३ मध्ये सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना सुरू केल्याने अनेक मुलींना आठवीपर्यंतच्या शिक्षणासाठी समाजामधून आर्थिक साहाय्य उपलब्ध झाले. मदरसांमधील शिक्षणाचेदेखील आधुनिकीकरण करण्यात आले. दरम्यानच्या काळात मुलींची पटसंख्या वाढवण्यासाठी विविध उपाय योजले गेले. त्याचबरोबर शालेय पोषण आहार शारीरिक आणि शैक्षणिक आरोग्यासाठी योजना अतिशय महत्त्वपूर्ण ठरली.

नव्या स्पर्धेसाठी सज्ज

शिक्षण हक्क कायद्यामुळे खासगी शाळांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणे आणि त्यातून नव्या स्पर्धेसाठी सज्ज होणे शक्य झाले आहे.

'बालचित्रवाणी' हा महाराष्ट्राच्या प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांसाठी एक महत्त्वाचा आधार ठरला आहे. एक प्रकारे महाराष्ट्राने शिक्षणाचे डिजिटायजेशन करण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल टाकले. मुलांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी २०१५-१६ मध्ये राज्य शासनाने 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम' सुरू केला, यातून ५३,४५६ शाळा प्रगत तर ६४,९७८ शाळा डिजिटल झाल्या. राज्यात ४२ सैनिकी शाळा असून त्यातील चार मुलींकरिता, चार सहशिक्षणासाठी आणि ३४ मुलांसाठी आहेत. गेल्या वर्षापर्यंत या शाळांमध्ये २१२०९ पटनोंदणी झाली आहे.

तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर

राज्याचा आतापर्यंतच्या जडणघडणीत शिक्षण या क्षेत्राने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सध्या अभ्यासक्रम, मूल्यमापनात शाळांची, शिक्षकांची भूमिका या सर्वांवर नव्या अंगाने विचार करणे गरजेचे आहे. शिक्षण क्षेत्रात आव्हाने मोठी आहेत. मात्र शालेय शिक्षण विभाग या सर्व आव्हानांना समर्थपणे तोंड देण्यास सज्ज आहे. कोविड-१९च्या काळात शालेय शिक्षण विभागाने तंत्रज्ञानाचा सुयोग्य पद्धतीने वापर करून शिक्षण विद्यार्थ्यांच्या घराघरांत पोहोचवण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

- प्रा. वर्षा गायकवाड, शालेय शिक्षण मंत्री

प्राथमिक शिक्षणाव्यतिरिक्त राज्यात राबवलेली ग्रामशिक्षण मोहीम युनेस्कोच्या कौतुकास पात्र ठरली. या योजनेसाठी 'मोहम्मद रेझा पहेलवी' हा पुरस्कार राज्याला प्रदान केला, त्याशिवाय महिला प्रौढ साक्षरतेच्या कामामध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल १९८२-८२ व १९८३-८४ मध्ये ४५.५० लाख रुपयांचे रोख पारितोषिक महाराष्ट्र राज्याला प्राप्त झाले.

माध्यमिक शिक्षण

महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणाचा प्रसार वेगाने झाल्यामुळे त्याचा अतिशय चांगला परिणाम माध्यमिक शिक्षणावरही झाला. राज्याच्या स्थापनेनंतर मे १९६२ मध्ये सर्व विभागातील शासकीय शाळा जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आल्या. सध्या खासगी संस्था, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपरिषदा व कटक मंडळांच्या व्यवस्थापनाकडून माध्यमिक शाळा चालवण्यात येतात. १९६५ च्या कायद्यानुसार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची स्थापना झाली त्यांच्यामार्फत दहावी, बारावीच्या परीक्षांबरोबरच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तक निर्मिती, मूल्यमापन आदी कामे केली जात आहेत. शाळांच्या विस्तारामुळे माध्यमिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध झाल्या आहेत. तरीदेखील ग्रामीण भागातील प्रतिकूल शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीमुळे विद्यार्थी शिक्षणापासून दूर राहू नये यासाठी १९६६ मध्ये शासकीय विद्यानिकेतने सुरू करण्यात आली, अशी ५ विद्यानिकेतने राज्यात कार्यरत असून केंद्राची नवोदये विद्यालयेदेखील १९८५-८६ मध्ये राज्यात सुरू झाली आहेत. एकीकडे शिक्षणाचा दर्जा सुधारतानाच शालेय विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, चारित्र्यसंवर्धन, बंधुत्व, खेळाडूवृत्ती व सेवाभाव आदी गुणांची जोपासना आणि संवर्धनासाठी १९९६-९७ पासून महाराष्ट्र छात्रसेनेची योजना सुरू करण्यात आली. आर्थिकदृष्ट्या (मागासवर्गीय) दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शुल्क माफी, मुलींसाठी सायकल वाटप, शिष्यवृत्ती, वेगवेगवळ्या प्रोत्साहन योजनांमुळे लाखो विद्यार्थी उच्च शिक्षणापर्यंत पोहोचू शकले हे वास्तव आहे.

राज्याच्या डोंगरी आणि दुर्गम भागात शिक्षणाची गंगा पोहोचवण्यासाठी आदिवासी मुलांकरिता ५५६ शासकीय निवासी आश्रमशाळा, ४९५ शासकीय वसतिगृहे असून त्यात ५२१६० विद्यार्थी राहतात. त्याशिवाय अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळांमध्ये, शिक्षणासाठी योजना सुरू कराण्यात आली असून आजतागायत ५४ हजार विद्यार्थी या इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. राज्यात समग्र शिक्षा, दिव्यांग समावेशक शिक्षण

एक दृष्टिक्षेप– प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणावर

शिक्षण	१९६०–६१	२०१८–१९
प्राथमिक शाळा	३४५९४	१०६२३७
प्राथमिक शाळेतील विद्यार्थी	४१७८०००	१५७४८०००
माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा	२४६८	२७४४६
माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थी	८५८०००	६६०८०००

कार्यक्रमांचीदेखील प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

'असर'चे निरीक्षण

अनुसूचित जाती, जमाती तसेच विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती योजनादेखील सुरू असून महाराष्ट्राची शिक्षण क्षेत्रातील कामगिरी अन्य राज्यांच्या तुलनेत चांगली असल्याचे राष्ट्रीय पाहणी असलेल्या 'असर'च्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. या सर्वेक्षण अहवालातील वैशिष्ट्ये:

- पटनोंदणीची टक्केवारी ९८.५ वरून ९९.२ टक्के इतकी.
- प्राथमिक शाळेतील मुलांची प्रगती उच्च प्राथमिक शाळांतील मुलांपेक्षा चांगली.
- खासगी शाळांपेक्षा जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांची कामगिरी उत्तम.
- भारताच्या तुलनेत महाराष्ट्राची खूप चांगली प्रगती.
- गणितामध्ये इयत्ता तिसरी, पाचवी आणि आठवीमध्ये प्रगती चांगली.
- जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये मुलांची व शिक्षकांची अधिक उपस्थिती.

कोविड-१९ मुळे राज्यात लॉकडाऊन करण्यात आल्यानंतर शाळा बंद झाल्या पण शिक्षण सुरूच होते. गुगलच्या सहकार्याने गुगल क्लासरूम उपक्रम राबवणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे.

उच्च शिक्षणातही पुढेच

मेकॉले यांच्या १९३५ मधील प्रस्तावातील शैक्षणिक विकासाची कल्पना संपूर्णतः ब्रिटिश शासनाच्या उपयोगी होती, स्वातंत्र्यानंतर १९४८ मध्ये डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली उच्च शिक्षणावर पहिला विद्यापीठ शिक्षण आयोग स्थापन करण्यात आला. त्यानंतर मुदलियार समिती, कोठारी आयोगाची स्थापना केंद्र सरकारने केली, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या या आयोगांनी उच्च शिक्षणाला दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

ऑनलाइन शिक्षणाकडे वाटचाल

"राज्याच्या स्थापनेचे यंदाचे हीरकमहोत्सवी वर्ष आहे. राज्याने सर्वच क्षेत्रात देदीप्यमान प्रगती साधली आहे. पारंपरिक शिक्षणासोबतच आता ऑनलाइन शिक्षणाकडे वाटचाल करत आहोत. राज्यात शैक्षणिक सुविधा, संशोधनाबरोबरच माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनासुद्धा ऑनलाइन शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध होतील यासाठी शासन प्रयत्न करत आहे."

- उदय सामंत, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

चित्र आश्वासक महाराष्ट्राचे

डॉ. काकोडकर समिती

डॉ. काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली २०१० मध्ये स्थापलेल्या 'महाराष्ट्रातील उच्च शिक्षण' या समितीने रचनात्मक विकासासाठी शिक्षणातून तरुणांना सक्षम करणे ही महत्त्वाची गरज असल्याचे नमूद करून -३ (Anyaone - Anytime - Anywhere) हे सूत्र सुचवले. त्यानंतर राज्य सरकारने डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. आतापर्यंतच्या समित्यांनी उपाययोजना आणि राज्यातील वास्तविकता यांची सांगड घालून विद्यापीठांच्या बृहत विकास आराखड्यांचे निकष सुचवण्याचे महत्त्वाचे कार्य या समितीकडे सोपवले. उच्च शिक्षणाबद्दलचा बृहत आराखडा तयार करण्यासाठी प्रथमच राज्य शासनाने घेतलेला पुढाकार महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाला नवी दिशा देणारा ठरला आहे. उच्च शिक्षणाच्या सोयी व दर्जामध्ये वाढ करण्याच्या हेतूने शासनाने १९८४ सालापासून शालेय शिक्षण विभागापासून

उच्च शिक्षण हा विभाग वेगळा केला आहे.

१९६० पूर्वीची विद्यापीठे

- मुंबई विद्यापीठ (१८५७)
- दुसरे नागपूर विद्यापीठ (१९२३, नामविस्तार- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ- २००६)
- तिसरे पुणे विद्यापीठ (१९४९: नामविस्तार- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ २०१४)
- चौथे महर्षी डॉ. कर्वे यांनी १९१६ साली स्त्रियांसाठी स्थापन केलेले श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ, मुंबई (१९४९ मध्ये कायद्याने मान्यता)
- पाचवे मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (१९५८ नामविस्तार : 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ', १९९४).

१९६० नंतरची विद्यापीठे

- शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (१९६२)
- अमरावती विद्यापीठ, अमरावती (१९८३ : नामविस्तार - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ (२००५),
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक (१९८८)
- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (१९९० : नामविस्तार - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ- २०१८),
- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (१९९४)
- कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक (१९९७)
- महाराष्ट्र पशू व मत्स्य विद्यापीठ, नागपूर (२०००)
- सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (२००४- नामविस्तार- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ -२०१९)
- गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली (२०११)

कृषी विद्यापीठे

महाराष्ट्रामध्ये शेतकी विषयाच्या पद्धतशीर, तंत्रशुद्ध उच्च शिक्षणाला व संशोधनाला वाहिलेली कृषी विद्यापीठे देखील १९६० नंतर राज्यात स्थापन झाली, त्यात :-

- महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी (स्थापना१९६८),
- डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला (१९६९),
- डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली (१९७२)
- वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी (१९७२)

या विद्यापीठांच्या अंतर्गत सुमारे १८९ महाविद्यालये असून १५२९७ त्याची प्रवेश क्षमता आहे. तर ३८ महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सुविधा असून त्यात १३३८ प्रवेश क्षमता आहे. पीएचडी (आचार्य) साठी १२ शासकीय महाविद्यालयांमध्ये २३३ क्षमता असून २३० कृषी तंत्रविद्यालयाच्या माध्यमातून १३७७० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

एकूण विद्यापीठांची संख्या	६२
राज्य विद्यापीठे	३४ (सार्वजनिक-२२, खासगी-११ आणि मुक्त विद्यापीठ-१)
अभिमत विद्यापीठे	२१ (खासगी-१२, शासकीय-७, शासकीय अनुदानित-२)
राष्ट्रहितासाठीच्या संस्था	६
केंद्रीय विद्यापीठ	१
महाविद्यालयांची संख्या	४५७१
स्वायत्त संस्था	२२६२
उच्च शिक्षणातील पटसंख्या	४२.३० लाख
	• पदवी - ३३५१६९०
	• पीएच.डी. - ८७९६
	• एम.फिल- २१७२
	• पदव्युत्तर पदवी - ४६१२४३
	• पदव्युत्तर पदविका - १९९८४
	• पदविका - ३५५२०९
	• प्रमाणपत्र - १७७१०
	• इंटिग्रेटेड - १३५२३
वसतिगृहांची संख्या	५६९५ (क्षमता - ६८२६९८)

मुक्त विद्यापीठ

'ज्ञानगंगा घरोघरी' हे बोधवाक्य घेऊन नाशिकमध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना १९८८ मध्ये झाली, या मुक्त विद्यापीठाची स्थापना महाराष्ट्राच्या शैक्षणिक चळवळीतील एक मैलाचा दगड ठरली.

देशातील सर्वाधिक महाविद्यालये ज्या राज्यांमध्ये आहेत त्यात उत्तर प्रदेशनंतर महाराष्ट्राचा क्रमांक आहे, दर लाख लोकसंख्येमागे राज्यात ३३ महाविद्यालये आहेत. तर देशातील सर्वाधिक महाविद्यालये असणाऱ्या वरच्या १० जिल्ह्यांमध्ये पुणे (४५०), नागपूर (३१३) आणि मुंबई (३०५) चा क्रमांक लागतो. यातून महाराष्ट्राचे उच्च शिक्षणातील स्थान स्पष्ट होते. राजर्षी शाहू महाराज प्रतिपूर्ती योजनेमुळे विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक संधी उपलब्ध होत असून विविध महामंडळांमार्फत शैक्षणिक कर्जही देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना शिक्षणाची गुणवत्ता आणि उपयुक्तता तपासून घेणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ एकूण ६०५ अभ्यासक्रमांना देण्यात आला आहे. यामध्ये उच्च व तंत्र शिक्षणचे ५३९ अभ्यासक्रम, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे १० अभ्यासक्रम, कृषी विभागाचे २४ अभ्यासक्रम, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे १६ अभ्यासक्रम आणि अन्य याचे १६ अभ्यासक्रम यामध्ये येतात. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता देण्यात येतो.

विद्यापीठांमध्ये शिकवले

जाणारे अभ्यासक्रम आणि उद्योगधंद्याची आवश्यकता यात समन्वय (कनेक्ट) करण्यात येत आहे. शिक्षण व उद्योग यांची सांगड घालून तरुणांना रोजगारभिमुख अभ्यासक्रम आणि शिक्षण देण्यावर अधिक भर देण्यात येत असून त्याद्वारे तरुणांना रोजगार व स्वयंरोजगाराची नवीन दिशा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

राज्यात पीएच.डी.साठी नवनवीन दिशादर्शक आणि समाजोपयोगी विषय निवडले जात आहेत. यंदाच्या वर्षी कोविड -१९च्या प्रादुर्भावामुळे पीएच.डी. करत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रबंध सादर करणेसंबंधी अडचणी निर्माण झाल्या होत्या. परंतु नावीन्यपूर्ण उपक्रम व तंत्रज्ञान यात नेहमी अग्रेसर असणाऱ्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने पीएच. डी. ऑनलाइन मौखिक परीक्षा (ऑनलाइन) आयोजित करून विद्यार्थ्यांना दिलासा दिला. यूजीसीने कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करून जागतिक संकट काळातही आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कार्यरत राहणारे आणि असा अभिनव उपक्रम करणारे ते पहिले विद्यापीठ ठरले आहे.

शिक्षण संस्थांचे योगदान

स्वातंत्र्यानंतर खरेतर आपल्यासमोर मोठा प्रश्न होता की, वंचितांना शिक्षण कसे देता येईल. त्या वेळी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शाळा सुरू केल्या. 'कमवा आणि शिका' या त्यांनी दिलेल्या मूलमंत्रावर अनेक जण त्या काळी आपल्या पायावर उभे राहू शकले. कर्मवीर भाऊराव पाटील यांची संवेदनशीलता, त्याग, समर्पण, इतके मोठे आहे की, कधी-कधी ते मुलांना आपल्या स्वत:च्या खांद्यावर बसवून शाळेत पोहोचवत असत. छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासासाठी दिलेले योगदान अतिशय महत्त्वाचे आहे.

साताऱ्यातील रयत शिक्षण संस्था, नाशिकची जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज संस्था, महात्मा गांधी विद्यामंदिर, विदर्भातील शिवाजी महाराज शिक्षण संस्था अशा अनेक संस्थांचे आणि शिक्षण महर्षींचे राज्याच्या शिक्षण विकासात मोलाचे योगदान आहे.

१९८३ मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल केले. त्या वेळी बारावीनंतर अनेक विद्यार्थ्यांना इंजिनिअर, डॉक्टर व्हायचे होते पण महाराष्ट्रातील मुलांना सामावून घेऊ शकतील अशी शासकीय महाविद्यालये नसल्याने अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत होते. त्या वेळी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी महाराष्ट्रातील शासकीय महाविद्यालये सोडून खासगी महाविद्यालये स्थापन करण्यास परवानगी दिली. आज राज्यात खासगी शिक्षण संस्थांचे जाळे निर्माण झाले असून यामुळे आज लाखो डॉक्टर, इंजिनिअर तयार झाले आणि त्यांना राज्यात, इतर राज्यांमध्ये, परदेशात नोकऱ्या मिळाल्या. अनेक विद्यार्थी राज्य

शिक्षण क्षेत्रात अग्रेसर

महाराष्ट्र निश्चितच शिक्षण क्षेत्रात अग्रेसर आहे. कोविड-१९ प्रादुर्भावाचे संकट उभे राहिले तेव्हा, शाळा बंद असल्या तरी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये आणि त्यांना शिक्षण मिळावे यासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून तसेच ऑनलाइन शिक्षणाद्वारे शासनाने प्रयत्न केले. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडे मोबाइल उपलब्ध आहेत, त्या पालकांना जिओ टीव्हीच्या सहकार्याने चार विविध भाषांमधून बारा शैक्षणिक चॅनेल्स उपलब्ध करून देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

- ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, शालेय शिक्षण, राज्यमंत्री

अभ्यासक्रम	एकूण संस्था (शासकीय, अनुदानित, विना अनुदानित, विद्यापीठ संचलित/अभिमत)
पदविका (तंत्रनिकेतने व तत्सम, औषध निर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी)	७७६
पदवी (अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, फॉर्म-डी, नियोजन)	७४१
पदव्युत्तर पदवी (अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, व्यवस्थापनशास्त्र (एमबीए,एमएमएस), पीजीडीएम, हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, फॉर्म-डी, नियोजन)	७९५
एकूण	२३१२

शासन देत असलेल्या शिष्यवृत्तीमुळे शिकू शकले, असे मत काही तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

दृष्टिक्षेपात : उच्च शिक्षण

गेल्या ८ वर्षातील जरी प्रवास पाहिला तर उच्च शिक्षणाच्या सोयीसाठी राज्यात २०११-१२ या वर्षी ४४ विद्यापीठे होती तीच संख्या २०१८-१९ मध्ये ६२ इतकी झाली.

तंत्रशिक्षणाची भरारी

देशातील व्यावसायिक अभ्यासक्रम राबवण्यामध्ये महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर राहिले आहे. तंत्रकुशल मनुष्यबळ, सक्षम कारखाने, तांत्रिक व्यावसायिक संशोधनाच्या आधारे जीवनमान उंचावण्याच्या कामात महाराष्ट्र राज्याने आपला ठसा उमटवला आहे. त्यामुळे राज्यात व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संख्येतही वाढ झाली आणि तंत्रकुशल मनुष्यबळाबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यामध्ये राज्याने भरारी घेतली आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये समाजातील सर्व घटकांना सामावून घेण्याचे शासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. शुल्क प्रतिपूर्ती योजनेमुळे अनेक दुर्बल आणि वंचित घटकांना हे शिक्षण घेणे शक्य होत आहे. अल्पसंख्याक, दिव्यांग, मुली या सर्वांचा विचार करून वेगवेगळ्या योजना राबवून या घटकांना व्यावसायिक शिक्षणाकडे वळवून त्यांना आत्मनिर्भर करण्यात शासनाला यश आले आहे.

राज्यात तांत्रिक शिक्षण देण्याची एकत्रित जबाबदारी १९४८ मध्ये स्थापलेल्या तंत्रशिक्षण संचालनालयावर सोपवली असून डिसेंबर १९८४ मध्ये तंत्रशिक्षण संचालनालयाचे विभाजन करून तंत्रशिक्षण आणि व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय निर्माण करण्यात आले. तंत्रशिक्षणासाठी मुंबई विद्यापीठाच्या सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयास आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांना अनुदान देण्यात येते, तर अशासकीय तंत्र महाविद्यालये आणि संस्थांना साहाय्य केले जाते.

राज्याने १९६३ मध्ये स्वायत्त दर्जाचे तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ स्थापन केले त्याचे नाव १९९९ मध्ये महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ करण्यात आले आहे. १२०० हून अधिक तंत्रनिकेतने, स्वायत्त तंत्रनिकेतने, इतर तांत्रिक संस्था या मंडळाशी संलग्न असून १८६ विविध अभ्यासक्रम या मंडळामार्फत चालवले जातात. विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेत एकसूत्रता आणण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाची (सीईटी सेल) स्थापना केली आहे. सर्व प्रकारच्या वैद्यकीय शिक्षण, तंत्रशिक्षण, उच्च शिक्षणांतर्गत येणाऱ्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची सामायिक प्रवेश परीक्षा आणि केंद्रीभूत प्रवेशप्रक्रिया या कक्षाद्वारे केली जाते. त्याशिवाय राज्यात प्रवेश नियामक प्राधिकरण व शुल्क नियामक प्राधिकरण देखील २०१५ मध्ये अस्तित्वात आले असून विनाअनुदानित संस्थांमध्ये प्रवेशासाठी अन्याय झाल्यास या प्राधिकरणाकडे दाद मागण्यासाठी विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध झाली आहे.

संग्रहित

शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना (औद्योगिक प्रशिक्षण संस्था), सरकारी औद्योगिक प्रशिक्षण कार्यशाळा, अधिक दोन टप्प्यावरील शिक्षणाचे व्यावसायीकरण, माध्यमिक पातळीवरील तांत्रिक शिक्षण आणि प्रमाणपत्र आणि संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमांविषयी प्रशासकीय जबाबदाऱ्यांसाठी १९८४ मध्ये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाची स्थापना करण्यात आली. सध्या राज्यातील ३५८ तालुक्यात ४१७ शासकीय औद्योगिक

तंत्रशिक्षण

१९६० मध्ये केवळ ८ अभियांत्रिकी, तंत्रशास्त्र, औषध निर्माणशास्त्र, आर्किटेक्चर, एचएमसीटी महाविद्यालये होती तर केवळ १४ तंत्रनिकेतने कार्यरत होती, यांची प्रवेशक्षमता अनुक्रमे ९५२ आणि १९४० इतकी होती. सध्याच्या घडीला अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी सध्या राज्यातील ३४० शासकीय तसेच अनुदानित आणि विना अनुदानित, विद्यापीठ संचलित संस्थामध्ये १२७५३७ जागांवर विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. तर राज्यात शासकीय, अशासकीय, अनुदानित व विनानुदानित तंत्रनिकेतनांमध्ये विविध ५२ विषयातील पदविका अभ्यासक्रमासाठी ३७८ संस्थांमध्ये १०८०४१ इतकी राज्यात प्रवेशक्षमता आहे. त्याशिवाय औषध निर्माणशास्त्र पदविका (डी. फार्मसी) राज्यात ३९४ संस्थांमध्ये २४ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रवेश दिला जातो. त्याशिवाय औषध निर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट आणि केटरिंग टेक्नॉलॉजी आणि एमबीए, एमएमएस, एम.टेक, पदवी, पदव्युत्तर पदवी, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी पदविका अशा विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना राज्यात प्रवेश दिला जातो.

प्रशिक्षण संस्था कार्यरत असून जवळपास एक लाखाच्या आसपास त्यांची वार्षिक प्रवेशक्षमता आहे. त्यात आदिवासी भागासाठी, अनुसूचित जाती, नवबौद्ध मुला-मुलींसाठी, अल्पसंख्याकांसाठी, महिलासांठी अशा स्वतंत्र संस्था आणि तुकड्या आहेत. त्याचबरोबर राज्यात ५३८ खासगी आयटीआय कार्यरत असून सुमारे ५० हजाराच्या आसपास त्याची प्रवेश क्षमता आहे. आयटीआय झाल्यानंतर राज्यातील सुमारे ११ हजार विविध औद्योगिक आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारांसाठी विद्यावेतनावर सुमारे एक लक्ष जागा स्थित करण्यात आल्या आहेत.

वैद्यकीय शिक्षणक्षेत्रात आमुलाग्र बदल

सार्वजनिक आरोग्य ही लोककल्याणकारी राज्यातील महत्त्वाची आणि जीवनावश्यक बाब असून राज्यात प्राथमिक आरोग्य सुविधा सार्वजनिक आरोग्य विभाग पुरवत असला तरी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग वैद्यकीय शिक्षण कार्याबरोबरच राज्यातील जनतेला प्राथमिक आरोग्यासह विशेषोपचार व अतिविशेषोपचार सेवा देत आहे. त्याशिवाय वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, आयुर्वेद संचालनालय आदी विभागांच्या माध्यमातून हे कार्य सुरू आहे.

वैद्यकीय क्षेत्रात शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन आणि भारतीय पद्धतीचे वैद्यकीय शिक्षण यांच्या समतोल विकासासाठी तसेच आरोग्य विज्ञान शिक्षणाची गुणवत्ता नियोजनबद्धरीत्या वाढण्याच्या दृष्टीने राज्यात शासनाने नाशिक येथे महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठाची ३ जून १९९८ रोजी स्थापना केली. हे विद्यापीठ देशातील चौथे आरोग्य विज्ञान विद्यापीठ आहे. राज्य शासनाने १९६० पासून वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. ॲलोपॅथी, आयुर्वेदिक, होमिओपॅथी, युनानी, दंतचिकित्सा, फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, ऑडिओलॉजी व स्पीच लँग्वेज पॅथॉलॉजी, नर्सिंग, बीपीएमटी या विद्याशाखेच्या सुमारे ५४९ पेक्षा अधिक शासकीय, अनुदानित, खासगी संस्था असून त्यात सुमारे ३१ हजार ९०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता निश्चित करण्यात आली आहे. वैद्यकीय शिक्षणात विद्यार्थ्यांना अधिक सुविधा मिळाव्यात यासाठी आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम प्रवेशामधील ७०:३० प्रादेशिक कोटा कार्यपद्धती रद्द करण्यात आली असून वन महाराष्ट्र वन मेरिट यानुसार वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया केली जात आहे. वैद्यकीय अभ्यासक्रमाला पूरक ठरतील असे अभ्यासक्रम महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत तयार करण्यात येत आहेत. एकूणच, राज्यातील शिक्षण क्षेत्रात गेल्या ६० वर्षांत झालेले परिवर्तन महाराष्ट्राच्या प्रगतीतील एक मोठा टप्पा ठरले आहे. आगामी काळात पारंपरिक शिक्षणाबरोबरच उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण आणि विविध शाखांशी संबंधित असलेल्या शिक्षणाच्या क्षेत्रात महाराष्ट्र देशात सर्वोच्चस्थानी राहील, यात शंकाच नाही. गेल्या सहा दशकांत महाराष्ट्राने शिक्षणाच्या सर्वांगीण पैलूंचा विस्तार करतानाच 'अश्वासक महाराष्ट्राचे' चित्र साकार केले आहे. आगामी काळात अजून मोठा टप्पा गाठायचा असून त्या दृष्टीने महाराष्ट्राची घोडदौड वेगाने सुरू आहे, अशीच अविरतपणे, अखंडपणे.

संग्रहित

संदर्भ : ■ महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल-२०१९-२०२० ■ शैक्षणिक धोरणांचा आढावा - डॉ. नरेंद्र जाधव यांच्या समितीचा अहवाल ■ महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे संकेतस्थळ-www.mcaer.org ■ केंद्र शासनाचे मानव संसाधन मंत्रालयाचा ऑल इंडिया सर्वे हायर एज्युकेशन -२०१८-१९अहवाल ■ सन २०२०-२१ चे उच्च शिक्षण आणि तंत्रशिक्षण विभागाचे कार्यक्रम अंदाजपत्रक ■ dtemaharashtra.gov.in तसेच https://www.dvet.gov.in/ हे संकेतस्थळ ■ https://vishwakosh.marathi.gov.in/ हे संकेतस्थळ ■ केंद्र शासनाच्या दळणवळण व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या सी-डॅक संस्थेचे https://mr.vikaspedia.in/ संकेतस्थळ ■ महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषदेचे संकेतस्थळ ■ माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे www.mahasamvad.in संकेतस्थळ ■ श्रीमती विजयशीला सरदेसाई, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या माजी अध्यक्षा ■ डॉ. पांडुरंग जाधव, महात्मा गांधी विद्यापीठाचे वैद्यकीय संचालक आणि महात्मा गांधी विद्यापीठ ट्रस्टचे उपाध्यक्ष ■ डॉ. राजन वेळूकर, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू ■ डॉ. शिवकुमार ऊत्तुरे, राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे सदस्य आणि महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे अध्यक्ष ■ डॉ. दिलीप म्हैसेकर, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु

विभागीय संपर्क अधिकारी

संग्रहित

सांस्कृतिक : साहाय्यकारी भूमिका

भौगोलिक, वांशिक, धार्मिक, भाषिक तसेच सांस्कृतिकदृष्ट्या महाराष्ट्र हे वैविध्याने नटलेले राज्य आहे. प्राचीन काळापासूनच विविध प्रवाहांची संयोगभूमी असल्यामुळे वैविध्य हेच या भूमीचे वैशिष्ट्य ठरले आहे. महाराष्ट्राचे भौगोलिक स्थान आणि मराठी माणसाची सर्वांना सामावून घेण्याची स्वागतशील वृत्ती, महाराष्ट्राची सर्वसमावेशक संस्कृती घडवण्यास पोषक ठरली आहे. त्यामुळेच महाराष्ट्र एक सुसंस्कृत आणि पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. अनेक कलाप्रकारांना महाराष्ट्राच्या या मातीने आणि रसिक जनतेने कायमच प्रोत्साहन दिले आहे.

मीनल जोगळेकर

नयनरम्य किनारा लाभलेला कोकण, सह्याद्रीची उत्तुंग रांग, शेजारी असणारा देश व घाट, वनराईने नटलेला विदर्भ, विस्तीर्ण मराठवाडा अशी नैसर्गिक विविधता महाराष्ट्राच्या सांस्कृतिक घटकांमध्ये प्रतिबिंबित आहे.

सणवार, व्रत-वैकल्ये, यात्रा-जत्रा, लोकोत्सव, वस्त्र-पोशाख, खाद्यपदार्थ, दागदागिने, लग्नाचे विधी, पाककृती आणि रांगोळ्या, वास्तुशास्त्र, चित्रकला, शिल्पकला, हस्तकला, छायाचित्रण, सिरॅमिक, प्रिंट मेकिंग, ग्राफिक डिझाईन, फॅशन डिझाइन, इंटेरिअर डिझाईन अशा दृश्यकला आणि गायन, नृत्य, नाट्य, चित्रपट, व्हिडिओ अशा दृक आणि श्राव्य या दोन्ही प्रकारात मोडतात अशा प्रयोगात्मक कला इ. विविध प्रकारांनी महाराष्ट्राची कला संस्कृती समृद्ध केली आहे.

प्राचीन कला संस्कृती

इ. स. पू. सु. १५०० या काळात मध्य भारतातील माळवा येथून एक कृषी जमात महाराष्ट्रात येऊन गोदावरी, प्रवरा, तापी, भीमा आदी नद्यांच्या खोऱ्यांत स्थिरावली व तेथूनच महाराष्ट्राच्या कलापरंपरेस सुरुवात झाली. त्या जमातीने महाराष्ट्रास कुंभाराच्या चाकाची, तांबे या धातूची ओळख करून दिली, अशा तऱ्हेचा पुरावा प्रथम जोर्वे येथे सापडल्याने या संस्कृतीला 'जोर्वे संस्कृती' अहमदनगर जिल्ह्यातील दायमाबाद येथे सापडलेली तांब्याची (भरीव) हत्ती, बैल, गेंडा व बैलगाडी ही शिल्पे, नेवासे, तेर, नाशिक, पैठण, ब्रह्मपुरी (कोल्हापूर), कराड, कौंडिण्यपूर, भोकरदन इ. ठिकाणांच्या उत्खननांतून सापडलेली ओतीव शिल्पे, नक्षीकामयुक्त वस्तू, भांडी यामधून महाराष्ट्रातील कलापरंपरा इ.स.पू.१५०० वर्षे या काळापासून चालत आली असावी, असे दिसते.

कृषी संस्कृतीचा प्रभाव

प्राकृतिक रचनेनुसार महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने शेती केली जाते. त्यामुळे यामध्ये विविधता आढळते. जत्रा-यात्रा, बैलपोळा सारखे सण, वेळ-अमावस्या, पांडव पूजन, इर्जिक, खळं जेवण, धान्य पूजन, याबरोबरच मोटेवरची गाणी, भलरी गीते, लागवड गीते, काढणीची

गाणी, पशू पूजन, पाणी पूजन, वृक्ष पूजन अशा कृषी संस्कृतीशी निगडित वैविध्यपूर्ण रूढी, परंपरा, सण-उत्सव, कार्यक्रम वेगवेगळ्या भागांत दिसून येतात.

लोकोत्सव

महाराष्ट्र हा उत्सव प्रिय म्हणून गणला जातो. फक्त महाराष्ट्रात साजरे केले जाणारेही काही सण आहेत. उदाहरणार्थ सार्वजनिक शिवजयंती, गुढी पाडवा, अक्षय तृतीया, पोळा, दहीहंडी उत्सव, गणपती उत्सव, भाऊबीज, हळदी कुंकू, मंगळागौर, गौराई, कानबाई, होळी, चंपाषष्ठी, वेगवेगळ्या जत्रा यात्रा, पंढरीची वारी, मारबत, आंबेडकरी जलसे, कुस्त्यांचे फड, नवस फेड, गोडा-खारा नैवेद्य परंपरा, भोंडला, ताबूत असे वेगवेगळे लोकोत्सव साजरे केले जातात. या लोकोत्सवांमधून सामाजिक अभिसरण व सांस्कृतिक आदानप्रदान होत असते.

पंढरपूरच्या विठोबा या लोकदैवताचे महाराष्ट्रात अनन्यसाधारण स्थान आहे. या दैवताला भजताना मोठी संतपरंपरा निर्माण झाली असून महाराष्ट्राच्या समाज जीवनात संतांचे खूप मोठे योगदान आहे. या संत परंपरेतल्या बहुतेक संतांनी अभिजात काव्य निर्मिती केली आहे. संतपरपरेचा वारसा अजूनही महाराष्ट्रात प्रामुख्याने संत साहित्याच्या आणि वारकरी दिंडीच्या रूपाने दिसून येतो.

जीवनमूल्ये शिकवणारी वारी

समता, बंधुभाव, प्रेम यांसारखी जीवनमूल्ये शिकवणारी, स्वत:चे अस्तित्व विसरायला लावणारी ही वारी म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे वैभव! पंढरीची वारी आषाढी-कार्तिकी एकादशीला पंढरपूरला पोहोचण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक संतांच्या दिंड्या आणि पालख्या निघतात. वारीत नाट्य, गोलरिंगण, उभं रिंगण ही खास आकर्षण असतात. वारी परंपरा सुमारे ८०० वर्षांपासून टिकून आहे.

जानेवारी - फेब्रुवारी महिन्यात, महत्त्वांच्या सणांना विविध ठिकाणी यात्रा भरतात. जत्रेत लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्व स्तरातील, सर्व जाति-धर्मातील समुदाय मोठ्या आनंदाने सहभागी होताना दिसतात. त्यातून सामाजिक एकोपा जपला जातो. जत्रा हे धार्मिक कारणांबरोबरच आर्थिक व व्यावहारिक उलाढालींसाठी सोयीचे केंद्र असते. नगर जिल्ह्यातील कानिफनाथाची जत्रा गाढवांच्या व खेचरांच्या व्यापारासाठी, तर नांदेड जिल्ह्यातील मालेगाव येथील खंडोबाची जत्रा घोड्यांच्या व्यापारासाठी प्रसिद्ध आहे. त्यामुळे या जत्रेला खंडोबाची जत्रा म्हणण्याऐवजी लोक 'घोड्यांची जत्रा म्हणतात. बऱ्याच ठिकाणी एका ठरवलेल्या दिवशी गावातील प्रत्येक कुटुंब आपापल्या पाहुण्यांना, मित्र मंडळींना आमंत्रित करून जेवू घालतात. त्या दिवशी गावामध्ये तमाशा मनोरंजनाचे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. जत्रांमध्ये जंगी कुस्त्यांचे फड चालतात.

सांस्कृतिक विकासावर भर

कोणत्याही राज्याच्या विकासाचे मूल्यमापन सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय निकषांबरोबरच सांस्कृतिक निकषावरही केले जाते. त्यामुळे राज्य शासन सांस्कृतिक क्षेत्राबाबत नेहमीच सर्जनशील आणि संवेदनशील राहिले आहे. त्यामुळे सांस्कृतिक विकासावर भर दिला जात आहे. चित्रपट, मालिका यांच्यासह रंगमंच, लोककला, माहितीपट, जाहिरातपट यांचा मनोरंजन क्षेत्राशी संबंधित धोरणात समावेश करण्यात येणार आहे. मनोरंजन क्षेत्रास उद्योग क्षेत्राचा दर्जा देण्याबाबतही शासन सकारात्मक आहे.

- अमित देशमुख, सांस्कृतिक कार्य मंत्री

लोककला

समृद्ध गायन, वादन, नृत्य, नाट्य यांच्या सुरेख संगमातून, मराठी मातीचा गंध ल्यालेल्या विविध लोककला महाराष्ट्रात विकसित झाल्या आहेत. महाराष्ट्राच्या अर्थकारणात या लोककलांचा महत्त्वाचा वाटा आहे.

लोकगीते - महाराष्ट्रात स्त्रियांची जात्यावरची ओवीगीते, कांडपगीते, पाळणा, बाळाला जोजवण्याची गीते, अंगाई गीते, मंगळागौर, नागपंचमी, भोंडला, इ. सणासुदीची गीते, वासुदेव गीते, भजन, अभंग, पोवाडा , असे असंख्य लोकगीताचे प्रकार मौखिक परंपरेने चालत आले आहेत.

लोकनृत्ये - महाराष्ट्रात लोकनृत्याचे विपुल वैविध्य आहे. लोकनृत्ये साधारणपणे सामूहिक स्वरूपात सादर होतात व त्यांना मुख्यतः तालवाद्यांची, तसेच लोकसंगीताची साथ असते. लेझीम हा महाराष्ट्रातील प्रमुख क्रीडाप्रधान लोकनृत्य प्रकार आहे. झिम्मा, गोफ, टिपऱ्या, फुगडी, कोंबडा, आगोटापागोटा, पिंगा, इ. अनेक पारंपरिक क्रीडा-नृत्यप्रकार ग्रामीण व नागर स्त्रियांमध्ये प्रचलित आहेत. पोतराज, गजनृत्य याशिवाय, साभिनय नृत्यगायनाचे लोकप्रिय प्रकार म्हणजे 'अदा'ची लावणी तसेच फडावरची लावणी अत्यंत लोकप्रिय आहे.

गौंड, भिल्ल, कातकरी, ठाकूर, कोरकू इ. आदिवासी जमातींची लोकनृत्ये ही वैशिष्ट्यपूर्ण असून ज्या वाद्यांच्या साथीने

कातळशिल्पे

कातळशिल्पे ही धारदार हत्याराने दगडात कोरून अथवा दगडाचा काही भाग खरवडून विशिष्ट आकृती तयार होईल अशा प्रकारे निर्माण केली जातात. कोकणात संपूर्णपणे उघड्यावर असलेल्या जांभा दगडात कातळशिल्पे खोदण्यात आली आहेत. या कलाकृतीमध्ये महाकाय आकाराचा माणूस, हत्ती, कासव, मगर व अनाकलनीय आकृत्या आहेत. वर्ष २०१७-२०१८ मध्ये स्थानिक संशोधकांच्या सहकार्याने रत्नागिरी जिल्ह्यातील ५२ गावातील ९० ठिकाणांवरील १००० हून जास्त चित्रांचा शोध पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयामार्फत लावण्यात आला आहे. कशेळी येथील हत्तीचे कातळशिल्प (१६ x १३ मी.) भारतातील सर्वात मोठे कातळशिल्प असल्याचे सिद्ध झाले आहे. ही कातळ चित्रे साधारण ४० हजार वर्षांपूर्वीची किंवा त्याही आधीची असावी असे सिद्ध झाले आहे.

ती केली जातात, त्या वाद्यांच्या नावाने ती ओळखली जातात. उदा., 'ढोलाचा नाच', 'तारपीचा नाच' इत्यादी. आदिवासींमध्ये जन्म, विवाह, मृत्यू अशा प्रसंगीही नृत्ये केली जातात. 'कडकलक्ष्मी', 'भगत', 'वीर' ही धार्मिक लोकनृत्ये काही जमातींत रूढ आहेत. विदर्भात 'दंडार' हे लोकनृत्य प्रचलित आहे. सागरकिनारी भागांत कोळीनृत्याचे अनेक प्रकार रूढ आहेत. कोकणात गौरीगणपतीचा 'चेऊली नाच' 'जाखडी' (उखाणा), दहिहंडीच्या वेळी काला नृत्य केले जाते. नागर समाजात 'टिपरी' व 'गोफनृत्ये' प्रचलित असून, ती दक्षिण महाराष्ट्रात व विदर्भात कोजागिरी पौर्णिमेला, तर कोकणात गोकुळाष्टमीला केली जातात. दिंडी व काला हे धार्मिक आशय असलेले नृत्यप्रकार आहेत.

लोकनाट्य - बहुजनांच्या मनोरंजनासाठी त्यांचाच विषय घेऊन त्यांनीच सादर केलेले सहज, सुलभ नाट्य म्हणजे लोकनाट्य, अशी थोडक्यात व्याख्या करता येईल. गोंधळ, वाघ्या-मुरळीचे जागरण, भुत्ये दशावतार, तमाशा, दंडार, खडीगंमत, भारूड, सोंगी भजन, कीर्तन, कळसूत्री बाहुल्या, बहुरूपी खेळ इ. पारंपरिक लोकनाट्य प्रकार लोकप्रिय आहेत.

दृश्यात्मक कला (भित्तिचित्रे) - महाराष्ट्रात सर्वांत पुरातन चित्रकला अजिंठा लेण्यांमध्ये सापडते. अजिंठ्यामध्ये एकूण ३० बौद्धधर्मीय गुंफा (लेणी) आहेत. त्यांतून प्राचीन व पारंपरिक महाराष्ट्रीय वास्तु-शिल्प-चित्रादी कलांचे सुंदर प्रातिनिधिक दर्शन घडते. भित्तिचित्रे रंगवण्याची प्रथा १९व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत कमीअधिक प्रमाणात प्रचलित होती.

मूर्तिकला व वास्तुकला

महाराष्ट्रात इ. स. पू. सु. २०० पासून ते जवळजवळ १२व्या शतकापर्यंत मूर्तिकला ही वास्तुकलेशी निगडित होती. लेण्यांमधून ही शिल्पे कोरलेली आहेत. कार्ले, भाजे, बेडसे, जुन्नर, नाशिक, कान्हेरी, अजिंठा, वेरूळ, पितळखोरा येथील बौद्ध लेणी वेरूळ घारापुरी येथील हिंदू लेणी तसेच वेरूळ, धाराशीव येथील जैन लेणी ही महाराष्ट्राच्या वास्तुवैभवाची साक्ष देतात. भाजे येथील लेणी सर्वांत प्राचीन म्हणजे इ. स. पू. २५० या काळातील आहेत. वेरूळ येथील एका महाकाय पाषाणात खोदलेले, मुक्तपणे उभे असलेले कैलास लेणे (आठवे शतक) हा तर वास्तु-शिल्पकलेतील एक चमत्कारच आहे. त्याचप्रमाणे घारापुरीच्या लेण्यातील शिवाची तीन स्वरूपे प्रकट करणारे त्रिमूर्तीचे भव्य शिल्प मन थक्क करून टाकणारे आहे.

यानंतरची मूर्तिकला बांधीव देवळांवर दिसून येते. ११व्या शतकापासून १४व्या शतकापर्यंत चालुक्य, राष्ट्रकूट व यादव यांच्या कारकिर्दीत अनेक मंदिरे बांधली गेली. यादवकाळात हेमाडपंती वास्तुशैलीची अनेक मंदिरे बांधली गेली. शिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने पंढरपूर (विठोबा), एलिचपूर (विष्णू), कोल्हापूर (महालक्ष्मी), अमरावती (आदित्य), वहाळ (भवानी) इ. देवळांवर आढळतात. शिवाय नाशिक, त्र्यंबकेश्वर, कोकण, वऱ्हाड या भागांतील देवळेही शिल्पदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण आहेत. शिलाहारांनी बांधलेले अंबरनाथ येथील मंदिर (१०६१) व गंडरादित्याच्या कारकिर्दीतील (१११०-४०) खिद्रापूरचे (जि. कोल्हापूर) कोप्पेश्वर मंदिर, तसेच यादवांनी बांधलेले सिन्नर येथील मंदिर (सु. तेरावे शतक) या शिवमंदिरांवरील शिल्पकाम लक्षणीय आहे.

वारसास्थळे

देशातील सर्वात जास्त जागतिक वारसास्थळांचा मान असलेले महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे, ही राज्यासाठी गौरवाची बाब आहे.अजिंठा लेणी, वेरुळ

धोरण असलेले राज्य

कोणत्याही राज्याच्या विकासाचे मूल्यमापन करायचे झाल्यास सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक निकषांबरोबरच सांस्कृतिक निकषही महत्त्वाचे ठरतात. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी कला आणि संस्कृती याला महत्त्व देत स्वतंत्र विभाग केला आणि त्यांच्यामुळेच महाराष्ट्रात सांस्कृतिक विकासाला चालना मिळाली. त्यामुळे आज महाराष्ट्रात साहित्य, शिल्पकला, चित्रकला, संगीत, नाटक आणि चित्रपट यांसारख्या विविध कला बहरल्या. २०१० मध्ये महाराष्ट्राचे सांस्कृतिक धोरण निश्चित करण्यात आले. महाराष्ट्राच्या संस्कृतीची जपणुकीबरोबरच बहुआयामी, रोजगाराभिमुख महासंस्कृतीचे स्वरूप प्राप्त करून देण्यावर या धोरणात भर दिला आहे.

लेणी, घारापुरी लेणी, कासचे पठार, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसची इमारत व दक्षिण मुंबई मधील चर्चगेट आणि फोर्ट परिसरातील १९ व्या व २० व्या शतकातील व्हिक्टोरियन कलात्मक गॉथिक शैलीतील वास्तू (आर्ट डेको) यांचा युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केला आहे.

कलाशिक्षणाचे केंद्र

कलाशिक्षणाच्या क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर आहे. कलेचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यासाठी १८५७ साली मुंबईत सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टसची स्थापना झाली असून आजही ते कलाशिक्षणासाठीचे देशातील सर्वोच्च केंद्र आहे. अनेक उत्तमोत्तम कलाकार या संस्थेने देशाला दिले आहेत. कलाशिक्षणाकरिता स्वतंत्र कलासंचालनालय १९६५ मध्ये स्थापन केले. अनेक विद्यापीठांमधून तसेच खासगी संस्थांकडून चित्रकला, मूर्तिकला, उपयोजित कला या कलाविषयांचे अभ्यासक्रम चालवले जातात.

वास्तुवैभवाचे साक्षीदार

महाराष्ट्राच्या इतिहासाला जागतिक पातळीवर इथल्या गड-कोट-दुर्ग-किल्ल्यांमुळे खास ओळख मिळाली आहे. महाराष्ट्रात जमिनीवर, डोंगरावरील आणि पाण्यातील असे तिन्ही प्रकारचे गड -किल्ले आहेत. इथल्या गौरवशाली इतिहासाचे, शौर्यशाली परंपरेचे साक्षीदार बहुतांश किल्ले पश्चिम घाट किंवा सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये आहेत. इतक्या मोठ्या संख्येने किल्ले देशाच्या कोणत्याही इतर प्रांतात नाहीत. राज्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित आणि अन्य ऐतिहासिक संदर्भ असलेले किल्ले हे वर्ग एकमध्ये (संरक्षित वर्गवारीत) येतात आणि अन्य सुमारे ३०० किल्ले हे वर्ग दोनमध्ये येतात. किल्ल्यांची निगा पुरातत्त्व विभागाकडून राखण्यात येते.

पेशवे काळात मंदिरे, नदीवरील घाट, वाडे, उद्याने, कारंजी इ. प्रकारांत वास्तुनिर्मिती झाली. औरंगजेबाने औरंगाबाद येथे बांधलेली 'बिवीका मकबरा' (१६८०) ही ताजमहालची प्रतिकृती प्रसिद्ध आहे. १८व्या-१९व्या शतकांत ब्रिटिश अमलाखाली तत्कालीन पाश्चिमात्य प्रभावातून प्रबोधनकालीन व गॉथिक शैलीची वास्तुनिर्मिती महाराष्ट्रात झाली. महाराष्ट्रातील आधुनिक वास्तुकलेच्या इतिहासात मुंबई शहराचे स्थान अग्रगण्य आहे. सध्या महाराष्ट्रातील अनेक शहरांतून आधुनिक रचनातंत्रे, पूर्वरचित वास्तुघटक इत्यादींचा वापर करून आधुनिक वास्तुनिर्मिती सातत्याने होत आहे. त्याचप्रमाणे स्थानिक वास्तुसाहित्य वापरून माफक किंमतीत कलात्मक गृहनिर्मिती करणारे कल्पक वास्तुकारही अनेक आहेत.

लघुचित्रे : १५६५ ते १६२७ या काळात या राज्यातील चित्रकला परमोच्च अवस्थेला पोहोचली होती. ही चित्रकला दख्खनी कला (दक्षिणी कलम) म्हणून ओळखली जाते. अहमदनगर येथे विशेषतः संगीतातील रागांवर आधारित चित्रे रंगवली गेली. त्यांना रागमाला चित्रे असे म्हणतात. एका रागमालेत ३६ किंवा ४२ चित्रे असतात.

पोथ्या : १७व्या - १८व्या शतकांत भागवत धर्मावर काही चांगल्या चित्रमय पोथ्या महाराष्ट्रात निर्माण झाल्या. धुळे, नगर, पुणे व नागपूर येथील वस्तुसंग्रहालयांत काही चांगल्या पोथ्या आहेत. नागपूर वस्तुसंग्रहालयातील रघुजी भोसले यांच्या मूळ मालकीची श्रीमद्-भागवत ही पोथी सर्वोत्कृष्ट आहे.

चित्रकथी : कागदावर रंगवलेल्या चित्रमालिकेस अनुसरून संगीतमय कथाकथन करण्याची एक पिढीजाद परंपरा महाराष्ट्रात १७व्या शतकापासून चालत आली आहे. १८व्या शतकातील उत्तरार्धात रूढ झालेली ही चित्रकथी-परंपरा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पिंगुळी येथील ठाकर जमातीने आजतागायत सांभाळून पुढे चालू ठेवली आहे.

गंजिफा : गंजिफा म्हणजे पत्त्यांचा जोड. हे पत्ते गोल आकाराचे असतात.

चित्र आश्वासक महाराष्ट्राचे

पत्त्यांवरील चित्रे दशावतार, नवग्रह इत्यादींवर आधारलेली असतात. पत्त्याच्या कागदावर अनेक संस्कार करून तो टणक व गुळगुळीत बनवतात. त्यावर लघुचित्रण पद्धतीने चित्रे काढून, त्यावर लाख व राळ यांच्या मिश्रणाचा एक लेप दिला जातो.

असे गंजिफाचे जोड बनवणारी एक चितारी जमात सावंतवाडी (जि. सिंधुदुर्ग) येथे पिढ्यान्पिढ्या गेली २०० वर्षे काम करत आहे.

कलेची पंढरी

रंजनाच्या स्वरूपात माहिती देत आपलं उत्पादन आणि सेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणारी, पासष्टावी कला म्हणवली जाणारी जाहिरात ही कला अतिशय प्रभावीपणे आधुनिक काळात महाराष्ट्रात विकास पावली आहे. मुंबई ही जाहिरात कलेतील दिग्गजांची पंढरी म्हणून जगप्रसिद्ध आहे. शब्द, चित्र, संगीत, संवाद, नाट्य यांचा कल्पक मेळ घालून उत्तम छायाचिण, चित्रीकरण, संपादन अशा तांत्रिक गोष्टींच्या साहाय्याने जाहिरात सजवली जाते.

लाकडी कोरीव काम : १७व्या शतकाच्या उत्तरार्धापासून १९व्या शतकाच्या अखेरपर्यंत महाराष्ट्रात अतिशय उत्कृष्ट प्रतीचे लाकडी कोरीव काम झाले. नाशिक, पैठण, पुणे तसेच कोकणात सावंतवाडी, आकेरी, आचरे, कुणकेश्वर इ. ठिकाणी मंदिरांमध्ये ठिकठिकाणी लाकडी कोरीव काम आढळते.

दैनंदिन व्यवहारातील लोककला : घरातील जमिनीवर व अंगणात सुंदर अलंकारिक रांगोळी काढण्याची परंपरा महाराष्ट्रात कित्येक पिढ्या चालत आली आहे.

वारली चित्रकला: ठाणे जिल्ह्यामध्ये डहाणूजवळच्या डोंगराळ भागात वारली या आदिवासी जमातीची वस्ती आहे. या जमातीत अद्यापही विधिप्रसंगी वधू-वराच्या

झोपडीवर सर्व बाजूंनी चित्रे काढली जातात. पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या संकेतांनुसार ही चित्रे काढली जातात. वारली जमातीच्या चित्रांत त्यांनी पाहिलेल्या व अनुभवलेल्या अनेक घटना बारकाव्यांसह चित्रित केलेल्या असतात.

संगीत नाटक, भावगीत व चित्रपट : संगीत नाटक, भावगीत गायन आणि चित्रपट या आधुनिक काळातील खास महाराष्ट्राच्या अशा दृकश्राव्य कला.

मराठी संगीत नाटक : संगीत नाटक ही मराठी रंगभूमीची भारतीय रंगभूमीलाच नव्हे तर एक प्रकारे जागतिक रंगभूमीला दिलेली एक देण आहे. इ.स. १८४३ साली सांगलीला विष्णुदास भावे यांनी मराठी संगीत नाटकाचे रोपटे लावले. ते रोपटे बलवंत पांडुरंग अर्थात अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी खऱ्या अर्थाने रुजवले. त्यानंतर गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, राम गणेश गडकरी या नाट्य लेखकांनी मराठी संगीत नाटक रुजवण्यास मोलाचे योगदान दिले. नाट्य पंढरीच्या वारकऱ्यांचा वार्षिक आनंदसोहळा म्हणून मराठी नाट्य संमेलन भरवण्याची परंपरा १९०५ पासून महाराष्ट्रात सुरू झाली असून ही परंपरा शतकाच्या उंबरठ्यावर आहे. त्याला अनुदानाच्या रूपात राज्य शासनाचे भरीव आर्थिक पाठबळ आहे.

भावगीत : १९१५ ते १९५० हा कालखंड महाराष्ट्राच्या संगीतविषयक अस्सल निर्मितीचा काळ होता. महाराष्ट्रात भावगीत-गायनाची कला याच काळात बहरली. अर्थपूर्ण, भावनांनी ओथंबलेले काव्य आणि त्याला लावलेली गुणगुणावीशी वाटणारी चाल, हे भावगीतांचे वैशिष्ट्य.

चित्रपट : भारतीय चित्रपटसृष्टीची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात उभारली गेली. दादासाहेब तोरणे यांच्या 'भक्त पुंडलिक' या भारतातील पहिल्या चित्रपटाने भारतीय चित्रपट सृष्टीचा पाया रचला तर दादासाहेब फाळके यांनी भारतीय चित्रपटसृष्टीचा खऱ्या अर्थाने विस्तार केला. दादासाहेब फाळके यांनी १९११ साली 'राजा हरिश्चंद्र' या भारतीय सिने इतिहासातील पहिल्या चित्रपटाचे चित्रीकरण येथेच केले. बाबुराव पेंटर, व्ही. शांताराम, भालजी पेंढारकर या मराठी दिग्दर्शकांनी भारतीय सिनेमांची वाट अधिकच सुकर केली. १९३१ साली बोलक्या चित्रपटाचे आगमन होईपर्यंत मुंबईच भारतीय सिनेसृष्टीचा केंद्रबिंदू होती, पण तिच्याबरोबरच पुणे, खडकी, कोल्हापूर, नाशिक या गावीही चित्रीकरणाचे काम सुरू होते.

२०व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात मुंबईतील चित्रपट व्यवसायाची भरभराट झाली. अनेक चित्रपट कंपन्या अस्तित्वात आल्या. सुरुवातीपासूनच व्यवसाय आणि कला म्हणूनही भारतीय चित्रपट व्यवसायाचा जो विकास झाला, त्यात महाराष्ट्राचा महत्त्वाचा वाटा आहे. मराठी चित्रपटांची विविधता, आशय आणि दर्जा हा नेहमीच आगळा वेगळा राहिलेला आहे. पौराणिक, सामाजिक, ऐतिहासिक, कौटुंबिक, विनोदी, राजकीय, अशा आशयाच्या मराठी चित्रपटानी भारतीय चित्रपटसृष्टी समृद्ध केली आहे. आजपर्यंत ६६ मराठी चित्रपटांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत, यातील ५ मराठी चित्रपटांना सर्वोच्च सुवर्ण कमळ पुरस्कार मिळाला आहे, तर पुरस्काराच्या विविध श्रेणीमध्ये मराठी चित्रपटाने आजपर्यंत १८३ राष्ट्रीय पुरस्कार मिळविले आहेत. श्वास, हरिश्चंद्राची फॅक्टरी व कोर्ट या तीन मराठी चित्रपटांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील अत्यंत प्रतिष्ठेच्या अशा ऑस्कर पुरस्कारांमध्ये नामांकन मिळाले आहे.

तृतीय रत्न

महात्मा फुले यांच्या 'तृतीय रत्न' नाटकाच्या लेखनापासून दलित रंगभूमीची पायाभरणी झाली. पुढे त्यातूनच छत्रपती शाहू महाराजकालीन सत्यशोधक जलसे आले. सत्यशोधक जलसे शेतकऱ्यांच्या प्रश्नाबरोबरच जातीयतेचा, अस्पृश्यतेचा, अंधश्रद्धेच्या प्रश्नाचे ही चित्रण करत होते. आंबेडकरी दलित रंगभूमी हीदेखील दलित समजाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक पुनर्रचनेसाठी उत्प्रेरक ठरली आहे. याची सुरुवात आंबेडकरी संमेलनातून होऊन टप्प्याटप्प्याने लोकनाट्य, पथनाट्य यातून प्रगत झाली. आंबेडकरी जलसे दलित रंगभूमीची दुसरी पायरी आहे. यात आंबेडकरी विचारांचे प्रतिबिंब दिसते.

वैभवशाली परंपरेचे पाईक

१ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्य स्थापन होताच यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या साहित्य, कलाप्रेमी नेतृत्वाकडे राज्याची धुरा आली आणि महाराष्ट्रात सांस्कृतिक क्षेत्राला खऱ्या अर्थाने शासकीय प्रोत्साहन मिळू लागले.

कला, संगीत, नाट्य, सिनेमा आदी

ठळक बाबी

- महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण हे अतिशय कलाप्रेमी होते. त्यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली राज्याच्या सांस्कृतिक क्षेत्राची पायाभरणी झाली. राज्य नाट्यस्पर्धा, मराठी चित्रपट महोत्सव, विविध कलांचे महोत्सव, शिबिरे अशा अनेक प्रकारे कला आणि कलाकारांचे जतन - संवर्धन सुरू करण्यात आले.
- सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित करण्यात येणारी राज्य नाट्यस्पर्धा, हा राज्यातील संस्कृतीत क्षेत्राचा मानबिंदू ठरला आहे. हौशी रंगकर्मींसाठी दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या राज्य नाट्यस्पर्धेचे यंदाचे साठावे वर्ष असून, गेली सहा दशके सातत्य राखून असलेली ही देशातीलच नव्हे तर संपूर्ण जगातील एकमात्र अशी स्पर्धा आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. गेल्या ६० वर्षांत राज्य नाट्यस्पर्धेचा हौशी, हिंदी, संगीत, संस्कृत, बाल, व्यावसायिक आणि दिव्यांग असा विस्तार होत गेला. दरवर्षी सुमारे दहा हजार रंगकर्मी या स्पर्धांच्या निमित्ताने रंगभूमीवर कार्यरत असतात.
- तमाशा, लावणी, खडीगंमत, दशावतार, कीर्तन या कलाप्रकारांना राज्य शासनातर्फे भांडवली आणि प्रयोग अनुदान देण्यात येत असल्यामुळे, काहीशा मागे पडत चाललेल्या या कलाप्रकारांना पुन्हा एकदा ऊर्जितावस्था आली आहे.'तसेच या कला प्रकारांची प्रशिक्षण शिबिरे आणि महोत्सव आयोजित करून शासनाकडून कलाकारांना व्यासपीठ दिले जात आहे. शासनाचे पाठबळ तर आहे, पण रसिकांनीही या कलांना पुरेसा प्रतिसाद देणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी कलाकारांनी आपल्या सादरीकरणात काही बदल घडवून आणणे व प्रेक्षक आणि त्यांच्यातील दरी सांधणे आवश्यक आहे.
- राज्याच्या स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त २०१० मध्ये राज्याचे सांस्कृतिक धोरण जाहीर करण्यात आले. कला, साहित्य, संस्कृती अशा विविध क्षेत्रातील अतिशय ज्येष्ठ आणि तज्ज्ञ मान्यवरांचा धोरण मसुदा समितीत समावेश होता. त्यांनी राज्याच्या पुढील २५ वर्षांचा विचार करून भाषा, कला आणि संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी विविध उपाययोजना सुचवल्या होत्या. या धोरणातील बाबींची तत्काळ अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने पावले उचलली गेली आणि त्याचेच फलित म्हणून राज्याला सुवर्णमहोत्सवी वर्षात राज्यभाषा मराठीसाठी स्वतंत्र विभाग मिळाला.
- राज्यातील लुप्त होणाऱ्या लोककलांचे जतन व संवर्धन करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प अलीकडेच सांस्कृतिक कार्य संचालनालयाने हाती घेतला होता, तो आता अंतिम टप्प्यात आहे. राज्यातील नऊ विद्यापीठांमार्फत राज्याच्या विविध भागातील सुमारे दोनशे लुप्त होणारे कलाप्रकार, कलाकार, वाद्य यांचे दृकश्राव्य चित्रीकरण करण्यात आले आहे. हा ठेवा लवकरच यु-ट्यूब वाहिनीच्या माध्यमातून व पुस्तकरूपाने उपलब्ध करून दिला जाणार आहे.

क्षेत्रांना प्रोत्साहन देणे, कल्याणकारी उपक्रम राबवणे यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग अस्तितवात आला. राज्यातील चित्रपट, नाटक, लोककला या क्षेत्रांसाठी अनुदान देण्याच्या योजना विभागाने सुरू केल्या. सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून सांस्कृतिक क्षेत्रातील प्रतिभांचा वारसा वृद्धिंगत करण्याचे, गौरवशाली इतिहास असणाऱ्या महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा येणाऱ्या काळात अधिकाधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न होत आहे.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार, ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार, गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार, नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार, संगीताचार्य कै. बळवंत पांडुरंग तथा अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार, राज्य सांस्कृतिक पुरस्कार, राज कपूर जीवन गौरव पुरस्कार व विशेष योगदान पुरस्कार, व्ही. शांताराम जीवन गौरव व विशेष योगदान पुरस्कार, तमाशा सम्राज्ञी कै. विठाबाई नारायणगांवकर जीवन गौरव पुरस्कार, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत पुरस्कार असे विविध पुरस्कार सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून देण्यात येतात. महाराष्ट्रातील सांस्कृतिक अंगाची लोकांना माहिती व्हावी, भावनात्मक ऐक्य निर्माण व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनांतर्गत राज्य नाट्य महोत्सव, राज्य चित्रपट महोत्सव याबरोबरच संगीत, नृत्य, लोककला इत्यादी विविध कला महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. नाट्य, तमाशा, बालनाट्य प्रशिक्षण, कीर्तन व शाहिरी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येतात. याशिवाय आर्थिक स्थिती चांगली नसलेल्या वृद्ध व अपंग कलाकारांना आर्थिक मदत, सांस्कृतिक कार्य करत असलेल्या संस्थांना अनुदान देण्यात येते. सांस्कृतिक संचालनालयामार्फत राज्यभरात घेण्यात येणाऱ्या नाट्यस्पर्धा यामुळे अनेक कलाकार महाराष्ट्रात घडले तर मराठी सिनेमांना देण्यात येणाऱ्या अनुदानामुळे मराठीतही आशय असलेले, सामाजिक संदेश देणारे सिनेमे निर्माण होऊ लागले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची जाण ठेवत गेल्या ६० वर्षांतील विविध नेतृत्वांनी कला आणि कलाकारांचे जतन, संवर्धनाची भूमिका कायम ठेवली आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्राचा आलेख सतत उंचावत राहिला आहे आणि यापुढेही राहील.

संदर्भ : मराठी विश्वकोश, लोकराज्य, शासन निर्णय, डॉ. गणेश चंदनशिवे, विभागप्रमुख, लोककला अकादमी, मुंबई विद्यापीठ

सह-संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय

पर्यावरण : वसुंधरेसाठी अभियान

गेल्या ६० वर्षात राज्याने जगाशी गती जुळवताना आपली प्रगती साध्य केली आहे. पर्यावरण ऱ्हास हा जागतिक मुद्दाही महाराष्ट्राने आपल्या पद्धतीने हाताळला आहे. सध्याचे मंत्री आदित्य ठाकरे पर्यावरण बदलाच्या या विषयाकडे अधिक गांभीर्याने पाहत असून त्यांच्याच कल्पनेतून आलेल्या प्लास्टिकबंदीसारख्या उपक्रमांना राज्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे. शाश्वत विकासाचा मार्ग हवा असेल तर पर्यावरण जपणुकीशिवाय पर्याय नाही आणि ही केवळ शासनाची जबाबदारी नसून तो लोकचळवळीचा विषय बनला पाहिजे, याकडे विशेषत्वाने लक्ष दिले जात आहे.

सचिन अडसूळ

महाराष्ट्र लोकसंख्येमध्ये देशात दुसरे तर क्षेत्रफळाच्या दृष्टीने तिसरे मोठे राज्य आहे. राज्यातील ४५.२ टक्के जनता शहरात राहते. उष्ण कटिबंधीय मोसमात येत असलेल्या या राज्यात मोठ्या प्रमाणात लाभलेले वनक्षेत्र, समुद्रकिनारे, नद्या व डोंगराळ प्रदेश राज्याची विशेष ओळख निर्माण करतात. उत्तम पायाभूत सुविधा, तंत्रज्ञानातील प्रगती, कुशल मनुष्यबळ आणि नैसिर्गक साधनसंपत्तीच्या उपलब्धतेमुळे राज्य गुंतवणूकदारांसाठी कायमच पसंतीचे राहिले आहे. देशाची अर्थिक राजधानी असलेल्या राज्यात मुबलक संसाधनांमधील वाढ, शहरी लोकसंख्या, दळणवळणाच्या वाढत्या सोयी-सुविधा यामुळे पर्यावरण हा कळीचा मुद्दा ठरला आहे. गेल्या जनगणनेनुसार राज्यात दीड कोटी लोकसंख्या तर दीडशेहून अधिक शहरे वाढली. त्याबरोबर वीज वापरातही ४४०४२ दश लक्ष किलोवॅट तास वाढ नोंदवली गेली. रेल्वे मार्ग २१६ कि.मी. व रस्ते जवळपास ६० हजार कि.मी. वाढले. अशा बदलांचा पर्यावरणावर परिणाम होत असतोच. त्यामुळे पर्यावरण संवर्धन आणि यातून पुढे पर्यावरण व्यवस्थापनाची यशस्वी अंमलबजावणी करून राज्य शुद्ध हवा, स्वच्छ पाणी, निरोगी सजीवसृष्टी, कसदार जमीन, हिरवाकंच परिसर व सुंदर समुद्र किनारे निर्माण करण्यासाठी वाटचाल करत आहे.

जल, जमीन, हवा या भौतिक घटकांनी मिळून तयार झालेल्या वातावरणाला आपण पर्यावरण असे म्हणतो. यामध्ये नैसर्गिक व मानवनिर्मित अनेक घटक असून जैविक व अजैविक घटकांनी मिळून पर्यावरण तयार झाले आहे. यातच जल, जमीन व हवा यातून सजीवसृष्टी निर्माण झाली असून पर्यावरणात सतत शिलावरण, जलावरण, जिवावरण व वातावरणामध्ये प्रक्रिया व आंतरक्रिया सुरू असतात.

निसर्ग ही स्वत:हून निर्माण झालेली पर्यावरण चक्रातील एक कलाकृती आहे. निसर्ग आहे म्हणून मनुष्याचे अस्तित्व आहे. त्यामुळे पर्यावरण सुरक्षित राहण्यासाठी आपण त्याच्याकडून जेवढे घेत आहोत त्यापेक्षा जास्त देणे गरजेचे आहे. आज

जमिनीचे रूपांतर धुळीत होण्यापासून वाचवणे, हवा प्रदूषित होऊ नये यासाठी प्रयत्न करणे, पाण्याचे स्रोत, समुद्रकिनारे स्वच्छ ठेवणे, वन सुरक्षित ठेवणे आवश्यक झाले आहे. आपले घरही नैसर्गिक हवे, असे कित्येक विचारवंतांनी मत मांडलेले आहे. म्हणजे निसर्गातील आहे त्या सुविधांचा वापर करून जगणे असा अर्थ आहे. म्हणजेच आपण कमीत कमी पर्यावरणाचा ऱ्हास करणे या ठिकाणी आवश्यक आहे. वातावरणात पृथ्वी असा एक ग्रह आहे त्यावर मोठ्या प्रमाणात नैसर्गिक संसाधने उपलब्ध आहेत. वाढती लोकसंख्या आणि त्यांच्या गरजांमुळे मुबलक असणारी ही साधनसंपत्ती कमी पडून नवीन भौतिक संसाधनांच्या निर्मितीमुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे. यातूनच पर्यावरण व्यवस्थापनाला महत्त्व प्राप्त झाले असून कमीत कमी पर्यावरणाचा ऱ्हास आणि विकास ही संकल्पना राज्यात स्वीकारली जात आहे.

संवर्धनासाठी पावले

आजही पर्यावरणात स्तिमित करणारे असंख्य अलंकार आहेत. त्यांना भविष्यातही नैसर्गिक स्वरूपात सुस्थितीत ठेवणे आपले आद्य कर्तव्य आहे. पुढील पिढीला त्यांच्या संवर्धन करण्याच्या पद्धतीसह, आहे त्या सुंदर स्थितीत सोपवणे गरजेचे आहे. त्यासाठी जल, जंगल, जमीन, हवा यांचे संरक्षण करणे व त्यामध्ये सुधारणा करणे यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. २०१७ मध्ये राज्याचे वातावरणीय बदल अनुकूलन धोरण तयार केले आहे. पृथ्वीच्या गेल्या ३० वर्षांतील तापमानातील ०.८ टक्के वाढ व त्यामुळे समुद्र पातळीतील झालेली २३ सें.मी. वाढ संपूर्ण सजीवसृष्टीला धोक्याची असल्याचे समोर आले आहे. या तापमान वाढीमुळे मुख्यत: पर्जन्यवृष्टी, मानवी आरोग्य, वन्यजीव, वने, वन्य जैवविविधता, शेती, मानवी राहणीमान, उपजीविकेची साधने इत्यादींवर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. भविष्यातील पर्यावरणीय बदल लक्षात घेऊन पर्यावरणीय परिस्थितीला तोंड देणे, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करणे, पर्यायी उपाययोजना राबवणे याबाबत मार्गदर्शक सूचना शासनाकडून देण्यात येत आहेत.

प्लास्टिकमुक्तीचा निर्धार

महाराष्ट्र प्रगतिशील आणि पुरोगामी राज्य आहे. पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागाचा महाराष्ट्र सिंगल युज प्लास्टिकमुक्त करण्याचा निर्धार आहे. महाराष्ट्रातील वाढती प्रदूषणाची पातळी कमी करण्यावर भर देत असताना निर्सगाशी संबंधित पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या पंचतत्त्वांवर विभाग काम करत आहे. हे करत असताना नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जनजागृती आणि प्रबोधन करण्यावर अधिकाधिक भर देण्यात येत आहे.

- संजय बनसोडे, पर्यावरण व वातावरणीय बदल, राज्यमंत्री

चित्र आश्वासक महाराष्ट्राचे

पर्यावरणाचा ऱ्हास करून होणारी प्रगती मान्य नसल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी नुकतेच जाहीर केले. यातून सर्वस्तरांवर पर्यावरणाचे महत्त्व पटवून देणारा निर्णय समोर येतो. संपूर्ण महाराष्ट्रात सिंगल युज प्लास्टिक बंद करण्याचा निर्णय पर्यावरण मंत्र्यांनी घेतला आहे. प्लास्टिक बंदीमुळे पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. महामार्गाच्या कामात अडथळा आणणारा सांगली जिल्ह्यातील ४०० वर्षांपूर्वीचा वटवृक्ष वाचवण्याचा निर्णयही पयार्वरण संवर्धनाकडे नेणारा महत्त्वपूर्ण घटक मानला पाहिजे.

पर्यावरणविषयक निर्णय

वृक्ष संरक्षण व जतनासंदर्भात कायद्याचे नियमन नगरविकास विभागाऐवजी पर्यावरण विभागामार्फत करण्यास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाचे नाव बदलून पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग असे करण्यात आले आहे. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग हा निसर्गाशी संबंधित पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या पंचतत्त्वांवर कार्य करेल, अशी घोषणा पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे आणि राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून केली. जनजागृती व शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे जनमानसात त्यांच्या कृतीद्वारे भवताल अधिक समृद्ध करण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. निसर्गाशी असलेली संलग्नता निश्चित करण्यासाठी या वर्षी विभागामार्फत

१०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. राज्याचा समृद्ध वारसा आणि पर्यावरण जतनासाठी कटिबद्ध आहोत याची सुरुवात जणू त्या घटनेने दाखवून दिली. युनायटेड नेशन्स एनव्हायरमेंट प्रोग्रामने (यूएनईपी) जागतिक पर्यावरण दिन २०२० ची संकल्पना Time For Nature अशी निश्चित केली असून त्या अनुषंगाने विभागाने राज्य शासनाच्या इतर संबंधित विभागांसह वातावरणीय बदलांबाबत उपाययोजना करत निसर्गपूरक जीवनपद्धतीसाठी कृती आराखडे तयार केले आहेत.

पृथ्वी तत्त्वाशी संबंधित वनीकरण, वनसंवर्धन, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन तसेच जमिनीचे धुपीकरण आदी बाबींवर हा विभाग कार्य करेल. तसेच हवेच्या गुणवत्तेसाठी हा विभाग उद्योग, परिवहन व इतर विभागांच्या सहकार्याने वायू प्रदूषण कमी करून महाराष्ट्रातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न करून वायू तत्त्वाचे संरक्षण करेल. तसेच जल तत्त्वाशी संबंधित नदी संवर्धनाच्या सद्य:स्थितील चालू कामांसह सागरी जैवविविधता, जलस्रोतांचे संवर्धन व संरक्षण तसेच सागरीकिनारे यांची स्वच्छता यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. अग्नी तत्त्वाशी संबंधित ऊर्जास्रोत म्हणून अन्य विभागांसह कार्य करत ऊर्जाचा परिणामकारक वापर, ऊर्जा बचत तसेच ऊर्जेचा अपव्यय टाळणे या बाबींना प्रोत्साहन देत, अपारंपरिक ऊर्जेच्या निर्मितीसाठी नावीन्यपूर्ण उपक्रमांचा यात अंतर्भाव आहे. महामार्गाच्या दुतर्फा असलेल्या जागा, पडीक जमिनी, शेतांचे बांध यांसारख्या जागांवर उपक्रम राबवले जाणार आहेत. वातावरणीय बदलाच्या अनुषंगाने राज्यातील प्रत्येक पर्यावरण क्षेत्राचे संवर्धन करून शाश्वत विकासावर भर देण्यात आला आहे. याअनुषंगाने पर्यावरण संवर्धनावर विशेष लक्ष देण्यात येत आहे. कांदळवनाचे संरक्षण हा त्या दृष्टीने फार महत्त्वाचा निर्णय आहे. राज्यातील कांदळवनासाठी संरक्षित झालेल्या आणि न झालेल्या क्षेत्राचे सर्वेक्षण केले जात आहे.



विदर्भातील काही जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणात कोळसा खाणी आणि औष्णिक वीज निर्मिती केंद्रे आहेत. संवेदनशील वन क्षेत्रात येणाऱ्या कोळसा खाणींचा लिलाव न करता तेथील वनसंपदा आणि पर्यावरण जपावे यासाठी पर्यावरण विभागामार्फत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. त्यातील काही कोळसा खाणींचा लिलाव रद्द करण्यात यश आले आहे. याबरोबरच राज्यातील सर्व औष्णिक वीज निर्मिती केंद्रातून होणाऱ्या प्रदूषणाला नियंत्रित करण्यासाठी नियोजन केले जात आहे. यामध्ये वीज केंद्रांचाही समावेश आहे. याच धर्तीवर एमआयडीसी, सार्वजनिक बांधकाम विभागाबरोबर समन्वय करून उद्योगांमधून होणारे प्रदूषण, सांडपाणी व्यवस्थापन तसेच रस्ते आणि इतर बाबींतून निर्माण होणाऱ्या धुळीसारख्या प्रदूषण नियंत्रणासाठीही कार्यवाही केली जात आहे. १९८८ ला राष्ट्रीय वननीती ठरवण्यात आल्यानंतर देशातील वनांचे प्रमाण ३३ टक्क्यांवर वाढवण्याचे उद्दिष्ट ठरवले आहे. यामध्ये राज्य शासन त्या वनांच्या सुरक्षेबरोबर त्यामध्ये प्रत्यक्ष वाढ कशी करता येईल, यासाठी अंमलबजावणी करत आहे.

इतर महत्त्वाचे निर्णय

- माझी वसुंधरा अभियान
- सामूहिक पातळीवर ठोस वृक्षारोपण, वनीकरण कार्यक्रम राबवण्यासाठी ३५० कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद
- वणवा प्रतिबंधक करण्यासाठी उपाययोजना, गॅस वाटप, जलसंधारण यासाठी नवीकरण निधी व्यवस्थापन प्राधिकरण (कॅम्पा) अंतर्गत १५१ कोटी रुपयांची तरतूद
- वनातील आग प्रतिबंधक उपाययोजनेसाठी कार्यक्रम
- नगर वन उद्यान योजनेचा विस्तार करण्याचा निर्णय
- हरित महाराष्ट्र अभियान व वन महोत्सवाचे आयोजन
- 'सफेद चिप्पी' महाराष्ट्र राज्य कांदवळन वृक्ष म्हणून घोषित
- आंग्रीया पठाराला नियुक्त क्षेत्र म्हणून अधिसूचित करण्याची शिफारस

आव्हाने

वाढत्या लोकसंख्येमुळे मोठ्या प्रमाणात गरजांची निर्मिती होत असते. मग त्या पुरवण्यासाठी भौतिक सुविधांची निर्मितीही करणे गरजेचे राहते. यामध्ये निवारा, दळणवळण तसेच उद्योग अशा अनेक घटकांचा समावेश येतो. यातून कळत-नकळत मोठ्या प्रमाणात पर्यावरणावर परिणाम होतो. यामधून भरून न येणारी पर्यावरणाची हानी व नुकसान पाहायला मिळते. पर्यावरणाचे

महत्त्व लक्षात घेऊन आपली जीवनशैलीच बदलणे आज गरजेचे झाले आहे. लोकसंख्येची वाढ, त्यामुळे वाढणाऱ्या गाड्यांची संख्या, औद्योगिक क्षेत्र यामुळे प्रदूषणातही वाढ होत आहे. यात जमीन, जल, वायू व ध्वनी प्रदूषण यांचा समावेश होतो.

वनक्षेत्रही विकास प्रक्रियेत काही प्रमाणात कमी होत आहे. देशात वनांचे प्रमाण ३३ टक्क्यांपर्यंत वाढवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. भारत वन स्थिती अहवाल २०१९ (आयएसएफआर) नुसार सध्या महाराष्ट्रात अत्यंत घनदाट जंगल ८७२०.५३ चौ.कि.मी. (२.८३ टक्के), मध्यम दाट जंगल २०५७२.३५ चौ. कि.मी.(६.६९ टक्के) व विरळ जंगल २१४८४.६८ चौ.कि.मी. (६.९८ टक्के) असे एकूण ५०७७७.५६ चौ. कि.मी. (१६.५० टक्के) निव्वळ जंगल आहे. एकूण भौगोलिक क्षेत्राच्या तुलनेत संपूर्ण देशात २१.६७ टक्के वनांनी व्यापलेले क्षेत्र असून राज्यात तीच टक्केवारी १६.५० टक्के आहे. देशासह सर्व राज्यांमध्ये त्याचे प्रमाण ३३ टक्के करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. २०१७ च्या आयएसएफआर अहवालानूसार राज्यात ९५.५६ चौ. कि.मी. क्षेत्राची वाढ नोंदवली गेली. यामध्ये सर्वात जास्त वाढ सिंधुदुर्ग जिल्हा व इतर कोकण पट्ट्यातील आहे. ही वाढ फळबागांमधील वृक्षांच्या समावेशाने झाल्याचे वन विभागाने सांगितले.

ग्लोबल वार्मिंगचे परिणाम रोखताना मनुष्याला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. कित्येक पैसा त्यासाठी खर्च करावा लागतो. मनुष्यहानी होत तर आहेच याशिवाय जमीन खचणे, रोगराई पसरणे, अतिवृष्टी, दुष्काळ, प्रदूषणामुळे होणारा त्रास, मनुष्य-वन्यजीव संघर्ष अशा अनेक बाबींना सामोरे जावे लागत आहे. आपण आजच्या धावपळीच्या जगात दरवर्षी कॅलेंडर बदलतो मात्र आपण आपल्या दिनचर्येतही काही बदल करणे गरजेचे आहेत. वर्ष बदलत आहेत, कॅलेंडर बदलत आहेत, परंतु पर्यावरणाशी संबंधित योगदान आपल्या दिनचर्येत समाविष्ट करत नाही. आपण पर्यावरणातून घेताना देणेही शिकले पाहिजे. आपण विकास संकल्पना राबवत असताना प्रदुषणही वाढवत असतो, कचरा व जमिनीचा ऱ्हासही या वेळी होतो. मग नैसर्गिक संसाधने, ऊर्जा व जैवविविधता काही प्रमाणात कमी होत आहे. यासाठी होणाऱ्या हानीचा अंदाज घेऊन यातील मध्यम मार्ग शोधणे जागतिक आव्हान झाले आहे.

काही पर्यावरणविषयक अभ्यासकांच्या मते मेळघाट तसेच चंद्रपूर, गडचिरोलीसह सर्व विदर्भातील पर्यावरण आणि वनसंपत्ती यापुढे संरक्षित करणे आवश्यक आहे. जंगलांचा संबंध हिरवेपणाशी नसून अगदी कुपोषणासारख्या समस्येवरही जंगलच महत्त्वाचे आहे असेही ते म्हणतात. प्रत्यक्ष जे मोठ्या प्रमाणात लाभ घेतात त्या सामान्य माणसांनीच पर्यावरणासाठी प्रत्यक्ष जमिनीवर कार्य करणे गरजेचे आहे. पर्यावरणाची काळजी शासनाबरोबर सर्वसामान्यांनी करावी. प्रत्येकाने आपल्या आजूबाजूच्या १०० फूट जागेची जरी पर्यावरण व्यवस्थापनासाठी जबाबदारी घेतली तरी पर्यावरण संवर्धन निश्चित यशस्वी होईल, असे काही पर्यावरण अभ्यासकांचे म्हणणे आहे. अलीकडील काळात राज्य शासनाने पर्यावरणविषयक अतिशय सकारात्मक निर्णय तसेच वनांबाबत धोरणे स्वीकारलेली आहेत याचे स्वागत पर्यावरण अभ्यासकांमध्येही होताना दिसतेय. विकासाचा ताण एकीकडे वाढत असतानाच आरेतील कारशेडचा प्रश्न असो, खारफुटी वाढवण्याच्या अनुषंगाने ताब्यात घेतलेली जमीन असो, त्यामुळे राज्याने या महत्त्वपूर्ण विषयाकडे आपण किती गांभीर्याने बघतो हे घेतलेल्या निर्णयातून दाखवून दिले आहे. याबाबत सर्व स्तरांवरून पर्यावरणविषयक घेतलेल्या निर्णयांचे स्वागत होताना दिसत आहे.

नियोजन व त्याचे महत्त्व

विकास प्रक्रियेत भौतिक सुविधांची निर्मिती करत असताना कळत नकळत होणारे पर्यावरणाचे नुकसान व हानी कमीत कमी करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचा अभ्यास करून, लोकांमध्ये त्याबाबतचे महत्त्व पटवून पर्यावरणीय समस्यांचे निराकारण करणे गरजेचे आहे. औद्योगिक क्रांती, विकास व अर्थकारण करत असताना राज्यात पर्यावरणीय विचार रुजवले जात आहेत. जनजागृती करून कमीतकमी पर्यावरणाची हानी होईल यासाठी प्रयत्न केले जात आहे.

पर्यावरण प्रभाव मूल्यांकन धोरणानुसार

राज्यात कोणत्याही नवीन कामाच्या ठिकाणी, औद्योगिक वसाहतीच्या ठिकाणी जलस्रोत, झाडे, जंगले आहेत का याचा विचार तसेच अभ्यास करून, दुष्परिणामांची पडताळणी केली जात आहे. यातून पर्यावरणाचे कमीत कमी नुकसान होऊन विकासाची सांगड घालून योग्य व मधला पर्याय दिला जात आहे. समुद्राची वाढणारी पातळी, हवेचे प्रदूषण, जमिनीचा कमी होत असलेला कस तसेच जंगलतोड यावरच्या उपाययोजनांसाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे.

उपाययोजना

वने : मनुष्यप्राणी प्राणवायूशिवाय जगू शकत नाही. ऑक्सिजन हा प्राणवायू निव्वळ झाडांपासून मिळतो. तसेच आपल्या पर्यावरणातील तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी वने महत्त्वाची आहेत. यासाठी 'माझे जंगल माझे पाणी' ही संकल्पना जनमानसात रुजवणे, लोकसहभागातून वन संवर्धन, जंगलांवरील ताण कमी करून उपजीविकेच्या साधनांमध्ये वैविध्य निर्माण करणे, नदीच्या उगम स्थानाजवळील जंगल सुरक्षित करणे जेणेकरून बारमाही नदी वाहती राहील, कुन्हाडबंदी राबवणे, संयुक्त वन व्यवस्थापन समित्या कार्यरत करणे, वन वे रोखणे इ.द्वारे प्रयत्न केले जात आहेत.

जल : नदी व इतर जलाशयांचे पुनरुज्जीवन करणे, धरण व्यवस्थापनात धरणाखालील पाण्याचा प्रवाह अखंड सुरू राहण्यासाठी प्रयत्न करणे व नदीवर अवलंबून असणाऱ्या जीवसृष्टीचे संवर्धन करणे, सिंचनासाठी लागणाऱ्या पाण्याचे व्यवस्थापन करणे, नदीमार्गावरील जलस्रोतांचे जतन करणे व त्या ठिकाणी वनीकरण करणे, नदीकाठावरील गावांना पूरस्थितीचा संदेश देणारी यंत्रणा विकसित करणे, सांडपाणी व्यवस्थापनांतर्गत, पुनर्वापर सुरू करणे अशा उपाययोजना राबवण्यात येत आहेत. समुद्रकिनारे सुरक्षित व स्वच्छ करणे, खारफुटी जंगल संवर्धन करून त्यापासून समुद्र जीवसृष्टीसाठी पोषक अन्नप्रक्रिया चक्र अबाधित ठेवणे, सरोवर संवर्धन योजनेची यशस्वी अंमलबजावणी करणे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत २५० ठिकाणांचे राष्ट्रीय जल गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रमांतर्गत सर्वेक्षण केले जाते. ज्यामध्ये भूपृष्ठावरील पाण्याचे नमुने घेतले जातात. १५६ नद्यांचे, ३४ समुद्र किनारे/खाड्यांचे, १० नाल्यांचे नमुने घेवून पृथ्थक्करण केल्यानंतर गुणवत्ता निश्चित केली जाते. तसेच भूपृष्ठाखालील नमुन्यांचेदेखील संकलन करून गुणवत्ता तपासली जाते. ज्यामध्ये ५० ठिकाणांचा समावेश आहे. सदर राष्ट्रीय जल गुणवत्ता कार्यक्रम हा जागतिक पर्यावरण संनियंत्रण पद्धतीनुसार व भारत देशातील जल साधनसंपत्ती सनियंत्रण कार्यक्रमांतर्गत राबवला जातो. या कार्यक्रमांतर्गत भूपृष्ठावरील पाण्याचे नमुने दरमहा घेतले जातात. पाण्याची गुणवत्ता अनेक कारणांमुळे खालावली जाते. पर्जन्य दर, पावसाळ्यामुळे होणारी सौम्यता, उन्हाळ्यामध्ये जास्तीचे बाष्पीभवन व पाण्याचा वापर, मानवनिर्मित उद्योगधंदे व इतर उपक्रमांमुळे होणारे प्रदूषण, पाण्याच्या जलस्रोतातील प्रवाहदर इत्यादी आढळून येतात. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे एकाच ठिकाणाच्या जलगुणवत्तेमध्ये अनेक चढ-उतार ऋतुमानाप्रमाणे दिसून येतात. महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्रधिकरणामार्फत सीआरझेड अधिसूचना २०१९ अंतर्गत व्यवस्थापन करण्यात येत आहे. जल प्रणाली व सागरी सुरक्षिततेसाठी हे प्राधिकरण कार्य करत आहे.

जमीन : जमिनीचे प्रदूषण म्हणजे मातीची गुणवत्ता कमी होणे, जमीन दूषित व वापरण्याअयोग्य होणे होय. खते, कीटकनाशके, कारखान्यातील रासायने, कचरा, अयोग्य व घातक सिंचन प्रक्रिया, आम्लाचा पाऊस, कारखान्यातून निघणारा घातक धूर पावसात मिसळणे, कचरा डंपिंग ग्राऊंड यातून जमीन विषारी होऊन सजीवसृष्टीस धोका निर्माण झाला आहे. राज्यात ५४२८ घातक कचरा निर्माण करणारे कारखाने आहेत. तळोजा, ठाणे एमआयडीसी, रांजणगाव व नागपूर बुटीबोरी या ठिकाणी प्रक्रिया प्रकल्प यापूर्वी उभारण्यात आले आहेत.

जमिनीतील पोषक द्रव्यांचा समतोल राखणे यासाठी आवश्यक पीक पद्धती आत्मसात करणे, रासायनिक खतांचा तसेच कीटकनाशकांचे शेतीमधील प्रमाण कमी करणे, वनीकरण व वृक्षलागवडीतून होणारी जमिनीची धूप कमी करणे, सेंद्रिय शेतीला चालना देणे अशा उपाययोजनांची अंमलबजावणी केली जात आहे. जमिनीचा कस कायम राहण्यासाठी व जमिनीचे नुकसान टाळण्यासाठी कचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन या घटकांचा महत्त्वाचा सहभाग आहे. जैविक वैद्यकीय कचऱ्यावर पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत उपाययोजना राबवल्या जात आहेत. संबंधित कचऱ्याची रुग्णालये, प्रयोगशाळा यांनी योग्य विल्हेवाट लावली किंवा नाही याबात संनियंत्रण पर्यावरण विभागामार्फत

स्थापन केलेल्या समितीकडून करण्यात येते. तसेच राज्यात सामायिक सांडपाणी सयंत्रणा योजना, खासकरून रासायनिक कारखान्यांच्या औद्योगिक क्षेत्रासाठी हाती घेण्यात आली आहे.

हवा : हवा वेगवेगळ्या वायूंच्या एकत्रीकरणाने तयार झाली आहे. त्यातील वायूंचे प्रमाण सर्वसाधारण परिस्थितीत एकसारखे असते. यातील काही घटक आपल्याला गरजेचे असतात, तर काही उपयोगी नसतात तर काही घातक असतात. गरजेच्या घटकांचे प्रमाण जास्त व नको असलेल्या घटकांचे प्रमाण कमी राहून त्या दोघांमध्ये नैसर्गिक समतोल राखला गेलेला असतो. नको असलेल्या हवेतील घटकांच्या वाढत्या प्रमाणामुळे हवेचे प्रदूषण होते. त्याचा प्रत्यक्ष परिणाम सजीवसृष्टीवर होतो, वातावरणावर होतो. वनांचे प्रमाण वाढवणे, उद्योग व वाहनामूळे होणारे हवेचे प्रदूषण नियंत्रित ठेवणे हाच महत्त्वाचा पर्याय आहे. याबाबत शासनाच्या विविध विभागांमार्फत कामे सुरू आहेत.

ऊर्जा : आपण घरात वापरत असलेल्या विजेच्या निर्मितीसाठी नैसर्गिक पाण्याचा वापर केला जातो, अणू ऊर्जेतून वीज निर्मिती केली जाते अशा निर्मिती प्रक्रियेत पर्यावरणाचे नुकसान या ना त्या मार्गे होत असतेच. यासाठी सौर ऊर्जा किंवा अन्य पर्याय दिले जातात. ऊर्जा निर्माण करत असताना काही प्रमाणात तरी पर्यावरणावर परिणाम होतोच. यातच सध्या विजेचा आवश्यक व कमीत कमी वापर यासाठी योजना राबवल्या जात आहेत. अगदी वैयक्तिक पातळीपासून ते सार्वजनिक स्तरावर तसेच औद्योगिक स्तरावर वीज वापर नियंत्रित करणे आवश्यक आहे. इंधन वाचवणे यासाठी सार्वजनिक वाहतुकीचा वापर, घरातील अनावश्यक वीज वापर रोखणे, जास्त तारांकित (स्टार) असलेल्या विजेवर चालणाऱ्या यंत्रांची खरेदी व वापर करणे अशा अनेक पर्यायातून ऊर्जा वापर नियंत्रित करता येऊ शकतो. यासाठी ऊर्जा विभागासह अन्य विभाग कार्य करत आहेत.

माझी वसुंधरा अभियान

२ ऑक्टोबर २०२० ते ३१ मार्च २०२१ पर्यंत राज्यात जास्त लोकसंख्येच्या ६६७ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये हे अभियान राबवण्यात येत आहे. पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्त्वांवर आधारित माझी वसुंधरा अभियान आहे. या अभियानांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांना पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्त्वांवर केलेल्या कामाचे मुल्यमापन करून १५०० गुणांपैकी विगतवारीनूसार गुण देण्यात येणार आहेत.

राज्यातील पर्यावरणविषयक शासनाकडून राबवण्यात येत असलेल्या इतर उपाययोजना :

पंचतत्त्व	एकूण गुण	विषय
पृथ्वी	६००	हरित आच्छादान आणि जैवविविधता
		घनकचरा व्यवस्थापन
वायू	१००	स्थानिक वायू गुणवत्ता, हरितीकरण, उज्ज्वला योजना (ग्रामीण) / नॉन मोटरायझ्ड वाहतूक (शहरी)
जल	४००	जलसंवर्धन
		रेन वॉटर हार्वेस्टिंग व परकोलेशन
		नदी, नाले व तळ्यांची स्वच्छता
		सांडपाणी, मैला व्यवस्थापन व प्रक्रिया
अग्नी	१००	ऊर्जा वापर, सौर ऊर्जेचा वापर, बायोगॅस (ग्रामीण), सौर पंप (ग्रामीण), हरित इमारत (शहरी), वाहनांना चार्जिंग पॉईंट उपलब्धता (शहरी)
आकाश	३००	पर्यावरण सुधारणा व संरक्षण जनजागृती
		निसर्ग संवर्धनासाठी नागरिकांनी घेतलेली शपथ
एकूण	**१५००**	

राष्ट्रीय हरित सेना योजना

- इको सेन्सेटिव्ह क्षेत्र जाहीर करणे
- जिल्हा पर्यावरण समिती
- सरदार सरोवर प्रकल्प
- राष्ट्रीय नदी कृती योजना
- राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना
- राज्य सरोवर संवर्धन योजना
- मुंबई - पर्यावरणविषयक कृती आराखडा
- झोनिंग टलास
- ध्वनी प्रदूषण नियमन
- प्लास्टिक बंदी
- पर्यावरण सेवा योजना

संदर्भ : ■ पर्यावरण माहिती प्रणाली (mahaenvis), ■ पर्यावरण विभाग, वन विभाग, महाराष्ट्र शासन संकेतस्थळ, ■ एफएसआय अहवाल,■ पर्यावरण तज्ज्ञांचे मत, अरण्यऋषी मारूती चितमपल्ली (सोलापूर), महेंद्र घागरे(पुणे), संजय करकरे, सहायक संचालक बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, नागपूर ■ महासंवाद वृत्त, ■ वार्षिक पाहणी अहवाल, महाराष्ट्र राज्य

जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली

पायाभूत सुविधा : ट्राम ते मेट्रो

देशाच्या प्रगतीचे ग्रोथ इंजिन असलेल्या महाराष्ट्राचे बलस्थान दळणवळणाच्या सुविधा आहेत. वाढती गरज आणि तंत्रज्ञानातील बदलांचा स्वीकार करत महाराष्ट्रातील दळणवळणाच्या सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे. द्रुतगती मार्ग असो वा विमानतळांची निर्मिती. कधी काळी मुंबईत धावणाऱ्या ट्राम आता इतिहासजमा झाल्या असल्या तरी मुंबईसह राज्यातील अनेक शहरे आता मेट्रोच्या गतीत गती मिळवू लागली आहेत.

नंदकुमार वाघमारे

कोणत्याही प्रदेशाचा प्रगतीचा आलेख हा त्या भागातील दळणवळण क्षेत्रातील पायाभूत सुविधा व सोयींवर अवलंबून असतो. वाहतूक व्यवस्था मग ती प्रवासी अथवा मालवाहतूक असो, ती जर सक्षम असेल तर त्या देशाची अथवा राज्याची आर्थिक प्रगती होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रत्येक शासन वाहतूक व दळणवळण क्षेत्रातील पायाभूत सुविधांवर भर देते. रस्ते, रेल्वे, हवाई आणि जलवाहतूक, दूरध्वनी संपर्क यंत्रणा तसेच वीज पुरवठा या क्षेत्राच्या सक्षमीकरण व सुविधा जेवढ्या जास्त तेवढा त्या भागाचा विकास जास्त. त्यातून त्या भागातील आर्थिक सुबत्ता, उद्योगधंद्यांची वाढ व रोजगाराचे प्रमाण वाढत असते. त्याचबरोबर शेती क्षेत्रातील गुंतवणुकीवरही त्याचा प्रभाव पडत असतो.

देशातील सर्वाधिक नागरीकरण होणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचा क्रमांक खूपच वरचा आहे. त्यामुळे शहर अथवा गावांचे नियोजन करत असताना या पायाभूत सुविधांबरोबरच सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, विद्युत पुरवठा, संपर्क साधने (पोस्ट, दूरध्वनी, इंटरनेट सुविधा) या सर्वांचा एकत्रित विकास केला तर त्या भागातील जीवनमान सुधारण्यास मदत होते. या सर्व पातळ्यांवर महाराष्ट्र नक्कीच इतर राज्यांच्या तुलनेत अग्रेसर आहे.

गेल्या ६० वर्षांत महाराष्ट्राची प्रगतशील राज्य अशी ओळख निर्माण होण्यात दळणवळण क्षेत्राचा मोठा वाटा आहे. दळणवळण साधनांमुळे शहरे व गावेच

	सन १९६५-६६	सन २०१९-२०
रस्ते	५१,८७७ किमी.	३,०१,२६७ किमी.
वाहनांची संख्या	३ लाख ११ हजार	३ कोटी ७१ लाख २१ हजार ८६६
दर लाख लोकसंख्येमागील वाहनांची संख्या	६१८	३० हजार ३९८

जोडली गेली नाही तर त्या भागातील संस्कृतीही जोडली गेली आहे. वाहतूक सुविधांमुळे नागरिकांचे स्थलांतर होऊ लागले, पर्यटन वाढले, व्यापार सुलभ झाला.

चांदा ते बांदा पसरलेल्या महाराष्ट्रात रस्ते वाहतुकीचे मोठे जाळे आहे. त्यामुळे गावातील शेतीमाल शहरांमध्ये येऊ लागला. शहरातील सुविधा गावापर्यंत पोहोचू लागल्या, शिक्षण, व्यवसाय क्षेत्र वाढीस लागले. वाढती लोकसंख्या, वाहनांची वाढती संख्या तसेच राज्यात उद्योगधंद्याला असलेले पोषक वातावरण यामुळे रस्ते वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. राज्यातील रस्त्यांचा विकास करणारा सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई महानगरमध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, राज्य रस्ते विकास महामंडळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अशा विविध संस्था काम करत आहेत. केंद्रीय रस्ते निधी योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, याबरोबरच राज्यमार्ग निधी, नाबार्ड अंतर्गत ग्रामीण पायाभूत विकास निधीतील ग्रामीण रस्ते, आशियाई बँकेचा निधी आदी विविध माध्यमाद्वारे रस्ते बांधणी, रस्त्यांचे रुंदीकरण, सक्षमीकरण केले जाते.

राज्यातील रस्ते व वाहनांची तुलना

रस्त्यांवरील वाढता ताण पाहून शासन रस्ते विकासासाठी धोरण ठरवते. या धोरणानुसार साधारण २० वर्षांच्या कालावधीसाठी रस्ते विकास आराखडा तयार करण्यात येतो आणि त्यानुसार रस्ते विकास करण्यात येतो. राज्यात रस्ते विकास आराखडा २००१-२१ ची अंमलबजावणी सध्या होत आहे. त्याअंतर्गत २०२१ पर्यंत ३ लाख ३८ हजार कि.मी. रस्त्यांचा विकास करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

रस्त्यांचे जाळे विस्तारणार

देशाची अथवा राज्याची प्रगती ही त्या-त्या भागातील दळणवळण व तेथील पायाभूत सुविधांवर ठरते. राज्यात पसरलेले रस्त्यांचे जाळे, पायाभूत क्षेत्रातील अनेक प्रकल्प यामुळे महाराष्ट्र हे देशातील प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. या सुविधांमुळे औद्योगिक व सेवाक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. रस्त्यांचे जाळे अधिक विस्तारण्यासाठी विविध प्रकल्प सुरू केले आहेत. पुढील काळात राज्यात प्रमुख महामार्गांवर प्रवाशांसाठी शौचालय, रेस्टरुम आदी सुविधा देण्याचा मानस आहे.

- अशोक चव्हाण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), मंत्री

रस्ते वाहतुकीवरील ताण, वाहनांची संख्या हे लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने पुढील दहा वर्षात राज्यातील रस्त्यांची बांधणी, त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण व नव्या रस्त्यांची निर्मिती करण्यासाठी 'व्हिजन २०३०' अंतर्गत आराखडा तयार केला आहे. त्यानुसार सर्व जिल्हा मुख्यालये लगतच्या जिल्ह्याला चौपदरीकरणाने जोडण्यासाठी ६१० कि.मी. रस्त्यांचे काम, सर्व तालुके जिल्हा मुख्यालयास दुपदरीकरणाने जोडणे, सुमारे दहा हजार कि.मी. प्रमुख जिल्हा मार्गाचे दोनपदरी रुंदीकरण करणे, जिल्हा मुख्यालयात सुमारे दोन हजार कि.मी.चे रिंगरोड तयार करणे, राज्यातील तालुका मुख्यालये बायपासने जोडण्यासाठी २ हजार कि.मी.चे रस्ते निर्माण करणे, ८८ हजार २५० कि.मी. लांबीच्या रस्त्यांची देखभाल दुरुस्ती आदी उद्दिष्टे आहेत.

राज्यातील रस्त्यांच्या कामासाठी नेहमीच एकाच वेळेस पुरेसा निधी मिळेलच असे होत नाही. त्यावर मार्ग काढण्यासाठी राज्य शासनाने हायब्रीड न्युईटी योजना आणली आहे. या

योजनेंतर्गत ३० हजार कोटी रुपये खर्चून १० हजार कि.मी. लांबीच्या रस्त्यांची नव्याने बांधणी करण्यात येत आहे. यामुळे रस्त्यांची कामे वेगाने व दर्जेदार होण्यास मदत होत आहे.

राज्य शासनाच्या विविध प्रकल्पांबरोबरच केंद्र शासनानेही राष्ट्रीय महामार्गाची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू केली आहेत. यामुळेही राज्यातील रस्ते वाहतूक जलद होण्यास मदत होत आहे. मुंबई-पुणे-बेंगलोर महामार्ग, मुंबई-नाशिक महामार्ग, मुंबई-अहमदाबाद महामार्ग, मुंबई-गोवा,येडशी-औरंगाबाद, तुळजापूर-बुटीबोरी, पुणे-सातारा, पुणे -सोलापूर अशा राष्ट्रीय महामार्गांमुळे राज्यातील शहरे जोडली जात आहेत. त्यातून त्या भागाचा विकास झपाट्याने वाढल्याचे दिसून येते.

एक्स्प्रेस वे – परिसर विकासाचा मार्ग

एकीकडे शहरांना व गावांना जोडणाऱ्या मार्गांबरोबरच गेल्या काही वर्षात राज्यात मोठे महामार्ग बांधण्याचे काम सुरू झाले आहे. त्यामध्ये राष्ट्रीय महामार्ग व एक्स्प्रेस वे म्हणजेच द्रुतगती मार्गाचा समावेश आहे. अनेक वेळा अशा द्रुतगती मार्गांना विरोध होतो. मात्र, मोठ्या वाहतुकीचे, वर्दळीचे रस्ते हे चार किंवा सहापदरी करणे आवश्यक ठरते. या रस्त्यांसाठी जास्त पैसा लागतो, मोठी गुंतवणूक लागते. राज्याच्या उत्पन्नातील मोठा हिस्सा या रस्त्यांच्या कामाला लावला तर इतर पायाभूत सुविधा व विकास कामांना पैसा कमी पडतो. त्यावर उपाय म्हणून बाजारातून पैसा उभारून अशा एक्स्प्रेस-वेची निर्मिती करावी लागते. त्यासाठी जगभरात 'यूजर फीस' ही संकल्पना आली. भारतात त्यालाच टोल रस्ते असे म्हटले जाते. न्यूयॉर्कमधील मोठे रस्ते, हॉलंड टनेल हे सर्व टोल रस्तेच होते. त्याचप्रमाणे पूर्वीचा ग्रँट ट्रंक रोड हाही त्या काळातील टोलरस्ता होता. ब्रिटिश राजवटीच्या काळात उभारलेल्या ग्रँट ट्रंक रोडमुळे भारतातील अनेक शहरे ही एकमेकांना जोडली गेली.

द्रुतगती महामार्गाचा (एक्स्प्रेस वे) महाराष्ट्रातील पहिला प्रकल्प म्हणजे मुंबई -पुणे द्रुतगती महामार्ग. मोठे प्रकल्प उभारण्यासाठी महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळाच्या माध्यमातून बाजारातून पैसा उभारून प्रकल्प उभे राहू लागले. ज्या-ज्या ठिकाणी द्रुतगती (एक्स्प्रेस वे) महामार्ग उभारले त्या भागातील पायाभूत सुविधांचा तसेच औद्योगिक विकास झाल्याचे चित्र आहे. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग हा त्याचे उत्तम उदाहरण आहे. या महामार्गामुळे पुणे परिसरातील हिंजवडी माहिती तंत्रज्ञान पार्क, चाकण, तळेगाव, खेड विशेष आर्थिक परिसर (एसईझेड) आदी भागाचा विकास झाला. त्यामुळे अशा मोठ्या महामार्ग बांधणीसाठी पुढाकार घेणे सुरू झाले.

ग्रीनफिल्ड कोकण द्रुतगती महामार्ग

कोकणचा विकास व्हावा, यासाठी ग्रीनफिल्ड कोकण द्रुतगती महामार्गाची घोषणा झाली आहे. सुमारे ५०० किमी लांबीच्या या महामार्गामुळे मुंबईहून थेट रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हे जोडले जाणार आहेत. मुंबई-गोवा महामार्गही पूर्णत्वाकडे आला आहे. या

शहरांचा नियोजबद्ध विकास

देशात सर्वात झपाट्याने नागरीकरण होणारे राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. महानगरांचा विकास करताना मेट्रो प्रकल्पांना चालना देण्यात आली असून नागपूर, मुंबई पाठोपाठ पुणे मेट्रोच्या कामांनी गती पकडली आहे. स्वच्छता अभियानात महाराष्ट्राची कामगिरी देशपातळीवर सातत्याने अग्रस्थानी आहे. नगरांच्या नियोजबद्ध विकासासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

- एकनाथ शिंदे, नगरविकास मंत्री

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग

मुंबई-पुणे महामार्गानंतर विदर्भ, मराठवाडा तसेच कोकण हे भागही जोडणे आवश्यक होते. त्यासाठी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाची आखणी करण्यात आली. राज्याच्या रस्ते विकासात हा महामार्ग एक मैलाचा दगड ठरेल. ७०१ कि.मी. लांबीचा हा द्रुतगती मार्ग दहा जिल्ह्यातून जाणार असला तरी तो अप्रत्यक्षपणे इतर १४ जिल्ह्यांना जोडला जाणार आहे. त्यामुळे राज्यातील ३६ जिल्ह्यांपैकी २४ जिल्हे समृद्धी महामार्गामुळे विकासगंगेत येणार आहेत. प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होण्याआधीच समृद्धी महामार्ग हा देशभरातील इतर पायाभूत प्रकल्पासाठी पथदर्शी प्रकल्प ठरला आहे. या आठपदरी मार्गामुळे मुंबई ते नागपूर अंतर आठ तासांवर येणार आहे. त्याचबरोबर बुटीबोरी, वर्धा, अमरावती, जालना, चिखलठाणा, शेंद्रा, वाळुंज व सिन्नर ही औद्योगिक केंद्रेही जोडली जाणार आहेत. या मार्गावर २४ कृषी समृद्धी केंद्रांचा विकास करण्यात येणार आहे. कृषी समृद्ध केंद्रे ही स्वयंपूर्ण नवनगरे म्हणून उदयास येणार आहेत. मुंबईतील मुंबई बंदर व जवाहरलाल नेहरू पोर्टशी आणि नागपूर येथील मल्टी-मोडल कार्गो हबशी महाराष्ट्राच्या मागास भागाचा थेट संपर्क प्रस्थापित होईल. केवळ मुंबई व नागपूर या दोन शहरांना जोडणारा हा द्रुतगती मार्ग नसून विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि कोकण यांच्यातील आर्थिक आणि सामाजिक अंतर कमी करणारा हा मार्ग होईल.

दोन्ही महामार्गांमुळे येत्या २० वर्षात कोकणातील पायाभूत सुविधांचा मोठा विस्तार होणार असून कोकणाच्या पर्यटन विकासाही चालना मिळेल. याबरोबरच राज्यातील महत्त्वाच्या व्यावसायिक केंद्रांना जोडणाऱ्या रस्त्यांचा विकास करण्याची योजना शासन आखत आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर राज्याचा चेहरा-मोहरा बदलेल.

मुंबई परिसराचा कायापालट

जागतिक व्यापार, उद्योग व्यवसायाचे मध्यवर्ती केंद्र आणि देशाची आर्थिक राजधानी म्हणून मुंबईचे महत्त्व आहे. सध्या मुंबईत सुमारे १ कोटी १० लाख नागरिक हे सार्वजनिक वाहतुकीद्वारे प्रवास करतात. त्यापैकी ५२ टक्के रेल्वेने तर २६ टक्के हे बसने प्रवास करतात. मुंबईतील सार्वजनिक परिवहन व्यवस्थेतील मागणी व पुरवठ्याच्या प्रमाणात तफावत आहे. उपनगरीय रेल्वेवर त्याचा प्रचंड ताण पडतो.

मुंबईतील वाहतुकीचा विचार करताना ट्राम रेल्वे ते मेट्रो रेल्वे हा प्रवास रंजक तेवढाच वाहतूक क्षेत्राच्या विकासाचा मार्ग दाखवणारा आहे. देशातील पहिली रेल्वे मुंबई परिसरात सुरू झाली. पूर्वी मुंबईत ट्राम, उपनगरीय रेल्वेद्वारे वाहतूक होत होती. त्यानंतर बेस्ट बस, टॅक्सी सेवा असे विविध वाहतूक सुविधा सुरू झाल्या. त्याचबरोबर बेस्टची डबलडेकर बस ही पर्यटकांसाठी खास आकर्षण आहे. मात्र, वाढत्या मुंबईत या सुविधा अपुऱ्या पडू लागल्या. त्यातून पश्चिम द्रुतगती महामार्ग, पूर्व द्रुतगती महामार्ग व मुक्त महामार्ग हे महामार्ग बांधण्यात आले. ५० हून अधिक उड्डाणपूल बांधले. देशातील पहिला सी लिंक वरळी वांद्रे मार्गावर राजीव गांधी सी लिंक हा मुंबईत बांधण्यात आला. तरीही वाहतूक कोंडी सुटली नाही. यावर उपाय म्हणून मेट्रोचा बृहद आराखडा तयार करण्यात आला. यानुसार, मुंबई परिसरातील वाहतूक व्यवस्थेत सुधारणेसाठी सुमारे ३३७.१ कि.मी. लांबीचे १४ मेट्रोमार्ग उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यातील मेट्रो सुरू झाली असून उर्वरित कामे झपाट्याने सुरू आहेत.

चित्र आश्वासक महाराष्ट्राचे

त्याबरोबरच देशातील पहिली मोनोरेलही मुंबईत सुरू झाली. मेट्रोची उभारणी करताना राज्य शासनाने पर्यावरणावर संरक्षणावर भर दिला आहे. याचेच एक पाऊल म्हणजे मेट्रोच्या आरे वसाहतीतील कारशेड तेथून हलवून कांजूरमार्ग येथे उभारण्यात येणार आहे. यामुळे आरेचा तो भाग जंगल म्हणून घोषित करण्यात आला आहे.

मुंबई शहर व उपनगराबरोबरच मुंबई शेजारच्या ठाणे, कल्याण-डोंबिवली, बदलापूर, वसई विरार, मीरा भाईंदर, भिवंडी ह्या परिसरातही मेट्रोचे जाळे विणले जात आहे. येत्या २० वर्षात या सर्व मेट्रोसेवा पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यास मुंबईवरील वाहतुकीचा ताण बऱ्याच प्रमाणात कमी होण्यास मदत होईल. मेट्रोबरोबर उपनगरीय रेल्वे, बेस्ट बस, मोनो रेल या सर्व सुविधांचा एकात्मिक सुविधा निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने, महामुंबई परिसरातील परिवहन व वाहतूक व्यवस्थेच्या अभ्यासासाठी; परिवहन साधने समावेशक सर्वंकष परिवहन अभ्यास आणि व्यावसायिक आराखडा तयार केला आहे. यामध्ये २०२१ आणि २०३१ पर्यंत कुठल्या सुविधा निर्माण कराव्यात, यासंबंधी शिफारसी दिल्या आहेत.

मेट्रोशिवाय मुंबई महानगर प्रदेशात मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत अनेक प्रकल्प हाती घेतले आहेत. यामध्ये वर्सोवा ते विरार सी-लिंकचे कामही हाती घेण्यात येणार आहे. नवी मुंबई ते तुर्भे भागाच्या वाहतुकीवर उपाय म्हणून ५.४ किमीचा तुर्भे ते खारघर हा रस्ता तयार करण्यात येत आहे. पुढील २० वर्षात

वाढणाऱ्या वाहतुकीचा अभ्यास करून मुंबई व नवी मुंबईला जोडणारा नवीन ठाणे क्रिक ब्रिज बांधण्यात येणार आहे.

वाहतूक कोंडीवर उपाय

मुंबईतील वाहतूक कोंडीवर उपाय योजण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने सागरी किनारा मार्ग अर्थात कोस्टल रोड उभारण्यास सुरुवात केली आहे. दक्षिण मुंबईतील शामलदास गांधी मार्ग (प्रिंन्सेस स्ट्रिट) ते राजीव गांधी सागरी सेतू यांना जोडणारा ९.९८ कि.मी.चा हा सागरी किनारा मार्ग राज्यातील पहिलाच प्रकल्प असून त्याच्या पहिल्या टप्प्याचे काम सुरूही झाले आहे. या मार्गालगत समुद्राला जोडून ६.४ कि.मी. लांबीचा मुंबईतील सर्वात मोठा समुद्री पदपाथ (प्रोमेनडा) उभारण्यात येत आहे.

मुंबई व नवी मुंबईला जोडणारा मुंबई पोरबंदर प्रकल्पासही चालना दिली असून शिवडी ते न्हावा दरम्यानच्या २२ कि.मी. चा हा सहापदरी महामार्ग आहे. या महामार्गामुळे मुंबई व नवी मुंबईतील अंतर कमी होऊन नवी मुंबई विमानतळाशी वेगवान दळणवळण शक्य होणार आहे. विरार ते अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका (मल्टिमोडल कॉरिडॉर)मुळे विरार, भिवंडी, कल्याण, डोंबिवली, पनवेल, उरण, तळोजा एमआयडीसी ही केंद्रे जोडली जाणार असल्यामुळे मोठ्या प्रमाणात औद्योगिक विकास व रोजगार निर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल पडणार आहे.

उपनगरीय रेल्वेसाठी विशेष यंत्रणा

मुंबईतील रस्ते वाहतुकीवरील ताण लक्षात घेऊन उपनगरीय वाहतूक सेवेच्या बळकटीकरणावर भर देण्यात येत आहे. त्यासाठी मुंबई रेल्वे विकास महामंडळ स्थापले आहे. याद्वारे मुंबई शहरी वाहतूक प्रकल्प योजना (एमयूटीपी) राबवण्यात येत आहे. याचा आतापर्यंत २ टप्प्याची रेल्वे मार्ग विकासाची कामे मुंबई व परिसरात झाली आहेत. दुसऱ्या टप्प्यात याअंतर्गत ९४ नवीन उपनगरीय रेल्वे मार्ग

वाहने	सन १९७१	जानेवारी २०२०
दुचाकी वाहने	८३,९३०	२,७२,४८,४१७
चारचाकी वाहने	१,२२,५०८	५१,५६,६६०

निर्माण होणार आहेत. एमयूटीपी ३ अंतर्गत पनवेल-कर्जत २८ कि.मी. दुहेरी लाईन, ऐरोली ते कळवा या मार्गावर उन्नत मार्ग, विरार-डहाणू रेल्वे मार्गाचे चौपदरीकरण ही कामे होणार आहेत.

मुंबईबरोबरच नवी मुंबईमधील दळणवळण क्षेत्रातील पायाभूत व संरचनात्मक सुविधांचा मोठ्या प्रमाणावर विकास होत आहे. नवी मुंबई विमानतळाचे काम मोठ्या वेगाने सुरू आहे. त्याचबरोबर रस्ते वाहतुकीला पर्याय म्हणून नवी मुंबईत मेट्रो प्रकल्प सुरू आहे. नवी मुंबई मेट्रो ही नवी मुंबई विमानतळाला जोडण्यात येणार आहे. त्यामुळे प्रवासी वाहतुकीबरोबरच या परिसराचा विकास होण्यास मदत होणार आहे.

मेट्रोबरोबरच नेरूळ-बेलापूर-सीवूड-उरण रेल्वे मार्गाचे काम पूर्णत्वास आल्यास उरण, जेएनपीटी या भागाचा विकास होऊन या भागाचा नागरी विकास मोठ्या प्रमाणात होणार आहे.

एकंदरीत मुंबईच्या वाहतुकीचे वेगळेच प्रश्न ते म्हणजे एकाच वेळी विविध बाजूने होणारी वाहतूक. त्याची कोंडी सोडवण्यासाठी हे विविध उपाय केले जात आहेत. राज्य शासन मात्र सामान्य मुंबईकरांचा प्रवास सुखकर आणि गतिमान होण्यासाठी उपाययोजनांना प्राधान्य देत आले आहे.

दळणवळणाची उत्तम सेवा

राज्याच्या विकासात राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि एसटी महामंडळाचा मोठा वाटा आहे. कोरोना महामारीच्या संकटातही एसटीने प्रवासी दळणवळणाची उत्तम सेवा दिली. याच काळात ऑक्सिजनची वाहतूक करणाऱ्या वाहनांना रुग्णवाहिका समकक्ष वाहनाचा दर्जा, सहा महिन्यांसाठी वाहनांवरील १०० टक्के करमाफी असे निर्णय घेतले गेले. राज्यातील सुरक्षित प्रवासी वाहतुकीची व्यवस्था आणि प्रवाशांना उत्तम सुविधा कशा उपलब्ध होतील यासाठी शासन प्रयत्न करत आहे.

- ॲड. अनिल परब, परिवहन मंत्री

सार्वजनिक वाहतूक सुलभ

रस्ते सक्षम असणे आवश्यक नसून या रस्त्यांवरून शहरे व गावांना जोडणारी वाहतूक व्यवस्थाही सक्षम व कार्यक्षम असणे आवश्यक आहे. त्यातून एसटी महामंडळाचा उदय महाराष्ट्रात झाला. पुणे ते अहमदनगर ही पहिली बस १९४८ मध्ये सुरू झाली. रस्ता तेथे एसटी हे

ब्रीदवाक्य घेऊन राज्यातील कानाकोपऱ्यांत एसटीची सेवा सुरू झाली. एसटी महामंडळाने २०१८-१९ मध्ये राज्यातील ९१.९५ टक्के लोकसंख्येपर्यंत सेवा पोहोचवली होती. महामंडळाशिवाय खासगी वाहतूकही मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते.

शहरी वाहतूक क्षेत्रातील प्रयोग

एसटी महामंडळ हे गावागावांमध्ये व शहरांतर्गत वाहतूक करणारी व्यवस्था आहे. मात्र, शहरांमधील अंतर्गत शहरी वाहतूक व्यवस्थेतही बदल आवश्यक ठरत आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, महाराष्ट्र हे देशातील तिसरे मोठे शहरीकरण होणारे राज्य आहे. इतर राज्यांच्या तुलनेत सर्वात जास्त २७ महानगरपालिका असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राला ओळखले जाते. वाढत्या नागरीकरणाबरोबरच अनेक आव्हानेही वाढली असल्याचे दिसून येते. नागरीकरण व आर्थिक समृद्धी वाढते त्याच्या अनेकपट वैयक्तिक वाहनांची संख्या वाढते. जागतिक स्तरावर दिसणारे हे चित्र महाराष्ट्रातही लागू होते.

याशिवाय खासगी प्रवासी वाहनांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यातील सर्वाधिक संख्या ही शहरी भागातील असल्याचे दिसून येते.

वैयक्तिक वाहतूक साधनांमुळे प्रदूषण, वाहतूक कोंडी, रस्ते अपघात अशा अनेक समस्या निर्माण झाल्या. त्याबरोबर शहरांमधील वाहतूक कोंडी ही आर्थिक वाढ खुंटण्याचे लक्षण असल्याचे या क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. हे सर्व लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या राष्ट्रीय शहरी वाहतूक धोरणाच्या धर्तीवर राज्य शासनाने राज्य नागरी वाहतूक धोरण जाहीर केले आहे. या धोरणानुसार, वैश्विकदृष्ट्या स्वीकारलेल्या चालणे, सायकलिंग आणि सार्वजनिक वाहतूक या दळणवळण साधनांवर भर दिला आहे. ही साधने सुरक्षित तर आहेतच, त्याचप्रमाणे पर्यावरणपूरक आणि आरोग्यदायी आहेत. त्याचबरोबर आर्थिकदृष्ट्या सक्षम शहरे निर्माण होण्यास मदतगार ठरतील.

यासाठी सार्वजनिक वाहतुकीचा महत्त्वाचा भाग असलेली बस यंत्रणा सक्षम होणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. पुण्यातील केंद्रीय रस्ते वाहतूक संस्थेने प्रसिद्ध केलेल्या निकषानुसार, प्रति एक लाख लोकसंख्येमागे ४०-४५ बस असणे आवश्यक आहे. पण सध्या तेवढी संख्या नसल्याचे दिसून येते. तीन लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये जेथे मेट्रोसारखी वाहतूक साधने व्यवहार्य नाहीत, अशा ठिकाणी बस व्यवस्था आवश्यक आहे. सध्या २३ शहरांमध्ये राज्य परिवहन महामंडळाकडून बस सुविधा उपलब्ध आहे. तर मुंबईमध्ये बेस्ट, पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये महानगर परिवहन महामंडळ यासह १३ शहरांमध्ये महानगरपालिकांमार्फत बससेवा पुरवली जाते. मात्र, सक्षम बस वाहतूक यंत्रणा निर्माण होण्यासाठी शहरांमधील सार्वजनिक वाहतूक क्षेत्रात सार्वजनिक खासगी सहभाग आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

शहर बससेवाव्यतिरिक्त शहरांमधील वाहतुकीसाठी इतरही अनेक प्रयोग वेळोवेळी झाले आहेत. त्यात मेट्रो, बसमार्गिकेसाठी वेगळी व्यवस्था (बीआरटी), रिंगरोड आदींचा समावेश आहे. मुंबई शिवाय पुणे, नागपूर येथे मेट्रो, नाशिकमध्ये निओ मेट्रो असे विविध प्रकल्प राबवण्यात येत आहेत. इलेक्ट्रिक वाहनांच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने रोड टॅक्स, नोंदणीमध्ये सवलत यासह अनुदान योजना जाहीर केली आहे. मुंबई महानगराप्रमाणेच पुण्यातील वाहतुकीचा प्रश्न सोडवण्यासाठी पुणे महानगर विकास प्राधिकरणाने सर्वंकष वाहतूक आराखडा तयार केला आहे. तसेच मुंबई-पुणे हायपरलूप प्रकल्पाचा विचार सुरू असून यामुळे हे अंतर अर्ध्या तासात पार करता येणार आहे.

रेल्वे मार्गांमुळे वाहतुकीस चालना

पूर्वी नदीकिनाऱ्यावर असलेल्या गावांचा, शहरांचा विकास होत असल्याचे म्हटले जात होते. मात्र, भारतात रेल्वेचे

परवडणाऱ्या घरांची निर्मिती

"सर्वसामान्य गोरगरीब माणसाचे घराचे स्वप्न पूर्ण करणे, स्वस्त व परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे यासोबतच झोपडपट्टीमुक्त शहरे करण्याच्या दृष्टीने राज्य शासन प्रयत्नशील आहे. सध्या गृहनिर्माण उद्योग संकटात आहे. त्याला नवसंजीवनी देण्यासाठी आम्ही विविध सवलती जाहीर केल्या आहेत. विविध परवानग्या देताना अतिशय सुलभ प्रक्रियेचा अवलंब करीत आहोत."

- डॉ. जितेंद्र आव्हाड, गृहनिर्माण मंत्री

वर्ष	देशातील संख्या	महाराष्ट्रातील वापरकर्ते
डिसेंबर २००८	३४ कोटी ६८ लाख	२ कोटी ७४ लाख ८३ हजार
जुलै २०२०	११४ कोटी ४१ लाख ७८,०९६	९ कोटी १३ लाख ८७ हजार ६५५

*ट्राय संकेतस्थळावरील आकडेवारी

जाळे विस्तारण्यास सुरुवात झाल्यावर रेल्वे स्थानकांभोवती शहराचा विकास होत असल्याचे दिसून येते. रेल्वेमुळे प्रवासी वाहतुकीबरोबर मालवाहतूकही वेगाने होते. त्यामुळे राज्यातही नवनवीन रेल्वे प्रकल्प सुरू होत आहेत.

राज्यात कोकण रेल्वेसह ३१ मार्च २०१९ पर्यंत ६,१९९.५४ किमी लांबीचे लोहमार्ग होते. भारतातील एकूण लांबीच्या ९.१ टक्के लांबी ही महाराष्ट्रात आहे. सध्या राज्यात पुणे-मिरज लोंढा मार्गाचे दुपरीकरण, यवतमाळ-पुसद मार्गे वर्धा-नांदेड हा नवीन मार्ग, इटारसी-नागपूर नवीन मार्ग, अहमदनगर-परळी वैजनाथ मार्ग, मनमाड-जळगाव तिसरा मार्ग, वर्धा -बल्लारशहा तिसरा मार्ग, वर्धा-नागपूर चौथा मार्ग, वर्धा-सेवाग्राम-नागपूर चौथा मार्ग, कल्याण-कसारा तिसरा मार्ग, बारामती -लोणंद नवीन मार्ग, बेलापूर-सीवूड-उरण नवीन मार्ग, पेण -रोहा दुपरीकरण, भुसावळ-जळगाव तिसरा मार्ग व जळगाव भुसावळ चौथा मार्ग आणि तिगाव-चिंचोडा तिसरा मार्ग हे प्रकल्प सुरू आहेत. रस्ते वाहतुकीवरील ताण कमी करून जलद वाहतूक व्यवस्था उभारण्यासाठी रेल्वे वाहतुकीवर भर देणे आवश्यक आहे.

जलवाहतुकीची सुरुवात

रस्ते वाहतुकीवरील ताण कमी करायचा असेल तर जलवाहतुकीला चालना देणे आवश्यक आहे. सागरमाला सारखे प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. जलवाहतुकीला प्राधान्य देण्यासाठी महाराष्ट्र मेरिटाईम बंदर विकास धोरण २०१६ ची अंमलबजावणी सुरू झाली आहे. राज्यात आता मुंबई पोर्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट ही दोन मोठी बंदरे असून ४८ लहान बंदरे आहेत. मुख्यतः या बंदरातून माल वाहतूक होते.

मुंबईतील भाऊचा धक्का ते मांडवा दरम्यान रो-रो सुविधा सुरू झाल्यामुळे मुंबई ते अलिबाग यामधील वाहतुकीचा वेळ वाचला आहे. मुरूड तालुक्यातील राजापूर खाडीतील आगरदांडा, श्रीवर्धन तालुक्यातील दिघी आणि रायगड जिल्ह्यातील करंजा व काशिद येथे जेट्टी व प्रवासी टर्मिनलच्या कामामुळे मुंबईहून बोटसेवा, रो रो पॅक्स सेवा सुरू करता येणार आहे. मरिना योजनेंतर्गत नवी मुंबईतील बेलापूर खाडी येथे ३० बोटी नांगरून ठेवता येतील एवढे मोठे मरिना बांधण्यात येत आहे.

महत्त्वाचे प्रकल्प

- ग्रीनफिल्ड कोकण द्रुतगती महामार्ग
- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग
- कोस्टल रोड प्रकल्प
- मुंबई, नागपूर, पुणे व नाशिक मेट्रो
- भाऊचा धक्का ते मांडवा रोरो सेवा
- करंजा (जि. रायगड), काशिद (जि. रायगड) येथे प्रवासी जेट्टी टर्मिनल
- नवी मुंबईतील बेलापूर खाडी येथे मरिना बांधकाम सुरू
- वर्सोवा ते विरार सी-लिंक
- तुर्भे ते खारघर टनेल रोड
- शिवडी न्हावा शेवा पारबंदर प्रकल्प
- विरार ते अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका (मल्टिमोडल कॉरिडॉर)
- नागपूर शहर व परिसरात वातानुकूलित ब्रॉडगेज मेट्रो ट्रेन्स
- नाशिक निओ मेट्रो प्रकल्प

वीज क्षेत्रातील भरारी

पायाभूत व संरचनात्मक सुविधांच्या विकासात वीज क्षेत्राचाही प्राधान्याने समावेश होणे आवश्यक आहे. त्या बाबतीत महाराष्ट्र नक्कीच आघाडीवर आहे. १९६२ मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची स्थापना झाल्यानंतर आतापर्यंत राज्यात औष्णिक विद्युत, जल विद्युत आदींबरोबर नवीकरणीय व पारंपरिक वीज निर्मितीवरही भर दिल्याचे दिसून येते.

सुरुवातीला फक्त औद्योगिक व घरगुती ग्राहकांना वीज वितरण केले जात होते. १९७७-७८ मध्ये कृषी क्षेत्राला मोठ्या प्रमाणावर वीज पुरवठा सुरू झाला. २००९-१० पासून विद्युत क्षेत्रात खासगी कंपन्यांचा वापर वाढल्यामुळेही निरंतर वीज पुरवठा होत आहे. औद्योगिक व सेवा क्षेत्राचा विकास वाढत गेला तसा विजेचा वापरही वाढत असल्याचे दिसून येते. राज्यात सर्वात जास्त वापर हा औद्योगिक क्षेत्राचा असून २०१९-२० या वर्षात तो ३४,४४८ दशलक्ष युनिट होता. तर त्या खालोखाल कृषी क्षेत्रात २०,९३० दशलक्ष युनिट एवढा होता. वीज निर्मिती केंद्रातून ग्राहकांपर्यंत वीज पोहोचवण्यासाठी महापारेषण व महावितरण यांनी निर्माण केलेल्या पायाभूत सुविधांमुळे आता राज्यातील जवळपास प्रत्येक गावात वीज पोहोचली आहे. मुंबईनजीकच्या एलिफंटा लेण्याच्या ठिकाणीही वीज पोहोचवण्याचे आव्हान महावितरणने स्वीकारले आहे. राज्यातील दुर्गम भागातात जेथे वीज वितरण शक्य नाही, तेथे सौर ऊर्जेच्या माध्यमातून वीज पुरवली जात आहे. नवकरणीय ऊर्जेचा वापरही गेल्या काही वर्षात वाढला आहे. पुढील काळात

अपारंपरिक उर्जेच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी सौर ऊर्जेचा वापर करणाऱ्या सहकारी सोसायट्यांना शासनाने सवलतीही जाहीर केल्या आहेत.

ग्रामीण विद्युतीकरणांतर्गत राज्यातील ४१,९२८ गावांपैकी मार्च २०१९ पर्यंत ४१ हजार ६१८ गावांचे पारंपरिक ऊर्जेद्वारे व ३०५ गावांचे अपारंपरिक ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्यात आले आहे. याशिवाय कृषी पंपाचे विद्युतीकरण, अटल सौर कृषी पंप योजना, मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना, प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा, दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना अशा विविध योजनांच्या माध्यमातून राज्यातील सर्वस्तरापर्यंत निरंतर वीज पुरवठा करण्यात येत आहे.

प्रत्येक जिल्ह्यात विमानतळ

राज्यात रस्ते व रेल्वेबरोबरच जल व हवाई वाहतुकीच्या विस्तारावरही गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात लक्ष दिले जात आहे. यासाठी प्रत्येक जिल्ह्यात विमानतळ बांधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. काही ठिकाणची कामे पूर्ण झाली असून शिर्डीचा विमानतळ सुरू झाला असून सिंधुदुर्गमधील चिप्पी विमानतळ लवकरच सुरू होईल. राज्यात सध्या पाच आंतरराष्ट्रीय व १३ देशांतर्गत विमानतळ आहेत. राज्यातील अमरावती, सोलापूर यासारख्या शहरांमध्येही विमानतळ सुरू करण्यात येत आहेत. शिर्डी विमानतळामुळे तीर्थक्षेत्र असलेले हे स्थान आता जगाशी जोडले गेले आहे.

याशिवाय मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी नवी मुंबई येथे नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम सुरू झाले आहे. त्याचप्रमाणे पुणे जिल्ह्यातही पुरंदर येथे नवीन विमानतळ बांधण्यात येत आहे.

मोबाइल क्रांती

रस्ते, वीज याबरोबर राज्यातील संपर्क क्षेत्रातील प्रगतीही मोठ्या वेगाने वाढल्याचे दिसते. सुरुवातीला फक्त मोजक्या लोकांकडे असलेल्या लँडलाइन दूरध्वनीपासून ते आता अगदी खेड्यापाड्यांतील नागरिकांच्या हातात दिसणारे स्मार्टफोन हा बदल गेल्या दोन दशकांत झपाट्याने झाल्याचे दिसते. मोबाइल नेटवर्क क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानामुळे इंटरनेटची सुविधा स्वस्तात व सर्वच ठिकाणी उपलब्ध झाल्यामुळे मोठ्या सोयी निर्माण झाल्या. दळणवळण क्षेत्रात त्यामुळे आमूलाग्र बदल झाल्याचे दिसून येते.

देश व राज्यातील मोबाइल वापरकर्ते

मागील ६० वर्षाचा कालावधीकडे बघता, महाराष्ट्राने दळणवळण क्षेत्रात चांगली प्रगती केली आहे असे म्हणता येईल. परंतु, महाराष्ट्राला देशात आपला अग्रेसर हा शिक्का कायम राखायचा असेल तर, बऱ्याच काही प्रकल्प व योजनांचा विचार करावा लागेल व ते राबवावे लागतील. यामध्ये सर्व प्रमुख शहरांना बाह्यवळण रस्ते, औद्योगिक क्षेत्रे व महत्त्वाच्या बाजारपेठा यांना जोडणारे मालवाहतुकीसाठी स्वतंत्र रस्ते अथवा मार्ग, महत्त्वाच्या पर्यटन स्थळी जाणारे सुधारित रस्ते इत्यादी योजनांचा समावेश करता येईल. जलवाहतुकीच्या प्रकल्पाकडे विशेषतः मुंबई व आसपासच्या जागा, शहरांमधील नद्या इत्यादीं प्रकल्पांचा यामध्ये समावेश करावा लागेल. महाराष्ट्राला लाभलेल्या किनाऱ्याचा वाहतुकीसाठी उपयोग करण्याची गरज आहे. यामुळे किनारपट्टीतील पर्यटनस्थळांचा विकास होईल. औरंगाबाद, सोलापूर, कोल्हापूर, नांदेड यांसारख्या अनेक शहरांमध्ये मेट्रो, मोनो रेल, स्वतंत्र बस मार्गिकासारख्या प्रकल्पांच्या सुसाध्यतेचा विचार आतापासूनच करायला हवा. शिर्डी विमानतळाचा अनुभव बघता पंढरपूर, नांदेड, अकोला (शेगाव) इत्यादीसारख्या स्थळांना जोडणारी विमानसेवा पुढील काही वर्षांमध्ये सुरू करावी लागेल. पुढील दोन ते तीन दशकाचा विचार करून त्या दृष्टीने महाराष्ट्राने आतापासूनच पावले उचलण्यास सुरुवात केल्याचे विविध प्रकल्पांवरून दिसून येते.

संदर्भ : ■ आर्थिक पाहणी अहवाल २०१९-२०, ■ भारतीय दूरसंचार विनियामक प्राधिकरणाचे संकेतस्थळ ■ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ ■ सार्वजनिक बांधकाम विभाग ■ श्री. अशोक दातार, वाहतूक नियोजन तज्ज्ञ ■ श्री. अमोल खैर, पायाभूत सुविधा व नगर नियोजन तज्ज्ञ ■ साप्ताहिक लोकप्रभा, दि. सुहास जोशी । सप्टेंबर १, २०१७ सप्टेंबर ८, २०१७ ■ श्री. अशोक पेंडसे, विद्युत क्षेत्रातील अभ्यासक

विभागीय संपर्क अधिकारी

संग्रहित

महिला विकास : नवतेजस्विनींची झेप

महाराष्ट्र राज्याची पुरोगामी भूमिका आणि धोरणे महिला व बालविकासाच्या क्षेत्राच्या विकासासाठी कारणीभूत ठरली आहेत. केवळ 'चूल आणि मूल' या भूमिकेतून बाहेर पडत राज्यातील महिला सर्वच क्षेत्रात यशस्वी वाटचाल करत आहेत. हे त्या महिलांच्या जिद्द, कष्ट आणि संघर्षाबरोबरच महिला आणि बालविकास क्षेत्रामध्ये शासनाकडून वेळोवेळी झालेल्या सुधारणा, कायद्यांबरोबरच या क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या, सामाजिक संस्था आदी अनेक घटकांच्या कार्याचेही फलित आहे. शेतीपासून विज्ञान-तंत्रज्ञान, उद्योग, राजकीय, सामाजिक आदी सर्वच क्षेत्रात महिला कर्तृत्व गाजवत असल्याचे आज दिसून येते.

सचिन गाढवे

महाराष्ट्राची लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनुसार) ११ कोटी २३ लाख ७४ हजार असून यात ५ कोटी ८२ लाख ४३ हजार पुरुष तर ५ कोटी ४१ लाख ३१ हजार स्त्रिया आहे. यापैकी सुमारे ३ कोटी स्त्रिया ग्रामीण भागात तर २ कोटी ४१ लाख स्त्रिया शहरांमध्ये राहतात. प्रतिहजार पुरुषांमागे ९२९ स्त्रियांची संख्या आहे. ग्रामीण आणि शहरी महिलांच्या जीवनमानात तसेच त्यांच्या समस्यांमध्येही फरक आहे. मात्र, स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच समान वागणूक मिळावी, त्यांना प्रगतीची दारे कायम उघडी राहावीत यासाठी राज्य शासन महिला व बालकल्याण विकास विभागाच्या माध्यामातून विविध कार्यक्रम राबवत आहे. गेल्या ६० वर्षात राज्याच्या धोरणाचा एकत्रित परिणाम म्हणून आज राज्यातील महिला सर्वच क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहेत.

स्वतंत्र विभागाची निर्मिती

शासनाने १४ ऑगस्ट १९९१ ला समाज कल्याण विभागातून महिला, बाल व अपंग संचालनालयाची निर्मिती केली. नंतर जून १९९३ मध्ये पुन्हा अपंग कल्याण विभाग समाज कल्याण विभागास जोडण्यात आला. पुढे फेब्रुवारी, २००० मध्ये महिला आणि बाल कल्याण संचालनालयाचे आयुक्तालयात रूपांतर झाले. जून १९९३ मध्ये राज्यस्तरावर महिला व बालविकास विभागाची स्वतंत्र प्रशासकीय विभाग म्हणून स्थापना केली. महिला व बालविकासांचे जीवनमान, सुरक्षा, विकास आणि समाजातील सहभाग या बाबी समग्रपणे झाल्या पाहिजेत यावर लक्ष केंद्रित करणे हा विभागाच्या स्थापनेमागील मुख्य उद्देश आहे. महिला व बालकांशी संबंधित धोरण तयार करणे, कार्यक्रम, योजना तयार करणे, योजनांची अंमलबजावणी करणे तसेच विकास कार्यात काम करणाऱ्या सरकारी आणि समाजसेवी संस्थांमध्ये समन्वय साधणे ही या विभागाची दायित्वे आहेत.

महिला व बालविकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली पुणे स्थित राज्याचे महिला व बाल विकास आयुक्तालय, नवी मुंबई येथील एकात्मिक बाल विकास

सेवा योजना आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, महिला आर्थिक विकास महामंडळ, राजमाता जिजाऊ माता- बाल आरोग्य आणि पोषण अभियान ही कार्यालये, आयोग, महामंडळ कार्यरत आहेत. राज्य शासनाच्या शाश्वत ध्येयांपैकी 'स्त्री- पुरुष समानता आणि सर्व महिला आणि मुलींचे सक्षमीकरण' हे एक ध्येय आहे.

स्वतंत्र महिला व बालविकास विभागाची स्थापना होण्यापूर्वी महिलांचे संरक्षण आणि कल्याण इतपत मर्यादित स्वरूपात पाहिले जात होते. परंतु पुढील काळात महिलांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सक्षमीकरण, पुनर्वसन, त्यांच्या जीवनमानात बदल घडवून आणणे आदी अनेक आयामानुसार काम होऊ लागले.

चळवळींचा वारसा

महिला उद्धाराची चळवळ आपल्याकडे स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच जोमाने सुरू होती. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख अशा अनेक समाजसुधारक आणि कृतिअग्रणींनी यामध्ये मोठे योगदान दिले आहे. जागतिक स्तरावरही महिला कल्याण, मुक्तीच्या चळवळी चालू होत्या. स्त्री-पुरुष समानतेचे धोरण स्वीकारण्याची गरज त्यातून व्यक्त होत होती. त्यातूनच संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेच्या (इकोसोक) महिला आयोगाने (कमिशन ऑन द स्टेटस आफ वुमेन - सीएसडब्ल्यू) १९७५ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून जाहीर केले. त्याचबरोबरीने १९७६-१९८५ हे 'संयुक्त राष्ट्रे महिला दशक' म्हणून जाहीर केले. सर्वच क्षेत्रात महिलांना समानतेची वागणूक आणि संधी मिळावी यासाठी प्रयत्न सुरू झाले. लिंगभेदाच्या आधारे होणारा अत्याचार रोखणे, शेतीच्या मालकीत महिलांना हक्क तसेच इतर मानवी हक्क मिळण्यासाठी धोरणे आखणे आणि सर्व जगात त्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रयत्न करणे असे काम सुरू झाले.

भारतातही १९७५ नंतर स्त्री संघटनांच्या कृतिशील चळवळींना प्रारंभ झाला. महाराष्ट्रातही महिला अत्याचारविरोधी चळवळ, हुंडाविरोधी चळवळ, महागाईविरोधी आंदोलने आदी अनेक आंदोलने उभी राहिली. स्त्रीमुक्ती संघटना, पुरोगामी महिला संघटना, नारी समता मंच, समाजवादी महिला सभा, स्त्री आधार केंद्र आदी स्त्री संघटना, संस्थांनी महिलांवरचे अन्याय- अत्याचार, हुंडाबळी, स्त्री-भ्रूण हत्या, लैंगिक अत्याचार आदी प्रश्नांवर आवाज उठवला. वेगवेगळ्या स्त्री संघटनांना एकत्र आणून 'स्त्री मुक्ती आंदोलन संपर्क समिती'च्या माध्यमातून काम केले गेले.

पहिले महिला धोरण

१९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाच्या स्थापनेनंतर लगेचच महाराष्ट्राने १९९३ च्या कायद्याने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना केली. महिलांच्या समस्यांकडे गांभिर्याने पाहताना राज्याने २२ जून १९९४ रोजी देशातील पहिले महिला धोरण जाहीर केले. हे धोरण म्हणजे 'महिलांच्या मुक्तीचा जाहीरनामा' आहे असे धोरणातच नमूद केले होते. स्त्री- पुरुष समानतेच्या आधारावर कायदे बदल करणे, कृती कार्यक्रम आखणे यासाठी शासनाच्या सर्व विभागांना सूचना दिल्या गेल्या. पुढे २००१ मध्ये राज्याने दुसरे महिला धोरण जाहीर केले. महिलांना केंद्रस्थानी मानून नियोजन, महिलांसाठी सनद, महिला सक्षमीकरणासाठी निधी, जेंडर ऑडिट, महिलांचा सहभाग, स्वयंसाहाय्यता गटांमार्फत महिलांचा आर्थिक विकास व सक्षमीकरण, कृषी आणि ग्रामीण विकास क्षेत्रात महिलांची भूमिका, शिक्षण, आरोग्य, प्रसाधनगृहांच्या सुविधा, पाणीपुरवठा, पाळणाघराच्या सुविधा, बालविवाहास प्रतिबंध, सुरक्षा व संरक्षण, वसतिगृह, महिलांना मालमत्तेचा हक्क, आपदग्रस्त महिलांचे पुनर्वसन, कामाचा सन्मान, एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या यंत्रणेचा महिला सक्षमीकरणासाठी वापर, स्वयंसेवी संघटन आदी उद्दिष्टांचा समावेश करण्यात आला.

२०१४ मध्ये राज्याचे तिसरे महिला धोरण बनवण्यात आले असून त्याच्या अंमलबजावणीसाठी महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर प्रयत्नशील आहेत. महिलांच्या कल्याणाची जबाबदारी केवळ महिला व बालविकास विभागाचीच नसून प्रत्येक विभागाने महिलांना समोर ठेऊन कायद्यामध्ये सुधारणा करण्याचे

सुदृढ बालक, सक्षम महिला

गेल्या ६० वर्षांत महाराष्ट्रात महिला आणि बालकांच्या विकासासाठी राज्य शासनाकडून मोठे काम झाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण, बचतगट चळवळींमुळे महिलांचा सामाजिक, आर्थिक स्तर उंचावला. आम्ही जिल्हास्तरीय यंत्रणांची संवेदनशीलता वाढवण्यावर भर देत आहोत. माविमच्या माध्यमातून महिला बचतगट चळवळ अधिक सक्षम केली जात आहे. एकूणच 'सुदृढ बालक, सक्षम महिला, सुपोषित महाराष्ट्र' ही जनचळवळ व्हावी, यासाठी आम्ही सर्व शक्तीने प्रयत्न करू.

- ॲड. यशोमती ठाकूर, महिला व बालविकास मंत्री

ग्रामीण महिलांना संधी

१९९३ मधील ७३वी घटनादुरुस्ती होण्याआधीच महाराष्ट्रात १९९२ च्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांमध्ये महिलांना ३० टक्के जागा राखीव करण्यात आल्या होत्या. हा महिलांसाठी क्रांतिकारी निर्णय आहे. ७३व्या घटना दुरुस्तीनंतर देशातील पंचायत राज संस्थांमध्ये हे आरक्षण एकूण जागांच्या १/३ (३३ टक्के) इतके करण्यात आले. पण महाराष्ट्राने त्यापुढे जाऊन ८ मार्च २०११ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के इतके आरक्षण जाहीर केले. महिलांना राजकीय सत्तेत समान वाटा मिळवून देण्याचा राज्याचा निर्णय पुरोगामी ठरला.

स्त्री शिक्षण, आरोग्य या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर काम सुरू आहे. मुलींना इयत्ता १२वीपर्यंत मोफत शिक्षण, ग्रामीण भागातील इयत्ता पाचवी ते १२ वी पर्यंतच्या मुलींना शाळेत जाण्यासाठी एस.टी.ने मोफत प्रवासाची सवलत देण्यात येते. ग्रामीण भाग व 'क' वर्ग नगरपरिषद क्षेत्रातील मुलींचे शैक्षणिक गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी दारिद्र्यरेषेखालील इयत्ता ८ वीच्या मुलींना मोफत सायकल वाटपाची 'राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना' राबवली जाते. इयत्ता पाचवी ते १० वी मधील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थिनींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना राबवली जाते. सामाजिक न्याय विभागामार्फत मुलींसाठी शासकीय वसतिगृहे चालवली जातात. ग्रामीण भागातील मुली महाविद्यालयीन शिक्षणापासून वंचित राहू नयेत, यासाठी तालुकास्तरावर प्रियदर्शनी वसतिगृहे सुरू करण्याची योजना सुरू करण्यात आली आहे.

संग्रहित

धोरण राबवले जात आहे. केंद्रीय तसेच राज्याच्या महिला धोरणांचा परिपाक म्हणून महिलांना समानता मिळवून देण्यासाठी अनेक कायदे बनवण्यात आले. महिलांना संपत्तीमध्ये समान अधिकार देण्यासाठी २००५ मध्ये हिंदू वारसा हक्क कायद्यात सुधारणा करण्यात आली. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ नुसार आता महिलांना शिधापत्रिकेमध्ये कुटुंबप्रमुखाचा मान दिला जातो. त्यामुळे महिलांचा सन्मान वाढण्यास मदत झाली आहे. महिलांचा कुटुंबात होणारा छळ रोखण्यासाठी कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ मध्ये करण्यात आला.

महिलांचा गौरव

कर्तृत्ववान महिलांचा गौरव करण्याची महाराष्ट्राची परंपरा आहे. महिलांना शिक्षणाची कवाडे उघडी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेल्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव पुणे विद्यापीठास देऊन त्यांचा गौरव केला आहे. तसेच सोलापूर विद्यापीठाचा नामविस्तार करत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे तर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला बहिणाबाई चौधरी यांचे नाव देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. महिलांचे कल्याण, शिक्षण आदी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सावित्रीबाई फुले पुरस्कार, महिला व बालविकास क्षेत्रातील कार्याबद्दल अहिल्यादेवी होळकर पुरस्कार, आरोग्य क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल डॉ. आनंदीबाई जोशी पुरस्कार आदी पुरस्कार देण्यात येतात. देवदासींच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना दिवंगत लताताई सकट यांच्या नावाने राज्य स्तरावर पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो.

राज्यात शासकीय, निमशासकीय सेवांमध्ये महिलांना अधिकच्या संधी मिळाव्यात यासाठी ३० टक्के समांतर आरक्षण देण्यात आले आहे. शेती आणि शेतीसंलग्न व्यवसायांमध्ये ग्रामीण महिला प्रचंड कष्ट घेतात. त्यांच्या कामाला मान्यताही मिळत असली तरी कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत महिलांचा वाटा अजून वाढण्यासाठी प्रयत्न होण्याची गरज आहे. शासनाने कृषी विभाग, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय आदी विभागाच्या विविध योजनात महिला तसेच महिलांच्या स्वयंसाहाय्यता गटाला प्राधान्य देण्याचे धोरण अंवलंबले आहे.

संधींची उपलब्धता

महिला उद्योजकांसाठी स्वतंत्र धोरण राबवणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. महिला संचलित उद्योगांचे सध्या ९ टक्क्यांच्या दरम्यान असलेले प्रमाण २० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. त्यामध्ये एमआयडीसीमध्ये प्राधान्याने भूखंड वाटप, कर्ज सुविधा आणि आर्थिक पाठबळ देण्यासारखे कार्यक्रम ठरवले

आहेत.

एसटीमध्ये वाहक म्हणून महिलांची नेमणूक, महिलांना रिक्षा, टॅक्सी परवाने, महावितरणमध्ये विद्युत साहाय्यक म्हणून नेमणूक अशा निर्णयांमुळे महिलांच्या सक्षमीकरणास हातभार लागत आहे. एसटी महामंडळात चालकपदासाठीच्या अटी व शर्ती शिथिल करून खास महिलांसाठी भरतीप्रक्रिया राबवण्यात आली. त्यातून पात्र महिलांना वाहनचालक प्रशिक्षण देण्याचे काम सुरू आहे. अशा प्रकारे जी कामे पूर्वी केवळ पुरुषांची गणली जात होती तेथे आता महिला अत्यंत समर्थपणे आपला ठसा उमटवत आहेत.

महिला प्रगतीच्या मार्गावर चालत असतानाना स्त्री-भ्रूण हत्या, बालविवाह या समस्याही समोर आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार शून्य ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची संख्या साधारणतः १ कोटी ३३ लाख इतकी असून स्त्री-पुरुष लिंगदर ८९४ इतका आहे. स्त्री भ्रूण हत्या रोखण्यासाठीस गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदानतंत्र कायदा, १९९४ (पीसीपीएनडीटी ॲक्ट) अंमलबजावणी केली जाते. महाराष्ट्रात अशा स्वरूपाचा कायदा १९८८ मध्येच लागू केला होता. असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. प्रसवपूर्व निदान तंत्राचा दुरुपयोग होऊ नये म्हणून तालुका, जिल्हा आणि राज्य पातळीवर दक्षता समित्या स्थापन करण्यात आलेल्या असून त्यांच्या माध्यमातून कार्यक्षेत्रातील सोनोग्राफी सेंटर्स, गर्भपात केंद्रांची तपासणी केली जाते.

महिला व बालविकास विभागामार्फत समाजातील निराधार, निराश्रित पीडित महिला, बालके यांच्याकरिता विविध योजनांच्या माध्यमातून त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक उन्नतीसाठी तसेच त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी काम केले जाते.

पुनर्वसन

राज्यात २० शासकीय महिला राज्यगृहे (संरक्षण गृहे म्हणूनही घोषित) आणि ६ आधारगृहे स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून कार्यरत आहेत. या योजनेंतर्गत निराधार, निराश्रित, परित्यक्ता, कुमारीमाता, संकटग्रस्त व अत्याचाराला बळी पडलेल्या महिलांना आश्रय, संरक्षण व मूलभूत सुविधा पुरवून त्यांचे नोकरी, व्यवसाय आणि विवाह याद्वारे पुनर्वसन करण्यात येते. राज्यात दोन शासकीय तर स्वयंसेवी संस्थांची पाच संरक्षण गृहे आहेत. कुंटणखान्यातून सोडवलेल्या व न्यायालय, बालकल्याण समितीच्या आदेशाने पीडितेस संस्थेत दाखल करून त्यांच्या पुनर्वसनासाठी केलेल्या प्रयत्नांतून आज अनेक महिलांचे जीवन सर्वसामान्य झाले आहे. अनाथालये, महिला स्वीकार केंद्र व सुरक्षा गृहातील निराश्रित मुलींच्या विवाहासाठी, देवदासी किंवा देवदासींच्या मुलींच्या विवाहासाठी, देवदासींच्या मुलींच्या १० वीपर्यंतच्या शिक्षणासाठी आर्थिक साहाय्याच्या योजना राबवल्याने या मुली शिकत आहेत. याबरोबरच महिला व बालकांच्या बाबतीत घडणाऱ्या अत्याचारास आळा बसावा या हेतूने राज्यात महिला समुपदेशन केंद्रे पोलीस ठाण्यांच्या आवारात सुरू केलेली आहेत. महिला आणि पोक्सो कायद्यांतर्गत १८ वर्षाखालील बालके जी लैंगिक अत्याचार, बलात्कार आणि ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडली आहेत अशा पीडितांच्या पुनर्वसनासाठी 'मनोधैर्य योजना' राबवली जाते. यामध्ये ३ ते १० लाख रुपयांपर्यंतचे अर्थसाहाय्य तसेच समुपदेशन आणि अन्य योजनांच्या माध्यमातून पुनर्वसनासाठी प्रयत्न केला जातो. केंद्र शासनाच्या योजनांचीदेखील राज्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. नोकरी करणाऱ्या महिलांसाठी केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत सध्या ६१ वसतिगृहे कार्यरत आहेत. संकटग्रस्त महिलांसाठी स्वाधार योजनेंतर्गत (स्वाधारगृह-सध्या ९ कार्यरत) त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांसोबतच वैद्यकीय, व्यवसाय प्रशिक्षण, मानसोपचार, समुपदेशन आदी सुविधा दिल्या जातात. महिला व मुलींचे लैंगिक शोषण आणि अन्य कारणांसाठी होणाऱ्या मानवी वाहतुकीला (ट्रॅफिकलिंग) आळा घालण्यासाठी तसेच पुनर्वसनासाठी 'उज्ज्वला योजना' राबवण्यात येत आहे. त्याअंतर्गत आतापर्यंत ५ 'उज्वला होम' कार्यान्वित झाली आहेत.

महिलांचा प्राथम्याने विचार करताना त्यांच्या विविध समस्या सोडवण्यावर राज्य शासनाने भर दिला आहे. विशेषतः मुलीचा विवाह हा आर्थिक ताणाचा राहू नये आणि ही सामाजिक समस्या दूर

सखी केंद्र

शारीरिक व मानसिक अत्याचार, आर्थिक छळवणूक आदी प्रकरणात महिलेस व तिच्या कुटुंबीयास न्याय मिळण्यासाठी तथा वैद्यकीय उपचार, पोलीस साहाय्य, मानसोपचार, अल्प कालावधीसाठी निवारा, अन्न व इतर मदत एकाच छताखाली मिळण्यासाठी ही केंद्रे स्थापित करण्याची योजना आहे. सध्या राज्यात ३५ जिल्ह्यांत ३६ सखी केंद्रे कार्यरत आहेत.

माविमचा भक्कम आधार

आंतरराष्ट्रीय महिला वर्षानिमित्त १९७५ ला स्थापन झालेले महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) हे महिलांच्या सामाजिक, आर्थिक सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. 'माविम'ला राज्य शासनाने महिला विकासाची राज्यस्तरीय शिखर संस्था केली आहे. माविमअंतर्गत सुमारे १ लाख ३९ हजार महिला स्वयंसाहाय्यता बचत गट स्थापन केलेले असून सुमारे १७ लाख महिला जोडल्या आहेत. ग्रामविकास समित्या व क्लस्टर स्तरावर स्वयंसाहाय्य बचतगटांचे फेडरेशन अर्थात लोकसंचलित साधन केंद्रे (सीएमआरसी) स्थापन करण्यात आली आहेत. कौशल्य विकासांतर्गत महिलांना नवीन कौशल्याची ओळख करून देणे, आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे तसेच त्यांच्याकडून उत्पादित मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. 'ई-बिझनेस' प्लॅटफॉर्म हे मॉड्यूल माविमकडून विकसित करण्यात आले असून त्या माध्यमातून महिला आपली आर्थिक उन्नती साधत आहेत.

व्हावी यासाठी शेतकरी, शेतमजूर, निराधार, निराश्रित विधवांच्या मुलीच्या विवाहासाठी १० हजार रुपये अनुदान, तसेच सामूहिक विवाह आयोजित करणाऱ्या संस्थेलाही प्रोत्साहनात्मक अनुदान देण्याची शुभमंगल सामूहिक विवाह योजना राबवण्यास सुरुवात केली आहे. विशेषतः ग्रामीण महिलांसाठी जिल्हा परिषदेतर्फे विविध काम केले जाते.

कौटुंबिक हिंसाचार थांबवणे

राज्यात जिल्हा व तालुका स्तरावर संरक्षण अधिकाऱ्यांची व विधी सल्लागारांची नेमणूक केली आहे. २००६ ते मार्च २०१९ अखेर संरक्षण अधिकाऱ्यांकडे ९९ हजार ६३३ कौटुंबिक हिंसाचाराची प्रकरणे प्राप्त झाली. त्यापैकी ८७ हजार ५४६ प्रकरणे न्यायालयात दाखल झाली. त्याद्वारे ५ हजार ९५० संरक्षण आदेश, १ हजार ८ मुलांच्या ताब्याचे आदेश, ४ हजार ७३४ नुकसारभरपाईचे आदेश, ३ हजार ३६० निवासाचे आदेश, ७ हजार ३२ अर्थसाहाय्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. या अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी टाटा समाज विज्ञान संस्थेसोबत सामंजस्य करार करून 'व्हॉयलन्स अगेन्स्ट वुमेन' (व्हीएडब्ल्यू) कक्ष स्थापित करण्यात आले आहेत. सध्या राज्यातील शंभरहून अधिक पोलीस ठाण्यांच्या आवारात हे कक्ष कार्यरत आहेत.

कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम २०१३ च्या अंमलबजावणीसाठी सर्व जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या आणि स्थानिक तक्रार समित्या स्थापल्या आहेत. मे २०१८ अखेर राज्यात ५ हजार २३८ अंतर्गत समित्या (विशाखा समिती) स्थापल्या आहेत.

संकटग्रस्त महिलांसाठी विविध हेल्पलाईन कार्यरत आहेत. कोविड-१९ काळामध्ये संपूर्ण जगभरातच महिलांवरील कौटुंबिक अत्याचाराच्या घटनांत वाढ झाल्याचे आढळून आले. त्यामुळे 'व्हॉयलन्स अगेन्स्ट वुमेन' (व्हीएडब्ल्यू) कक्षाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या 'मला बोलायचे आहे' या हेल्पलाईनवर सुमारे ८ हजारहून अधिक कॉल आले. राज्य महिला आयोगाच्या 'सुहिता' हेल्पलाईनवरही मदतीसाठी कॉल आले. त्यामध्ये आवश्यकतेप्रमाणे मदत करण्यात आली. महिलांच्या तक्रारी हाताळण्यासाठी '१८१' हा विशेष टोल फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यासाठी प्रकिया सुरू केली आहे.

राज्य शासन सामाजिक न्याय भवनच्या धर्तीवर प्रत्येक जिल्ह्यात महिला विकास भवनची स्थापना करणार आहे, त्यामुळे महिला आणि बालकांशी संबंधित विविध योजनांच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याने नागरिकांना वेगवेगळ्या ठिकाणी जावे लागण्याचा त्रास, वेळ आणि खर्च वाचणार आहे. तसेच राज्य महिला आयोगाचे प्रत्येक महसुली विभागस्तरावर कार्यालय सुरू करण्यात येणार असून त्यामुळे महिलांचे श्रम आणि पैसा वाचणार आहे.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत (आयसीडीएस) ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना, किशोरी योजनेतील किशोरवयीन मुली, गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांनाही पोषण

सुहिता हेल्पलाईन संग्रहित

आहार दिला जातो. इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजनेंतर्गत अमरावती व बुलडाणा जिल्ह्यात गर्भवती आणि स्तनपान कालावधीत महिलांना वेतन नुकसानभरपाई म्हणून रोख रक्कम देण्यात येते.

आर्थित उन्नतीसाठी प्रयत्न

महिला सक्षमीकरण आणि आरोग्य व स्वच्छता या विषयावरील कामासाठी विविध संस्थांबरोबर भागीदारी करण्यात आली आहे. 'तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम' राज्य शासनाने आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी (आयफॅड)च्या साहाय्याने २००७ ते २०१८ मध्ये राबवला. आता आयफॅड आणि राज्य शासनाच्या अर्थसाहाय्यातून 'नव तेजस्विनी-महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प' हा ५२३ कोटी रुपये खर्चाचा प्रकल्प राबवण्यात येणार असून १० लाख ग्रामीण कुटुंबांना दारिद्र्यरेषेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न होणार आहे. तसेच 'विकेल ते पिकेल' या या योजनेनुसार मागणीच्या अनुषंगाने उत्पादनांवर भर दिला जाणार आहे. समाजातील अतिगरीब महिला, तसेच कर्जाच्या विळख्यामध्ये अडकलेल्या महिलांना दारिद्र्याच्या दुष्टचक्रामधून बाहेर काढण्यासाठी नियोजन विभागाच्या साहाय्याने 'तेजश्री फायनान्शिअल सर्व्हिसेस' हा उपक्रम राबवण्यात येत आहे. एकाच ठिकाणी प्रशिक्षण, उत्पादन तथा विक्री केंद्र अशा संकल्पनेवर आधारित 'माविम घर' गडचिरोली, भंडारा, वाशिम व हिंगोली येथे बांधलेली असून त्यांचा बचतगटातील महिलांना उपयोग होत आहे.

ग्रामीण जीवनोन्नती अभियान

ग्रामीण भागातील गरिबीचे निर्मूलन करण्यासाठी केंद्र शासनाने २०११ मध्ये दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची (डीएवाय-एनआरएलएम) सुरुवात केली. त्यानुसार राज्यात 'उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान' राबवण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत ग्रामीण भागातील गरीब, वंचित, दुर्लक्षित, अनुसूचित जाती, अनुसुचित जमाती, अल्पसंख्याक, आदिवासी, आदिमजमाती, दिव्यांग, विधवा, परित्यक्ता व जोखीमप्रवण कुटुंबातील महिलांचे स्वयं साहाय्यता गट, गटांचे ग्रामसंघ व प्रभागसंघ तयार करण्यात येतात. तसेच उत्पादक संघ व महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना करण्यात येते. या सर्व समुदायस्तरीय संस्थांची क्षमता बांधणी करण्यात मोठ्या प्रमाणात प्रयत्न करून त्यांना उपजीविकेचे स्रोत निर्माण करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. आतापर्यंत राज्यात सुमारे पावणेपाच लाख स्वयं साहाय्यता गट निर्माण झालेले असून राज्यातील जवळपास ५२ लक्ष कुटुंबे अभियानाशी जोडलेली आहेत. बँकेच्या माध्यमातून ७ हजार ४९७ कोटीचे कर्ज स्वयं साहाय्यता गटांना उपलब्ध करून दिले असून १८ लक्ष कुटुंबांकडे उपजीविकेचे स्रोत निर्माण झालेले आहेत. महिलांना त्यांच्या गरजेनुसार सहज कर्ज उपलब्ध व्हावे या हेतूने अभियानांतर्गत निर्माण झालेल्या स्वयं साहाय्यता गटांसाठी महिला बँक स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

संग्रहित

राज्य महिला आयोग

राज्यात १९९३ मध्ये राज्य महिला आयोग स्थापन करण्यात आला. संकटग्रस्त महिलांना मोफत कायदेविषयक सुविधा पुरवणे, महिलांच्या प्रश्नांबाबत संशोधन करणे, समाजात लिंगसमानता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे, कायदेविषयक साक्षरता मोहीम राबवणे, समुपदेशन करणे, महिलांकडून आलेल्या तक्रारींवर सुनावणी करणे, महिला अत्याचार आदी स्वरूपाच्या गंभीर प्रकरणात स्वयंप्रेरणेने हस्तक्षेप करून कार्यवाहीचे निर्देश देणे आदी स्वरूपाच्या अधिकारातून आयोग काम करतो. आयोगाने कोविड-१९ काळामध्ये राज्यभरातील ५ हजार युवतींना डिजिटल साक्षर करण्याचा 'डिजिटल स्त्री शक्ती' उपक्रम स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्यातून हाती घेतला आहे.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन विविध उपक्रम राबवत असून त्याचे सकारात्मक परिणाम आज समाजाच्या सर्व स्तरांत दिसून येत आहेत. महाराष्ट्र आज विकसित राज्य आहे त्यामागे येथील महिलांचे कष्ट हे एक प्रमुख कारण आहे.

(**संदर्भ :** दिलीप हिवराळे आणि संगीता बिरारीस, उपायुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे, महेंद्र गमरे, माविम, मुंबई)

विभागीय संपर्क अधिकारी

संग्रहित

वंचितांचा विकास : ३६० अंश दृष्टिकोन

सामाजिक न्यायाचे समता, स्वातंत्र्य व बंधुत्व हे तत्त्व आहे. समाजातील सर्व घटक विशेषत: अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्याक, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, अत्याचारपीडित, निराधार अशा घटकांना न्याय व सामाजिक लाभात समान हिस्सा मिळवून देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. भारतीय राज्यघटनेत समाविष्ट असलेल्या राज्य धोरणाच्या निर्देशक तत्त्वांनुसार दुर्बल घटकांना समाजातील इतर घटकांच्या समान पातळीवर आणण्यासाठी व त्यांना उपजीविकेची साधने उपलब्ध व्हावित यासाठी राज्य शासनाने गेल्या ६० वर्षात विविध शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास कार्यक्रम हाती घेतले असून त्याचे प्रतिबिंब आजच्या समाजात दिसून येत आहे.

दत्तात्रय कोकरे

सामाजिक सुधारणांचा खूप मोठा वारसा महाराष्ट्राला लाभला आहे. वंचित आणि उपेक्षित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणताना त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी लढलेल्या लढ्याला स्वातंत्र्योत्तर काळात ऐतद्देशीय सरकारांनी न्याय देण्याचे कार्य केले. विशेषतः महाराष्ट्रात सामाजिक एकोपा निर्माण व्हावा आणि सर्व समाजघटकांना न्याय मिळावा यासाठी राज्य स्थापनेपासून विशेषत्वाने लक्ष दिले आहे. त्याचाच परिणाम आज महाराष्ट्र सामाजिकदृष्ट्या देशातील इतर राज्यांत अग्रेसर राहिले आहे.

आवश्यक सुविधा उपलब्ध

महाराष्ट्रात १९३२ ला 'बॅकवर्ड क्लास वेलफेअर' या नावाने समाज कल्याण विभागाची सुरुवात झाली. या विभागातून वेळोवेळी वेगवेगळे विभाग, संचालनालय व आयुक्तालय स्वतंत्र करण्यात आली. १९५६ ला पुणे येथील समाज कल्याण संचालनालय, १९७२ ला नाशिक येथील आदिवासी विकास आयुक्तालय तर १९८३ मध्ये स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची स्थापना झाली. १९९१ ला महिला व बालविकास विभागांतर्गत पुणे येथील महिला व बालविकास आयुक्तालय, १९९९ ला सामाजिक न्याय विभागांतर्गत पुणे येथील दिव्यांग विकास आयुक्तालय, २००० ला सामाजिक न्याय विभागांतर्गत पुणे येथील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय तसेच २०१७ ला इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग हा स्वतंत्र विभाग करण्यात आला असून २०२० ला त्याचे नाव इतर मागास बहुजन कल्याण विभाग असे करण्यात आले आहे. काळानुरूप बदल घडवत सर्व सामाजिक घटकांना विकासप्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी त्या त्या वेळी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात राज्य शासन नेहमीच अग्रेसर राहिले आहे.

उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन

राज्यातील डोंगरी आणि दुर्गम भागात आदिवासी मुलांसाठी शासकीय निवासी आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा आहेत. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यासाठी महसुली विभाग, जिल्हा व तालुकास्तरावर मोफत शासकीय वसतिगृहे उपलब्ध करून दिली आहेत. यामध्ये भोजन, गणवेश, शैक्षणिक साहित्य व इतर सवलतीही मोफत दिल्या जातात. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी 'इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षण' ही योजना सुरू केली आहे. पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वयं योजना या योजनेत आदिवासी शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना बारावीनंतरच्या उच्च शिक्षणाकरिता भोजन, निवास व शैक्षणिक साहित्यासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी राज्य शासनाने शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे.

निवासी शाळा, आश्रम शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले जात असून, उच्च शिक्षणातील सर्वात मोठी अडचण असते ती ग्रामीण विद्यार्थ्यांना शहरात राहण्याची सोय नसणे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या अनुसूचित जाति-जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरात निवासाची आणि भोजनाची मोफत सोय उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने विविध योजना राबवल्या आहेत. त्याचाच परिणाम आज उच्च शिक्षणातील अनुसूचित जाति-जमातीचा टक्का वाढला आहे. याबरोबरच परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समतेचे विचार जनसामान्यात रुजवला जावा त्याबरोबच अनुसूचित जातींच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते उपक्रम राबवण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या पुणे येथील बार्टी अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेने आपल्या उद्देशानुसार केलेले कार्य राज्यातील अनुसूचित समाजाच्या विकासात महत्त्वाचे योगदान देत आहे.

सर्वसमावेशक विकास

महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून येणाऱ्या काळात राज्यातील वंचित, उपेक्षित घटकांच्या सर्वांगीण, सर्वसमावेशक विकासावर भर दिला जाणार आहे. त्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या माध्यमातून योजनांची विकासगंगा घराघरांत आणि मनामनांत पोहोचवण्याचा ध्यास आम्ही घेतला आहे.

- धनंजय मुंडे, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री

पायाभूत सुविधांवर भर

ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतर्गत महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांमध्ये डांबरी/सिमेंटचे रस्ते, नाले बांधकाम, विहीर दुरुस्ती, बालवाडी, पिण्याच्या पाण्याची सुविधा, सार्वजनिक शौचालय, वाचनालय, व्यायामशाळा, विजेचे दिवे आदी कामे केली जातात.

राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील कुटुंबाचे राहणीमान उंचवावे व त्यांचा निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागामध्ये त्यांचा स्वतःच्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्यासाठी रमाई आवास योजना सुरू केली आहे. अत्याचाराचे बळी ठरणारे अनुसूचित जाती व जमातीच्या कुटुंबातील सदस्यांना आर्थिक साहाय्य दिले जाते. आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना प्रोत्साहनपर अर्थसाहाय्य देण्यात येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात एक याप्रमाणे ३४ जिल्ह्यांच्या ठिकाणी सामाजिक न्याय विभागांतर्गत जिल्हास्तरीय कार्यालय व महामंडळांच्या कार्यालयासाठी इमारती बांधल्या जात आहेत. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन शेतमजूर कुटुंबांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध व्हावे म्हणून १०० टक्के अनुदानित कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबलीकरण योजना सुरू आहे.

योजना तळापर्यंत पोहोचाव्यात

शासन राबवत असलेल्या या योजनांबाबत या क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, ज्यांना या आरक्षणाचा लाभ घेता आला नाही त्यांच्यामध्ये शैक्षणिक चळवळ उभारण्याची गरज आहे. योजनांचा पुनर्विचार होऊन सध्याच्या परिस्थितीत त्या कशा फलदायी होतील याचा अभ्यास आवश्यक आहे.

महात्मा फुले विकास महामंडळ, अण्णा भाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ आणि बार्टीसारख्या संस्था समाज सक्षमीकरणात चांगला हातभार लावू शकतात. वाढते खासगीकरण आणि स्पर्धा यांचे वाढत जाणारे प्राबल्य वाढले तर खासगी उद्योगामध्ये देखील आरक्षणाची मागणी होऊ शकते. अशा परिस्थितीत खासगी क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी लागणारी क्षमता, कौशल्य असलेले व्यक्तित्व उभे करणे गरजेचे आहे.

प्रगती झाली, तरी...

महाराष्ट्राच्या निर्मितीपासून अनुसूचित जातींनी बरीच प्रगती केली आहे त्यांच्या प्रतिव्यक्ती उत्पन्नात सुधारणा झाली आहे व दारिद्र्य कमी झाले आहे. त्यांची शैक्षणिक पातळी व घरे तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा यासारख्या नागरी सुविधा सुधारल्या आहेत. तरीही अनुसूचित जाती इतरांपेक्षा मागे पडत आहेत. असे या क्षेत्रातील अभ्यासकांचे निरीक्षण आहे.

२०१२ नुसार, अनुसूचित जातींचे प्रतिव्यक्ती उत्पन्न कमी आहे. नागरी सुविधांमध्ये अनुसूचित जातीचा प्रवेश सहभाग कमी आहे, त्यांच्या खराब घरांचे प्रमाणही अधिक आहे ते जवळपास १४ टक्के इतके आहे. इतर मागास जातीतील हे प्रमाण आठ तर उच्च जातीत पाच टक्के आहे. याकडेही तज्ज्ञ लक्ष वेधतात.

एका आकडेवारीनुसार शहरात सुमारे ३२ टक्के अनुसूचित जातींची लोकसंख्या झोपडपट्टीत राहते, त्या तुलनेत एकूण पातळी २३ टक्के आहे. शौचालय नसलेल्या घरांचे प्रमाण अनुसूचित जातीत ५५ टक्के असून अनुसूचित जातिजमातीत्तरांचे प्रमाण ४२ टक्के आहे. वीज उपलब्ध नसलेल्या घराचे प्रमाण अनुसूचित जातीत २० टक्के असून इतरांत १२ टक्के आहे. शिक्षणात - निरक्षरतेचे अनुसूचित जातीतील प्रमाण २० टक्के असून उच्च जातीत १५ टक्के आहे. उच्च शिक्षणात अनुसूचित जातींचा नोंदणी दर कमी (२७.४ टक्के) असून उच्च जातीचा ३५ टक्के आहे. याच वेळी राज्य सरासरी दर ३१ टक्के आहे. जातीय भेदभाव व अत्याचारांच्या समस्या आजही आहेत. वार्षिक पातळीवर अत्याचार होतात व सार्वजनिक सुविधा नाकारल्या जातात असे दिसते. २०१० ते २०१९ या काळात अनुसूचित जातीवरील भेदभावाची एकूण ११४८९ प्रकरणे नोंदवण्यात आलीत. त्यामुळे शासन राबवत असलेले उपक्रम गरजेचे आहेतच पण ते आणखी व्यापक होण्यासाठी सर्व समाजघटकांनीही आवश्यक तो सहभाग नोंदवला पाहिजे.

बहुजनांच्या हक्कासाठी कटिबद्ध

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या राज्यघटनेमुळे, त्यातील आरक्षणामुळे बहुजन समाज मुख्य प्रवाहात येण्यासाठी मदत झाली. आरक्षणाची अंमलबजावणी, ओबीसींसाठी मंडल आयोगाच्या शिफारशी आदींच्या माध्यमातून बहुजन समाज शिक्षण, नोकरी आणि राजकीय व्यवस्थेपासून वंचित राहू नये याची खबरदारी शासन घेत आहे. राज्यातील बहुजनांना मुख्य प्रवाहात आणण्यावर आमचा भर आहे.

- छगन भुजबळ, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

आदिवासी मुख्य प्रवाहात

सामाजिक विकासात आदिवासींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने १९८३ मध्ये आदिवासी विकास विभाग स्थापन केला आहे. आदिवासी जनतेच्या आर्थिक उन्नतीसाठी आदिवासी विकास महामंडळाची व शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचीही स्थापना करण्यात आली आहे. आदिवासींच्या जीवनावर सखोल संशोधन होऊन आवश्यक सांख्यिकी माहिती उपलब्ध होण्यासाठी पुणे येथे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. या संशोधनाच्या माध्यमातून आदिवासींच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी कार्यक्रम राबवणे शक्य होत आहे. आदिवासींना मुख्य प्रवाहात आणताना त्यांच्या हक्कांची जपणूक केली जात आहे.

पेसा कायदा अंमलबजावणी अंतर्गत अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना विकासाची कामे करण्यासाठी, आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत पाच टक्के निधी वितरित करण्यात येतो. याकरिता ग्रामपंचायतींना थेट निधी उपलब्ध करून देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या निधीतून मूलभूत पायाभूत सुविधा, वनहक्क व पेसा कायद्याची अंमलबजावणी, आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, वन्य जीव संवर्धन, जलसंधारण, वनीकरण, वन्यजीव पर्यटन व वन उत्पादने या प्रकारची कामे करून अनेक गावांनी आपल्या समस्या सोडवण्याला प्राधान्य दिले आहे.

कुपोषणमुक्तीसाठी 'अमृत आहार'

कुपोषण आणि बालमृत्यू हा आदिवासींचा सर्वात मोठा प्रश्न आहे. तो सोडवण्यासाठी शासन विविध योजनांच्या माध्यमातून आरोग्यविषयक सुविधा आणि संतुलित आहार देण्यासाठी प्रयत्न करत आहे. १६ जिल्ह्यांत राबवण्यात येत असलेल्या डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना एक वेळचा पूर्ण आहार तसेच, सात महिने ते सहा वर्षे वयोगटातील बालकांना आठवड्यातून चार वेळा अंडी किंवा केळी पुरवण्यात येतात. ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम या योजनांतर्गत अनुसूचित क्षेत्रामध्ये लहान व कायमस्वरूपी सामूहिक विकास सुविधा निर्माण करण्यात येतात. नागरी आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत

नगरपरिषद क्षेत्रातील अनुसूचित जमाती घटकांच्या वस्त्यांमध्ये अंतर्गत रस्ते, विजेची सोय, गटारे, पिण्याच्या पाण्याची सुविधा, आरोग्यविषयक सुविधा, शिक्षणविषयक सुविधा, इत्यादी सामूहिक लाभाची कामे केली जातात, बेघर किंवा ज्यांची घरे कुडा-मातीची आहेत अशा आदिवासी लाभार्थ्यांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी शबरी आदिवासी घरकूल योजना सुरू करण्यात आली आहे

प्रलंबित असलेले वनहक्क दावे व अपिले यांचा निपटारा करण्याच्या अनुषंगाने आदिवासी विकास विभागामार्फत विशेष वनमित्र मोहीम राबवण्यात येत असून या मोहिमेंतर्गत कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे.

संस्कृतीची जोपासना आवश्यक

आदिवासींचा विकास काही प्रमाणात झाला हे खरे आहे. परंतु रूढी परंपरा संस्कृती चालीरिती जपण्यासाठी आणखी प्रयत्न व्हावेत. आदिवासींच्या दृष्टीने त्यांच्या परिस्थितीचा अभ्यास करून योजना आखल्या गेल्या पाहिजे. शासनाच्या योजना चांगल्या आहेत परंतु त्यांची अंमलबजावणी चांगली करावी. गावाचा विकास गावाने करावा यासाठी नियोजन व्हायला हवे असे या क्षेत्रात कार्य करणाऱ्या जाणकारांचे मत आहे.

बहुजन कल्याण

इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग या समाजातील लोकांच्या कल्याणासाठी शासनाने स्वतंत्र विभाग स्थापन केला आहे. पुणे येथील संचालक इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकूल आवास अशा विविध योजना आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी विविध विकास कार्यक्रम राबवण्यात येत आहेत.

इतर मागास बहुजन कल्याण या विभागामार्फत इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी विविध शैक्षणिक, आर्थिक उन्नतीच्या, सामाजिक व इतर सामूहिक योजना राबवण्यात येत असून त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. शैक्षणिक योजनेमध्ये परीक्षा शुल्क, शिष्यवृत्ती, भारत सरकार शालान्त परीक्षोत्तर शिष्यवृत्ती, शासकीय वसतिगृहे व स्वयंस्फूर्त संस्थांना वसतिगृहे तसेच आश्रमशाळा व आश्रम शाळा चालवण्यासाठी मदत, इमारत अनुदान आदी योजनांचा समावेश आहे. समाजातील विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी राज्य शासनाने शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे, त्यामुळे, समाजातील विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षण घेणे शक्य होत आहे. धनगर समाजासाठी सुद्धा विविध योजना राबवण्यात येतात.

राज्यातील इतर मागासवर्ग, विजाभज व विमाप्र प्रवर्गात समावेश करण्यासाठी किंवा त्या प्रवर्गातून एखादी जात वगळण्यासाठी आलेल्या मागण्या व तक्रारींची तपासणी करण्यासाठी तसेच मागासवर्गीयांची यादीमध्ये (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता) सामाजिक, आर्थिक निकषानुसार प्रगत व उन्नत गट किंवा व्यक्ती निर्धारित करून संबंधित जात वगळण्यासाठी अभ्यासपूर्ण शिफारस राज्य शासनास करण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोग आहे.

दिव्यांगांचे सक्षमीकरण

दिव्यांग व्यक्तींच्या क्षमता ओळखणे, कौशल्य विकास करणे, समान संधी देणे, अधिकारांचे रक्षण करून सक्षमीकरण करणे, तसेच समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासन व दिव्यांग कल्याण आयुक्तालयामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

राज्य शासन सामाजिक सुरक्षेच्या विविध योजना राबवते. संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन, इंदिरा

नावीन्यपूर्ण योजना राबवणार

राज्यातील वंचित-उपेक्षित बहुजन समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. त्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी यापुढेही नावीन्यपूर्ण अशा योजना इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबवण्यात येतील.

- विजय वडेट्टीवार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री

गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तिवेतन, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तिवेतन, राष्ट्रीय कुटुंब लाभ यांसारख्या योजना राबवल्या जातात. ज्येष्ठ नागरिकांसाठीही शासनाच्या विविध विभागांमार्फत कल्याणकारी योजना राबवल्या जातात.

भटक्या जमाती

अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि इतर मागास वर्ग यांच्या आर्थिक विकासास चालना देण्यासाठी राज्य शासनाने संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादित, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्यादित ही विकास महामंडळे स्थापन केली असून त्याद्वारे २० टक्के अनुदान, बीज भांडवल, ५० टक्के अनुदान, थेट कर्ज, मुदत कर्ज, सूक्ष्म वित्तपुरवठा, महिला समृद्धी, शैक्षणिक कर्ज, इत्यादी विविध योजना राबवल्या जातात. राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ, राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, इत्यादी महामंडळांच्या विविध योजना राबवण्यासाठी त्या त्या महामंडळांना राज्याची अधिकृत यंत्रणा म्हणून प्राधिकृत केले आहे. राज्यातील आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

कौशल्यातून रोजगार निर्मिती

कोविड-१९च्या संकटातही कौशल्य विकास विभागामार्फत राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांमधून ८५ हजारांहून अधिक बेरोजगारांना रोजगार मिळाला. यापुढे देखील ही मोहीम अधिक प्रभावीपणे राबवली जाईल. अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठीही विविध योजना राबवण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, शैक्षणिक कर्ज, महिला बचतगट, मदरशांमधील मुलांसाठी अभ्यासक्रम, एमपीएससी, युपीएससी, अशा विविध योजनांमधून समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी व्यापक कार्य करण्यात येईल.

- नवाब मलिक, अल्पसंख्याक विकास मंत्री

शासन भक्कमपणे पाठीशी

महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्तांच्या प्रश्नाची काहीच सोडवणूक झाली नाही असे नाही. शासनाचे प्रयत्न, चळवळीचे प्रयत्न व गैरसरकारी संस्था-संघटनांचे प्रयत्न महत्त्वाचे आहेत. शासकीय पातळीवर के. बी. अंत्रोळीकर समिती, १९४९; एल. बी. थाडे समिती, १९६०; पी. के मिश्रा समिती, १९७१; भि. रा. इदाते समिती, १९९७; बाळकृष्ण रेणके राष्ट्रीय आयोग, २००८; भि. रा. इदाते राष्ट्रीय आयोग, २०१८ नेमले गेले. यांच्या काही शिफारशींनुसार भटक्या-विमुक्तांसाठी मंत्रालयाची निर्मिती करण्यात आली. गैरसरकारी संस्थाकडून इकोनेट रिपोर्ट, २००९; गणेश देवी (टॅग) राष्ट्रीय

सारथी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे या संस्थेच्या धर्तीवर छत्रपती शाहू महाराज यांच्या नावाने छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) मराठा, कुणबी, कुणबी- मराठा व मराठा -कुणबी व शेती व्यवसायातील बहुजन समाज यांच्या विकासासाठी ही संस्था स्थापन करण्यात आली.

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग तसेच इतर वंचित आणि दुर्लक्षित घटकांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाच्या अनुषंगाने संशोधन व अभ्यास करणे तसेच त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी विद्यार्थी, युवक-युवतीसाठी विविध उपक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी सारथी या संस्थेच्या धर्तीवर महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) स्थापना करण्यात आली आहे.

न्या. सच्चर आयोगाच्या शिफारशीनंतर महाराष्ट्र शासनाने २००८ मध्ये अल्पसंख्याकांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र अशा अल्पसंख्याक विकास विभागाची स्थापना केली असून अल्पसंख्याकांच्या विकासासाठी विविध योजना राज्यात राबवण्यात येत आहेत. अल्पसंख्याकासाठी वस्ती / क्षेत्र (बहुल नागरी / बहुल ग्रामीण) विकास योजना राबवण्यात येतात. अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची राज्यात स्थापना करण्यात आली आहे. शासनाने केलेल्या प्रयत्नांमुळे मुस्लीम समाजाच्या विकासाच्या गतीवर सकारात्मक परिणाम झाला हे या क्षेत्रात कार्य करत असलेल्या कार्यकर्त्यांचे मत आहे.

रिपोर्ट, २००८; कल्पना कन्नाबिरण रिपोर्ट, २०१७ हे रिपोर्ट बनवण्यासाठी या संस्थांना शासनाने आर्थिक मदत देऊ केली. यांच्या शिफारशींच्या आणि चळवळीच्या रेट्यातून भटक्या-विमुक्तांना रेशन कार्ड, मतदान पत्र, घरकूल योजना, शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना राबवली गेली. शिक्षित भटक्या लेखक विचारवंतांनी शेकडो संशोधन पुस्तके लिहिली. ४० पेक्षा ज्यास्त आत्मकथने प्रकाशित झाली. बऱ्याच विद्यापीठांत या भटक्या विचारवंतांची-अभ्यासकांची संशोधने-पुस्तके अभ्यासक्रमाला लागली. मुंबई विद्यापीठाच्या इतिहास विषयाच्या एम.ए.च्या अभ्यासक्रमात भटक्या-विमुक्तांच्या इतिहासाचा एक विशेष पेपरच ठेवला गेला. भटक्या-विमुक्तांच्या बाबतीत घडत असलेल्या या बाबी सकारात्मक आहेत. असे या क्षेत्रातील अभ्यासकांचे निरीक्षण आहे.

सन्मान, संधी गरजेची

भटक्या विमुक्त जातिजमाती क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, १९५३ साली इतर मागासवर्गीयांसाठी नेमलेल्या पहिल्या राष्ट्रीय आयोगाने सादर केलेल्या अहवालात हे स्पष्ट केले होते की. स्वतः चे घर किंवा जागा नसलेले छोटे-छोटे भटके समुदाय देशात खूप मोठ्या संख्येने आहेत. पायापासून समूळ उच्चाटन झालेले विमुक्त जमातीचे लोकही मोठ्या संख्येने आहेत. या सर्वांना स्थिर व सन्मानाचे जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाची आहे.

शासनाने थाडे कमिशनची नेमणूक केली आणि राज्यातल्या मूळ भटक्या विमुक्तांची यादी तयार त्यांना १९६०-६१ पासून शिक्षण व नोकरीच्या क्षेत्रात देशात पहिल्यांदा ४ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या. पुढे भटक्यांच्या यादीत जशी जातींची वाढ होत गेली, तशी राखीव टक्केवारी पण ११ टक्के पर्यंत वाढवली गेली. ती न्याय्य ठरत नाही हे कळल्यावर त्यांची वेगवेगळ्या गटात (अ,ब,क,ड) विभागणी करून, राखीव टक्केवारीचीही विभागणी केली गेली.

भटक्या विमुक्तांच्या शैक्षणिक विकासासाठी पुरोगामी व सहानुभूतीपूर्ण धोरण स्वीकारून त्यांच्यासाठी मुक्त हस्ते अनुदानावर आधारित आश्रमशाळा सुरू ठेवण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे आज भटक्या विमुक्तांतील अनेक युवक युवती शिक्षित होऊन सरकारी अधिकारी-कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. भटक्या विमुक्तांसाठी राज्यात स्वतंत्र मंत्रालय, स्वतंत्र संचालनालय, स्वतंत्र आर्थिक विकास महमंडळ सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातले पहिले राज्य आहे.

देवदासींच्या तथा भटक्या जमातीतील कोल्हाटी जमातींच्या महिलांच्या मुला-मुलींना शासकीय सोयी-सवलतींचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेले जात प्रमाणपत्र त्यांच्या वडिलांची ओळख पटल्याशिवाय मिळत नसल्याचे लक्षात आल्यावर अशांना त्यांच्या आईच्या जातीवर आधारित जातीचे प्रमाणपत्र देण्याचा शासकीय निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातले पहिले राज्य आहे याचा अभिमान आहे.

अनुसूचित जाती / जमातीच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय स्थितीचा अभ्यास करून राज्य शासनाला शिफारशी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने २००५ ला राज्य अनुसूचित जाती / जमाती आयोगाची स्थापना केलेली आहे. सफाई कर्मचाऱ्यांच्या उन्नतीसाठी, त्यांची मुक्तता व पुनर्वसन यासाठी राज्यात असलेल्या विविध कल्याण योजनांच्या संस्थांकरिता १९९८ ला राज्य सफाई कर्मचारी आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. कल्याणकारी राज्य व्यवस्थेंतर्गत अनुसूचित जाती व इतर दुर्बल घटकांचा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक प्रगतीच्या माध्यमातून सर्वांगीण विकास साधण्याचे काम महाराष्ट्राने गेल्या साठ वर्षांत केले आहे.

कौशल्य विकासातून आदिवासींचा विकास

आदिवासींचा खऱ्या अर्थाने विकास करावयाचा असेल तर, आहे त्या ठिकाणी असलेले जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक असणारे शिक्षण व आर्थिक मदत करणे आवश्यक आहे. त्यासाठी वनहक्क, वनोजपावरील त्यांचा हक्क अबाधित ठेवणे, त्यांच्या कौशल्याचा वापर होईल, असे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्या माध्यमातून आदिवासी बांधवांचा स्वयं विकास करण्यावर राज्य शासनाचा भर आहे. आदिवासी बांधवांच्या पारंपरिक व्यवसायाला, शेतीला चालना दिली जाणार आहे.

- ॲड. के. सी. पाडवी, आदिवासी विकास मंत्री

संदर्भ : ■ सामाजिक न्याय व विशेष साहाय्य, आदिवासी विकास, इतर मागास बहुजन कल्याण या विभागाचे २०२०-२०२१ चे कार्यक्रम अंदाज पत्रक ■ महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१९ -२०२० ■ ज्येष्ठ साहित्यिक अर्जुन डांगळे ■ अन्वर राजन, विश्वस्त, सचिव, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे. ■ डॉ. नारायण भोसले, इतिहास विभाग, मुंबई विद्यापीठ ■ देवाजी नवलू तोफा, आदिवासी समाज सेवक, मेंढा लेखा (गडचिरोली) ■ ॲड. पल्लवी रेणके, प्रदेशाध्यक्षा, लोकधारा भटके विमुक्त राष्ट्रीय समन्वय, महाराष्ट्र ■ सुखदेव थोरात, शिक्षणतज्ज्ञ, माजीअध्यक्ष, युजीसी अध्यक्ष, इंडियन इन्स्टिट्युट ऑफ दलित स्टडिज.

विभागीय संपर्क अधिकारी

भाषा : विचारांची आणि व्यवहारांची

राधाकृष्ण मुळी

मराठी भाषेला अडीच हजारांहून अधिक काळाचा वैभवशाली इतिहास आहे. त्याचे विविध पुरावेही मिळाले आहेत. हे पुरावे आपल्या मराठीला अभिजात भाषेच्या परिघात नेऊन ठेवण्यास समर्थ आहेत. मराठी केवळ लोकभाषा आणि राजभाषा न राहता ती ज्ञानभाषा झाली पाहिजे, यासाठी विविधस्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. आज जागतिकीकरणाच्या या काळात मराठी पाय रोवून घट्ट उभी आहे.

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी,
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी,
धर्म, पंथ,जात एक जाणतो मराठी,
एवढ्या जगात माय मानतो मराठी..

कविवर्य सुरेश भट यांनी मराठी अभिमान गीतात अवघ्या मराठी मनांची स्पंदने व्यक्त केली आहेत. संत ज्ञानेश्वर, फादर स्टिफन्स, माधव ज्युलियन, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, ना. गो. नांदापूरकर, वि. म. कुलकर्णी, कुसुमाग्रज, गुरू ठाकूर अशा अनेक कवींनी 'मराठीचे माहात्म्य' वर्णिले आहे.

कवीने अभिव्यक्त केलेली भावना आणि रोकडा दैनंदिन व्यवहार यादरम्यान मराठी कुठे उभी आहे? कशी उभी आहे? कवी कुसुमाग्रजांनी एकदा त्यांची भावना जळजळीत शब्दात व्यक्त केली होती. त्यानंतर या प्रश्नांची चर्चा तर झाली होतीच.

सिंहासनावर मराठीच

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या वेळी काय अपेक्षा व्यक्त केली गेली होती, याचा शोध घेताना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण यांच्या भाषणांचा संग्रह नजरेखालून घातला तर त्याचे उत्तर मिळते.

सावरगाव डुकरे या गावात विदर्भ साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटक म्हणून यशवंतरावांनी दि.१३ फेब्रुवारी १९६० रोजी केलेले भाषण 'सह्याद्रीचे वारे' या त्यांच्या भाषणांच्या संग्रहात समाविष्ट आहे. या भाषणाला राज्य स्थापनेचा संदर्भ आहे, हे तर स्पष्टच आहे. यशवंतरावजी म्हणाले होते, मी सुरुवातीलाच म्हणालो की, मराठी भाषेच्या जीवनामध्ये आज एक महत्त्वाची गोष्ट घडत आहे, ती म्हणजे नवीन होऊ घातलेल्या मराठी राज्याची रचना. कारण ती जशी राजकारणातील महत्त्वाची गोष्ट आहे, तशीच मराठी भाषेच्या दृष्टीनेही ती महत्त्वाची गोष्ट आहे, असे मी मानतो. मराठी भाषिक राज्याचे माझ्या मनात चित्र काढण्याचा जेव्हा मी प्रयत्न करतो, तेव्हा मराठी जनता राज्य सिंहासनावर येऊन बसली आहे, असे चित्र उभे राहण्याऐवजी या सिंहासनावर मराठी भाषा विराजमान झाली आहे, असेच चित्र

माझ्या मनात चितारले जाते.'

महाराष्ट्र राज्याची स्थापना आणि त्या राज्यात मराठीचे स्थान याच्या परस्पर संबंधावर यापेक्षा अधिक समर्पक शब्दात आणि अर्थात अधिक अधिकाराने अधिक काही बोलता/लिहिता आले असते काय, असा प्रश्न पडतो आणि या प्रश्नाचे उत्तर नाही असेच आहे.

या भाषणातच यशवंतराव म्हणाले होते की, मराठी भाषेचे राज्य झाल्यानंतर ज्ञानाच्या सर्व क्षेत्रातील विचारांची संपदा तिने मराठी जीवनात आणली पाहिजे ही जिम्मेदारी तिच्यावर आहे. त्याकरिता मराठी भाषा ही अधिक विचारप्रवाही आणि अधिक विचारवाही झाली पाहिजे.

एका परीने भाषेच्या संदर्भात काय घडावे, भाषेत काय घडावे, भाषेने काय घडवावे याचे मानदंड निश्चित करणारे हे विचार आहेत. त्याच्या आधारे आपली वाटचाल आपल्याला नजरेखालून घालता येईल.

संस्थात्मक कार्य

राज्यात सुमारे दहा वर्षांपूर्वी मराठी भाषा विभाग निर्माण करण्यात आल्यानंतर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, भाषा संचालनालय या मंडळांचा, संचनालयांचा कारभार मराठी भाषा विभागाच्या कार्यकक्षेत समाविष्ट झाला आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची धुरा आधुनिक महाराष्ट्रातील नामवंत ज्ञानोपासक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दीर्घकाळ वाहिली. या मंडळाने विश्वकोश निर्मितीची पायाभरणी केली. स्वतंत्र विश्वकोश मंडळ १९८० साली अस्तित्वात आले. तोपर्यंत याच मंडळाने विश्वकोशाचे काम पाहिले. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने आजवर प्रकाशित केलेल्या पुस्तकांची संख्या ५४० पेक्षा अधिक आहे.

महाराष्ट्राचे शिल्पकार या मालिकेत मंडळाने राज्याच्या राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, वैचारिक आणि आर्थिक जडणघडणीत ज्या मान्यवरांचा सहभाग आहे, अशा व्यक्तींच्या जीवनकार्याचा परिचय करून देणारी पुस्तके प्रकाशित केली आहेत. मंडळाच्या वतीने उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित केली जातात. तसेच सर्वसामान्यपणे व्यावहारिक कारणामुळे जी पुस्तके खासगी प्रकाशक प्रकाशित करण्याची शक्यता नसू शकते अशी पुस्तके वाजवी दरात उपलब्ध करून देण्याचे काम मंडळाने करून दिले आहे. नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान, ललित व ललितेत्तर साहित्याच्या प्रकाशनार्थ अनुदान, चर्चासत्रे व कार्यशाळांना अनुदान राज्यातील ७ साहित्य संस्थांना वार्षिक अनुदान, मराठी साहित्य संमेलनासाठी अनुदान, मराठी भाषेत प्रसिद्ध होणाऱ्या दर्जेदार आणि निकषपात्र नियतकालिकांना अनुदान, यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार (या योजनेत दरवर्षी ३५ साहित्य पुरस्कार), ज्येष्ठ साहित्यिकांस विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार, प्रकाशन संस्थेस श्री.पु.भागवत पुरस्कार आदी उपक्रम या मंडळामार्फत राबवले जातात. उल्लेखनीय बाब म्हणजे मंडळाने आजवर प्रकाशित केलेल्या पुस्तकांपैकी ४४४ पुस्तक ई-बुक स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या संख्येत भर पडत आहे. मराठी विश्वकोश निर्मितीस चालना हे या महामंडळाचे महत्त्वपूर्ण कार्य. कालांतराने हे मंडळ आणि विश्वकोश मंडळ वेगळे झाले. १ डिसेंबर १९८० रोजी विश्वकोश निर्मिती मंडळाची स्थापना झाली. विश्वकोशाचे खंड महाजालावरही उपलब्ध आहेत. आजच्या काळातील वाचक त्याच्या हातातील फोनवर विश्वकोशातील संदर्भ पाहू शकतो. विश्वकोशाचे वीस खंड हे राज्य निर्मितीनंतरचे संस्थात्मक माध्यमातून झालेले महत्त्वाचे काम ठरते. बदलता काळ लक्षात घेऊन यापुढे विश्वकोशातील नोंदी छापील स्वरूपात प्रकाशित न करता त्या वाचकांना ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, यासाठी ज्ञानमंडळे स्थापन करण्याचे नियोजन असून त्या दिशेने प्रगती झाली आहे.

सर्व शाळांमध्ये मराठी सक्तीची

मराठी शाळांमध्ये मराठी भाषेचे सक्तीचे अध्यापन व अध्ययन विधेयक विधान परिषदेत एकमताने संमत करण्यात आले आहे. राज्यातील सर्व माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये यावर्षी इयत्ता पहिली आणि सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मराठी हा विषय सक्तीचा करण्यात आला आहे. राज्यातील शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने मराठी हा विषय सक्तीचा करण्यात येणार आहे. २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात पहिली आणि सहावीसाठी, २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात दुसरी आणि सातवीसाठी, २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात तिसरी आणि आठवीसाठी, तर २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात चौथी आणि नववीसाठी, तर २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात पाचवी आणि दहावीसाठी मराठी हा विषय सक्तीचा करण्यात येणार आहे. या संदर्भातील शासन निर्णय शालेय शिक्षण विभागाने १ जून २०२० रोजी जारी करण्यात आला आहे.

याचबरोबर मंत्रालयातील सर्व नस्त्या (फाईल) वरील शेरे हे मराठीतच लिहिले जातील, असेही निर्देश देण्यात आले आहेत. शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा सक्षतपणे वापर करण्याबाबतचा मराठी भाषा विभागाने शासन निर्णय २९ जून २०२० रोजी जारी केला आहे.

संस्कृती रक्षण

मराठी भाषा आणि महाराष्ट्राची संस्कृती यांचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन करण्याच्या हेतूने १ मे १९९२ रोजी स्थापन केलेल्या राज्य मराठी विकास संस्थेने मोलाचे कार्य केले आहे. या संस्थेची प्रकाशने उल्लेखनीय आहेत. या संस्थेने मराठी भाषेच्या विकासाला पुरक असे माहितीकोश, माहिती पुस्तिका, संकल्पना कोश आदी ७१ पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यात भाषाविषयक, कोश व सूची वाङ्मय आणि शैक्षणिक पुस्तकांचा समावेश आहे. ही संस्था विविध उपक्रम राबवते. त्यात इतर राज्यातील मराठी भाषिक विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांचा समावेश आहे. संस्थेत दलित ग्रामीण साहित्य शब्दकोश व साहित्यसूची, वस्त्रनिर्मिती माहितीकोश, मराठी ग्रंथसूचीमाला, वाराणसी येथील मराठी भाषेचा सांस्कृतिक व समाज भाषा वैज्ञानिक अभ्यास, मोडी लिपीतील हस्तलिखितांचे मराठी भाषेत रूपांतरण व विषयसूची खंड तयार करणे, विविध संज्ञा संकल्पना कोश आदी उल्लेखनीय प्रकल्प सुरू आहेत. काही उपक्रमांसाठी अन्य संस्थांचे सहकार्य घेतले जाते.

या संस्थेच्या दोन प्रकल्पांचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. संस्था तिची प्रकाशने ई-पुस्तक स्वरूपात उपलब्ध करून देत आहे. तसेच मराठीतील उत्तोमोत्तम साहित्यकृतींची श्राव्य पुस्तके तयार करण्याचा संस्थेचा उपक्रम असून ही पुस्तके संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेली आहेत.

भाषा समाजाची

भाषेबाबत सगळेच काही सरकार करू शकत नाही. भाषा ही केवळ सरकारची नसते तर ती अवघ्या समाजाची असते. जसा समाज तशी त्याची भाषा. त्यामुळे मराठी भाषेबाबत एका बाजूने सरकारने काय केले हे पाहताना समाजानेही काय केले हे पाहावे लागेल. सरकारने भाषेचा अग्रक्रम निश्चित केला, तो अमलात आणला, त्या दिशेने प्रयत्न केले त्याचवेळी त्याच पद्धतीने समाजात भाषेचा अग्रक्रम आणि त्या बाबतचा व्यावहारिक जीवनातील आग्रह टिकून राहिला का? असा प्रश्न विचारावा लागेल.

भाषेच्या विकासासाठी पायाभूत यंत्रणा, संस्था उभारण्याचे काम शासनाने केले आहे. या कामाचा विचार करताना डोळ्यांसमोर प्रथम येते ते राज्य साहित्य व संस्कृती मंडळ. या मंडळाचे उद्घाटन करताना यशवंतरावजींनी (मंडळाच्या उद्घाटनाचा) हा औपचारिक समारंभ ही महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर घडणारी एक अत्यंत महत्त्वाची घटना आहे असे मी मानतो, अशी भावना व्यक्त केली होती. त्यांचे हे उद्गार मंडळाचे महत्त्व आणि त्याकडे पाहण्याची शासनाची भूमिका स्पष्ट करणारे आहेत. याच भाषणात यशवंतरावांनी ज्ञानाच्या सरोवराचे पाट आपण लोकांच्या जीवनापर्यंत पोहोचवले पाहिजेत. ज्ञानगंगा लोकांच्या जीवनापर्यंत पोहोचवण्यासाठी या मंडळाची मदत होईल, असे म्हटले होते.

महत्त्वाचे म्हणजे राज्य शासनाने मान्य केलेल्या निकषांशी जुळतील असे टंक या संस्थेने उपलब्ध करून दिले आहेत. त्यांना यशोमुद्रा आणि यशोवेणू अशी नावे देण्यात आली आहेत. या संस्थेने युनिकोड कार्यशाळेचे आयोजन केले आहे. संगणकावर मराठी साधनांचा मुक्त वापर होण्यासाठी मुक्त आणि व्यक्त स्वरूपाची साधने निर्माण करण्याचा संस्थेचा संकल्प आहे. संस्थेचे हे उपक्रम बदलत्या काळाशी आणि संगणक युगाशी सुसंगत आहेत.

संस्थेने मराठी भाषा, संस्कृती, साहित्य आणि समाज जीवन या संदर्भातील मोलाचा ठेवा जतन करण्यासाठी मराठीतील दुर्मीळ पुस्तके आणि नियतकालिके यांचे संगणकीकरण करून ते जनतेला उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. त्यासाठी संस्थेने ९५६ दुर्मीळ ग्रंथांची सूची तयार केली असून १०३ पुस्तके तसेच विविध नियतकालिकांचे अंक सध्या संगणकावर म्हणजे संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. महाबळेश्वरजवळ भिलार येथे 'पुस्तकाचे गाव' हा उपक्रम कार्यन्वित करण्यात आला आणि तो लोकप्रिय ठरला.

व्यवहारात मराठी

मराठी भाषेच्या दृष्टीने भाषा संचालनालय मोलाचे कार्य करत आहे. राज्य कायदे व नियमांचे मराठीकरण करणे, राज्य कायद्यांचे अद्ययावतीकरण करणे, संविधान आणि केंद्रीय अधिनियमांचे मराठीकरण, न्याय निर्णयांचे मराठीकरण, नियम पुस्तिका आणि प्रमाण नमुने व प्रपत्रे यांचे मराठीकरण, प्रशासकीय व संकीर्ण प्रकरणांचे मराठीकरण आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे परिभाषा कोश, शब्दकोश व शासन व्यवहार उपयोगी मार्गदर्शक पुस्तिका तयार करण्याचे काम हे संचालनालय करते. संस्थेने शासन व्यवहार कोश, प्रशासन वाक्प्रयोग, पदनाम कोश, वित्तिय शब्दावली, शासन व्यवहार शब्दावली, न्याय व्यवहार कोश प्रकाशित केले आहेत. त्याचबरोबर प्रशासनिक लेखन, राजभाषा परिचय, शासन व्यवहार शब्दावली, कार्यदर्शिका, प्रमाण लेखन नियमावली, मराठी लघुलेखन मार्गदर्शिका अशा शासन व्यवहारास उपयुक्त मार्गदर्शक पुस्तिका प्रकाशित केल्या आहेत.

संस्थेने लोकप्रशासन, कृषिशास्त्र, तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र, गणितशास्त्र, शिक्षणाशास्त्र, मानसशास्त्र, रसायनशास्त्र, यंत्र अभियांत्रिकी, भूगोलशास्त्र, न्यायवैद्यक व विषशास्त्र, औषधशास्त्र, व्यवसाय व्यवस्थापन, साहित्यसमीक्षा, वृत्तपत्र विद्या, वाणिज्यशास्त्र, धातुशास्त्र, शारीरशास्त्र,

ग्रंथालयशास्त्र, विद्युत अभियांत्रिकी, संख्याशास्त्र, शरीरक्रिया शास्त्र, भूशास्त्र, स्थापत्य अभियांत्रिकी, अर्थशास्त्र, जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, राज्यशास्त्र, भाषाविज्ञान, समाजशास्त्र असे परिभाषा कोश आणि काही पारिभाषिक शब्दावल्या प्रकाशित केल्या आहेत. परिभाषा कोशांची यादी येथे तपशिलाने नमूद करण्याचे कारण की, कोणत्याही भाषेचा विकास होताना विविध ज्ञानशाखांची परिभाषा विकसित होणे आवश्यक असते. त्यासाठी परिभाषा कोश तयार करावे लागतात. राज्याच्या भाषा संचालनालयाने परिभाषा कोश, शासन व्यवहार उपयोगी शब्दकोश व शासन व्यवहार उपयोगी मार्गदर्शक पुस्तिका प्रसिद्ध केल्या आहेत.

राज्यात १९७९ साली राजभाषा वर्ष साजरे करण्यात आले. त्या वर्षात मराठी भाषा ही ज्ञानविज्ञानाची भाषा व्हावी अशी अपेक्षा पुन्हा एकदा व्यक्त झाली. त्या वेळी आयोजित परिसंवादात विविध ज्ञानशाखांची परिभाषा म्हणून मराठीचा उपयोग करताना येणाऱ्या अडचणींचा ऊहापोह केला गेला. विज्ञानाची परिभाषा हा केवळ एका राज्यापुरता अथवा देशापुरता मर्यादित असलेला प्रश्न नसतो, याकडे तेव्हा लक्ष वेधले गेले. राजभाषा ही लोकभाषेपासून फटकून असलेली चालणार नाही म्हणून दैनंदिन शासकीय व्यवहारात मराठी शब्द वापरताना ते शब्द अधिक लोकाभिमुख असतील याची काळजी घेतली गेली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली गेली. हे सर्व प्रतिपादन आजही लागू आहे. किंबहूना जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीची आणि परिणामांची त्यात भरच पडली आहे. या विचारांच्या पार्श्वभूमीवर भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या परिभाषा कोशांचे मोल आपण लक्षात घेतले पाहिजे.

या साऱ्या विवेचनांचा अर्थ इतकाच की, राज्य निर्मितीच्या वेळी आणि नंतर स्थापलेल्या संस्थांनी नवीन तंत्रज्ञानाची कास धरून आपले उपक्रम लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला आहे.

येथे हेही नमूद करणे आवश्यक आहे की, शासन निर्णयासारखा महत्त्वपूर्ण दस्तऐवज राज्य शासनाच्या संकेतस्थळावर दैनंदिन उपलब्ध करून दिले जातात. ही बाब किती उपयुक्त आहे, याचा अनुभव शासन निर्णयाची प्रत ज्याला आवश्यक वाटते त्यालाच कळू शकेल! कोणे एके काळी शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करून घेण्यासाठी प्रयत्न करावे लागत. हे चित्र केव्हाच बदलले असून राज्यातील कोणताही रहिवासी त्याच्या मोबाईल फोनवर राज्य शासनाच्या संगणक संकेतस्थळावर जाऊन हे निर्णय पाहू शकतो आणि आवश्यकतेनुसार त्याची प्रत काढू शकतो.

परीघ विस्तारला तरीही...

गेल्या ६० वर्षात मराठी साहित्याचा परीघ विस्तारला. एका बाजूने महानगरीय तर दुसऱ्या बाजूने ग्रामीण वास्तव साहित्यात आले. दलित साहित्याने संबंध समाजजीवनाला आरसा दाखवला. मराठी रंगभूमी आपल्या वैभवासह देशाच्या अभिमानाचा विषय ठरली. साहित्य प्रकाशनाची २०० वर्षे या शरद गोगटे यांच्या ग्रंथात त्याबाबतचे विवेचन वाचावयास मिळते. मराठी प्रकाशन संमेलनातील अध्यक्षीय भाषणांचा संग्रह प्रसिद्ध झाला आहे. पहिल्या संमेलनाचे अध्यक्ष अनंतराव कुलकर्णी यांनी असे नमूद केले होते की, १८०५ साली जरी पहिले मराठी छापील पुस्तके प्रकाशित झाले असले तरी १८०५ ते १८४० या ४० वर्षात अवघी शंभरच मराठी पुस्तके प्रसिद्ध झालेली दिसतात. १८४१ ते १९०० या ६० वर्षात आणखी हजार पुस्तकांची त्यात भर पडली. आज दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची संख्या कितीतरी अधिक आहे. ग्रंथ प्रदर्शन, साहित्य संमेलनात होणारी ग्रंथ विक्री या बाबींची वेळोवेळी चर्चा होते. ग्रंथ व्यवहाराला उत्तेजन देण्यासाठी राज्य सांस्कृतिक धोरणात मांडण्यात आलेल्या ग्रंथोत्सवाची कल्पना बहुतेक जिल्ह्यांतून राबवण्यात येते. त्याला मिळणारा प्रतिसादही उल्लेखनीय आहे. तथापि श्री. गोगटे यांच्या ग्रंथात नमूद केलेल्या एका बाबीकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे. ती म्हणजे आपल्याकडील विद्यापीठांकडून प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांची संख्या अगदीच कमी आहे.

पंचवीस वर्षाचे धोरण

राज्याचे पुढील पंचवीस वर्षाचे धोरण ठरवणे, भाषा अभिवृद्धीसाठी नवनवे उपक्रम सुचवणे आणि या बाबतीत सरकारला सल्ला देण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली. ज्येष्ठ संशोधक-समिक्षक डॉ. सदानंद मोरे यांनी समितीचे अध्यक्ष म्हणून भूमिका मांडताना नमूद केले होते की, केवळ सैद्धान्तिक व वैचारिक मुद्दे न मांडता व्यावहारिक दृष्टिकोन समोर ठेवून भाषेच्या सार्थ विकास साधण्याला समितीने प्राधान्य दिले. मराठी ही एक अभिजात भाषा आहे. ही बाब वेळोवेळी मांडली गेली आहे. ज्येष्ठ विचारवंत डॉ. हरी नरके यांनी असे सप्रमाण विवेचन केले आहे की, महाराष्ट्राची (मराठी) भाषा ही किमान अडीच हजार वर्ष जुनी आहे. या संदर्भात त्यांनी पुराव्यासह केलेले विवेचन सर्वज्ञात आहे.

मराठी ग्रंथव्यवहार आणि साहित्य याबाबत सर्वसमावेशक विवेचन या लेखाच्या शब्दमर्यादेत शक्य नाही. मराठीतील ग्रंथ प्रकाशनाची २०० वर्ष केव्हाच पूर्ण झाली आहेत. या २०० वर्षात ग्रंथव्यवहाराची व्याप्ती वाढली हे स्पष्टच आहे. मराठी ग्रंथ

व्यवहाराचे केंद्र निमशहरी भागात गेले. वर्तमानपत्र आणि वाहिन्या यामुळे नव्या लेखकांना संधी मिळाली. हे सगळे खरे असले तरी अर्थशास्त्र, व्यापार उदीम, राज्यशास्त्र, विज्ञानातील विविध शाखा या संदर्भात अद्ययावत माहिती देणारी पुस्तके संख्येने कमीच आहेत. गंभीर तत्त्वचर्चा करणाऱ्या ग्रंथांची संख्या मोजकीच ठरते. मराठीची प्रकृती अधिक कालसुसंगत ठरण्यासाठी ही उणीव दूर करणे गरजेचे आहे. त्यासाठी इंग्रजी आणि अन्य भाषेतून मराठीत उत्तम ग्रंथांचा वेळीच अनुवाद होणे आवश्यक आहे. इंग्रजीत वर्तमान राजकीय आणि सामाजिक प्रश्नांची चर्चा करणारी पुस्तके वेळोवेळी प्रकाशित होतात. त्याचाही कित्ता गिरवला गेला पाहिजे. ही जबाबदारी आधुनिक ज्ञान संपादन केलेल्या नव्या पिढीची आहे.

भाषा म्हणून विचार करताना एक काहीसा संवेदनशील मुद्दा येतो तो म्हणजे प्रमाणभाषेचा. कोणत्याही भाषेत होणारे लिखाण हे नियमबद्ध असते. ललित साहित्यात बोलीभाषा येणे अपरिहार्य ठरते आणि समर्थनीय तर निश्चितच ठरते. मात्र अन्य साहित्य हे प्रमाणभाषेत लिहिले जाणे हे भाषेच्या प्रकृतीच्या दृष्टीने अनिवार्य होय. या बाबतीत एक महत्त्वाची बाब म्हणजे प्रमाणभाषेशी नाते सांगणारी संगणकावरील प्रणाली लोकप्रिय होणे आवश्यक आहे. इंग्रजीत ज्याप्रमाणे शब्दांचे स्पेलिंग आणि आनुषंगिक बाबी तपासणाऱ्या आज्ञावली संगणकावर प्रचलित आहेत तसे काही प्रमाणमराठीच्या बाबतीत घडलेले दिसत नाही. दुसरे म्हणजे भाषा ही परिसरातून येते आणि नव्या पिढीचा परिसर हा वाहिन्या तसेच समाजमाध्यमांनी व्यापलेला आहे. या माध्यमांवरील भाषेवर कोणतेही नियंत्रण नसले तरी इंग्रजी आणि हिंदीचा जबर पगडा आहे. आजच्या काळात भाषा शुद्धीचा अतिरेकी आग्रह अव्यवहार्य असला तरी माध्यमांच्या भाषेचा होणारा परिणाम लक्षात घेता या बाबतीत व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सामाजिक पातळीवर काही एक पथ्य पाळणे गरजेचे आहे. या बाबतीत सरकारपेक्षा समाजाचीच जबाबदारी अधिक आहे. मराठी प्रकाशक संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना प्रा. श्री. पु. भागवत यांनी गेल्या काही वर्षात आपल्या शिक्षण प्रकियेत भाषेचा, विशेषत: मातृभाषेचा संस्कार दुबळा झाला असल्याचे निरीक्षण नोंदवले होते. या दुबळेपणात प्रचारमाध्यमे भर टाकत असल्याचा अभिप्राय नमूद केला होता. त्याचा विचार करणे आवश्यक आहे. या बाबतीत माध्यमांचे अभ्यासक प्रा. जयदेव डोळे यांनी नमूद केलेला पुढील अभिप्राय

महत्त्वाचा आहे. प्रसारमाध्यमे आणि मराठी या विषयावरील लेखात त्यांनी म्हटले होते की, 'मराठी मरणार नाही, तिच्याएवढी प्रगल्भ भाषा मरणार नाहीच पण माणसे मरत असतात. माणसांबरोबर मराठी भाषेच्या म्हणी, वाक्प्रचार, उपमा, उत्प्रेक्षा, दृष्टान्त, अन्योक्ती, वक्रोक्ती, शिव्या, उखाणे-कोडी नष्ट होत असतात. त्यांचे संक्रमण होत नाही. मग ज्या मराठी भाषकांच्या पिढ्या येत राहतात, त्यांना इंग्रजी, हिंदी भाषांचा आधार घेत पुढे जावे लागते. चिंता करायची ती याबद्दल करायची.'

समाजाचीही जबाबदारी

आजच्या जगात व्यावहारिक अपरिहार्यता म्हणून इंग्रजीची कास धरली गेली तर ते समजण्यासारखे आहे. मात्र ही अपरिहार्यता मर्यादित परिघात असते. त्या अपरिहार्यतेने अवघ्या जीवनाचे वर्तुळ व्यापण्याचे कारण नाही. हा विवेक सर्वत्र बाळगला तर मराठीचे भवितव्य हा चिंतेचा विषय होण्याचे कारण नाही. मराठी राजभाषेसंदर्भात सरकार विविध माध्यमांतून आपली जबाबदारी पार पाडत असताना समाजाने या भाषेसाठी आपली जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे. या जबाबदारीची सुरुवात व्यक्तिगत आणि कौटुंबिक जीवनापासून सुरू होते, हे लक्षात घ्यावे लागते. आपल्या व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात आपण आग्रहपूर्वक मराठी भाषा तिच्या सर्व वैशिष्ट्यांसह सातत्याने उपयोगात आणली आणि मराठीला आजच्या जगात ज्ञान-विज्ञान तसेच अर्थव्यवहारात ज्ञानभाषा म्हणून उपयोगात आणण्यासाठी समृद्ध आणि समर्थ केले तर पुढील कालखंडात आपली भाषा आणि आपले जीवन अधिक प्रगत, संपन्न होत जाईल.

या लेखाच्या प्रारंभी राज्य निर्मितच्या पार्श्वभूमीवर विदर्भ साहित्य संमेलनात यशवंतराव चव्हाण यांनी केलेल विवेचन नमूद केले आहे. त्या भाषणात ते म्हणाले होते की, राज्य भाषेचा दर्जा जेव्हा भाषेला प्राप्त होतो तेव्हा लोकजीवन समृद्ध करण्याचे एक महत्त्वाचे साधन म्हणून आपण त्या भाषेकडे पाहत असतो. वेगवेगळ्या साहित्य प्रकारांनी लोकजीवन समृद्ध होत असते. लोकजीवन समृद्ध करणे हे साहित्याचे अंग आहे की नाही, त्याचा तो उद्देश आहे की नाही, हा अर्थात वादाचा विषय होऊ शकेल परंतु निदान त्याचा परिणाम तसा घडत असतो म्हणून मराठी भाषेचे राज्य झाल्यानंतर ज्ञानाच्या सर्व क्षेत्रातील विचारांची संपदा तिने मराठी जीवनात आणली पाहिजे, ही जिम्मेदारी तिच्यावर आहे. त्याकरिता मराठी भाषा ही अधिक विचारप्रवाही, अधिक विचारवाही झाली पाहिजे.

६० वर्षांपूर्वी भाषेबाबत ही अपेक्षा व्यक्त करणाऱ्या यशवंतरावांनी साहित्य संस्कृती मंडळ स्थापन करून एक दिशा दिली. या दिशेने पुढे जाण्यासाठी आजच्या पिढीत मराठी भाषा ही ज्ञानाची-विज्ञानाची आणि विचारांची भाषा होईल; ही भूमिका घेऊन क्रियाशील राहणे आवश्यक आहे.

संदर्भ : लोकराज्य आणि महाराष्ट्र वार्षिकी

उपसंचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय, अमरावती

संग्रहित

पर्यटन : मनमोहक महाराष्ट्र

निसर्गाने भरभरून दान टाकलेल्या महाराष्ट्रात पर्यटन क्षेत्राच्या वाढीला प्रचंड मोठा वाव आहे हे ओळखून राज्य शासनाने या क्षेत्राच्या विकासाकडे विशेषत्वाने लक्ष दिले आहे. रोजगारवाढीची सर्वात जास्त क्षमता असलेल्या या क्षेत्राच्या माध्यमातून राज्य शासन विकासाचे नवे अध्याय लिहू इच्छिते. पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे आणि राज्यमंत्री आदिती तटकरे महाराष्ट्राच्या याच क्षमतेचा उपयोग करून राज्याला पर्यटनाच्या नकाशावर ठळक करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

गणेश रामदासी

'महाराष्ट्र' हे नाव समोर आले की, पर्यटकांना मोहवते ती कोकणची विस्तृत किनारपट्टी, तेथील आंब्या-पोफळीच्या बागा, सह्याद्रीच्या दऱ्या-खोऱ्यातील धबधबे, किल्ले, डोंगर सुळके, मराठवाड्यातील लेणी आणि धार्मिक स्थळे, विदर्भातील समृद्ध वन्यजीवन, हस्तकला, उत्तर महाराष्ट्रातील ऐतिहासिक वारसा अंगावर मिरवणारी शिल्प-मंदिरे आणि वायनरीज आणि पश्चिम महाराष्ट्रात विकसित झालेली कृषिपर्यटन केंद्रे आणि तेथील रुचकर भोजन.

'आकर्षक महाराष्ट्र' पर्यटकांना कायम मोहवत आला आहे. जगभरातील पर्यटकांना साद घालत आला आहे. सांस्कृतिक पर्यटन, सागरी पर्यटन, साहसी पर्यटन, कृषी पर्यटन, निसर्ग पर्यटन, ग्रामीण पर्यटन असे पर्यटनाचे कितीतरी पर्याय, गड-किल्ले-मंदिरांची मांदियाळी, नयनरम्य वनश्री व पाणवठे, सर्वात जास्त संख्येने असलेल्या जागतिक वारसा स्थळांमुळे महाराष्ट्र पर्यटन नकाशावर नेहमीच ठळक दिसून येतो. पर्यटनवाढीसाठी एवढी सगळी साधनसंपत्ती उपलब्ध असतानाही या क्षेत्राचा विकास मात्र धिम्या गतीने झाला. त्यामुळे या सर्वांचा एकत्रित विचार करून त्यातून राज्याच्या आर्थिक विकासासाठी एक समग्र धोरण ठरवण्याचे आणि ते राबवण्यासाठी आवश्यक असलेले नेतृत्व सध्या महाराष्ट्राला मिळाले असून मंत्री आदित्य ठाकरे व राज्यमंत्री अदिती तटकरे हे पर्यटन क्षेत्राला उंचीवर नेण्यासाठी धडाडीने निर्णय घेत असून त्याचे सकारात्मक परिणाम आगामी काळात दिसून येतील.

संजीवक कृषिपर्यटन

पारंपरिक शेतीला आधुनिकतेची जोड मिळाल्याशिवाय शेती फायदेशीर ठरणार नाही हे ओळखून राज्यात कृषी पर्यटनासारख्या व्यवसायाला प्रोत्साहन देण्यात येत आहे. यातून रोजगार निर्मितीबरोबरच कृषी संस्कृतीची ओळख शहरी पर्यटकांना होण्यास मदत होत होती. गेल्या सात-आठ महिन्यांत कोरोनाच्या संकट काळामध्येही कृषी क्षेत्रात काम अखंड सुरूच होते आणि टाळेबंदी उठल्यानंतर पर्यटकांना विशेष आकर्षित

करणारी जागा ही कृषी पर्यटनाचीच आहे. देशात कृषी पर्यटन सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. गेल्या सप्टेंबरमध्ये महाराष्ट्राने कृषी पर्यटन धोरण २०२० या शासनाने जाहीर केले आहे, असे धोरण जाहीर करणारेही महाराष्ट्र हे पहिलेच राज्य आहे. या धोरणामुळे कृषी पर्यटन व्यवसायाला राजमान्यता मिळाली, ते एक दिशादर्शक व परिपूर्ण मार्गदर्शक धोरण आहे, अशा प्रतिक्रिया या क्षेत्रात गेली काही वर्षे सातत्याने काम करणाऱ्या संस्था व शेतकऱ्यांनी दिल्या.

या कृषी पर्यटन धोरणात कृषी व पर्यटन या दोन अतिमहत्त्वाच्या विभागांचा समन्वय आहे. शहरातील तसेच गावातीलही ज्यांच्याकडे शेती नाही, असे पर्यटक गावातील शेतीला भेट देतील, शेतीच्या विविध पैलूंचे जवळून दर्शन व अनुभव घेतील, ताजा कृषिमाल, भाजीपाला, फळेफुले, अतिशय रास्त दरात खरेदी करू शकतील, अस्सल गावरान भोजनाचा आस्वाद घेऊ शकतील, शेतात फेरफटका, बैलगाडी ट्रॅक्टर सफर, ग्रामीण खेळ खेळतील.

कृषी पर्यटन सुरू करताना शेती आणि पर्यटन कशी सांगड घालायची जे समजत नाही शेतामध्ये पर्यटनाच्या सर्व काही सुविधा निर्माण केल्या तरी जर का तिथवर पोहोचण्यास बारमाही रस्तेच नसतील तर पर्यटक पोहोचणार कसा? यावर मात करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

खेडोपाड्यांत चालत आलेल्या विजेच्या लंपडावामुळे पर्यटक मुक्कामाला आल्यावर उष्म्याने हैराण होतो. शेतकऱ्यांना आधुनिक समाज माध्यमाची आवश्यक माहिती नसल्यामुळे कृषी पर्यटन केंद्रांचे मार्केटिंग त्यांना करता येत नाही ही एक अडचण आहे. प्रशिक्षणाअभावी घरातील इतर सदस्यांचा कृषी पर्यटन प्रकल्पातील सहभाग मर्यादित होतो. याबाबत जनजागृती व्हावी याकरिता पर्यटन विभाग विचार करत आहे. पर्यटन स्थळ व त्याच्या अवतीभवतीचे रस्ते, प्राचीन मंदिरांचा जीर्णोद्धार आणि जुन्या किल्ल्यांची डागडुजी यावर प्राधान्याने काम झाले तर कृषी पर्यटनाला भरारीचे दिवस येतील, असे ग्रामीण पर्यटन, पुरातत्त्व व पुराभिलेख, प्राचीन मंदिरे व त्याची बांधकाम-रचना या विषयावर लेखन करणाऱ्या एका अभ्यासकाचे म्हणणे आहे.

वर्तुळ पर्यटन

वर्तुळ पर्यटन हा आताच्या काळातील सर्वात कळीचा मुद्दा बनला आहे. कोणतेही एकच पर्यटनस्थळ विकसित करून पर्यटकांना आकर्षित करण्यापेक्षा पर्यटकांना अधिकाधिक पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी संपूर्ण सर्किट किंवा वर्तुळ विकसित करणे आवश्यक झाल्याचे पर्यटन क्षेत्रातील अभ्यासकांचे म्हणणे आहे. उदाहरणार्थ कोल्हापूर पर्यटन वर्तुळ : महालक्ष्मी मंदिर-कोपेश्वर मंदिर खिद्रापूर-नृसिंहवाडी-पन्हाळा गड-राधानगरी अभयारण्य-जोतिबा मंदिर-विशाळगड, पंढरपूर वर्तुळ : विठ्ठल मंदिर-अक्कलकोट, सोलापूर भुईकोट किल्ला-सिद्धेश्वर मंदिर-मंगळवेढा (विजापूर याला जोडून घेता येते) किंवा परांडा-करमाळा- बीड वर्तुळ : परांडा किल्ला-माणकेश्वर मंदिर-बार्शी मंदिर-करमाळा मंदिर-खर्डा किल्ला-श्रीगोंदा शेख महंमद समाधी-पेडगांव लक्ष्मी नारायण मंदिर-सौताडा धबधबा-नायगांव मयूर अभयारण्य-कंकालेश्वर मंदिर बीड-कपिलधार धबधबा, अशी राज्यात अनेक वर्तुळे तयार करण्यात येतील. काही वर्तुळे दुसऱ्या वर्तुळात समाविष्ट होतील,

पर्यटनाला चालना

गडकिल्ले, समुद्रकिनारे, वारसास्थळे, जंगल हे महाराष्ट्राचे वैभव असून ते जागतिक स्तरावर पोहोचवण्यासाठी पर्यटन विभाग कार्य करेल. ग्रामीण पर्यटनाला चालना देण्यासाठी कृषी पर्यटन धोरण तर कोकणातील पर्यटनाला चालना देण्यासाठी बीच शॅक धोरण जाहीर केले आहे. जगभरातील पर्यटकांना आकर्षित करून महाराष्ट्राच्या पर्यटनाला चालना देणे आणि राज्यात मोठी रोजगार निर्मिती करण्याचे ध्येय आहे. राज्याचा पर्यावरणपूरक विकास करण्यावरही भर देण्यात येत आहे.

- आदित्य ठाकरे, पर्यटन मंत्री

अशा छोट्या-मोठ्या वर्तुळातून पर्यटन क्षेत्राचा विकास झाला तर त्यातून त्या त्या परिसराचा विकास होईल. त्या परिसरातील संस्कृतीही पर्यटकांना अनुभवता येईल.

वारसा जपणे आवश्यक

राज्यातील काही पर्यटन स्थळे अ,ब,क अशा श्रेणीत विकसित केली जात आहेत. पण असे विकसन करताना परिसरातील 'हेरिटेज' संवर्धन हाच खरा या योजनेचा गाभा हवा असा विचार सांस्कृतिक वारसा संवर्धनातील काही संस्था व अभ्यासक मांडतात. महाराष्ट्रातील वारसा जतन व संवर्धनासाठी राज्याचे एकात्मिक धोरण आवश्यक आहे, असा आग्रहसुद्धा ते धरतात. पुढील २५ वर्षांसाठीचा शास्त्रोक्त विचार त्यात व्हावा, असेही ते म्हणतात. आपला नैसर्गिक, सांस्कृतिक व वास्तुरूपी वारसा जर संवर्धित झाला तर ही अद्वितीय जागतिक मूल्ये पर्यटनाच्या माध्यमातून जगासमोर येतील व या परिसराचा आर्थिक विकास घडेल असे अभ्यासकांना वाटते.

गिर्यारोहण

हिमालय हा जगभरातील गिर्यारोहकांसाठी कायम साद देत आला आहे. भारतीय गिर्यारोहकही हिमालय सर करण्यासाठी कायम उत्सुक असतात, मात्र या साहसी खेळाविषयी त्यात समाविष्ट असलेल्या पर्यटनाविषयी अधिक क्षमतेने कार्य करणे आवश्यक आहे. महाराष्ट्राला लाभलेल्या सातपुडा आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगाही गिर्यारोहकांना आवाज देत आहेत. गिर्यारोहण आणि भटकंती करणारे अनेकजण या क्षेत्रात कार्य करत आहेत. ते नवनवी पर्यटनस्थळे शोधत आहेत, त्यांच्या या शोधाला भक्कम साथ मिळणे आवश्यक आहे. कोरोनाच्या या काळातही औरंगाबाद येथील काही भटकंती करणाऱ्यांनी दहा नवी पर्यटन स्थळे, पंधरा नव्या धबधब्यांची स्थळे शोधून काढली. निसर्गाने दोन्ही हातांनी सौंदर्य बहाल केलेल्या या स्थळांकडे पर्यटकांना आकर्षित करायचे असल्यास तेथील पायाभूत सुविधांचा विकास व्हायला हवा, असे यासाठी कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांना वाटते. साहसवीरांसाठी खरे गिरिस्थान सह्याद्रीच आहे. त्यामुळे गिर्यारोहणाच्या अभ्यासक्रमासाठी हिमालयाचा पायथा गाठावा लागतो त्याचे प्राथमिक प्रशिक्षण देणारे केंद्र राज्य शासनाने सह्याद्रीच्या पायथ्याशी निर्माण करण्याची मागणी

संग्रहित

महत्त्वपूर्ण निर्णय

- मुंबईत पर्यटन आणि रोजगाराला चालना देण्यासाठी काही ठरावीक जागी निवासी ठिकाणे वगळून, मिल्स कंपाऊंड आदी क्षेत्रात रात्र जीवनाला संमती.
- कोकणच्या विकासाला चालना देणारे बीच शॅक (बांबू झोपडी - सागर किनारी) धोरण जाहीर. ८० टक्के रोजगार स्थानिकांना देणे आवश्यक.
- राज्याच्या ग्रामीण आणि कृषी पर्यटनास चालना देण्यासाठी कृषी पर्यटन धोरण जाहीर.
- साहसी पर्यटन धोरणाचा मसुदा जाहीर.
- कॅराव्हॅन पर्यटन धोरणाचा मसुदा जाहीर.
- मुंबईतील वानखेडे स्टेडियममध्ये पर्यटकांना करता येणार हेरिटेज वॉक. यासाठी एमटीडीसी आणि एमसीएमध्ये सामंजस्य करार.
- ऐतिहासिक अशा मुंबई महापालिका मुख्यालय इमारतीत पर्यटकांना करता येणार हेरिटेज वॉक. यासाठी एमटीडीसी आणि मुंबई महापालिका यांच्यामध्ये सामंजस्य करार.
- आदरातिथ्य क्षेत्राला चालना देण्यासाठी हॉटेल, रेस्टॉरंटला ७० परवानग्यांऐवजी आता फक्त १० परवानग्या/परवाने/ना-हरकत प्रमाणपत्रे आणि ९ स्वयं प्रमाणपत्रे लागू करण्याचा निर्णय.
- वन पर्यटनाला चालना देण्यासाठी पर्यटन आणि वन महामंडळाच्या समितीची स्थापना.
- मुंबई विद्यापीठ परिसर, गेट वे ऑफ इंडिया आदी ठिकाणांचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याचा निर्णय
- मुंबईत आंतरराष्ट्रीय दर्जाचे ॲक्वेरियम, 'लंडन आय'च्या धर्तीवर 'मुंबई आय'ची निर्मिती करण्याच्या दृष्टीने प्रयत्न
- एमटीडीसीमार्फत पर्यटकांसाठी मोटोहोम कँपरव्हॅन सुरू
- सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये हॉटेल ताजची गुंतवणूक. जिल्ह्यातील मौजे शिरोडा वेळागर येथील जागा हस्तांतर करण्याबाबत पर्यटन विभाग आणि हॉटेल ताजमध्ये सामंजस्य करार.

अनेक गिर्यारोहक संस्थांची आहे. असे केल्याने गिर्यारोहकांच्या खर्चात बचत होईल तसेच सह्याद्रीचे मॅपिंग पण करता येईल. पश्चिम घाट हा पर्यटकांसाठी जितका महत्त्वाचा आहे, तितकाच तो अभ्यासकांसाठी महत्त्वाचा आहे. येथे अनेक दुर्मीळ वनस्पती आणि प्राणी आढळून येतात. नुकतेच तेजस ठाकरे यांनी हिरण्यकेशी या कोकणातील नदीत विशिष्ट प्रकारचा शोधलेला दुर्मीळ माश्याबाबत तरूणाईतही कुतूहल आणि कौतुक आहे.

बाजाराची जोड आवश्यक

ग्रामीण पर्यटन, कृषिपर्यटन, जंगल सफारी किंवा वन पर्यटन आणि शहरी वन पर्यटन ही परस्परांना पूरकच असल्याने तसे विविध करार परस्पर विभागांनी केलेले आहेत. अशा सर्व पर्यटन केंद्राच्या परिसरातील हस्तकला, कृषी उत्पादने आणि खाद्यसंस्कृतीला बाजारपेठ मिळावी, असाही दृष्टिकोन शासनाचा आहे. पर्यटन वाढीसोबतच पर्यावरण रक्षणासाठी शासनातर्फे प्रत्येक जिल्ह्यात मियावाकी जंगले उभारली जात आहेत. हे शहरवन संकल्पनेचे अत्युत्तम मॉडेल ठरत आहेत, असे या क्षेत्रात काम करणाऱ्या काही स्वयंसेवी संस्थांचे मत आहे.

संपूर्णतः देशी वनस्पतींचे हे जंगल दोन वर्षातच वन्यजीवांसाठी व पशुपक्ष्यांसाठी सुरक्षित निवासस्थान बनते. प्रत्येक तालुका स्थानापर्यंत अशा स्वरूपाची नवनिर्मिती करण्यासाठी स्थानिक स्वयंसेवी संस्थांनी शासनाच्या मदतीने काम केले तर अल्पावधीतच जागोजागी अशी शहरवने बहरतील, त्यातून वनजीवन लोकांना समजेल, तेथील स्थानिक उत्पादकांना बाजारपेठ मिळेल, रोजगार वाढेल. हस्तकलेच्या वस्तूंना आंतरराष्ट्रीय पातळीवर मागणी वाढत आहे. हस्तकलेला जर पर्यटनाशी निगडित केले तर त्यासाठी प्रशिक्षणाचे कार्यक्रम राबवले तर या क्षेत्रातील उलाढाल वाढण्यास नक्कीच मदत होईल, असा विश्वास काही बचतगट व स्वयंसेवी संस्थांना आहे.

सागरी किनारे

कोकणकडे आणि कोकणचा सागर किनाऱ्याचे सौंदर्य अनुपमेय असेच आहे. कोकणातील पर्यटन विकासाच्या अनेक योजना या शासनाने हाती घेतल्या आहेत व कार्यान्वितही केल्या आहेत. क्रुझ टुरिझम, कॅटॅमॅरनने प्रवास, इंटरलॅण्ड टुरिझम सोबतच पर्यटकांना कॅराव्हॅन, कॅम्परव्हॅन उपलब्ध करून दिल्या जात आहेत. हे क्षेत्र अधिक विकसित होऊ शकते, त्यातून रोजगार वाढीसाठी खूप मोठा वाव आहे. यासाठी मोटरबोट व अन्य बोटी यांच्या खरेदीसाठी माफक दरात कर्ज उपलब्ध होणे गरजेचे आहे. तसेच पार्किंगसाठी स्पेशल मरीना तयार करणे गरजेचे आहे, असे मत क्रुझ व मोटरबोट व्यवसायात उतरू इच्छिणारे तरुण आणि संस्था नोंदवतात.

केंद्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या मते देशभरातील पर्यटन नकाशावर महाराष्ट्राचे स्थान कायम वरच्या श्रेणीत राहिले असल्याचे सांगितले. हे क्षेत्र वेगाने विकसित होणार असल्याने राज्य शासनाने पर्यटनपूरक मनुष्यबळास प्रशिक्षण देण्याची गरज आहे. त्याचबरोबर प्रभावी व आक्रमक प्रचारयंत्रणा राबवण्याच्या दृष्टीने माहिती व तंत्रज्ञान तसेच सोशल मीडियावर प्रभुत्व असणारी स्वतंत्र माहिती व प्रसिद्धी यंत्रणा निर्माण केली गेली तर महाराष्ट्र राज्य पर्यटनाच्या आंतरराष्ट्रीय नकाशावर अधिक प्रभावीपणे दिसू लागेल असे टूर ऑपरेटर्सचेही म्हणणे असते हा अनुभव या अधिकाऱ्यांनी बोलून दाखवला.

पर्यटनातून रोजगार निर्मिती

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या महाराष्ट्रात गडकिल्ले, ऐतिहासिक स्थळे, पुरातन कला व शिल्प, वन्य पशुपक्ष्यांची अभयारण्ये, तीर्थक्षेत्रे, सागरी किनारे व निसर्गसौंदर्य इ. पर्यटकांसाठी आकर्षणस्थळे आहेत. विदेशी पर्यटक सर्वाधिक मुंबईला व महाराष्ट्राला भेट देतात. बीच शॅक धोरण, कृषी पर्यटन, निसर्ग पर्यटन, साहसी पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करणे व पर्यटन व्यवसायास उद्योगाचा दर्जा देऊन त्या अनुषंगाने सवलती उपलब्ध करून पर्यटनाचा सर्वांगीण विकास करण्यात येत आहे.

- कुमारी आदिती तटकरे, पर्यटन, राज्यमंत्री

गणपती पुळे

पर्यटन क्षेत्रासाठी विद्यमान सरकार ज्या धडाडीने एकेक पाऊल उचलत चालले आहे. त्यामुळे सर्वांच्या मनात एक आश्वासक महाराष्ट्राचे चित्र निर्माण झाले आहे असाच निष्कर्ष सर्वांसोबतच्या वार्तालापातून निघतो.

कृषी पर्यटनाची सद्य:स्थिती

- कृषी पर्यटन केंद्रे महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात विस्तारलेली आहेत, एकूण संख्या ६२८ केंद्र आहेत
- साधारण ६९ टक्के कृषी पर्यटन चालक शेतकरी पदवीधर आहेत, २० टक्के कृषी पर्यटन चालक शेतकरी शिकले नसले तरीही व्यावहारिक ज्ञान खूप आहे, १ टक्के कृषी पर्यटन चालक शेतकरी उच्च पदवीधर असून, १० टक्के कृषी पर्यटन चालक शेतकरी सातवीपर्यंत शिकले आहेत
- ९० टक्के कृषी पर्यटन केंद्रांचे क्षेत्र १० एकर पर्यंत आहे, ९ टक्के कृषी पर्यटन केंद्रांचे क्षेत्र १० ते २५ एकर आहे, १ टक्के कृषी पर्यटन केंद्रांचे क्षेत्र २६ ते १०० एकर आहे.
- ५८ टक्के कृषी पर्यटन केंद्रांना शाश्वत सिंचन सुविधा आहेत, ३० टक्के कृषी पर्यटन केंद्रांना हंगामी सिंचन सुविधा आहेत, १२ टक्के कृषी पर्यटन केंद्र जिरायत पट्ट्यात आहेत.
- ५१ टक्के कृषी पर्यटन केंद्रावर विविध पद्धतीच्या फळबागा तसेच पारंपारिक पिके घेतली जातात. त्यामध्ये फळभाज्या, पालेभाज्या, आहेत.
- ४५ टक्के कृषी पर्यटन केंद्रावर त्यासोबत रोपवाटिका.
- ३५ टक्के कृषी पर्यटन केद्रांवर शेततळे असून १० टक्के कृषी पर्यटन केंद्रावर मत्स्यपालन केले आहे.
- २६ टक्के कृषी पर्यटन केंद्रवर औषधी वनस्पती लागवड आहे. त्यामध्ये विविध प्रकारची झाडेझुडपे आहेत.
- छोटेखानी पशुपालन ३७ टक्के कृषी पर्यटन केंद्रावर आहे. १० टक्के कृषी पर्यटन केंद्रावर विविध प्रकारचे प्राणी व पक्षी संग्रहालय आहेत.
- ३९ टक्के कृषी पर्यटन केंद्राला लागून इतर पर्यटन सुविधा आहेत.
- १३ टक्के कृषी पर्यटन केंद्रावर वॉटर स्पोर्ट्स करता येऊ शकतात.
- ३० टक्के कृषी पर्यटन केंद्राच्या जवळ गड किल्ले आहेत. त्यातून इतिहासाची साची माहिती मिळते आहे.
- ७५ टक्के कृषी पर्यटन केंद्रावर कौटुंबिक सहली येतात. तसेच २० टक्के कृषी पर्यटन केंद्रांवर शाळेच्या सहली येतात. ५ टक्के कृषी पर्यटन केंद्रांवर सर्व सहली येतात उदा शाळा, महाविद्यालयीन सहली, कंपनी सहली, कौटुंबिक सहली, इत्यादी.
- २०१८- १९ मध्ये सर्व कृषी पर्यटन केंद्रावर एकूण ७.३ लाख पर्यटक आले आहेत त्यामधून १४.७५ कोटी रुपयाचे उत्पन्न ६२८ कृषी पर्यटन केंद्रांना मिळाले आहे.
- महाराष्ट्रातील एकूण कृषी पर्यटन केंद्रावर १४१६७ विदेशी पर्यटकांनी भेटी दिल्या आहेत.
- महाराष्ट्रातील एकूण ६२८ कृषी पर्यटन केंद्रावर ३४५० खोल्या असून, ३८ टक्के कृषी पर्यटन केंद्रे फक्त दिवसभराची सहली करतात.

संग्रहित

संदर्भ : ■ पांडुरंग तावरे, अध्यक्ष कृषिपर्यटन विकास संस्था, बारामती ■ श्रीकांत उमरीकर, अभ्यासक व लेखक, औरंगाबाद ■ वरूण भामरे, सल्लागार वास्तुशिल्पी, रायगड विकास प्राधिकरण, नासिक ■ शीतल आमटे-करजगी, मुख्य कार्यकारी अधिकारी, आनंदवन, वरोरा जि. चंद्रपुर ■ रफिक शेख, एवरेस्ट विजेता व पो. कॉ. औरंगाबाद ■ लीना कामत-प्रभु ,उपाध्यक्ष आंग्रिया सी इगल प्रा.लि. मुंबई-गोवा ■ स्नेहल पाटील, माहिती अधिकारी,आयटीडीसी, औरंगाबाद.

लेखक माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या औरंगाबाद विभागाचे संचालक आहेत.

क्रीडा : विजय हमारा लक्ष्य हैं...

डॉ. किरण मोघे

महाराष्ट्र आज क्रीडा क्षेत्रात देशातील महत्त्वाचे राज्य आहे. सह्याद्री-सातपुड्याचा कणखरपणा ही महाराष्ट्राची ओळख आहे. इथल्या मातीने आणि वातावरणाने खेळाडूंसाठी आवश्यक ती काटकता दिली आहे. लगोरी, लंगडी, आट्यापाट्या, मल्लखांब, विटीदांडूने खेळासाठी आवश्यक अंगभूत कौशल्य प्रदान केले. त्यातूनच क्रीडा संस्कृती येथे रुजली. पुण्याचा डेक्कन जिमखाना, अमरावतीची हनुमान व्यायाम प्रसारक संस्था यांसारख्या संस्थांनी या संस्कृतीचे वैभव देश-परदेशात पोहोचवण्याचे कार्य केले. कोल्हापूर आणि सांगलीने अनेक कुस्तीपटू घडवले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कुस्तीला राजाश्रय देत खासबाग मैदान उभारले.

कदम कदम पे नक्श है, विजय हमारा लक्ष है'....१९९४ मध्ये बालेवाडीच्या शिवछत्रपती क्रीडानगरीत राष्ट्रीय स्पर्धेच्या निमित्ताने घुमलेले भारतरत्न लता मंगेशकर यांचे हे स्वर राज्यातील क्रीडा क्षेत्राच्या पुढील वाटचालीची दिशा स्पष्ट करणारे होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नेतृत्व करणारे खेळाडू घडवण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेल्या या क्रीडानगरीमुळे राज्यात नव्या क्रीडापर्वाची सुरुवात झाली आणि इथल्या मातीत रुजलेल्या खेळांसोबत इतर आंतरराष्ट्रीय क्रीडा प्रकारातही राज्याला पुढे नेण्याच्या प्रयत्नांना खऱ्या अर्थाने गती मिळाली.

गेल्या ६० वर्षांच्या काळात महाराष्ट्राच्या अनेक खेळाडूंनी देशाच्या क्रीडा लौकिकात भर घातली आहे. अत्यंत मर्यादित सुविधा असतानादेखील खाशाबा जाधव यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर यश संपादन करून नव्या पिढीला खेळाकडे वळण्याची प्रेरणा दिली. त्याच काळात विलियम जोन्स यांनी बिलियर्ड्ससारख्या खेळात नेत्रदीपक कामगिरी केली, तर अनेक क्रिकेटपटूंनी भारतातर्फे खेळताना इंग्लंड आणि न्यूझीलंडविरुद्ध खेळताना चांगली कामगिरी केली.

देशी खेळाकडे लक्ष

कबड्डीचे भीष्माचार्य शंकरराव तथा बुवा साळवी यांच्या प्रयत्नांमुळे कबड्डी खेळाच्या विकासाला गती मिळाली. १९६३ मध्ये राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन करण्यासाठी तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू उपस्थित होते. कबड्डीच्या विकासात पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यापासून सर्वांनीच विशेष योगदान दिले. त्याचा परिणाम म्हणून आज कबड्डी लीगच्या माध्यमातून अनेक खेळाडूंना करिअर करण्याची संधी प्राप्त होत आहे. खो-खोच्या प्रसारातही महाराष्ट्राचे योगदान मोठे आहे.

या खेळाला महाराष्ट्राने लोकाश्रय दिला. भाई नेरुरकर यांच्या प्रयत्नातून खो-खोला संघटनात्मक स्वरूप मिळाले. धुळ्याच्या गरुड मैदानाला खो-खो खेळाच्या प्रसारात वेगळे महत्त्व आहे. महाराष्ट्राच्या मातीत रुजलेल्या या खेळांशिवाय बॅडमिंटन, टेनिस, जलतरण, ॲथलॅटिक्स, क्रिकेट, बुद्धिबळ, नेमबाजी, बास्केटबॉल अशा विविध क्रीडा प्रकारात सुरुवातीपासूनच महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आपली ओळख निर्माण केली. नागपूरच्या यंग मुस्लीम क्लबने फुटबॉलचे अनेक खेळाडू दिले आहेत. मुंबईच्या समर्थ व्यायाम मंदिराची मल्लखांबच्या प्रसारात महत्त्वाची भूमिका आहे.

समर्पणातूनच यश

क्रिकेटपासून ते कबड्डीपर्यंत, खो-खोपासून ते अगदी बिलियर्डपर्यंत मुंबई आणि महाराष्ट्राने भारताच्या क्रीडा क्षेत्राचा पाया रचला. आजची पीढी या पायावर विक्रमांचे इमले रचतेय. पण विक्रमापर्यंतचा हा प्रवास एका रात्रीत झालेला नाही. अनेक पिढ्यांनी त्यासाठी खस्ता खाल्या. काहींनी तर आपले आयुष्य क्रीडा क्षेत्रासाठी समर्पित केले. अशा अनेक अनाम क्रीडा संघटनांच्या प्रयत्नातून महाराष्ट्राचे क्रीडाविश्व घडले आहे.

महाराष्ट्राच्या मातीत रुजलेले कबड्डी, खो-खो, मल्लखांब यांसारखे खेळ आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचले आहेत. ते अधिक लोकप्रिय होण्यासाठी अधिक प्रयत्न करावे लागणार आहेत. त्यासोबत आट्या-पाट्यासारख्या पारंपरिक खेळाच्या संवर्धनाकडेही लक्ष द्यावे लागेल. या खेळांना वलय प्राप्त होण्यासाठी अधिकाधिक स्पर्धात्मक आयोजन होणे आवश्यक आहे आणि त्यासाठी खासगी संस्थांचे पाठबळ तेवढेच महत्त्वाचे आहे.

उल्लेखनीय कामगिरी

महाराष्ट्राला कुस्ती, कबड्डी, खो-खो, हॉलिबॉल आदी क्रीडा प्रकाराची मोठी परंपरा लाभली आहे. ऑलिम्पिक राष्ट्रकुल व आशियाई स्पर्धा, खेलो इंडिया, महिला क्रीडा स्पर्धा आदी स्पर्धांमध्ये राज्याची कामगिरी उल्लेखनीय राहिली आहे. राज्यातील जिल्हा व विभागीय क्रीडा संकुलांची स्थापना करणे, कुस्ती खेळाच्या विकासासाठी अर्थसाहाय्य, व्यायामशाळा विकास योजना, जिल्हा क्रीडा संकुलाची देखभाल करण्यासाठी शासन प्रयत्नशील राहिले आहे. विविध स्पर्धांमधील पदक विजेत्यांना रोख पारितोषिके दिली जातात. त्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात येत आहे. याचबरोबर आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने विविध कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे.

- सुनील केदार, क्रीडा व युवक कल्याण मंत्री

गौरव आणि सन्मान

राज्याच्या क्रीडा संस्कृतीचे संवर्धन व्हावे यासाठी या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या क्रीडा महर्षी, मार्गदर्शक, खेळाडू आणि संघटकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी १९६९-७० पासून शिवछत्रपती पुरस्कारांची सुरुवात करण्यात आली, तर १९८८-८९ पासून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय खेळाडू घडवणाऱ्या मार्गदर्शकांना उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार देण्यात येत आहे. क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी मोलाचे योदान देणाऱ्या क्रीडा महर्षींचा गौरव करण्यासाठी २००१-०२ पासून शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार देण्यात येतो. दिव्यांग खेळाडूंना प्रोत्साहित करण्यासाठी एकलव्य क्रीडा पुरस्कार, तर जल, जमीन आणि आकाशात प्रतिकूल परिस्थितीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना साहसी क्रीडा पुरस्काराने गौरवण्यात येते. महिला खेळाडूंच्या कामगिरीचा गौरव जिजामाता क्रीडा पुरस्काराने तर जिल्हास्तरावर खेळाडू, मार्गदर्शक, संघटक व दिव्यांग खेळाडूंचा गौरव जिल्हा क्रीडा पुरस्काराने करण्यात येतो.

क्रीडा विकासाचे 'व्हिजन'

महाराष्ट्राच्या क्रीडा विकासाला चालना देण्यासाठी आणि खेळ व खेळाडूंना प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी २००१ मध्ये राज्याचे क्रीडा धोरण आखण्यात आले. असे धोरण आखणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरले. राज्याच्या क्रीडा लौकिकात भर घालण्यासाठी आणि कामगिरी उंचावण्यासाठी पुढील चार ऑलिम्पिक स्पर्धांसाठी क्रीडा विभागामार्फत 'ऑलिम्पिक व्हिजन' तयार करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंना प्रशिक्षण आणि आर्थिक साहाय्य केले जात आहे. मिशन ऑलिम्पिक योजनेंतर्गत आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या तयारीसाठी ५२ खेळाडूंना २.५७ कोटी रुपये आर्थिक साहाय्य मंजूर करण्यात आले.

गुणवंत खेळाडूंचा शोध, खेळाडूंना प्रशिक्षण आणि अर्थसाहाय्य, आवश्यक वातावरण निर्मिती, खेळाडूंमधील नेतृत्वाचा विकास, पुरस्काराच्या माध्यमातून प्रोत्साहन अशा विविध पातळीवर क्रीडा विकासाचे प्रयत्न शासन पातळीवर करण्यात येत आहेत. गतवर्षी राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केलेल्या व प्रावीण्य प्राप्त केलेल्या २५२६ खेळाडूंना १.६७

कोटी रुपये शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. १९९१ मध्ये असणारी १६ कोटीची तरतूद आता ३०७ कोटीपर्यंत पोहोचली आहे.

भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे केंद्र (साई) नागपूर येथे स्थापन होत आहे. येथे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा निर्माण होणार आहेत. खेळासाठी अनुकूल वातावरण तयार झाल्याने ग्रामीण-आदिवासी भागातूनही महत्त्वाकांक्षी खेळाडू पुढे येताना दिसत आहेत. त्यांना शासनातर्फे संधीदेखील उपलब्ध करून देण्यात येत आहे. 'मिशन शौर्य'च्या माध्यमातून एव्हरेस्ट शिखर सर करणारे चंद्रपूरच्या आदिवासी आश्रमशाळेतील ११ विद्यार्थी ग्रामीण भागातील क्रीडा विकासाचे उत्तम उदाहरण आहे.

'खेलो इंडिया'चे उत्तम आयोजन

नुकत्याच झालेल्या 'खेलो इंडिया' स्पर्धेच्या निमित्ताने महाराष्ट्रातील उत्तम क्रीडा संघटन, नियोजनाची परंपरा आणि क्रीडाप्रेमींमधील उत्साह याचे दर्शन घडले. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील कोणत्याही क्रीडा नियोजनासाठी महाराष्ट्र सज्ज असल्याचा संदेश या स्पर्धांच्या निमित्ताने देण्यात आला, तसे क्रीडा संस्कृती येथे किती खोलवर रुजली आहे याचेही दर्शन यानिमित्ताने घडले. क्रीडा क्षेत्रात करिअर घडवण्याची स्वप्ने पाहणाऱ्या खेळाडूंसाठी हे आयोजन निश्चित प्रेरक ठरले असणार. या खेळात महाराष्ट्राने अव्वल स्थान पटकावले.

बालेवाडी येथील क्रीडावैभव

पुण्याजवळील बालेवाडी-म्हाळुंगे येथील २०० एकरच्या माळरानावर श्री शिवछत्रपती क्रीडानगरी उभारण्यात आली. एकाच ठिकाणी साधारणत: सर्व प्रकारचे ऑलिम्पिक खेळ असणारे हे देशातील पहिले क्रीडासंकुल बनले. आंतरराष्ट्रीय खेळाडू घडवण्यासाठी आवश्यक क्रीडाग्राम आणि क्रीडासंकुल एकाच ठिकाणी असल्याने हे महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचे 'क्रीडावैभव' ठरले आहे. याच ठिकाणी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, युवा राष्ट्रकुल स्पर्धा, खेलो इंडिया स्पर्धांसह विविध खेळांच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. येथे उभारण्यात आलेल्या महाराष्ट्र क्रीडा प्रबोधिनीच्या माध्यमातून शालेय जीवनापासूनच येथे उत्तम खेळाडू घडवले जात आहेत.

भवितव्याचा वेध

राज्यात आज खेळाकडे करिअर म्हणून पाहणाऱ्या शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहे. यासाठी खेळाडूंना मिळणारी शासकीय नोकरीची संधी प्रोत्साहन देणारी ठरली आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर राज्यासह देशाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या खेळाडूंना शासकीय सेवेत त्यांच्या कामगिरीनुसार थेट नियुक्ती देण्यात येत आहे. आतापर्यंत ६७ खेळाडूंना अशी नियुक्ती देण्यात आली आहे. राज्यातील प्रावीण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय सेवेत नोकरीसाठी ५ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय स्पर्धेत यशस्वी होणाऱ्या खेळाडूंना शासनातर्फे रोख स्वरूपात पारितोषिके देण्यात आली आहेत.

राज्याच्या समृद्ध क्रीडा परंपरेला पाठबळ देण्याचे कार्य राज्य शासनकडून होत आहे. खेळाडूंना उत्तम प्रकारच्या सुविधा आणि खेळण्यासाठी मैदान मिळावे म्हणून तालुका, जिल्हा आणि विभागीय स्तरावर क्रीडासंकुल उभारण्यात येत आहेत. कोल्हापूरच्या विभागीय क्रीडा संकुलात आंतरराष्ट्रीय दर्जाची व राज्यातील पहिली वातानुकूलित तालीम उभारण्यात आली आहे.

योजना अनेक...उद्देश एक...

राज्यात क्रीडा धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक पायाभूत सुविधांचा विकास आणि राज्याचा क्रीडा नकाशा तयार करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवणारे खेळाडू घडवण्यासाठी तयार करण्यात येणारा कृती आराखडा उपयुक्त ठरणार आहे.

क्रीडा प्रशिक्षण शिबिर, क्रीडा सुविधांचे सर्वेक्षण, शाळांना प्रोत्साहन अनुदान, जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र, क्रीडा सुविधा निर्मितीसाठी अर्थसाहाय्य, आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील खेळाडूंना प्रशिक्षण व अर्थसाहाय्य, महाराष्ट्र क्रीडा परिषद अनुदान, अनिवासी क्रीडा प्रबोधिनी, नावाजलेल्या कुस्तीगिरांना मानधन आदी विविध योजना शासनातर्फे राबवण्यात येत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील खेळाडूंच्या गुणवत्तेलाही वाव मिळाला आहे.

शासनाने क्रीडा क्षेत्रातील संशोधन, प्रशिक्षण आणि कौशल्य विकास यामधील गुणवत्ता निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विजय खोले यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

खेळाडूंच्या प्रशिक्षणासाठी क्रीडा प्रबोधिनीची स्थापना करणारे महाराष्ट्र

देशातील पहिले राज्य आहे. पुणे, कोल्हापूर, प्रवरानगर, सांगली, नाशिक, अमरावती, अकोला, औरंगाबाद, ठाणे, नागपूर आणि गडचिरोली येथे प्रबोधिनीची स्थापना करण्यात आली आहे.

जागतिक भरारीसाठी....

प्रशिक्षण आणि साहाय्य यामुळे महाराष्ट्राची क्रीडा क्षेत्रात प्रगती होत आहे. मात्र अजूनही उद्दिष्टाच्या दिशेन बरेच प्रयत्न करावे लागतील. पुरस्कार देणे हा एक भाग झाला, त्यासोबत गावपातळीवरील प्रतिभेचा शोध घेण्यासाठी योग्य नियोजन आणि कष्ट महत्त्वाचे आहेत. ग्रामस्तरावर खेळाविषयीची जागृती आणि शैक्षणिक संस्थेसोबत मैदाने तयार करणे गरजेचे आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील पदकाचा विचार खालच्या स्तरावर खेळाडू घडवण्याच्या प्रक्रीयेपासून व्हायला हवा.

जागतिक स्तरावर नियमित यश संपादन करणाऱ्या देशातील खेळाडू घडवण्याची प्रक्रिया लक्षात घेतली तर बालपणापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत प्रशिक्षणात सातत्य असल्याचे दिसून येते. यासाठी योग्य संस्थात्मक बांधणी तेवढीच महत्त्वाची आहे. पंचायत युवा क्रीडा व खेळ अभियानाच्या धर्तीवर गावपातळीवरील खेळाडूंना प्रोत्साहित करणारी योजनादेखील उपयुक्त ठरू शकेल.

किती खेळाडू स्पर्धात्मक खेळात सहभागी होतात याची नोंद करून सहभाग वाढवण्याचे प्रयत्न गरजेचे आहेत. तूर्तास यश कमी मिळाले तरी चालेल परंतु खेळाडूंचा सहभाग वाढणे महत्त्वाचे आहे. खेळाला मिळणारी प्रसिद्धीदेखील तेवढीच महत्त्वाची आहे. दूरचित्रवाणीवरील क्रीडा स्पर्धांच्या थेट प्रक्षेपणामुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रेरणा मिळाली हे नाकारता येणार नाही. समाजात खेळाडूला प्रतिष्ठा मिळाली तर त्याचा खेळातील सहभाग वाढवण्यावर अनुकूल परिणाम होईल. क्रीडा विकासात खेळाडूला जेवढे महत्त्व आहे तेवढेच खेळासाठी उपलब्ध होणाऱ्या सुविधा आणि मैदानाला आहे. क्रीडा संस्कृतीच्या विकासासाठी खेळाडू, पालक, क्रीडा संघटक, संस्था, प्रशिक्षक या सर्वांच्या प्रयत्नातून अनुकूल वातावरण तयार करावे लागेल. एखाद्या मोठ्या स्पर्धेपुरता खेळाडूची रुची मर्यादीत न राहता दैनंदिन जीवनातही आवड जोपासली जाईल यासाठी प्रयत्न करावे लागतील. त्यासाठी पालक, शिक्षक, मार्गदर्शक या सर्वांचे योगदान आवश्यक आहे. अलीकडच्या काळात काही औद्योगिक संस्थांनी क्रिकेटव्यतिरिक्त इतर खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी केलेले स्तुत्य प्रयत्न या प्रक्रियेचा एक भाग ठरावा.

प्रत्येक विद्यार्थ्याचा खेळात सहभाग

गुणवत्तेचा शोध घेण्यासाठी शालेय क्रीडा स्पर्धा उपयुक्त ठरतात. मात्र या स्पर्धेत निवडक विद्यार्थी सहभागी होत असल्याने त्यापैकी चांगले खेळणाऱ्या खेळाडूंना प्रशिक्षण देऊन त्यांना पुढील स्पर्धेसाठी तयार केले जाते. त्यांच्या क्षमतेनुसार ते विशिष्ट पातळीपर्यंत पुढे जाऊ शकतात. याउलट १०० टक्के सहभाग निश्चित केल्यास खरी गुणवत्ता पुढे येऊ शकेल आणि त्यातील निवड ही निश्चितपणे भविष्यासाठी आश्वासक असेल.

शासनाने उत्तम खेळाडू घडवण्यासाठी उत्तम योजना आखल्या आहेत. त्यांची अंमलबजावणी करताना स्थानिक स्तरावरील समर्पित व्यक्तींची भूमिकादेखील तेवढीच महत्त्वाची आहे. थेट नियुक्तीद्वारे प्रशासनात येणारे खेळाडूदेखील अनुकूल बदल घडवून आणण्यात चांगले योगदान देऊ शकतील. क्रीडा सुविधेसोबतच या क्षेत्रात मनुष्यबळाचे योग्य व्यवस्थापनदेखील महत्त्वाचे आहे.

खेळातील शास्त्रीय दृष्टिकोन महत्त्वाचा

आदिवासी भागातून आलेले ॲथलिटनी सहा महिन्याच्या प्रशिक्षणात राष्ट्रीय स्तरावर उत्तम कामगिरी केल्याची उदाहरणे आहेत. अशा खेळाडूंना प्रोत्साहन देताना स्थानिक पातळीपासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत त्याच्या दैनंदिन सवयी, आहार, प्रशिक्षण यात समानता असणे आणि त्याचे शास्त्रीय विश्लेषण होणे गरजेचे आहे. खेळाडू खेळ निवडताना त्यामागे त्या खेळाची त्याच्या अवतीभोवती असलेली सहज उपलब्धता हेच एक प्रमुख कारण असते. याचा दुष्परिणाम म्हणजे अनेक गुणवान खेळाडूची गुणवत्ता बहरण्याआधीच कोमेजून जाते. पालकांच्या आवडीनुसार खेळाची निवडदेखील गुणवत्तेला मागे सारणारी ठरू शकते.

भारतात आजही आपल्या खेळाडूंच्या यशात त्याच्या वैयक्तिक गुणवत्तेचा आणि मेहनतीचा वाटा ९० टक्के असतो. चीन, अमेरिका आणि रशिया या क्रीडा महासत्ता असलेल्या देशात गुणवत्तेला उमलत्या वयातच पैलू पाडले जातात. मग स्पर्धात्मक जगात प्रवेश करताना हा

खेळाडू सगळी आव्हाने पेलण्यासाठी सज्ज असतो. आपल्याकडे याबाबत काम सुरू असून त्याला गती येणे आवश्यक आहे.

खासगी क्षेत्राने पुढे यावे

शासकीय पातळीवर क्रीडा विकासाचे अनेक प्रयत्न होत असताना खासगी संस्था आणि उद्योकांनीदेखील क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी पुढे येण्याची गरज आहे. ऑलिम्पिक खेळाडू घडवण्यासाठी १५ ते २० वर्षाचा आराखडा तयार करून खेळाडूंमागे अशा संस्थांनी संपूर्ण पाठबळ उभे केल्यास त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येतील. विशेषत: क्लब आणि क्रीडा

प्रबोधिनीसारख्या सुविधा वाढण्यासाठी समाजातून पुढाकार घेतला गेल्यास स्थानिक खेळाडूंना प्रोत्साहन देता येईल.

आज कबड्डी, कुस्ती, ॲथलॅटिक्स यांसारख्या खेळात मिळणारे यश इतर खेळांपेक्षा अधिक आहे आणि या खेळातील बरेच खेळाडू ग्रामीण भागातून आलेले आहेत असे दिसून येईल. त्यामुळे या भागातील गुणवत्तेचा शोध व अशा गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यात खासगी संस्था मोलाचे योगदान देऊ शकतील. खेळाडूंना हवे असणारे साहाय्य केवळ पैशाच्या रूपात नसते तर प्रशिक्षण, विविध स्पर्धांमधील सहभाग, प्रत्येक स्तरावर उन्नत सुविधांची उपलब्धता, पोषणाविषयीचे मार्गदर्शन, आवश्यक मैदान अशा विविध पैलूंचा त्यात समावेश असतो. या बाबी गावपातळीपासून उपलब्ध करून देण्यासाठी क्रीडा संस्थांनीदेखील पुढाकार घेणे गरजेचे आहे.

खेळाडूला आश्वस्त करणे आवश्यक

खेळाडूंना शासकीय नोकरीत आरक्षण आहे, पण तेवढेच पुरेसे नाही. खेळाडूला होणारी एक दुखापत त्याची क्रीडा कारकिर्द संपवू शकते. अशा वेळी त्याची जबाबदारी स्वीकारणारी व्यवस्था अस्तित्वात असल्यास तो पूर्ण क्षमतेने आणि उत्साहाने मैदानावर उतरेल. याचाच दुसरा पैलू म्हणजे राष्ट्रीय पातळीच्या पुढे निवड झालेल्या खेळाडूंना आवश्यक सर्व मदत देण्याची तयारी ठेवावी लागेल. व्यावसायिक आणि शास्त्रीय पद्धतीने होणारी निवड प्रक्रियादेखील खेळाडूच्या मनात आत्मविश्वास निर्माण करणारी असते

लक्षणीय नोंदी

- राही सरनौबत-ऑलिम्पिक स्पर्धेसाठी पात्र ठरणारी पहिली व सर्वात युवा भारतीय महिला नेमबाज. २०१३ चँगवॉन, द. कोरिया येथे झालेल्या विश्वचषक स्पर्धेत पिस्टल प्रकारात सुवर्णपदकासह अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धेत यश.
- राज्याने अनेक कसोटी क्रिकेटपटू देशाला दिले. रणजी करंडक ४४ वर्ष महाराष्ट्राच्या ताब्यात (मुंबई, महाराष्ट्र, विदर्भ संघ मिळून). सचिन तेंडूलकरला क्रिकेटमधील देदीप्यमान कामगिरीबद्दल भारतरत्न सन्मान.
- बिलियर्ड्समध्ये विल्सन जोन्स १९५८ आणि १९६४ च्या स्पर्धेत जगज्जेतेपद पटकावले. स्वतंत्र भारताचा पहिला जगज्जेता खेळाडू होण्याचा मान.
- १९५२ साली सदुभाऊ गोडबोले समितीने कबड्डी शब्दोचाराच्या नियमांची शिफारस केली. १९५३ साली कबड्डी फेडरेशनने ते नियम स्वीकारले.
- कमलेश मेहताने टेबल टेनिस राष्ट्रीय स्पर्धेत ८ वेळा विजेतेपद, 'सॅफ' स्पर्धेत ७ सुवर्ण तर इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ४ रौप्य आणि ४ कास्य पदकांची कमाई केली.
- प्रवीण ठिपसे ग्रॅण्डमास्टर किताब जिंकणारे भारताचे तिसरे खेळाडू ठरले.
- धनराज पिल्ले यांनी चार ऑलिम्पिक, ४ विश्वचषक, ४ चॅम्पिअन्स ट्रॉफी आणि ४ आशियाई क्रीडा स्पर्धेत हॉकीत भारताचे प्रतिनिधित्व केले. अशी कामगिरी करणारे भारताचे एकमेव खेळाडू.
- बुद्दी डिसूझा भारताचा पहिला अर्जुन पुरस्कार विजेता बॉक्सर, त्यांनी ९ वेळा राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेचे विजतेपद मिळवले.
- खो-खो राष्ट्रीय स्पर्धेत पुरुष संघ ५१ पैकी ३८ वेळा विजेता, तर महिला संघ ५० पैकी २० वेळा विजेता.
- वीरधवल खाडे हा ऑलिम्पिकसाठी पात्र ठरणारा सर्वात तरुण भारतीय खेळाडू.
- कविता राऊत राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पदक जिंकणारी महाराष्ट्राची पहिली खेळाडू.
- नंदू नाटेकर विदेशात बॅडमिंटनचे विजेतेपद पटकावणारे पहिले भारतीय बॅडमिंटनपटू.
- ललिता बाबर ही पीटी उषा यांच्यानंतर ३२ वर्षांनी ऑलिम्पिक स्पर्धेच्या अंतिम फेरीत खेळणारी भारतीय खेळाडू.
- नाशिकच्या महाजन बंधूपैकी डॉ. महेंद्र महाजन यांनी काश्मीर ते कन्याकुमारी हे ३८५० कि.मी.चे अंतर १२ दिवसात पूर्ण केले.
- माजी केंद्रीय मंत्री खासदार शरद पवार आणि शशांक मनोहर यांनी आयसीसीचे अध्यक्षपद भूषवले.
- १९५६ च्या मेलबोर्न ऑलिम्पिक स्पर्धेत फुटबॉलमध्ये भारताला पदकाच्या जवळ पोहोचवण्यात नेविल डिसोझा यांची महत्त्वाची भूमिका होती. त्यांनी उपांत्यपूर्व सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध हॅट्ट्रिक गोल नोंदवले.
- पुण्याचे सुरेंद्र चव्हाण एव्हरेस्ट सर करणारे महाराष्ट्राचे पहिले गिर्यारोही ठरले, तर महिलांमध्ये कृष्णा पाटील यांनी हा पराक्रम केला.

हेदेखील लक्षात घ्यावे लागेल. मागेल त्याला खेळ याऐवजी शालेय स्तरावर प्रत्येकाचा खेळात सहभाग निश्चित करावा लागेल. यासाठी पालकांचे सहकार्यदेखील महत्त्वाचे ठरणार आहे. पाल्याच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ या दृष्टिकोनातून त्यांनी खेळाकडे पाहिल्यास मुले मैदानाकडे वळतील.

भविष्य उज्ज्वल आहे...

तंत्रज्ञानाची जोड आवश्यक

महाराष्ट्राने क्रीडा क्षेत्रातील कामगिरी सातत्याचे उंचावली आहे. गेल्या पाच वर्षातील शालेय राष्ट्रीय स्पर्धेत राज्याने सातत्याने दुसऱ्या क्रमांकाचे यश मिळवले आहे. खेलो इंडिया स्पर्धेतही महाराष्ट्राने नेत्रदिपक यश मिळवले. ॲथलेटिक्समध्ये गुणवान खेळाडू पुढे येत आहे. बालेवाडी क्रीडा प्रबोधिनीत प्रशिक्षण घेतलेल्या ८१ खेळाडूंनी देशाचे प्रतिनिधित्व केले आहे. मात्र ही चांगली सुरुवात समजून पुढची वाटचाल करायची आहे. महाराष्ट्राकडे क्षमता आहे, कौशल्य आहे, शासनस्तरावर सकारात्मक दृष्टिकोन आहे, गरज आहे नवे तंत्र आत्मसात करण्याची...

आज जगात प्रत्येक क्षेत्रात वेगाने बदल होत आहेत. क्रीडा क्षेत्रही त्याला अपवाद नाही. या क्षेत्रातील तंत्रदेखील तेवढ्याच वेगाने बदलते आहे. आपल्याला काळानुरूप बदलावेच लागेल. त्यामुळे नुसती गुणवत्ता असून यापुढे चालणार नाही त्याला तंत्रज्ञानाची जोड मिळाली तरच तो खेळाडू आंतरराष्ट्रीय पातळीवर चमक दाखवू शकेल. त्यांना रुचेल आणि समजेल अशा तांत्रिक माध्यमातून त्यांच्याकडे पोहोचवावे लागेल. यापुढच्या काळात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून गावपातळीवर क्रीडाकौशल्य पोहोचवावे लागेल. एखाद्या खेळासाठी आवश्यक आहार, व्यायाम, नियम, खेळण्याची पद्धत, विशिष्ट कौशल्ये या सर्व बाबी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सोप्या पद्धतीने खेळाडूंपर्यंत पोहोचवाव्या लागतील तसे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्यांच्या कामगिरीचे सातत्यपूर्ण विश्लेषण करून त्यात सुधारणा घडवून आणावी लागेल.

एक सुवर्णपान....

स्वतंत्र भारताला ऑलिम्पिकमध्ये पहिले वैयक्तिक पदक कुस्तीतील पैलवान खाशाबा जाधव यांनी मिळवून दिले. १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये त्यांनी बँटमवेट प्रकारात कांस्य जिंकले होते. त्यांच्या विजयानंतर कराडपासून त्यांचे गाव गोळेश्वरपर्यंत काढण्यात आलेली १५१ बैलगाड्यांची मिरवणूक अनेक पैलवानांना प्रेरित करणारी ठरली. त्यांच्यानंतर देशाला ऑलिम्पिकमध्ये वैयक्तिक पदक मिळायला ४४ वर्ष लागली. प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी साकारलेले यश देशाच्या क्रीडा क्षेत्रीतील एक सुवर्णपान आहे.

कुस्ती पैलवान
खाशाबा जाधव

चित्र आश्वासक महाराष्ट्राचे

जिल्हा क्रीडा संकुलाच्या ठिकाणी आणि तालुकास्तरावर एनआयएस प्रशिक्षकांच्या माध्यमातून अशी सुविधा निर्माण करता येईल. जिल्हा क्रीडा संकुलात त्या भागातील खेळाच्या गुणवत्तेनुसार विशिष्ट खेळांचे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करून नवे तंत्र खेळाडूंपर्यंत पोहोचवता येईल. यातून समोर आलेल्या गुणवान खेळाडूंच्या पुढील प्रशिक्षणाची व्यवस्था बालेवाडी येथे केल्यास चांगले खेळाडू तयार होतील. राष्ट्रीय खेळाडूंसाठी शिष्यवृत्ती त्यांना प्रोत्साहन देणारी व पुढील प्रशिक्षणासाठी पूरक ठरू शकेल. त्याचबरोबर खेळातील नियोजन, प्रशिक्षण या दोन्ही बाबीत मनुष्यबळाचा स्वतंत्रपणे विचार केल्यास प्रशिक्षणाची गुणवत्ता आणखी वाढू शकेल आणि प्रशिक्षण आणि पाठबळ यामुळे भविष्यातील ऑलिम्पिक खेळाडू घडतील.

राज्याचा गौरव

देशाच्या क्रीडा वैभवात भर घालणाऱ्या राज्यातील खेळाडूंना देशपातळीवर सन्मानित करण्यात आले आहे.

भारतरत्न - १, पद्मश्री - १९, मेजर ध्यानचंद पुरस्कार - ९, राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार - ५, द्रोणाचार्य पुरस्कार - ७, अर्जुन पुरस्कार - ७०.

संदर्भ : ■ लोकराज्य जानेवारी २०१९, मॅग्निफिशंट महाराष्ट्र ■ संदीप चव्हाण, वरिष्ठ क्रीडा पत्रकार ■ दिनेश पाटील, क्रीडा संचालक कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव ■ विजेंद्र सिंग, ॲथलेटिक्स प्रशिक्षक नाशिक.

जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार

आयटी : गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन, प्रशासनात वापर

डॉ. गणेश व. मुळे

औद्योगिकदृष्ट्या कायम अग्रेसर असलेल्या महाराष्ट्राने नेहमीच तंत्रज्ञानाची कास धरली आहे. माहिती तंत्रज्ञानातील नव्या बदलाचा स्वीकार जसा येथील खासगी क्षेत्रात झाला तसाच तो राज्य शासनाने आपल्या कारभारात आणला. त्यामुळे प्रशासन अधिक गतिमान आणि पारदर्शी होण्यास मदत झाली. नव्या आकांक्षेच्या नव्या पिढीबरोबर हे तंत्रज्ञान अधिकाधिक लोकाभिमुख करून सर्वसामान्यांना होणारा त्रास कमी करण्यावर शासनाचा भर राहिला आहे.

महाराष्ट्रात माहिती तंत्रज्ञानाचा वापर अन्य राज्याच्या तुलनेत अधिक होतो आहे. शासनात अधिक गतिमानता यावी यासाठी राज्यात विविध प्रयोग झाले. आणि त्यामुळे प्रशासनात गतिमानता आली. आज राज्यात कृषी, जैविक, शिक्षण, पर्यावरण, ऊर्जा, चित्रपट, अन्न, माहिती यासह अनेक विषयात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होतो आहे.

संग्रहित

खरंतर तंत्रज्ञानाला कला आणि कौशल्य असे दोन पर्यायी मराठी शब्द आहेत. कालपर्यंत जगात सोनं, हिरे, मोती यापेक्षा 'ऑईल' हे मौल्यवान होते. पण आता त्याची जागा 'डाटा'नी घेतली आहे. जसा मानवी जगण्याला 'आटा' महत्त्वाचा तसा 'डाटा' महत्त्वाचा आहे. महाराष्ट्राने माहिती तंत्रज्ञान धोरण आखले. त्यानुसार कामकाज सुरू झाले. रोजगार निर्मिती, माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा, माहिती तंत्रज्ञान उद्योगाचा प्रसार करीत माहिती तंत्रज्ञानाचा विकास या माध्यमातून डेटासेंटर देखील विकसित करण्याचे धोरण आखण्यात आले.

शेतकऱ्यांसाठी ऑनलाइन पोर्टल

राज्य शासनाने महाआयटी महामंडळापर्यंत महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ च्या डिजिटल अंमलबजावणीसाठी 'ऑनलाइन पोर्टलचा विकास' या पोर्टलचा वापर करून बँकांमार्फत ३४ लाखांहून अधिक कर्ज खात्याच्या रेकॉर्ड/नोंदी अपलोड, ३१ लाखाहून अधिक कर्ज नोंदीवर प्रक्रिया पूर्ण केली. या ऑनलाइन पोर्टलद्वारे बँक, आपले सरकार सेवा केंद्र, शिधावाटप दुकानामध्ये शेतकऱ्यांसाठी आधार प्रमाणिकरणाची सुविधा उपलब्ध केली आहे. आतापर्यंत २९ लाखांहून अधिक शेतकऱ्यांकडून आधार प्रमाणिकरण पूर्ण केले आहे. नोडल बँकद्वारे २६ लाखांहून अधिक कर्ज खात्यात १७ हजार ८० कोटी रकमेचे वितरण पूर्ण करण्यात आले.

उद्योगवृद्धीसाठी तंत्रज्ञान

महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवाल २०१९-२० नुसार राज्यात माहिती तंत्रज्ञान उद्योगांच्या संतुलित वाढीस चालना देण्यासाठी शासनाने माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानाधारित सेवा धोरण लागू केले आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सिडको व सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया यांनी विकसित केलेली ३७ सार्वजनिक माहिती संकुले सुमारे १८ हजार कोटी गुंतवणूक व सुमारे २.६७ लाख रोजगारासह राज्यात कार्यान्वित आहेत.

जैव तंत्रज्ञान

राज्याच्या जैव तंत्रज्ञान धोरणानुसार राज्यात जैव तंत्रज्ञान घटक स्थापित करणा-या कंपन्यांना विविध आर्थिक प्रोत्साहने व कर सवलती दिल्या जातात. राज्यात औद्योगिक विकास महामंडळ परिसरात जालना आणि हिंजवाडी पुणे येथे सार्वजनिक क्षेत्रातील दोन जैव तंत्रज्ञान संकुले विकसित करण्यात आली आहेत. सुमारे ३०५ कोटी अपेक्षित गुंतवणुकीची सहा खासगी तत्त्वांवरील जैव-तंत्रज्ञान संकुले राज्यात प्रस्तावित आहेत. राज्यात सुमारे ४९६८ कोटी गुंतवणूक व सुमारे १.७७ लाख रोजगार निर्मिती होणे अपेक्षित असलेली सार्वजनिक क्षेत्रातील १५ जैव-तंत्रज्ञान विशेष आर्थिक क्षेत्रे प्रस्तावित करण्यात आली आहेत. ऑक्टोबर २०१९ पर्यंत सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांतर्गत २६१ कोटी गुंतवणुकीच्या ५० घटकांची नोंदणी झाली असून, त्याद्वारे ०.८७ लाख रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे. मोठ्या उद्योगांतर्गत ११२० कोटी गुंतवणुकीची व ०.७१ लाख रोजगार निर्माण होणे अपेक्षित असलेली १६ घटकांची नोंदणी झाली आहे.

लोकाभिमुख सेवा

शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करत असताना त्यामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून जनतेला जलद सेवा देण्यास आणि पारदर्शक राज्यकारभार करण्यास या शासनाची प्राथमिकता आहे. शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या डिजिटल अंमलबजावणीसाठी विकसित केलेले ऑनलाइन पोर्टल, कुशल, अर्धकुशल आणि अकुशल कामगारांची औद्योगिक मागणी पूर्ण करण्यासाठी महाजॉब्ज पोर्टल, सायबर हल्ले रोखण्यासाठी उपाययोजना यासोबतच विविध विभागांमध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा अवलंब करून लोकाभिमुख सेवा प्रदान करण्यावर भर आहे.

- सतेज पाटील, माहिती व तंत्रज्ञान, राज्यमंत्री

माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी खासगी क्षेत्रास सहभागी करून घेण्यात आले आहे. या अंतर्गत ५३० खासगी माहिती तंत्रज्ञान संकुले मंजूर करण्यात आली असून त्यापैकी १९.९२७ कोटी गुंतवणुकीची व सुमारे ५.३० लाख रोजगार निर्माण करणारी १९० माहिती तंत्रज्ञान संकुले कार्यान्वित आहेत. उर्वरित ३४० माहिती तंत्रज्ञान संकुलांमध्ये ७०.९९४ कोटी प्रस्तावित गुंतवणुकीसह सुमारे १२.९५ लाख रोजगार संधी निर्माण होणे अपेक्षित आहे. खासगी माहिती तंत्रज्ञान संकुले पुणे १८६, मुंबई शहर व उपनगर १७२, ठाणे १५८, नागपूर ५, नाशिक ५, औरंगाबाद ३ आणि वर्धा १ या जिल्ह्यांमध्ये आहेत.

दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गिका

देशाची राजधानी दिल्ली व आर्थिक केंद्र मुंबई दरम्यानचा दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गिका या नियोजित औद्योगिक विकास प्रकल्पाचा उद्देश पायाभूत क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालून नवीन औद्योगिक शहरे 'स्मार्ट शहरे' म्हणून विकसित करणे हा आहे. या मार्गिकेत राज्यातील शेंद्रा बिडकीन आणि दिघी बंदर या दोन औद्योगिक क्षेत्रांचा समावेश आहे. शेंद्रा

भारत नेटमध्ये अव्वल

राज्यसभेतील एका माहितीनुसार देशात महाराष्ट्र इंटरनेट वापरकर्त्यांमध्ये आघाडीवर आहे. २७.७१ दशलक्ष वापरकर्ते आहेत. यात ९.७४ दशलक्ष हे ग्रामीण भागातील आहेत. तर १७.९७ दशलक्ष हे शहरी भागातील वापरकर्ते आहेत. हीच संख्या ३२४.९५ दशलक्ष संपूर्ण भारतातील आहे. त्यापैकी १२०.८८ दशलक्ष हे ब्रॉडबॅन्ड वापरकर्ते आहेत. उर्वरित २०४.०७ दशलक्ष हे नॅरोबॅन्ड इंटरनेट उपभोक्ते आहेत.

भारत सरकारच्या भारतनेट योजनेत महाराष्ट्राचे स्थान अव्वल आहे. या योजनेंतर्गत राज्यातील ग्रामपंचायत नेटद्वारे जोडण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. ग्रामीण भागातील डेटा, आवाज आणि व्हिडिओ माध्यमातून संपर्क साधण्यासाठी याचा उपयोग होईल. या योजनेतून ग्रामीण भागातील लोक इंटरनेटद्वारे स्वस्तात जोडले जातील. देशातील पहिल्या टप्प्यात ग्रामपंचायती भारतनेट जोडण्यात महाराष्ट्र उत्कृष्ट राज्य ठरले आहे. भरतातल्या १२ हजार ३७८ ग्रामपंचायती इंटरनेट सेवेने जोडल्या गेलेल्या आहेत. १४ हजार ८७८ ग्रामपंचायतीमध्ये भारतनेटचे काम प्रगतिपथावर आहे. डिजिटल भारतात महाराष्ट्राची आघाडी जवळपास सर्वच क्षेत्रामध्ये ठळकपणे दिसून येते हे विशेष होय.

बिडकोन औद्योगिक क्षेत्राला विशाल औद्योगिक समूह (क्लस्टर) आणि दिघी बंदर औद्योगिक क्षेत्रास मुंबई बंदराला पूरक बंदर तसेच व्यापार व औद्योगिक केंद्र बनवणे अशी संकल्पना या मार्गिकेचे यथार्थदर्शी नियोजन पूर्ण झाले असून टप्पा-१ मधील भाग म्हणून निश्चित झालेल्या शहरांसाठी मुख्य आराखडा व प्राथमिक अभियांत्रिकी कामे हाती घेण्यात आली आहे. या मार्गिकेचा एक भाग म्हणून कामावर चालत जाणे (वॉक-टू-वर्क) या संकल्पनेवर आधारित सुनियोजित आणि हरित स्मार्ट औद्योगिक शहर म्हणून राज्यातील १० हजार एकर क्षेत्रात पुनर्वापरासाठी व वापरास योग्य नसलेल्या वस्तूपासून नवीन वस्तू निर्माण करण्याचा पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला पायाभूत सुविधा आहेत. ऑरिकमध्ये सुमारे ५३ भूखंड गुंतवणूकदारांना वाटप करण्यात आले आहेत. ऑरिकमध्ये ५ हजार कोटीपेक्षा जास्त गुंतवणूक झाली असून सुमारे २५०० रोजगार निर्मिती झाली आहे.

पायाभूत सुविधा

सूक्ष्म व लघू उद्योग घटकांच्या सर्वांगीण विकासाकरिता केंद्र शासनाने औद्योगिक समूह विकास कार्यक्रम घोषित केला आहे. या क्षेत्रास कार्यक्षमता व परिणामकारकतेद्वारे समूह व्यूह रचना सहायक ठरते. राज्य शासनाने याच धर्तीवर महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास कार्यक्रम घोषित केला आहे. या कार्यक्रमांतर्गत तंत्रज्ञान, कौशल्य व दर्जात सुधार, क्षमता वर्धन, पणन सुविधा, भांडवल उपलब्धता, पायाभूत सुविधा निर्मिती/अद्ययावतीकरण करणे, सामाहिक सुविधा केंद्राची उभारणी, इत्यादी बाबी हाताळण्यात येत आहेत. सूक्ष्म, लघू उपक्रम-समूह विकास कार्यक्रम केंद्र शासनाने ३० औद्योगिक समूह प्रकल्पांना मान्यता दिली असून एकूण १६९.८५ कोटी अनुदान वितरीत केले आहे. यापैकी १७ प्रकल्प कार्यान्वित झाले असून, त्यामधील उच्चस्तरीय तंत्रज्ञानावर आधारित सामाईक सुविधा केंद्राच्या सुविधा या समूहामधील घटकांना उपलब्ध आहेत.

सेतूची कार्यक्षम यंत्रणा

माहिती तंत्रज्ञान संचालनालयाची स्थापना करण्यात आली. धोरणात्मक आराखडा तयार करणे आणि राज्यातील ई-प्रशासन कार्यक्रमावर देखरेख करणे, राज्य सरकारचे ई-प्रशासनाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आंतरविभागीय समन्वय साधला जाईल याची खात्री करणे या जबाबदाऱ्या या संचालनालयावर आहेत. संचालनालयाच्या मुख्य जबाबदाऱ्या. क्षमतावृद्धी, ई-प्रशासन उपक्रम राबवणे, उपक्रमाची पूर्तता करण्यासाठीच्या योजनांचे नियोजन, अंमलबजावणी. प्रमाणीकरण, सरकारी कामाची कार्यक्षमता, परिणामकारता वाढवण्यासाठी धोरणांची व आराखड्यांची अंमलबजावणी करणे. सामायिक ॲप्लिकेशन प्रक्रियांची प्रमाणीकरण, सुरक्षेचे पालन, आंतरसक्रियता आणि उपलब्धतेचे नियम तयार करणे, कार्यक्रम व्यवस्थापन व लेखा-राज्यभरात धोरणे व मानकांना अनुसरून ई-प्रशासन उपक्रमांना मार्गदर्शन करणे व त्यांचे संचालन करणे, केंद्रीय पायाभूत सुविधा- विविध स्वरूपांच्या राज्यव्यापी केंद्रीय पायाभूत सुविधा तयार करणे. सेवा देणे, अंतर्गत व नागरिककेंद्रित सेवांचे ई-सबलीकरण, निधी व्यवस्थापन-निधीचे स्रोत व त्याचा वापर याचे व्यवस्थापन असे कार्य आहे.

सेतू राज्य शासनाने स्थापन केलेली सोसायटी आहे. राज्यातील नागरिकांना अधिकाधिक कार्यक्षम, विश्वसनीय, पारदर्शक सेवा एकत्रितपणे आणि सातत्याने देणे हे तिचे उद्दिष्ट आहे. विविध प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्याने नियुक्ती केलेली ती संस्था आहे.

ती राज्य व जिल्हा पातळीवर स्थापली आहे. ही सोसायटी राज्यभरातील विविध माहिती तंत्रज्ञान प्रकल्पांना निधी पुरविते. राज्याच्या प्रत्येक जिल्हा आणि तालुकापातळीवर सेतू केंद्रे आहेत.

कोविड-१९ आणि तंत्रज्ञान

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात अग्रेसर आहे आणि त्याचा उपयोग अनेक क्षेत्रात होतो आहे.

कोविड-१९च्या साथीच्या काळात माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव लॉकडाऊनच्या काळात अधिकच दिसून आला. 'वर्क फॉर्म होम' आणि 'ऑनलाइन शिक्षण' पद्धतीत हे तंत्रज्ञान आता सर्वसामान्यांच्या अंगवळणी पडले आहे. माहिती तंत्रज्ञानावर आधारित शिक्षणपद्धती प्रभावी आणि सर्व समावेशक झाली. शिक्षणाची संधी सर्वत्र उपलब्ध झाली. अध्ययन सोपे झाले.

भारताचे माजी प्रधानमंत्री स्व. राजीव गांधी यांनी देशात १९८० च्या दशकात सर्व प्रथम संगणकीय क्रांती घडवून आणली. त्यामुळे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात देशाची वाटचाल जोमाने सुरू झाली. यामाध्यमामुळे माहिती आणि शिक्षण या क्षेत्रात मोठी क्रांती झाली आहे. कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव आणि संसर्ग रोखण्यासाठी केंद्र शासनाचे राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण, महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी, नाशिक डिस्ट्रिक्ट इनोव्हेशन कौन्सिल आणि नाशिक महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने डिजिटल प्लॅटफॉर्म्सची निर्मिती करण्यात आली आहे. 'नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर' ही या प्लॅटफॉर्म्सची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

नवी दिशा आणि अपेक्षा

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात महाराष्ट्राने अधिक भर दिला पाहिजे. आधुनिक सोयीसुविधा नागरिकांना उपलब्ध करून देणे, कामकाजामध्ये तंत्रज्ञानाचा वापर करणे, नव्या संकल्पना राबवणे, इतर ठिकाणी सुरू असलेल्या तंत्रज्ञानविषयक अनुकरणीय प्रकल्पांची अंमलबजावणी करणे याचा समावेश असावा. या क्षेत्रामधल्या विदेशी कंपन्यांशी करार करून अद्ययावत प्रकारचे कामकाज महाराष्ट्र राज्यातूनही शक्य व्हावे यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येते. तसेच या विषयासाठी स्वतंत्र समिती नेमून तज्ज्ञ लोकांचा सल्ला घेण्याचे धोरणही वाखाणण्याजोगे आहे.

डिजिटल महाराष्ट्र

सायबर तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे जगातील अब्जावधी लोकांच्या जीवनामध्ये फार वेगाने बदल घडत आहेत. सर्व जग जोडले जाऊन 'ग्लोबल व्हिलेज' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरली आहे. बऱ्याचशा सार्वजनिक सुविधा 'ई' म्हणजे

महाकवच ॲप

या डिजिटल प्लॅटफॉर्मची दोन मुख्य वैशिष्ट्ये आहेत. पहिले म्हणजे, 'कॉन्टॅक्ट ट्रेसिंग' आणि दुसरे 'क्वारंटाइन ट्रॅकिंग' कॉन्टॅक्ट ट्रेसिंग म्हणजे कोरोनाबाधित व्यक्ती ही अन्य कोणाच्या संपर्कात आली होती का, याचे ट्रेसिंग. अशा व्यक्तीने स्मार्टफोन बाळगला असल्यास त्याच्या आधारे ती व्यक्ती नेमक्या किती आणि कोणकोणत्या व्यक्तीच्या संपर्कात आली होती याचे ट्रेसिंग करणे या ॲपमुळे शक्य झाले. शिवाय, अशी व्यक्ती हॉटेल, रेस्टॉरंट, धार्मिक स्थळे, रेल्वे स्टेशन अशा कोणत्या गर्दीच्या सार्वजनिक ठिकाणी वावरली होती याचे ट्रेसिंगही महाकवच ॲपमुळे अचूकपणे आणि कमीत कमी वेळेत झाले. पूर्वी ही तपासणी प्रशासनाला मॅन्युअल पद्धतीने म्हणजे प्रत्यक्ष कर्मचाऱ्यांना पाठवून करावी लागत होती. यात वेळही खूप जात होता. पण आता 'महाकवच'मुळे प्रशासनाला कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी निश्चित दिशेने प्रयत्न करता आले.

महाकवच प्लॅटफॉर्मचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे क्वारंटाइन ट्रॅकिंग. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण, परदेशातून आलेली व्यक्ती किंवा संशयित रुग्ण यांनी किमान १४ दिवस स्वतःचे विलगीकरण म्हणजेच क्वारंटाइन करणे अतिशय आवश्यक असते. पण, बऱ्याचदा लोक निष्काळजीपणा दाखवतात आणि नियमांचे उल्लंघन करून अनेकांच्या संपर्कात येतात. त्यामुळेच कोरोनाचा संसर्ग वाढत जातो. पण आता अशा व्यक्तींच्या स्मार्ट फोनमध्ये जेव्हा महाकवच ॲप इनस्टॉल केले. तेव्हा अशा व्यक्तींचे क्वारंटाइन ट्रॅकिंगही डिजिटली करता आले. याची मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे जिओ फेन्सिंग व सेल्फी अटेंडन्स होय. अशा व्यक्तींना एका मर्यादित त्रिज्येतच वावरण्याची मुभा असेल. जेव्हा ही त्रिज्या ओलांडली जाईल तेव्हा ॲपद्वारे ही माहिती प्रशासनाला समजेल. यानंतर योग्य ती कार्यवाही प्रशासनातर्फे होणार आहे. या ॲपचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सेल्फी अटेंडन्स. प्रशासनाकडून जेव्हा जेव्हा विचारणा होईल तेव्हा अशा व्यक्तीला सेल्फी काढून तो ॲपद्वारे प्रशासनाकडे पाठवावा लागेल. कोविड-१९ च्या काळात याचा चांगला उपयोग झाला.

इलेक्ट्रॉनिक मार्गाने पुरवणे सुरूही झाल्याचा अनुभव येतो आहे. डिजिटल कनेक्टिव्हिटीमुळे शेतकऱ्यांना हवामान, शेतमालाचा भाव व शेतीविषयक अन्य बाबींची माहिती तत्काळ मिळणार आहे. यामुळे एक प्रकारे शेतकऱ्यांच्या मालासाठी 'डिजिटल मार्केट' निर्माण होणार असून मोठ्या प्रमाणावर शेती व शेतीपूरक रोजगाराच्या संधी निर्माण होतील. ही मोठी बाब आहे.

भारतात माहिती व तंत्रज्ञानाचा विकास जागतिकीकरणानंतर झाला. मात्र तो मोजक्या वर्गापर्यंतच मर्यादित होता, असेही मत तज्ज्ञ नोंदवतात. जे सुशिक्षित होते, ज्यांनी उच्च शिक्षण घेतले, काही अभियंता झाले, १९९० च्या दशकानंतर अभियंत्रिकीची महाविद्यालयेसुद्धा स्थापन झाली. त्यातूनच हजारो -लाखो लोकांना रोजगार / नोकऱ्या मिळाल्या, यामुळे या वर्गातील लोकांची भरभराट झाली. गेल्या आठ वर्षात सहराष्ट्रात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राने प्रगती केली असली तरी आगामी काळात 'डिजिटल युगाकडे' घेऊन जाण्यासाठी या सरकारने त्याकरिता चांगली पावले उचलली आहेत. सामान्य माणसाचे जनधन खाते काढणे हे अत्यंत स्वागतार्ह गोष्ट आहे.

खेड्यातील एखादा व्यक्ती आजारी पडली तर तंत्रज्ञानाच्या साहाय्याने त्या व्यक्तीवर उपचार शहरातील डॉक्टरद्वारे होऊ शकतात. तंत्रज्ञानाच्या योग्य वापरामुळे अनेक रोगांवर सहज मात करता येऊ शकते, असे तज्ज्ञांना वाटते. माहिती व तंत्रज्ञान सोबतच संगणकाचा योग्य वापर सरकार चालवण्यामध्ये झाला तर याचा फायदा सामान्य माणसाला किती होतो, यावरून आपल्याकडे माहिती तंत्रज्ञानाची क्रांती किती झाली आहे याचा अंदाज येतो, हे अधिक होण्याकरिता आपल्या खूप मोठे काम उभे करावे लागेल. उदा. माहिती तंत्रज्ञानाचा शेती, शिक्षण, आरोग्य, या विभागांमध्ये प्रामुख्याने तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. फक्त डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, स्मार्टकार्डचा वापर, विदेशातील कंपन्यांचे कोडिंग करणे, या सर्व गोष्टीमुळे तंत्रज्ञानात भरीव क्रांती झाली असे म्हणता येणार नाही. राज्य शासन या दृष्टीने चांगले प्रयत्न करत आहे, ही आश्वासक बाब आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या नव्या आव्हानाला सामोरे जाण्याची राज्याची पूर्ण क्षमता अधिक विकासाभिमुख रहाणार आहे. शिक्षणापासून ते मनोरंजनापर्यंत आणि पर्यटनापासून शेतीपर्यंत साऱ्या आघाड्यांवर महाराष्ट्र राज्य तंत्रज्ञानाच्या नव्या क्षितिजाशी आपले हात पोहोचवणार आहे. आज पाहिले तर शिक्षणाचा पाया भक्कम करणारी तंत्र प्रणाली अधिक पक्की करण्याकडे राज्याचा भर आहे. मुलांचा पाया नव्या तांत्रिक उपाययोजना करण्यावर शासनाचा भर आहे. माहितीचा होणारा यापुढच्या काळातला विस्तार आपल्या ज्ञानशाखातून तो परिपूर्ण

सायबर गुन्हेगारी

सायबर गुन्हेगारी हा सर्वांच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. देशातील गुन्हेगारीचा लेखाजोखा मांडणारा 'क्राइम इन इंडिया २०१९' हा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. देशात २०१९ मध्ये ५१ लाख ५६ हजार १७२ एकूण गुन्हे दाखल झाले आहेत. यामध्ये ४४ हजार ५५६ सायबर गुन्हे आहेत. देशात २०१८ मध्ये २७ हजार २४८ सायबर गुन्हे घडले होते. या वर्षी ६३ टक्क्यांनी सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहेत. सायबर गुन्ह्यात सर्वाधिक गुन्हे (२६,८९१) हे फसवणुकीच्या उद्देशाने झाले आहेत. यामध्ये डेबिट, क्रेडिट कार्ड, ऑनलाइन फसवणुकीच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. त्यानंतर लैंगिक छळाच्या उद्देशाने दोन हजार २६६ गुन्हे दाखल झाले आहेत. देशात २०१९ साली सर्वाधिक सायबर गुन्हे कर्नाटकात दाखल झाले असून महाराष्ट्र सायबर गुन्ह्यांत तिसऱ्या स्थानावर आहे. तर, मुंबई शहर देशात दुसऱ्या स्थानावर असल्याचे दिसून आले आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम ग्लोबल रिस्क रिपोर्ट २०१९ च्या अहवालानुसार, दशकभरातच सायबर क्राईम हा एक विशेषज्ञ आणि कोनाडा-गुन्हेगारीचा प्रकार बनून आज जगातील सर्वात महत्त्वपूर्ण सामाईक जोखिमांकडे गेला आहे. जगातील जवळजवळ प्रत्येक तंत्रज्ञान प्रगत राज्यांनी आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्थेने आर्थिकदृष्ट्या प्रेरित सायबर क्राइमच्या परिणामास कमी करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. खालील तीन तंत्रज्ञानाची पुढील १० वर्षांच्या जागतिक सायबरसुरक्षाची व्याख्या फार चांगली आहे. ५ जी नेटवर्कची नवीन पिढी ही सायबरसुरक्षा लँडस्केपसाठी सर्वात कठीण आव्हान असेल. हे फक्त वेगवान इंटरनेट नाही. जग अशा युगात प्रवेश करेल जेथे २०२५ पर्यंत ७५ अब्ज नवीन उपकरणे दरवर्षी इंटरनेटशी कनेक्ट होतील आणि सध्याच्या इंटरनेटच्या वेगाच्या जवळपास १000 पट वेगवान अवघड अनुप्रयोग आणि पायाभूत सुविधा चालवतील. जेव्हा हे एंटरप्राइझ आणि ऑपरेशनल टेक्नॉलॉजीसह एकत्र केले जाईल तेव्हा सायब्रेटॅक्सची एक नवीन पिढी उदयास येईल. ५ जी केवळ महान समृद्धी आणि लोकांचे जीवन वाचवण्यात मदत करणार नाही, परंतु सायबर क्राइमला खऱ्या अर्थाने वास्तविक जगात नेण्याची क्षमतादेखील वाढवेल.

होण्यासाठी आपले योगदान करत आहे. उपलब्ध होत असलेल्या माहितीच्या शाखा त्याला आता संगणकाच्या साहाय्याने समजून घेण्याची क्षमता आहे. राज्यात स्वतंत्र अशी शिक्षण देणारी अनेक विद्यापीठे माहिती आणि तंत्रज्ञानातील प्रगती प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना नव्या उत्साहाने प्रदान करत असतात. आपले राज्य तंत्रज्ञानाचा जोरावर आपली संस्कृती आणि भाषा दोन्हीकडे एकाच वेळी परिपूर्ण करण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहे, असे मत अभ्यासक नोंदवतात.

देशात महाराष्ट्राचे स्थान अव्वल आहे याचे हेच मोठे कारण आहे. जाणकार नागरिक आणि त्याला प्रोत्साहन देणारे सरकार यांचा नेमका समन्वय इथे दिसतो. येथे संशोधन शाखेत नवे संशोधन विकासात भर घालत आहे. आज देशात राजकीय इच्छाशक्तीच्या जोरावर प्रत्येक राज्य आपापला वाटा उचलत आहे. महाराष्ट्र त्यातही आपला सहभाग अधिक ठळकपणे दाखवून देण्यावर भर देत आहे. इच्छाशक्ती, राज्यशक्ती आणि प्रजाशक्ती एकवटून महाराष्ट्र आपले आव्हान पेलण्यात नक्की अग्रेसर राहील-असेल, असेही मत तज्ज्ञांनी नोंदवले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता नवे क्षेत्र

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)चा वापर वाढवण्याची गरज आहे. बायोमेट्रिक्स विविध क्षेत्रांमध्ये आणि जगभरातील विविध उद्दिष्टांमध्ये व्यापकपणे सादर केला जात आहे. बोटाचे ठसे, व्हॉईस ओळख आणि रेटिनल स्कॅन याना देखील चोरीचे लक्ष्य करतील. थ्री-फॅक्टर ऑथेंटिकेशन हा एक उत्तम उपलब्ध पर्याय आहे आणि त्या दोन-घटकांची प्रमाणीकरण आवश्यक आहे. पासवर्ड, टोकन आणि बायोमेट्रिक्स हे तीन घटक प्रमाणीकरणासाठी आहेत. बायोमेट्रिक सॉफ्टवेअर, तंत्रज्ञान आणि स्टोरेज पॉईंट्सची संपूर्ण परिस्थितीकीय प्रणाली समजून घेतल्यास वेगाने आणि वाढत असलेल्या हल्ल्याच्या पृष्ठभागाचे रक्षण करणे अद्याप कठीण आहे. महाराष्ट्राने या क्षेत्रात अधिक काम करावे. पुढील १० वर्षात सायबर सुरक्षा लँडस्केप लक्षणीय बदलू शकेल, जो बदलत्या तंत्रज्ञानाच्या नवीन पिढीद्वारे चालवला जाईल. जगभरातील शैक्षणिक तंत्रज्ञान, तांत्रिक समुदाय आणि धोरणकर्ते यांचे कौशल्य विकसित केले पाहिजे. हे केल्याने, सुरक्षितता परिसंस्था सायबर सुरक्षा डिफेन्स आणि भागीदारीची नवीन पिढी तयार करण्यात मदत करू शकते, ज्यामुळे जागतिक समृद्धी होईल.

सोशल मीडिया

राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने नव माध्यमांचा तंत्रज्ञानयुक्त अंगीकार केला आहे. महान्यूज वेबपोर्टल, ट्विटर, फेसबुक,

इन्स्टाग्राम, युट्यूब, ब्लॉग या समाजमाध्यमांच्या प्लॅटफॉर्म्ससह व्हॉट्सॲप, टेलिग्राम या इन्स्टन्ट मेसेजिंग माध्यमांचादेखील माहिती प्रसारणासाठी उपयोग करून घेतला जातो. मंत्रालयासह विभागीय, जिल्हा कार्यालये आणि दिल्ली, पणजी येथील महाराष्ट्र परिचय केंद्रेदेखील समाजमाध्यमांवर आपल्या कार्यालयाचे प्रतिनिधित्व करू लागली आहेत. या सर्व समाजमाध्यमांद्वारे शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि निर्णयांसह धोरणांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवली जात आहे. या माध्यमांशी लाखो लोक जोडले गेल्याने शासनसंवाद अधिक गतिमान झाला आहे. तंत्रज्ञानाच्या सुयोग्य वापर यामुळे होतो आहे. महासंचालनालयाने ट्विटर हॅण्डल्स- ४८, फेसबुक पेजेस - ४४, ब्लॉग्स - ४२, युट्यूब चॅनल्स - १६, इन्स्टाग्राम - ११, टेलिग्रामचॅनल्स - ४, जिओचॅटचॅनल - १, व्हॉट्सॲप ग्रुप्स - अंदाजे ११०० पेक्षा अधिक ग्रुप निर्माण करून माहितीचा प्रसार तत्काळ करण्याकडे भर दिला आहे. यासाठी जनतेचा प्रतिसाद सकारात्मक आहे.

एकूणच, आगामी काळात या क्षेत्रासाठी अधिक आश्वासक चित्र निर्माण करण्याची आवश्यकता आहे. दृष्टिज्ञान, आवाज आणि बोलणे यांचे आकलन, निर्णय क्षमता, भाषांतर यांसारख्या मानवी बुद्धिमत्ता लागणाऱ्या गोष्टी संगणकाचा वापर करून साध्य करण्याचे तंत्रज्ञान म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता होय. शासन त्या दृष्टीने काही नवीन करता येईल का? याचा विचार करीत आहे. कृषी, शिक्षण, उद्योग, पर्यटन, बँकिंग यांसारख्या क्षेत्रात याचा अधिक उपयोग होऊ शकतो. विशेषत: तंत्रज्ञान युजर फ्रेन्डली कसे करता येईल. याबाबत नव्याने मांडणी करावी लागेल, असे तज्ज्ञांना वाटते. राज्याचा शेवटच्या घटकापर्यंत तंत्रज्ञान पोहोचवून नवी विकासनीती शासन विकासासाठी उपयोगात आणत आहे. हेच आजवरच्या प्रयत्नातून दिसते. आगामी काळात देशाच्या अन्य राज्यांच्या तुलनेत माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात महाराष्ट्राची आघाडी असेल, यात शंका नाही.

संदर्भ : या लेखासाठी सर्वश्री अतुल कहाते, डॉ. दीपक शिकारपूर, अच्युत गोडबोले, सुभाष इनामदार, डॉ. प्रशांत माळी आणि किशोर गांगुर्डे यांच्याशी चर्चा.

उपसंचालक (माहिती), कोकण विभाग, नवी मुंबई

कायदा व सुव्यवस्था : तंत्रज्ञानाच्या साथीने गुन्ह्यांना आळा

समाजाचा आणि पर्यायाने त्या राज्याच्या प्रगतीचा थेट संबंध हा कायदा आणि सुव्यवस्थेशी असतो. समाजाच्या निकोप वाढीबरोबरच महाराष्ट्राच्या विकासासाठी अनुकूल, भयमुक्त वातावरण निर्माण करण्यात महाराष्ट्र पोलिसांचे मोठे योगदान आहे. स्वातंत्र्यलढ्यात आणि स्वातंत्र्यानंतर देशाची अखंडता टिकवून ठेवण्यात तसेच रोजच्या गुन्हेगारीसोबतच दहशतवाद आणि नक्षलवादाविरुद्धचा लढा असो वा सामाजिक प्रश्न, पोलिसांची कामगिरी विविधांगी विस्तारलेली आहे. गेल्या ६० वर्षांत महाराष्ट्राने विकासाची घोडदौड करून जी प्रगती साधली, त्यात राज्याच्या अबाधित असलेल्या कायदा-सुव्यवस्थेचा मोठा वाटा आहे.

किशोर गांगुर्डे

देशातील तिसऱ्या क्रमांकाचे मोठे राज्य असलेल्या महाराष्ट्रात देशातील सर्वात मोठे पोलीस दल आहे. 'सदरक्षणाय् खलनिग्रहणाय' या ब्रीदवाक्यानुसार कार्यरत असलेले पोलीस दल दहशतवाद, नक्षलवाद, सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे अशा विविध आघाड्यांवरदेखील पूर्ण ताकदीने लढत आहे. काळाप्रमाणे पोलीस दलाचेही आधुनिकीकरण, सक्षमीकरण होत गेले. मात्र, बदलत्या काळात गुन्ह्यांचे प्रकार बदलले आहेत, सायबर गुन्ह्यांना आळा घालण्याबरोबरच यातील गुन्हेगारांना जेरबंद करण्याचे मोठे आव्हान सध्या आहे.

पोलिसांना ध्वज प्रदान

महाराष्ट्र पोलीस दल २ जानेवारी १९६१ रोजी स्थापन झाले. याचदिवशी तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी महाराष्ट्र पोलीस दलाला ध्वज प्रदान केला, हा प्रसंग पोलीस दलासाठी एक महत्त्वपूर्ण प्रसंग मानला जातो. हाच दिवस महाराष्ट्र पोलिस दलाचा स्थापना दिन म्हणून साजरा केला जातो.

मिळाली रुबाबदार वर्दी

कालपरत्वे पोलिसांच्या कार्यपद्धतीमध्ये गुणात्मक बदल झाले. सुरुवातीला निळ्या रंगाची हाफ पॅन्ट आणि निळ्या रंगाचा फुल शर्ट हा पोलिसांचा गणवेश होता. या गणवेशाचे कापड जाडेभरडे असायचे, नंतरच्या काळात साधारणपणे १९८१ च्या दरम्यान हा गणवेश बदलला आणि खाकी रंगाच्या फुल पॅन्ट व खाकी हाफ शर्ट असा गणवेश झाला.

महाराष्ट्र पोलीस दलाचा विस्तार

राज्यात कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी महाराष्ट्र पोलीस सदैव सज्ज आहेत. राज्यात पोलीस यंत्रणेचा चांगलाच

विस्तार झाला असून आज राज्यात पोलिसांचे विविध १०३ घटक कार्यान्वित आहेत. मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, नवी मुंबई, अमरावती, पिंपरी-चिंचवड आणि लोहमार्ग मुंबई या अकरा ठिकाणी पोलीस आयुक्तालये आहेत. नुकतेच सप्टेंबर महिन्यात मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यान्वित झाले असून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते या पोलीस आयुक्तालयाचे ई-उद्घाटन झाले आहे. राज्यात ८ परिक्षेत्रे, ३६ पोलीस जिल्हे, ४ रेल्वे पोलीस जिल्हे, १६ राज्य राखीव पोलीस दल गट, १४ पोलीस प्रशिक्षण संस्थेसह गुन्हा अन्वेषण विभाग (सीआयडी), राज्य गुप्तवार्ता विभाग (एसआयडी), मोटार परिवहन विभाग, राज्य पोलीस बिनतारी संदेश यंत्रणा असे विविध विभाग कार्यरत आहेत, त्या माध्यमातून राज्यातील कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे काम सुरू आहे. अलीकडच्या काळातील सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता त्यासाठी महाराष्ट्र राज्य सायबर सुरक्षा प्रकल्प, आर्थिक गुन्ह्यांच्या तपासासाठी आर्थिक गुन्हे शाखादेखील नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार करून काम करत आहेत. बृहन्मुंबईसहित राज्यात एकूण १,१६५ पोलीस ठाणी आहेत. प्रशासकीय कारभारासाठी राज्याची आठ परिक्षेत्रांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. १९५६ मध्ये या परिक्षेत्रांची रचना करण्यात आली होती, त्या वेळी चार परिक्षेत्र होती, २६ एप्रिल १९७३ ला परिक्षेत्रांची पुनर्रचना होऊन सहा परिक्षेत्रे झाली आणि आता सध्या ८ परिक्षेत्रे कार्यरत आहेत.

'३०३' 'फोरटेन मस्कट'

१९६० पासून पोलिसांकडे ३०३ प्रकारच्या बंदुका, फोरटेन मस्कट अशा प्रकारची विविध हत्यारे त्यावेळी होती, आता पोलीस दल काळानुसार बदलले आहे, लाकडी दंडुक्याची जागा आता फायबरच्या दंडुक्याने तर जुन्या बंदुकांची जागा एके ४७, एके ५६, एसएलआर सारख्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी घेतली आहे. बुलेटप्रुफ जॅकेटांसह शस्त्रांसह दळणवळणाची साधने, तपासाच्या पद्धती बदलत्या गुन्ह्यांना अनुसरून बदलल्या आहेत. वेगवान वाहने आणि संपर्क यंत्रणादेखील अधिक गतिमान झाल्या आहेत.

जातीय दंगलींचे प्रमाण कमी

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर पोलीस दलापुढे जे आव्हान होते ते चोरी, घरफोडी, खून आदी प्रकारच्या गुन्ह्यांबरोबरच जातीय दंगलींचे आव्हान पोलिसांपुढे होते. १९६९, १९७३, ९१८४, १९९२, १९९३ या काळातील जातीय दंगलींचे मोठे आव्हान होते. संवेदनशील ठिकाणे अशी ओळख असलेल्या मुंबई, भिवंडी, मालेगाव आदीसारख्या ठिकाणी या दंगली झाल्या. अलीकडच्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात झालेले औद्योगिकीकरण, रोजगाराच्या संधीत झालेली वाढ, शिक्षणाचे वाढलेले प्रमाण आणि पोलिसांनी जातीय सलोखा अभियानासारखे राबवलेले जागृतीपर उपक्रमांमुळे दंगलींचे प्रमाण लक्षणीय कमी झाले आहे.

संघटित गुन्हेगारांना आळा

मुंबई शहरात १९८० च्या दशकात संघटित गुंड टोळ्यांनी डोके वर काढले, चाकू, सुरे वापरणाऱ्या दादा लोकांचा काळ तसा संपत आला असतानाच या संघटित गुंडाच्या टोळ्यांनी मोठा हैदोस घातला, मुंबई पोलीसांनी ((TADA) Terrorist and Disruptive Activities (Prevention) Act) त्यानंतर 'मोक्का' (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा') सारख्या कडक कायद्यांची अंमलबजावणी करून या टोळ्यांचे कंबरडे मोडले. महाराष्ट्रात 'टाडा'ऐवजी 'मोक्का' म्हणजे 'महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा' २४ फेब्रुवारी १९९९ ला लागू करण्यात आला. संघटित गुन्हेगारीविरुद्ध 'मोक्का'सारखा कठोर कायदा करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य राज्य ठरले.

नक्षलवादाविरोधात उपाययोजना

एकीकडे मुंबईतील संघटित टोळ्यांचा बीमोड होण्याच्या मार्गावर असतानाच महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्याच्या भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेऊन १९८० च्या दशकात गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी आपले बस्तान बसवण्यास

पोलीस यंत्रणा अधिक सक्षम

"राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था कायम राखली जावी यासाठी पोलीस दल अधिक सक्षम करण्याकडे आमचे लक्ष आहे. पोलिसांवर कामाचा ताण पडू नये यासाठी रिक्त पदे लवकरच भरली जातील. विशेषतः महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी कठोर कायदे करून त्याची अंमलबजावणी केली जाईल. आंध्रप्रदेशच्या दिशा कायद्याच्या धरतीवर आपण महाराष्ट्रात शक्ती कायदा करत आहोत. त्याचा मसुदा अंतिम टप्प्यात आहे. पीडितांना न्याय मिळवून देतानाच निरपराध्यांवर कोणताही अन्याय होऊ नये यासाठी तपास यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात आहे."

- अनिल देशमुख, गृह मंत्री

सुरुवात केली. अलिकडच्या काळात गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागातील आदिवासी बांधवांकरिता विविध लोकोपयोगी उपक्रम सुरू केले असून स्वतंत्र पोलीस परिक्षेत्र कार्यान्वित केले आहे, त्याबरोबरच नक्षल कारवायांवर प्रतिबंध घालण्यासाठीच १ डिसेंबर १९९० साली 'सी-६०' या विशेष पथकाची स्थापना केली. यात फक्त ६० सक्षम व विशेष कमांडोंची नेमणूक करण्यात आली. मधल्या काळात गडचिरोली जिल्ह्यात नक्षल कारवायांमध्ये वाढ झाल्याने गडचिरोलीचे उत्तर विभाग व दक्षिण विभाग या दोन विभागात विभाजन केले. दक्षिण भागात प्राणहिता उप मुख्यालय येथे मार्च १९९४ साली सी-६०चे दुसऱ्या मुख्यालयाची स्थापना झाली. सी-६० पथक हे नक्षल्यांचा कर्दनकाळ म्हणून ओळखल्या जाते. सी-६० पथकाला यापूर्वी (क्रॅक कमांडो) या नावाने सुद्धा ओळखले जात होते.

नक्षल चळवळीत ओढल्या गेलेल्या तरुण-तरुणींना मूळ प्रवाहात आणण्यासाठी शासनाने 'नवजीवन'नावाची योजना सुरू केली. त्यामुळे २००५ पासून ते आजपर्यंत गडचिरोली पोलीस दलासमोर एकूण ६४१ जहाल नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. त्यांच्या पुनर्वसनासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. एकीकडे आत्मसमर्पितांचे पुनर्वसन करतानाच दुसरीकडे सध्याचे युवक-युवती नक्षलवाद्यांच्या भूलथापांना बळी पडणार नाहीत, यासाठी पोलीस विशेष खबरदारी घेत आहेत. शिक्षणापासून वंचित असलेल्या अतिदुर्गम अशा ताडगाव, दामरंचा, हेडरी, गॅरापत्ती या भागात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाशी समनव्य साधून मुक्त विद्यापीठे केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. याचा ११५७ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे. या विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण करण्यासाठी 'प्रयास' (PRAYAS - Police reaching out to youth and students) सारख्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

'महाराष्ट्र सायबर'

सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासह सर्व सायबर गुन्ह्यांच्या तपासातील समन्वयासाठी राज्यात विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र सायबर स्थापन करण्यात आले आहे. देशात सर्वप्रथम महाराष्ट्रात सर्व पोलीस ठाण्यांपर्यंत सायबर सुरक्षेबरोबरच AMBIS (Automated Multi Model Biometric Identification System) राबवले जात आहे. ऑनलाइन व स्वामित्व हक्काची पायरसी रोखण्यासाठी महाराष्ट्र सायबरने डिजिटल क्राईम युनिट स्थापले असून सर्व ऑनलाइन पायरसीच्या गुन्ह्यांचा तपास या शाखेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

एसआरपीएफची मोलाची मदत

राज्यातील कायदा-सुव्यवस्थेबरोबरच आपत्ती व्यवस्थापन, नक्षलविरोधी मोहीम, महत्त्वाच्या स्थळांची सुरक्षा व्यवस्था, प्रशिक्षणासाठी राज्यात राज्य राखीव पोलीस दल (SRPF) तैनात आहे. साधारणपणे ६ मार्च १९४८ रोजी विशेष सशस्त्र पोलीस दल कार्यान्वित झाले. १९७० च्या दरम्यान हे दल भाभा अणू ऊर्जा संशोधन केंद्र आणि विमानतळावरही सुरक्षा व्यवस्थेचे काम पाहू लागले, नक्षलवादाचा मुकाबला करण्यासाठी या दलाचा विस्तार करण्यात आला आणि हिंगोली, गडचिरोली येथे नवीन गट तयार करण्यात आले. सध्या राज्य राखीव पोलीस दलाचे एकूण १६ गट कार्यरत आहेत. या गटांमध्ये १६,६४३ पोलीस अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. विशेष म्हणजे १९६१ ला गोवा पोलीस ऑपरेशन्समध्ये पुणे एसआरपीएफ गटाने सक्रिय सहभाग घेतला होता, त्याबद्दल तत्कालिन प्रधानमंत्री पंडित नेहरू यांनी या युनिटचा गौरव देखील केला होता.

'सीआयडी'चा बदलता चेहरा

फ्रेझर कमिशनच्या शिफारशीवरून २६ ऑक्टोबर १९०५ रोजी बॉम्बे प्रेसिडेन्सीच्या गुन्हे अन्वेषण शाखेची पुनर्रचना झाली आणि सीआयडी म्हणजेच गुन्हे अन्वेषण विभाग कार्यान्वित झाला. हा विभाग पोलीस खात्यातील महत्त्वाचा विशेष विभाग असून उच्च न्यायालय, महाराष्ट्र शासन किंवा पोलीस महासंचालकांनी सोपवलेल्या क्लिष्ट गुंतागुंतीच्या व व्यापक स्वरूपाच्या तसेच महत्त्वाच्या गुन्ह्यांचा तपास करतो. विभागाच्या आधिपत्याखाली अंगुली मुद्रा केंद्राची स्थापना १८९९ साली पुणे येथे झाली असून या केंद्राच्या कामकाजात कालपरत्वे बदल होत गेले. २०१७ मध्ये महाराष्ट्र शासनाने Automated Multimodel Biometric Identification System (AMBIS) या संगणकीय प्रणालीस अंगुली मुद्रा केंद्रातील शिक्षाप्राप्त व अटक आरोपींच्या अभिलेख पत्रिकांचे संगणकीकरण करण्यास मंजुरी दिली. याच विभागाच्या अखत्यारीतील पोलीस श्वान पथकाची पुनर्रचना झाली आहे, त्यात सीआयडीच्या अधिपत्याखाली ४६ श्वानपथक, तर महाराष्ट्रात एकूण ३५० श्वान कार्यरत आहेत.

'दिशा' च्या धर्तीवर लवकरच कायदा

महिलांवरील अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी राज्य शासनाने विविध उपाययोजना केल्या आहेत. राज्य शासनाने महिला सुरक्षेबाबत निवृत्त न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती, समितीने महिला

सुरक्षेच्या दृष्टिकोनातून विविध उपाययोजना सूचवणारे तीन अंतरिम अहवाल शासनाला दिले राज्यातील जवळपास सर्वच पोलीस ठाण्यांमध्ये महिला साहाय्य कक्ष स्थापन करण्यात आले, ज्यात सर्व अधिकारी-कर्मचारी या महिलाच होत्या. सर्व पोलीस घटक कार्यालये आणि पोलीस ठाण्यांमध्ये महिला सुरक्षा समिती, सामाजिक सुरक्षा समिती, विशेष समुपदेशन केंद्रे, एसटी स्थानकावर विशेष साहाय्य कक्ष, आणि हेल्पलाइन कार्यन्वित करण्यात आल्या.

महिलांविषयक खटल्याचे तत्काळ निकाल लागावेत, यासाठी विशेष आणि जलद गती न्यायालये स्थापन करण्यात आली. हुंडाबळी रोखण्यासाठी जिल्हास्तरावर दक्षता कक्षाची स्थापना करण्यात आली, तर पोलीस ठाण्यांमध्ये कामाच्या ठिकाणी महिलांसाठी तक्रार समिती स्थापन करण्यात आली. आंध्र प्रदेशच्या 'दिशा' कायद्याच्या धर्तीवर लवकरच महाराष्ट्रात कठोर कायदा करण्यात येणार आहे. या प्रस्तावित नव्या कायद्याचे प्रारूप तयार करण्यात आले आहे. 'दिशा' कायद्यात कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. बलात्कार, सामूहिक बलात्कार अशा गुन्ह्यांत आरोप सिद्ध झाल्यास दोषीला २१ दिवसांत शिक्षा देण्यात येणार आहे. या कायद्यात फाशीच्या शिक्षेचीही तरतूद करण्यात आली आहे. बलात्काराच्या गुन्ह्यात एफआयआर दाखल झाल्यानंतर २१ दिवसांमध्ये सुनावणी पूर्ण करून आरोप व गुन्हा सिद्ध झाल्यानंतर त्याप्रकरणी तत्काळ शिक्षा देण्याची तरतूद या कायद्यात आहे.

फोरेन्सिक लॅब

फेब्रुवारी १९५८ मध्ये स्थापलेल्या न्याय साहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या माध्यमातून तपास अधिकाऱ्यांना गुन्हा संशोधन कार्यात शास्त्रीय मदत पुरवतात. त्याचा पोलिसांना गुन्हा अन्वेषणामध्ये आणि न्यायालयाला पुरावे म्हणून निर्णयासाठी मदत होते. २००६-०७ मध्ये नार्को ॲनालिसिस, ब्रेन फिंगर प्रिंटिंग टेप ॲनालिसिस, लाय डेटेक्सेन, सायबर फॉरेन्सिक स्पिकर आयडेंटिफिकेशन तंत्रज्ञान या प्रयोगशाळेत सुरू केले आहे. केवळ राज्यातील पोलिसांनाच नव्हे तर फोरेन्सिक लॅबची सुविधा नसणाऱ्या दमण व दिव या केंद्रशासित प्रदेश व गोवा तसेच राज्यातील सैनिकी रुग्णालये आणि सीबीआयला देखील या लॅबमधून तांत्रिक सेवा उपलब्ध करून दिली जात आहे.

बॉम्बशोधक व नाशक पथक

राज्यात स्फोटकांचा वाढता प्रसार लक्षात घेऊन राज्य शासनाने घातपात कृत्यांचा प्रतिबंध करण्यासाठी प्रथम मुंबई शहराकरिता १२ जुलै १९८९ ला बॉम्बशोधक व नाशक पथक निर्माण केले. नागपूर, मराठवाडा आणि नांदेड परिक्षेत्रातील नक्षलवाद्यांच्या वाढत्या कारवाया तसेच बॉम्बस्फोटांच्या घटना लक्षात घेऊन नागपूर व औरंगाबाद परिक्षेत्रासाठी २८ सप्टेंबर १९९० व २६

जुलै १९९३ ला नांदेड शहरासाठी बॉम्ब शोधक व नाशक पथके तयार करण्यात आली. मुंबईत १२ मार्च १९९३ रोजी व त्यानंतर बॉम्बस्फोटांची मालिका घडल्यानंतर २३ मे १९९४ ला ठाणे, पुणे आणि औरंगाबाद येथे नव्याने बॉम्बशोधक व नाशक पथके तयार करण्यात आली. २००१ मध्ये या पथकाची पुनर्रचना करण्यात आली. २००८ मध्ये कोल्हापूर, लातूर, सोलापूर, बुलडाणा, रायगड, मालेगाव (नाशिक ग्रामीण), शिर्डी (अहमदनगर) या ७ ठिकाणी पथके कार्यरत झाली. त्यानंतर १६ सप्टेंबर २००८ अन्वये महाराष्ट्र राज्यात सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी बी.डी.डी.एस. पथके स्थापली आहेत. महाराष्ट्रात एकूण ६३ बी.डी.डी.एस. पथके कार्यरत आहेत मुंबई येथे १३ तर महाराष्ट्रातील इतर भागात ५० बॉम्बशोधक व नाशक पथके तैनात आहेत.

दहशतवादाविरोधात एटीएस

राज्यात दहशतवादी कारवायांना आळा घालण्यासाठी ८ जुलै २००४ ला दहशतवादविरोधी पथकाची स्थापना करण्यात आली आहे. हे पथक, नागपूर, औरंगाबाद येथे आणि उपपथक पुणे, नाशिक, अकोला, नांदेड येथे कार्यरत आहेत.

पोलीस दलाचे सक्षमीकरण

मुंबईला सीमेपलीकडून लक्ष्य करण्याचे प्रकार अनेकदा झाले. अतिरेकी हल्ला, बॉम्बस्फोट अशा कारवाया केल्या गेल्या. २६ नोव्हेंबर २००८ ला मुंबईवर झालेला दहशतवादी हल्ला हा या शक्तिस्थळावरचा हल्ला होता. मुंबई पोलिसांबरोबरच एनएसजी कमांडो, लष्कर, नेव्ही मार्कोस सारख्या केंद्रीय सुरक्षा दलांनी या हल्ल्याचा संपूर्ण ताकदीने प्रतिकार केला. मात्र, या वेळी दहशतवाद्यांकडे अत्याधुनिक शस्त्रे असल्याचे उघडकीस आल्याने मुंबई पोलिसांच्या सक्षमीकरणावर भर दिला. त्या वेळी नेमण्यात आलेल्या राम प्रधान समितीने विविध उपाययोजना सुचवल्या. शासनाने यातील विविध उपाययोजना अमलात आणल्या. पोलीस दलाचे आधुनिकीकरण होतानाच ते अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न झाला.

'फोर्स वन'ची स्थापना

मुंबईवर झालेल्या दहशतवादी

हल्ल्यानंतर राज्य शासनाने दहशतवाद्यांकडून होणाऱ्या संभाव्य हल्ल्यांचा प्रभावी व समर्थपणे मुकाबला करण्यासाठी राज्यात राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या (एन.एस.जी.च्या) धर्तीवर विशेष कमांडो पथक स्थापन करण्याचा निर्णय घेतला आणि २ एप्रिल २००९ रोजी राज्य सुरक्षा दलामध्ये 'फोर्स वन'या नव्या कमांडो पथकांची निर्मिती केली. त्याच वर्षी 'फोर्स वन अर्बन काऊंटर ट्रेनिंग अकादमी' निर्माण करण्यात आली. यापूर्वीच शासनाने दहशतवादी कारवायांना आळा घालण्यासाठी मुंबई पोलीस आयुक्तालयात ३१ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयान्वये २६ जलद प्रतिसाद पथके (क्यूआरटी) निर्माण करण्यात आली आहेत.

'गुप्तवार्ता'ची विशेष नजर

१९०५ मध्ये फ्रेझर कमिशनच्या शिफारशींवरून सीआयडीची इंटेलिजन्स विंग अस्तित्वात आली १९८१ ला तिची पुनर्रचना झाली आणि तिला गुप्तवार्ता विभाग असे नाव दिले. सध्या राज्यात गुप्तवार्ता विभागाचे ठाणे, कोकणभवन, पुणे, नाशिक, कोल्हापूर, अमरावती, नागपूर, अमरावती, नांदेड या ९ ठिकाणी घटक कार्यालये आहेत. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, महत्त्वाची ठिकाणी, सागरी किनारे, विघटनवादी/जातीय संघटना तसेच, इतर हालचालींबाबत गुप्तवार्ता मिळवून ती शासनास सादर केली जाते. कायदा-सुव्यवस्थेमध्ये गुप्त वार्ता विभागाची अतिशय महत्त्वाची भूमिका आहे.

प्रशिक्षणावर विशेष लक्ष

राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांना व शिपायांना प्रशिक्षण देण्यासाठी नाशिक येथे महाराष्ट्र पोलीस अकादमी व खंडाळा, नागपूर, अकोला, जालना, नानवीज (दौंड), मरोळ, बृहन्मुंबई, लातूर, तुरची (सांगली), धुळे आणि सोलापूर येथे पोलीस प्रशिक्षण केंद्रे आहेत.

नक्षलवादी, समाजकंटकांच्या चळवळींना आळा घालण्यासाठी राज्य राखीव पोलीस बल, तसेच जिल्हा पोलीस दलातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षणासाठी सुरूबडी, जिल्हा नागपूर येथील नवीन जागेवर अपारंपरिक अभियान प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले आहे. या प्रशिक्षणत गोरील्ला वॉर फेअर पद्धतीचा जास्तीत जास्त वापर करुन नक्षल्यांच्या वाढत्या चळवळीला आळा घालण्यावर भर दिला जात आहे. महाराष्ट्राबरोबर इतर नक्षल प्रभावित राज्य म्हणजे मध्यप्रदेश, छत्तीसगड येथील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना संयुक्तपणे प्रशिक्षण देण्यात येत आहे. जेणेकरून संयुक्त नक्षलविरोधी अभियान राबवल्यास नक्षल प्रभावित राज्यामध्ये नक्षलवाद्यांकडून होणाऱ्या कारवाईस आळा घालण्यास मदत होईल. अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी ९ ऑक्टोबर १९६४ रोजी वाहतूक संस्थेची स्थापना करण्यात आली, या संस्थेमुळे वाहतूकविषयाचे सखोल प्रशिक्षण पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांना मिळू लागले.

महाराष्ट्र पोलीस

१ जानेवारी १८२७ - तत्कालीन गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांनी बॉम्बे प्रेसिडेन्सी पोलीसची निर्मिती केली.

१९३५ - बॉम्बे प्रोव्हिन्स पोलीस

१९४९ - बॉम्बे स्टेट पोलीस

१ मे १९६० - महाराष्ट्र पोलीस

कारागृहातील शेती

वर्ष	उत्पादन रुपये
१९६६	७ लाख ९५ हजार रुपये
२०१८-१९	४ कोटी ८ लाख रुपये

कारागृहातील उद्योगातून मिळालेले उत्पादन

वर्ष	उत्पादन रुपये
१९६५	३९ लाख ९ हजार रुपये
२०१५-१६	१२ कोटी ६४ लाख रुपये

तंटामुक्त गाव मोहीम

गावपातळीवरील तंटे, वाद सामोपचाराने सोडवण्यासाठी १५ ऑगस्ट २००७ पासून सुरू करण्यात आलेल्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेमुळे गाव पातळीवर निर्माण होणारे कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न कमी होऊ लागले आहेत.

गावपातळीवर तंटे मिटत असल्याने पोलीस प्रशासनावरचा ताण कमी होऊ लागला आहे. ही मोहीम सुरू झाल्यापासून २०१५-१६ पर्यंत सुमारे १८९८९ गावे तंटामुक्त गाव पुरस्कारासाठी तर १३११ गावे विशेष शांतता पुरस्कारासाठी पात्र ठरली आहेत. या मोहिमेमुळे गावातील वाद गावातच मिटू लागले.

महामार्ग वाहतूक पोलीस

महामार्गावरील वाहतूक सुरळीत व नियंत्रित ठेवण्यासाठी राज्य वाहतूक शाखेची स्थापना १९४८ मध्ये स्थापली. मार्च १९८९ मध्ये ही शाखा बंद करण्यात आली. महामार्गावर होणारी लूटमार रोखण्यासाठी १९९२ मध्ये महामार्ग सुरक्षा गस्ती पथक कार्यरत करण्यात आले. त्यानंतर पुढील चार वर्षात १९९६ मध्ये महामार्ग पोलीस शाखा कार्यान्वित झाली. अपघातग्रस्तांना मदत, प्रवाशांना दवाखाने, विश्रामगृह, पेट्रोलपंप, पोलीस ठाणे आदींची माहिती देण्यासह महामार्गावरील वाहतूक सुरळीत ठेवण्याचे काम या शाखेच्या वतीने केले जाते. आज राज्यात ६३ पोलीस मदत केंद्रे कार्यरत आहे.

पोलिसांसाठी घरे

पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांना आवश्यक निवासस्थाने पुरवण्यासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळाची १३ मार्च १९७४ मध्ये स्थापना करण्यात आली. पोलीस निवासस्थानाबरोबरच पोलीस ठाण्यांसह इतर निवासी, कार्यालयीन इमारतींची उभारणी या महामंडळाने केली. स्थापनेच्या वेळी या महामंडळाचे सुमारे १० कोटी रुपयांचे भांडवल होते.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

भ्रष्टाचारमुक्त राष्ट्राचे ध्येय साध्य करताना शासकीय यंत्रणेद्वारे आणि समाजाद्वारे भ्रष्टाचारविरोधी प्रबळ संस्कृती निर्माण करण्यासाठी भ्रष्ट लोकसेवकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग राज्यात कार्यरत आहे. १९४६ मध्ये मुंबई व मुफसल (उपनगर) क्षेत्रासाठी लाचलुचपत प्रतिबंधक शाखा स्थापित करण्यात आल्यानंतर या दोन्ही शाखांचे १९५३ मध्ये एकत्रीकरण करण्यात आले. पुढे १९५७ मध्ये मुंबईच्या बॅलॉर्ड पिअर येथे लाचलुचपत प्रतिबंधक आणि गुप्तवार्ता केंद्र, स्वतंत्रपणे स्थापन करण्यात आले. १९९२ मध्ये वरळीला स्थलांतरित झालेल्या या विभागाचे नाव बदलून ते 'लाचलुचपत प्रतिबंधक विभाग' असे करण्यात आले. लाच स्वीकारताना सापळा लावणे, बेहिशोबी अपसंपदा जमा करणाऱ्यांविरुद्ध तसेच अन्य भ्रष्टाचार करणाऱ्यांविरुद्ध कारवाई केली जाते.

राज्यात ६० तुरुंग

पुनर्वसनासाठी गुन्हेगारांची सुधारणा हे ध्येय ठेवून १८९४ च्या तुरुंग कायद्यानुसार महाराष्ट्रात कारागृहांची स्थापना झाली आहे. राज्यात ६० तुरुंग असून एक खुली वसाहत, १९ खुले तुरुंग, एक किशोर सुधारालय आणि एक महिला कारागृहाचा समावेश होतो. कैद्यांना तिथे संगणक प्रशिक्षण तसेच पहिली ते दहावीपर्यंत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून अनेक बंदी उच्च शिक्षणाचादेखील लाभ घेत आहेत. कारागृह उद्योग, शेतीची कामेसुद्धा कारागृहात केली जात आहेत.

सध्या महाराष्ट्राच्या कायदा-सुव्यवस्थेच्या अंगाने विचार केल्यास महिलांशी संबंधित गुन्हे, सायबर सुरक्षा, आर्थिक गुन्हे, अतिरेकी कारवाया, मोठ्या व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक रोखण्याचे मोठे आव्हान आहे. त्या दृष्टीने उपाययोजना होण्याची आवश्यकता आहे. तसे प्रयत्नदेखील सुरू असून महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी लवकरच नवा कायदा राज्य शासन करणार आहे. शेतमाल खरेदी करून पैसे न देणाऱ्या व्यापाऱ्यांच्या विरुद्ध कठोर कारवाई करून शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी नवीन धोरण आणण्याच्या तयारीत शासन आहे. हे धोरण केल्यानंतर महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.

महत्त्वाचे निर्णय

- पोलीस शिपायांची सुमारे १२ हजार ५२८ पदे भरण्याचा निर्णय.
- आंध्रप्रदेशच्या दिशा कायदा सारखा महाराष्ट्रात 'शक्ती कायदा' मसुदा अंतिम टप्प्यात.
- मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली.
- राज्यातील सर्व पोलीस ठाण्यात सीसीटीव्ही बसवण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- कुराडगाव ता.जामखेड, जि.अहमदनगर येथे राज्य राखीव पोलीस बल गट निर्माण करण्यास मान्यता.
- टाकळी ढोकेश्वर, ता.पारनेर, जि. अहमदनगर येथे नवीन पोलीस स्टेशन, मनुष्यबळ व साधनसामग्री उपलब्ध करून देण्यास मान्यता, तसेच सातारा जिल्ह्यातील पाटण पोलीस ठाणे आणि उंब्रज पोलीस ठाण्याचे विभाजन व मल्हारपेठ आऊटपोस्टचे अपग्रेडेशन करून नवीन मल्हारपेठ पोलीस ठाणे निर्माण करण्यास मान्यता.

काही महत्त्वाचे

- राज्यात १९४६ च्या उत्तरार्धात नगरसेना संघटना सुरू झाली. कायदा-सुव्यवस्था, आपत्तीच्या वेळी मदत, वाहतूक, दळणवळण, पाणीपुरवठा, समाजकल्याण योजना आदींमध्ये त्यांचा मोठा उपयोग होत होता. डिसेंबर १९६३ अखेरीस त्यात ६६,८४१ नगरसैनिक होते विशेष म्हणजे त्यात स्त्री नगरसैनिकांची संख्या २६६१ इतकी होती.
- वैद्यकीयदृष्ट्या आणि रासायनिकदृष्ट्या कायदेशीर महत्त्व असलेल्या वस्तूंची तपासणी करून गुन्ह्यांच्या तपासाला साहाय्य करण्यासाठी ७ ऑक्टोबर १९६३ रोजी विधिविज्ञान प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली होती.
- पूर्वी कारागृहात बंदी असलेल्या कैद्यांना रंगीत टोप्या देण्याची पद्धत होती, ही पद्धत बंद करण्याचा आदेश शासनाने १९६७-६८ मध्ये दिला, तेव्हापासून ही पद्धत बंद झाली.
- १९६२-६३ मध्ये पोलिसांना तपास कामात साहाय्य करण्यासाठी दोन श्वान पथक पुण्यात कार्यरत होते. त्या पथकात दोन श्वान होते.
- देशातीलच नव्हे, तर जगातील पहिले महिला खुले कारागृह येरवडा, पुणे येथे १४ मार्च १९१० रोजी सुरू करण्यात आले, तर १९६८ मध्ये पैठण येथे खुले जिल्हा कारागृह सुरू झाले.
- अलीकडच्या काळात पोलीस दलात हजारो पदांची मोठी भरती झाली आहे.

संदर्भ : नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. प्रताप दिघावकर, अभ्यासक डॉ. रोहिदास दुसार, गृह विभागाची 'कार्याची रूपरेषा' अहवाल, कार्यक्रम अंदाजपत्रक, विश्वकोश, प्रभाकर पवार लिखित 'मुंबईच्या गुन्हेगारीचा एन्सायक्लोपीडिया महाराष्ट्र पोलीस, मुंबई पोलीस, महामार्ग वाहतूक पोलीस, गडचिरोली पोलीस, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे संकेतस्थळ

वरिष्ठ सहायक संचालक

राज्य शासन राज्याचा विकास करताना अनेक उपाययोजना करत असते. या उपाययोजना करताना सर्वसमावेशक विकास हा दृष्टिकोन समोर ठेवला जातो. विकासाभिमुख वाटचाल करताना राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात येतात. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयांचा थोडक्यात आढावा..

मंत्रिमंडळात ठरले !

पायाभूत सुविधेसाठी निधी

केंद्र शासनाच्या मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील पायाभूत सुविधा विकास निधी या योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेंतर्गत राज्यातील सागरी भागात जेट्टीसह मत्स्यबंदर बांधकामे व मासळी उतरवण्याची ठिकाणे विकसित करण्यासाठी शासनाचे स्वत:चेच प्रकल्प राबवण्यात येणार आहेत.

केंद्र शासनाकडून २०१८ च्या अर्थसंकल्पामध्ये ही योजना राबवण्याचे घोषित केले होते. या योजनेत केंद्र शासन सर्व राज्यांकरिता पुढील ५ वर्षात ७५२२.४८ कोटीचा निधी उपलब्ध करून देण्याचा प्रस्तावित आहे. ही योजना २०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीत राबवण्यात येणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी नाबार्डकडून कर्ज घेण्याच्या अनुषंगाने राज्य शासन, नाबार्ड व केंद्र शासनाचा मत्स्यव्यवसाय विभाग यांच्यात त्रिपक्षीय करार करण्यासदेखील या वेळी मंत्रिमंडळाकडून मान्यता देण्यात आली.

आदरातिथ्य क्षेत्राला उद्योगाचा दर्जा

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर आदरातिथ्य क्षेत्राचे पुनरुज्जीवन व पर्यटकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आदरातिथ्य क्षेत्राला औद्योगिक दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला. यानुसार प्रथम टप्प्यात केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे नोंदणीकृत असलेल्या हॉटेल व्यावसायिकांकडून १ एप्रिल २०२१ पासून वीज दर, वीज शुल्क, पाणीपट्टी, मालमत्ता कर, विकास कर व अकृषिक कराची आकारणी औद्योगिक दराने करण्याचा निर्णय घेण्यात आला.

केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे नोंदणीकृत नसलेल्या हॉटेल व्यावसायिकांकडून औद्योगिक दराने कर / शुल्क आकारणी करण्याकरिता निकष विहित करण्याकरिता एक तज्ज्ञ समिती नेमून राज्याचे निकष निश्चित करण्यात येतील. त्यानंतर ऑनलाइन अर्जप्रक्रिया राबवून निकषांची पूर्तता करणाऱ्या हॉटेल व्यावसायिकांना औद्योगिक दराने कर/ शुल्क आकारणी लागू करण्यात येईल.

भांडवली मुल्य सुधारणा

कोविड-१९मुळे टाळेबंदी आणि इतर क्षेत्रावर विपरित परिणाम झालेला पाहता २०२०-२१ मध्ये सुधारित होणारे इमारत किंवा जमिनीचे भांडवली मूल्य आता २०२१-२२ मध्ये सुधारित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये पोटकलम १५४ (१-ड) अंर्तभूत करण्याकरिता अध्यादेशात तशी सुधारणा करण्यात येईल.

लोकांचे दैनंदिन रोजगार बंद झाल्याने सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारांवर विपरीत परिणाम झाल्याचे दिसून येते. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.

माजी सैनिकांसाठी योजना

राज्यातील कायम वास्तव्य करीत असलेल्या माजी सैनिक व त्यांच्या विधवांना एका निवासी मालमत्तेचा कर, घरपट्टी माफीच्या योजनेस 'मा. बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजना' असे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला.

संरक्षण दलातील शौर्यपदक धारक आणि माजी सैनिकांच्या विधवांना नागरी भागातील घरपट्टी व मालमत्ता कर माफ करण्याची तरतूद नगर विकास विभागाने केली आहे. त्याचप्रमाणे ग्रामविकास विभागानेदेखील ग्रामीण भागातील अशा माजी सैनिकांच्या विधवांना एकच निवासी इमारतीस करातून माफी देण्याची तरतूद केली आहे. मात्र, नागरी व ग्रामीण क्षेत्रातील सर्वच सैनिकांना मालमत्ता करातून सवलत देण्याची तरतूद नसल्याने अशी मागणी करण्यात येत होती. या

वैद्यकीय उपकरण पार्क

रायगड जिल्ह्यात बल्क ड्रग पार्क आणि औरंगाबाद येथे ऑरिक सिटीमध्ये वैद्यकीय उपकरण पार्कसाठी विशेष प्रोत्साहने देण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे राज्यामध्ये वैद्यकीय उपकरण तसेच औषधी उत्पादनास मोठा वाव मिळणार आहे. या पार्कमधील उद्योगांना विशेष प्रोत्साहन योजना ५ वर्ष कालावधीकरिता लागू राहील.

दोन्ही विभागांच्या योजनांचे एकत्रीकरण करून त्याला 'मा.बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजना' असे नाव देण्यात आले असून यामुळे नागरी व ग्रामीण भागातील माजी सैनिकांना मालमत्ता करातूनदेखील सूट मिळेल.

शिवभोजन थाळी

शिवभोजन थाळीचा दर ३१ मार्च २०२१ पर्यंत ५ रुपये एवढा करण्याचा निर्णय घेण्यात आला. कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर १ ऑक्टोबरपासून पुढील ६ महिन्यासाठी हा दर लागू राहील. जानेवारी २०२० पासून १० रुपये एवढ्या दराने शिवभोजन थाळी उपलब्ध करून देण्यात येत होती. कोरोनामुळे मार्चपासून या थाळीची किंमत ५ रुपये एवढी करण्यात आली. सध्या एकूण ९०६ शिवभोजन केंद्रांमधून थाळ्यांचे वितरण होते.

पुनर्विकासाकरिता सूचना

मुंबई शहरातील जीर्ण व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या जलद पुनर्विकासाकरिता ११ सप्टेंबर २०१९ चा शासन निर्णय रद्द करून नवीन मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या मार्गदर्शक सूचनांमध्ये खालील बाबींचा समावेश असेल.

विकासक नोंदणी व विकासक पात्रतेसंदर्भातील नवीन मार्गदर्शक सूचना/ निकष गृहनिर्माण विभागाच्या स्तरावर नव्याने निश्चित करून निर्गमित करण्यात येतील.

उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकास योजनेमधील मालक/विकासक यांनी भाडेकरू/रहिवाशी यांचे १ वर्षाचे भाडे आगाऊ जमा करण्यासाठी एस्क्रो खाते उघडणे बंधनकारक व पुढील उर्वरित कालावधीचे भाडेदेखील याचप्रमाणे प्रकल्प पूर्ण होईपर्यंत दरवर्षी आगाऊ जमा करणे मालक/विकासकास बंधनकारक राहील.

उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाच्या बांधकामावर लक्ष ठेवण्यासाठी दक्षता समितीची स्थापना करणे. या समितीमध्ये संबंधित इमारतींच्या ना-हरकत प्रमाणपत्र धारक यांनी नेमलेला वास्तुविशारद यांचा नव्याने समावेश.

म्हाड अधिनियम, १९७६ मधील कलम-१०३ (ब) अन्वये भूसंपादित केलेल्या मालमत्तेचा पुनर्विकासास चालना देण्यासाठी मार्गदर्शक सूचना.

उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ३ ते ५ वर्षाची कालमर्यादा निश्चित करण्यात आली.

धारावी पुनर्विकासासाठी निविदा

धारावी पुनर्विकास प्रकल्पाची सध्याची निविदा प्रक्रिया रद्द करून नव्याने निविदा मागवण्याबाबत निर्णय घेण्यात आला. धारावी प्रकल्पाचा विकास करण्यासंदर्भात १६ ऑक्टोबर २०१८ रोजी मंत्रिमंडळाने निर्णय घेतला होता. त्यानुसार सध्या सुरू असलेली धारावी पुनर्विकासाची निविदा प्रक्रिया रद्द करण्याबाबत सचिव समितीने निर्णय घेतला होता. या निविदेच्या अटी व शर्तींमध्ये योग्य त्या फेरदुरुस्त्या करून नव्याने निविदा मागवण्याबाबत सचिव समितीचा निर्णय कायम करण्यात आला. या प्रस्तावाच्या अंमलबजावणीत काही फेरबदल करावयाचे झाल्यास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात येणार आहे.

प्रशासकांचा कालावधी वाढवला

कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर नजीकच्या काळामध्ये निवडणुका न झालेल्या १२ नागरी स्थानिक संस्थांमधील प्रशासकांच्या नियुक्तीचा कालावधी ६ महिन्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. मे व जून २०२० मध्ये मुदत संपलेल्या ३ महानगरपालिका, ८ नगरपरिषदा व एका नगरपंचयायतीच्या निवडणुकीची प्रक्रिया कोविड-१९मुळे स्थगित करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे या संस्थांमध्ये प्रशासक नियुक्त करण्यात आले होते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये प्रशासकाचा कालावधी ६ महिन्यांपेक्षा जास्त करण्यासंदर्भात सुधारणा करणे गरजेचे होते.

विधेयकाचे प्रारूप मागे

डाळीसाठी दर नियंत्रक विधेयकाचे प्रारूप मागे घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला. २०१४-१५ मध्ये डाळींचे भाव मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे मंत्रिमंडळाने २६ एप्रिल २०१६ च्या बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेनुसार राज्यात डाळींचे दर नियंत्रित ठेवण्याच्या दृष्टिकोनातून डाळीसाठी दर नियंत्रक विधेयकाचे प्रारूप तयार करून केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर केले होते. केंद्र शासनाने आता जीवनावश्यक वस्तू (सुधारणा) अधिनियम, २०२० मंजूर केला असून राष्ट्रपतींनी त्यास मान्यता दिल्यानंतर ५ जून २०२० पासून तो अंमलात आला आहे. त्यानुसार तृणधान्य, डाळी, कांदा, बटाटा, खाद्यतेल व खाद्यतेल बिया यांचे नियमन केवळ युद्ध, दुष्काळ, आत्यंतिक भाववाढ आणि गंभीर स्वरूपाची नैसर्गिक आपत्ती यासारख्या अतिविशिष्ट परिस्थितीतच करता येईल अशी तरतूद केली आहे. त्यामुळे दर नियंत्रक विधेयकाची आवश्यकता राहिली नसल्याने सदर विधेयकाचे प्रारूप मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

वातानुकूलित ब्रॉडगेज मेट्रो

नागपूर शहर व परिसरात रेल्वेच्या सध्याच्या पॅसेंजर ट्रेन्सऐवजी आधुनिक प्रकारच्या वातानुकूलित ब्रॉडगेज मेट्रो

ट्रेन्स सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. नागपूर मेट्रो मार्गिकेला उपमार्ग सेवेने (फिडर सर्व्हिस) ही सेवा जोडली जाईल. महामेट्रो, राज्य शासन व भारतीय रेल्वे यांच्या दरम्यान झालेल्या सामंजस्य करारनाम्यास कार्योत्तर मंजुरीही देण्यात आली आहे.

परवानग्यांची संख्या १०

राज्यात हॉस्पिटॅलिटी म्हणजेच आदरातिथ्य क्षेत्रासाठी क्रांतिकारी निर्णय पर्यटन विभागाने घेतला असून राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या निर्णयामुळे आदरातिथ्य उद्योग सुरू करण्यासाठी ७० परवानग्यांऐवजी आता १० परवानग्या तसेच ९ स्वयं प्रमाणपत्रे लागतील.

उच्चदाब वितरण प्रणाली

राज्यातील कृषिपंप अर्जदारांसाठी उच्चदाब वितरण प्रणाली योजना राबवण्यासाठी एशियन डेव्हलपमेंट बँकेकडून २,२४८ कोटी रुपये (३४६ दशलक्ष युएस डॉलर) इतके कर्ज घेण्यास राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. ३१ मार्च २०१८ अखेर पैसे भरून वीज जोडणीकरिता प्रलंबित असलेल्या राज्यातील सर्व कृषिपंप अर्जदारांकरिता उच्चदाब वितरण प्रणाली योजना राज्यात महावितरण कंपनीमार्फत राबवण्यात येत आहे. त्या अनुषंगाने एशियन डेव्हलपमेंट बँकेसोबत विहित नमुन्यात केंद्र शासन/ राज्य शासन व महावितरण कंपनीमार्फत अनुषंगिक करार करण्यात येणार आहेत.

कर्ज परतफेड : कालावधीबाबत निर्णय

नव तेजस्विनी-महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प राबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीकडून घेण्यात येणारे दीर्घ मुदतीचे कर्ज १.२५ टक्के व्याजदर व ०.७५ टक्के सेवा शुल्क, कर्जाच्या परत फेडीसाठी ५ वर्ष अधिस्थगन कालावधी (Moratorium Period) आणि कर्जाची परतफेड ही कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर ५ वर्षानंतर सुरू होऊन २० वर्षापर्यंत करण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला.

अटल भूजल योजना

राज्यात १३ जिल्ह्यांमध्ये केंद्र शासन पुरस्कृत अटल भूजल योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. या जिल्ह्यातील ७३ पाणलोट क्षेत्र, १३३९ ग्रामपंचायतीमधील १४४३ गावांमध्ये ही योजना राबवण्यात येईल. घसरणाऱ्या भूजल पातळीला आळा

घालून, भुजल पुनर्भरणाच्या उपाययोजनांद्वारे तसेच जल संधारण व कृषी विभागाकडील सूक्ष्म सिंचनाच्या उपाय योजनांद्वारे भूजल पातळीमध्ये सुधारणा करणे हा या योजनेचा मुख्य हेतु आहे.

मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना

केंद्र सरकारने नुकतेच संमत केलेल्या कृषीविषयक कायद्यांच्या राज्यातील अंमलबजावणी संदर्भात मंत्रिमंडळ उपसमिती स्थापण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या कायद्याच्या अनुषंगाने राज्यातील विविध शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींशीदेखील चर्चा करण्यात येणार असून त्या आधारे योग्य त्या सुधारणांचा मसुदा मंत्रिमंडळ उपसमितीसमोर सादर करण्यात येईल व त्यानंतर मंत्रिमंडळ बैठकीत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

वार्षिक सर्वसाधारण सभांसाठी मुदतवाढ

कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर राज्यातील सहकारी संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा ३१ मार्च २०२१ पर्यंत घेण्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. कोरोनाच्या उद्रेकामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे सहकारी संस्थांना निवडणूक, वार्षिक सर्वसाधारण सभा, लेखापरीक्षण तसेच पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ याबाबतीत कायदेशीर अडचणींचा सामना करावा लागत होता. यातून मार्ग काढण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील विविध कलमातदेखील सुधारणा करण्यात येतील.

वृक्ष संरक्षण कायद्याचे नियमन

वृक्ष संरक्षण व जतनासंदर्भात विषयक कायद्याचे नियमन आता नगरविकास विभागाऐवजी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत करण्यास मान्यता देण्यात आली.

वातावरणीय बदलाच्या दृष्टीने पर्यावरण विभागातर्फे कृती आराखडा विविध विभागांमार्फत राबवण्यात येत असून यामध्ये वृक्ष लागवड, अस्तित्वातील वृक्षांचे जतन व संगोपन हे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यामुळेच सदरील महत्त्वाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी हा निर्णय घेण्यात आला.

पोलीस शिपाई : रिक्त पदे भरणार

पोलीस शिपाई संवर्गातील १२ हजार ५२८ पदे १०० टक्के भरण्यात येत आहेत. यासंदर्भात वित्त विभागाच्या ४ मे २०२० च्या शासन निर्णयातून सूट देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या आरक्षणास दिलेल्या अंतरिम स्थगितीच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणी सामान्य प्रशासन विभाग व विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे मंत्रिमंडळाने गृह विभागाला निर्देशित केले आहे.

स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना

राज्यात स्व.बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना राबवण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी राज्य आरोग्य हमी सोसायटीस आर्थिक अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल. त्याचप्रमाणे विहित पद्धतीने विमा कंपन्यांची निवड करण्यात येईल. या योजनेत राज्यातील रस्त्यावर झालेल्या अपघातामधील व्यक्तिंना याचा लाभ मिळेल. ही व्यक्ती कोणत्याही राज्य, देशाची असली तरी देखील त्यांना योग्य ते वैद्यकीय उपचार देण्यात येतील. अपघातग्रस्तांना गोल्डन अवरमध्ये तत्परतेने वैद्यकीय सेवा व आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यासाठी या योजनेचा उपयोग होईल. या योजनेत पहिल्या ७२ तासांसाठी जवळच्या रुग्णालयांमधून उपचार करण्यात येतील.

सुमारे ७४ उपचार पद्धतीतून ३० हजार रुपयांपर्यंतचा खर्च मोफत केला जाईल. यामध्ये अतिदक्षता विभाग व वॉर्डामधील उपचार, अस्थिभंग तसेच रुग्णालयाच्या वास्तव्यातील भोजन याचा समावेश असेल. यामध्ये औद्योगिक अपघात, दैनंदिन कामातील किंवा घरी घडलेले अपघात व रेल्वे अपघाताचा समावेश नाही. या योजनेसंदर्भात कोणतीही तक्रार नोंदवण्यासाठी टोल-फ्री क्रमांकदेखील असेल. राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी यांच्यामार्फत ही योजना कार्यान्वित होईल.

शाळांना अनुदान

प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अशा एकूण २१६५ शाळांना २० टक्के व या याआधीच २० टक्के अनुदान घेणाऱ्या २४१७ शाळांना अतिरिक्त २० टक्के अनुदान १ नोव्हेंबर २०२० पासून देण्याचा निर्णय घेण्यात आला. याचा लाभ एकूण ४३ हजार ११२ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना होणार आहे.

कृषी महोत्सव

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये कृषी महोत्सव आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली. हा महोत्सव ५ दिवसांचा असेल कोरोनाची परिस्थिती आटोक्यात आल्यास या वर्षात राबवण्यात येईल. अन्यथा पुढील वर्षापासून आत्मा नियामक मंडळाच्यामार्फत हे महोत्सव आयोजित केले जातील. शेतकऱ्यांना कृषी विद्यापीठ, कृषी संशोधन केंद्र यांच्यामार्फत आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती उपलब्ध होते तसेच शेतकऱ्यांना ग्राहकांसाठी थेट विक्रीची संधी मिळते. म्हणून या जिल्हा कृषी महोत्सव योजनांचे आयोजन केले जात आहे.

प्राध्यापकांची पदे निवड मंडळामार्फत

राज्यातील शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील अध्यापकांची रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतून वगळून ती निवड मंडळांमार्फत भरण्याचा कालावधी वाढवण्यास मान्यता देण्यात आली. हा कालावधी ३१ मार्च २०२० पर्यंत होता तो आता ३१ मार्च २०२१ पर्यंत वाढवण्यात आला आहे.

कृषी पर्यटन धोरण

राज्यातील शेतकऱ्यांना पूरक व्यवसाय आणि नागरिकांना पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी राज्यात कृषी पर्यटन धोरण राबवण्यास मान्यता देण्यात आली. कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास, शेती उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करणे, कृषिपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देणे, गावातील महिला तरुणांना रोजगाराची संधी देणे, लोककला आणि परंपरांचे दर्शन घडविणे, पर्यटकांना प्रत्यक्ष शेतीतील कामाचा अनुभव देणे, प्रदूषणमुक्त व निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याचा अनुभव देणे असा या धोरणाचा उद्देश आहे. यासाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकऱ्यांच्या कृषी सहकारी संस्था, कृषी विज्ञान केंद्र, कृषी महाविद्यालये, कृषी विद्यापीठे, शेतकऱ्यांच्या भागीदारी संस्था किंवा कंपन्या या कृषी पर्यटन केंद्र उभारू शकतात. या पर्यटन केंद्रांना पर्यटन विभागाकडून नोंदणी प्रमाणपत्र मिळेल, त्यांना बँक कर्ज मिळू शकेल. वस्तू व सेवा कर तसेच विद्युत शुल्क इत्यादीचा लाभ घेता येईल. दोन एकर ते पाच एकरपर्यंत शेतीचे क्षेत्र असणाऱ्या ठिकाणी राहण्याची सोय असलेल्या खोल्या आवश्यक असून या ठिकाणी भोजन व्यवस्था व स्वयंपाकघर असावे.

www.maharashtratourism.gov.in या संकेत स्थळावर तसेच प्रादेशिक उपसंचालक, पर्यटन संचालनालय कार्यालयात अर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

संग्रहित

पूरग्रस्तांना वाढीव दराने मदत

नागपूर विभागात ३०-३१ ऑगस्ट व १ सप्टेंबर रोजी निर्माण झालेल्या पूर परिस्थितीमुळे तातडीची मदत म्हणून १६ कोटी ४८ लाख २५ हजार रुपये निधी वितरित करण्यात आला आहे. या संदर्भात राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून खर्च करण्यास आणि वाढीव दराने मदत देण्यासाठी होणारा खर्च राज्य शासनाच्या निधीमधून करण्यास मान्यता देण्यात आली. मध्य प्रदेशच्या छिंदवाडा व शिवणी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाल्यामुळे उपनद्यांना पूर येऊन ही परिस्थिती निर्माण झाली.

टीम लोकराज्य

‘पोषण माह’मध्ये राज्य अव्वल

आपले वेगळेपण जपत सदैव सर्वोत्कृष्टतेचा ध्यास असलेले आपले राज्य हे देशातील एक अग्रगण्य राज्य ठरले आहे. नव विचार, आधुनिक सुधारणा, मानवी हक्क, स्त्री हक्क, बाल हक्क, जन आरोग्य आदी क्षेत्रात महाराष्ट्राने कायमच आपला वेगळा ठसा उमटवला आहे. आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात महाराष्ट्र कायमच अग्रेसर राहिला आहे. महिला आणि बाल विकास या क्षेत्रातही महाराष्ट्राने अशीच उत्तम कामगिरी केली आहे. पोषण महिना २०२० या ‘पोषण माह’ राष्ट्रीय जन आंदोलन कार्यक्रमात महाराष्ट्राने देशात सर्वाधिक उपक्रम राबवून पहिला क्रमांक पटकावला आहे.

ॲड. यशोमती ठाकूर
महिला व बालविकास मंत्री

महिला व बालविकास विभागातर्फे आम्ही राबवत असलेल्या ‘सक्षम महिला, सुदृढ बालक, सुपोषित महाराष्ट्र’ या संकल्पनेला जनचळवळ बनवण्याचा संकल्प केला असून त्या दृष्टीने कार्यवाहीदेखील सुरू केली आहे.

देशाला कुपोषणमुक्त करण्यासाठी पोषण अभियान राबवले जाते. २०१७ च्या सर्वेक्षणानुसार सुमारे ३४ टक्के बालकांची ऊंची ही त्यांच्या वयाच्या मानाने कमी आहे. यामुळे या बालकांची त्यांच्या नैसर्गिक क्षमतेप्रमाणे शारीरिक व बौद्धिक वाढ होत नाही. याचा विपरीत परिणाम थेट त्यांच्या आरोग्यावर आणि शिक्षणावर होतो; पर्यायाने कुटुंबावरही होतो.

देशातील पहिले राज्य

अंगणवाडी पर्यवेक्षिका, सेविका, मदतनीस यांच्या माध्यमातून ग्राम तसेच नागरीस्तरावर लहान बालकांचे शिक्षण आणि पोषण, गर्भवती महिला, स्तनदा माता तसेच काही ठिकाणी किशोरवयीन मुलींना पोषण आहार वितरण केले जाते. ‘एकात्मिक बाल विकास सेवा योजना-महाराष्ट्र’च्या (आयसीडीएस) माध्यमातून हे काम देशामध्ये आपल्याकडे अत्यंत प्रभावीपणे होत आहे. त्यामुळे पोषणाच्या बाबतीत आपण खूप वरच्या स्तरावर आहोत. असे असले तरी कुपोषणाची समस्या गंभीरपणे घेत राज्याने ‘युनिसेफ’च्या साहाय्याने ‘राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य आणि पोषण मिशन’ सुरू केले. बालकांतील कुपोषणाचे प्रमाण कमी करणे आणि कुपोषणाने होणाऱ्या बालमृत्यूची समस्या दूर करणे अशी या मिशनची उद्दिष्टे

बालकांना सकस नैसर्गिक आहार मिळावा यासाठी सेंद्रिय पद्धतीने अंगणवाडी परिसरात स्थानिक फळभाज्या, पालेभाज्यांसाठी साकारलेली परसबाग.

आहेत. असे अभियान (मिशन) सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. सकस पोषणाचा संकल्प सिद्धीस नेण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पंचसूत्री तयार केली आहे.

- बाळाचे पहिले १००० दिवस
- योग्य स्तनपान
- पूरक पोषक आहार
- वाढीचे सनियंत्रण व संवर्धन
- किशोरवयीन मुलींचे शिक्षण आहार व लग्नाचे योग्य वय
- या पंचसूत्री पोषणाचा संकल्प तडीस नेण्याचा महामार्ग ठरणार आहे.

पूर्ण पोषणाचे ध्येय

राज्याने पोषण आहारासंबंधीचे आव्हान ओळखून, मुलांना योग्य आहार म्हणजेच पूर्ण पोषण मिळावे यासाठी ठोस पावले उचलली. बाळाच्या शारीरिक व बौद्धिक वाढीसाठी आवश्यक आहार व आहार देण्याच्या पद्धतीमध्ये पूर्णत्व आणणे हेच पूर्ण पोषणाचे ध्येय्य आहे. गेल्या वर्षभरात महिला, किशोरवयीन मुली व बालकांच्या पोषणासंदर्भात जनजागृती करण्यासाठी, त्याला चळवळीचे स्वरूप देण्यासाठी 'यशोदा माता अंगत-पंगत', 'मूठ भर धान्य', 'गोपाळ पंगत', 'अक्षय पात्र', 'दुर्गा बाल गणेश' आदी नावीन्यपूर्ण कार्यक्रम घेण्यात आले. जन्माष्टमी, गणेशोत्सवासोबत पोषण अभियान कार्यक्रमाची सांगड घालण्यात आली.

'पोषण माह'साठी नियोजन

अचूक नियोजन केल्यामुळे यावर्षीच्या 'पोषण माह'मध्ये राज्याने पहिला क्रमांक पटकावला हे विशेषत्वाने नमूद करावेसे वाटते. ७ ते ३० सप्टेंबर या कालावधीत हे अभियान राबवले गेले. अभियान राबवण्यापूर्वी सर्व मंत्र्यांसोबत आणि विभागांसोबत बैठक घेतली. अभियान प्रत्यक्ष फिल्डवर राबवताना येणाऱ्या अडचणी आणि त्यावरील उपाययोजनांबाबत विविधांगी विस्तृत चर्चा झाली. राज्यातील खासदार आणि आमदार यांनादेखील या अभियानात सहभागी करून घेण्यात आले.

अभियान जनसामन्यांच्या घराघरात आणि मनामनांत पोहोचवण्यासाठी जनसामान्यांच्या भाषेत संवाद साधण्यात आला. या सगळ्या अभियानादरम्यान सर्व विभाग, संस्था आणि कर्मचारी यांच्याशी सुसंवाद साधण्याचे काम महिला व बालविकास विभागाच्या सचिव आय. ए. कुंदन आणि एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्त इंद्रा मालो यांनी केले. यामुळे आम्ही राज्यभरात अभियान काळात ६ कोटी १८ लाख ७९ हजार १९० उपक्रम राबवू शकलो. त्याशिवाय सहभागींच्या संख्येनुसार ६३ कोटी ५२ लाख ६३ हजार ४४३ या संख्येने देशात दुसऱ्या क्रमांकावर राहिलो.

पोषणबाग व 'सॅम'

'पोषण माह'दरम्यान अतितीव्र कुपोषित बालकांचे (सॅम) व्यवस्थापन व कुपोषणमुक्ती तसेच 'परसबाग' अर्थात पोषणबाग या दोन संकल्पनांवर विशेष भर देत उपक्रम आखून अंमलबजावणी केली. ग्रामीण भागात आढळलेल्या सॅम बालकांना कुपोषणातून बाहेर काढण्यासाठी ग्राम बाल विकास केंद्रात (व्हीसीडीसी) पूरक पोषण आहार, औषधे देण्यासह पालकांचे समुपदेशन करण्यात येत आहे. पोषण माहमध्ये ग्रामीण भागात नऊ हजारावर तर शहरांमध्ये साडेअकरा हजारांच्यावर सॅम बालके आढळून आली.

बालकांना सुरुवातीच्या कालावधीतच पोषण घटकयुक्त सकस नैसर्गिक आहार उपलब्ध होणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी सेंद्रिय पद्धतीने स्थानिक फळभाज्या, पालेभाज्या अंगणवाडी, शाळा आवारात लागवड करणे; आणि त्यातून उपलब्ध होणाऱ्या भाज्यांचा बालकांच्या दैनंदिन गरम ताजा आहारात समावेश करण्याच्या दृष्टीने 'परसबागा' अर्थात 'पोषणबागा' हा उपक्रम पूर्वीपासूनच राबवत आहोत. राज्यात जून- जुलैमध्ये साडेनऊ हजारांवर इतक्या पोषणबागा तयार करण्यात आलेल्या होत्या. पोषण माहदरम्यान विशेष मोहीम घेऊन सुमारे साडेतेरा हजार पोषणबागा नव्याने तयार करण्यात आल्या.

आव्हानांवर मात

सध्या कोरोना महामारीच्या काळात पोषण अभियान राबवताना विभागासमोर असंख्य आव्हाने आहेत. टाळेबंदीचा अभियानावर परिणाम झाला आहेच, शिवाय मुलांवरही याचा परिणाम झाला. परंतु, याही परिस्थितीत सातत्याने विभागाचे कर्मचारी, आमच्यासोबत काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, प्रत्यक्ष कार्यस्थळावर काम करणाऱ्या अंगणवाडी व आशा सेविका झटत आहेत.

कोरोना परिस्थितीमुळे अनेक आव्हाने होती. बालकांना कोरोनाच्या धोक्यापासून सुरक्षित ठेवण्यासाठी मार्चपासूनच

अंगणवाड्या बंद ठेवाव्या लागल्या. त्यामुळे नियोजनात बदल करत गरम ताजा आहारऐवजी बालकांना घरपोच पोषण आहार (टीएचआर - टेक होम रेशन) पुरवठ्याचा निर्णय घेतला गेला. या काळात आम्ही स्तनदा माता, लहान बालके अशा ७४ लाख लाभार्थ्यांना पोषण आहार पोहोचवण्याचे शिवधनुष्य पेलले. लॉकडाऊनमध्ये योग्य शारीरिक अंतर, कुपोषणमुक्ती, गरोदरपणातील काळजी, पोषण-सुपोषण यावर राज्यस्तरावर अनेक विशेष वेबिनार आयोजित केले. स्मार्टफोनवरून ऑनलाइन प्रशिक्षण सत्रे आयोजित केली. शक्य तेथे पालकांचेही व्हॉट्सॲप ग्रुप करून सतत संपर्कात राहिल्याने पालक आणि बालकांशी संवाद साधता आला.

पोषण माह हे तर एक महिन्यासाठी संवाद साधणार आहोत. यामध्ये हेल्पलाइन, ब्रॉडकास्ट कॉल, व्हॉट्सॲप चॅटबोटचा समावेश आहे. ८०८०८०९०६३ या क्रमांकावरून गरोदर महिला, स्तनदा मातांना व्हिडिओ, ऑडिओ, व्हॉट्सॲपच्या माध्यमातून पोषण आहार, संपूर्ण पोषण, आरोग्याची काळजी, पाककृती आदींची माहिती दिली जाणार आहे. अर्थात महाराष्ट्राच्या या भरीव

सॅनिटायझर, हॅण्डवॉशचा वापर आदी सुरक्षेचे उपाय करून बालकांची वजने, मापे घेण्याचे काम विनाव्यत्यय सुरू केले गेले. त्याचाही फायदा पुढे 'पोषण माह' उपक्रमादरम्यान झाला.

तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर

कोविड-१९च्या कालावधीमध्ये पालकांच्या घरोघरी जाऊन भेट घेणे, अंगणवाडी सेविकांनाही वेळोवेळी पोषणाच्या अनुषंगाने प्रशिक्षण देण्याबाबत अडचणी आल्या. त्यावर आम्ही तंत्रज्ञानाच्या मदतीने यशस्वीपणे मात केली. या कालावधीत आम्ही निमियामुक्त भारत, बाळाचे १००० दिवस, राबवण्याचे अभियान होते. परंतु, पोषणाच्या संकल्पनेला अशी कालमर्यादा घालणे योग्य राहणार नाही. ही तर रोजच्या जीवनाशी निगडित बाब आहे. त्यामुळे आम्ही ते वर्षभर राबवण्याचे ठरवले आहे.

ऑनलाइन संवाद

नुकतेच आम्ही 'तरंग सुपोषित महाराष्ट्राचा' या आय.व्ही.आर. (इंटरक्टिव्ह वॉइस रिस्पॉन्स) प्रणालीवर आधारित ऑनलाइन संवाद व्यासपीठाचे लॉंचिंग केले असून त्या माध्यमातून डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे घराघरांत पोहोचत स्तनदा माता, बालकांचे पालक यांच्याशी

कामगिरीचे श्रेय, हे प्रत्यक्ष आघाडीवर लढणाऱ्या माझ्या सर्व अंगणवाडी सेविका, महिला व बालविकास विभाग, एकात्मिक बालविकास योजना, महाराष्ट्र यांचे सर्व अधिकारी कर्मचारी आणि या कामात सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवी संस्था या सर्वांचे आहे यात शंका नाही. 'सक्षम महिला, सुदृढ बालक, सुपोषित महाराष्ट्र'चे ध्येय साकार करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

शब्दांकन : सचिन गाढवे,
विभागीय संपर्क अधिकारी

राजन दांडेकर,
मुक्त पत्रकार

महाराष्ट्र शासन

दीप आशेचे...

डॉक्टर्स, नर्स, आरोग्य सेवक, पोलिस यंत्रणा, अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी हे कोरोनाविरुद्धच्या लढाईत अग्रभागी आहेत

राज्य शासन जनसामान्यांसाठी आरोग्य सुविधा पुरविण्याकरिता पावले उचलीत आहे

- महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेतून राज्यातील सर्व जनतेला मोफत व कॅशलेस विमा संरक्षण देणारे महाराष्ट्र एकमेव राज्य
- मुंबईसह राज्यातील सर्व खासगी व धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या रुग्णालयांमधील एकूण खाटांच्या ८० टक्के खाटा कोरोना उपचारासाठी राखीव ठेवल्या. उपचाराच्या दरावर देखील नियंत्रण
- मुंबई, ठाणे, पुणे येथे उपचारासाठी जम्बो सुविधांची उभारणी
- अतिदक्षता विभागातील (आयसीयु) रुग्णांना विशेषज्ञांचे मार्गदर्शन आणि उपचारासाठी 'टेलीआयसीयु' सुविधा. भिवंडी, जळगाव, सोलापूर, औरंगाबाद, अकोला आणि जालना या ७ ठिकाणी सुविधा सुरू
- रुग्णालयांनी योग्य बिलं आकारावीत यासाठी भरारी पथक नेमले
- कोरोना रुग्णांसाठी ऑक्सिजनची वाढती गरज लक्षात घेऊन वैद्यकीय प्राणवायू उत्पादन करणाऱ्यांना वैद्यकीय क्षेत्रासाठी ८० टक्के आणि उद्योगांसाठी २० टक्के प्राणवायू देण्याचे बंधनकारक.

सर्वसामान्यांना केंद्रबिंदू ठेऊन दर निश्चिती

- खासगी प्रयोगशाळेतील चाचण्यांसाठी ४५०० रुपयांवरून ९८० रुपये दर निश्चित
- एच.आर.सी.टी. चाचणीकरिता २ हजार ते ३ हजार रुपये कमाल दर निश्चित
- प्लाझ्मा थेरेपीसाठी प्लाझ्मा बॅगसाठी (२०० मि.ली.) साडेपाच हजार इतका कमाल दर निश्चित
- नागरिकांना योग्य किंमतीत मास्क मिळण्यासाठी महाराष्ट्र देशात प्रथम. एन ९५ मास्क १९ ते ४९ रुपयांपर्यंत तर दुपदरी आणि तीनपदरी मास्क ३ ते ४ रुपयांना मिळणार
- कोरोना योद्धयांना विमा कवच

या प्रयत्नांना साथ हवी आहे जनतेची काळजी घेऊ, जपून राहू

माझे कुटुंब
माझी जबाबदारी

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

कोविड-१९ हा संसर्गजन्य रोग आहे आणि तो कोणालाही होऊ शकतो.

आपल्या सुरक्षिततेसाठी आवश्यक आहे

घरीच राहा | एकमेकांमध्ये योग्य अंतर ठेवा | हात वारंवार साबणाने स्वच्छ धुवा | श्वसनासंबंधी स्वच्छता राखा

आपण सर्वजण मिळून कोविड-१९ विरुध्द लढू या

अधिक माहितीसाठी संपर्क साधा

• राष्ट्रीय कॉल सेंटर क्र. +९१-११-२३९७८०४६ • राष्ट्रीय नियंत्रण कक्ष क्र. ०२०-२६१२७३९४ • टोल फ्री हेल्पलाइन क्र.१०४ .बीएमसी हेल्पलाइन क्र. १९१६

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन

NHM

unicef for every child

/MahaArogyaIECBureau @MahaHealthIEC /mahahealthiec /MahaHealthIEC

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

If undelivered, please return to:

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., ए-१८०/४, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७०३ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: डॉ. दिलीप पांढरपट्टे